Ano 9 N. 41

...-feira 8 de Janeiro de 1925

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
...nha ainda que repetida uma tanga
...me ... avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
P. Hegdo Dessay
Quepem-Goa

# भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक ४१

गुरुवार ता. ८ जानेवारी सन १९२५

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. ( आगाऊ )

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें-गोंवा

S. R. Biblioteca Nacional Pangim 2
8-JAN-25

## Regime de papelada

Vezes sem conta temos condenado o regime de papelada que entre nós campêa infrene. em grave prejuiso, tanto dos governantes c mo dos governados.

Para o leitor poder fazer, mais uma vez, idêa nitida de que seja o mesmo regime, inserimos a seguir o que a respeito dêle diz o jornal *Noticias* de Margão.

Regime de papelada! E' o maior cancro que noa roe o mais precioso objecto que possuimos: o tempo. O que nao quere dizer que o tal sistema deixe de incomodar, tambem, as magras e esfarrapadas algibeiras do Zé-povinho.

Se não, que digam os governantas e os governados, lendo o seguinte:

Extinguiu-se o regime da monarquia, mas não se extinguiu o regime de papelada nas repartições do Estado. Temos hoje o telefonio, e contudo as tais notas de serviço e oficios são por uma pá velha. Para dizer digo que não digo, lá temos um oficio. E para dizer digo o que digo, uma nota de serviço. E o papel que se consome é em milhares de balas. Nada diremos do tempo que se perde, porque se daquela maneira se não gastasse o tempo nada haveria que fazer.

Isto posto á guisa de preambulo, vamos contar um caso que de simples passou a ser composto, sucedido em uma colónia nos tempos dos *ladrões da monarquia*, assim classificados por alguem, entre socos e murros nas mesas.

Um tambor de uma banda regimental mostrou ao seu regente uma baqueta partida e pediu que mandasse facturar uma outra. E o regente disse que nas despesas que estava autorisado a fazer não entrava o pagamento para a compra das baquetas. Que este assunto era da competencia do chefe do Estado Maior, a quem ia oficiar.

E lá foi dirigido o oficio com este chavão do estilo: Tenho a honra de...

Resposta do chefe do Estado Maior: Que não estava nas suas atribuições autorizar despezas afora das marcadas nos regulamentos das bandas. Que por isso, ia participar o caso ao sr. governador por oficio.

E o governador responde dizendo que tendo sido criadas as bandas regimentais por decreto ministerial, é ao ministro que cabe d r providencias para o assunto em questão. Que por tanto tinha que oficiar ao ministro.

Decorrem seis mezes. Do ministerio nenhuma resposta. O governador é pedido pelo regente para em telegrama fazer lembrar ao ministro o assunto. E o telegrama é feito. Nem pio. Mais telegrama. Mais outro. Mais outro. Silêncio!

Decorrem anos, e o regente da banda, finda a sua comissão regressa para Portugal, trata do caso no ministerio, e consegue liquidá-lo.

Feita a conta do custo dos telegramas, deu a soma cêrca de 300 mil réis. E a mais bem facturada baqueta não custaria então nem uma corôa ( 500 réis ) !!!

### AO PUBLICO

Recebemos uma folha solta da especie de *Ao Publico*, da Camara Municipal de Sanguem, que promete elucidar o Povo sobre factos sensacionais que tem havido na mesma instituiçao, constituindo farto pasto a' curiosidade indigena.

Venha a mesma elucidagao que so' depois de estuda la emitiremos sobre o caso a nossa modesta opiniao.

... कीती तरी
... नसतानां दिसले असनील.

# ECOS & CRITICA

### INTRIGAS

Muitos hindu's de Goa foram assistir ao Congresso Nacional Indiano, a cujas sessoes, realisadas, como se sabe, em Belgao asistiram, tambem, cristaos goeses, como o sr. J. J. da Cunha que nelas representou ate' o jornal *A Terra* de Margao, e outros.

Os inimigos dos hindu's, porem, aproveitaram da ida deles ao mesmo Congresso para os malquistar com a colonia europea da India, inventando mentiras, como por exemplo, a de ter sido convidado o *Mahatma' Gandhi* para Goa por uma deputagao hindu'. *Mahatma'* que e' considerado, equivocamente por muitos, entre no's, como um revolucionario tremendo.

Certo e', todavia, que ninguem o convidou para ca' pelo simples motivo do santo patriota do Indostao estar decidido a nao se divertir com passeatas onde nao tenha nenhuma missao patriotica a cumprir.

Mas, mesmo que tivesse havido convite ao *Mahatma* para visitar Goa ¿que mal teria disso resultado a nossa terra ? Nenhum.

E' que Gandhi e' apostolo de paz e nao violencia. *A* sua politica basea-se na *linha* e no *Charca'*. Detesta e repele tudo o que cheire a odio, sangue, violencia e outras coisas semilhantes Aconselha frugaldade no comer e simplicidade no vestir.

Numa palavra. Gandhi, e' um *mahatma'* que pelo credo politico e religioso que professa, e' comparado com o Cristo que conta na nossa terra *essencialmente catolica* numerosos adeptos.

Nao pega, pois, o perigoso plano daqueles que tentaram em vao indispor os hindu's com a nossa colonia europea, atribuindo-lhe propositos que nunca tiveram e que, mesmo que os tivessem, nao teria advindo deles a ninguem mal algum.

### CARTA DA CAPITAL

Recebemos uma carta de Pangim, na qual o seu autor, *Diavolo* se insurge contra a insinuaçao do "pendor anti portugues'", estampada nas colunas pelo "Heraldo" do ... nha, a proposito do cente... Gama.

O Diav... ... o "pendor anti estomacal" que vai directamente, de encontro com o "pendor anti-indio" que o sr. Antonio Maria e outros da mesma marca revelam.

### PROCESSOS POLITICOS

Surge por ai um *Recruta* do numero digito a indigitar aos competentes a falta de delicadeza de "Mundasso's Chogo's e pudvens" na festa do Gama pretendendo a seu modo insinuar que os hindu's se acham dominados por um "pendor anti-portugues".

Era escusada a intriga, porquanto e' demasiado conhecida de todos a sinceridade do ideal e processos politicos dos hindu's que nao alimentam sentimentos menos honestos e menos delicados por ninguem, ainda que seja desassombrada a sua maneira de encarar algumas personalidades portuguesas historicas.

Os hindu's presam mais a verdade do que a elasticidade abdomenal, preferindo siecеridade a' bajulaçao.

### CRITICA ALHEA...

O sr. J. J. da Cunha, referindo-se a's festas do Centenario escreve na *Terra* o seguinte:

Em quanto naquela India o seu povo reclama constitucionalmente, pelas vozes dos seus campeões, autonomia completa com poderes para regular as finanças, receitas e despesas públicas, nesta India o seu Povo com os seus dirigentes á frente se entretem em folias para festejar (que ironia!) a morte (o seu 4.° centenário ) de D. Vasco da Gama, o inclito argonauta, com iluminações, fogos e discursos, cujos sons e cuja memória passarão em po... gastando nessas ... perrimo te... mais ...

... खिळे, ... पत्रें व इतर सर्व ... दरानें विकल्या जातात.
... माल चोख, व्यवहार रोख.
अनुभवानें खात्री करून घ्या !

# विचार-लहरी

**लहर १० वी.**

मागील लहरींत सांगितल्याप्रमाणें दार्शनिक काळाकडे वळूं. या काळांत श्रेष्ठ असे तिघे दार्शनिक उत्पन्न झाले. ते कपिल, महावीर व बुद्ध हे होत.

\+ + +

सांख्य मताचे प्रस्थापक कपिल हे होत. गौतमबुद्ध व कपिल हे एकाच शहरांत जन्माला आले. परंतु गौतम बुद्धाचा काळ कपिलानंतर शंभर वर्षांचा होय. आद्य दर्शनकार या नात्यानें कपिलांची योग्यता फार मोठी आहे. आणि ह्मणूनच भागवतामध्यें त्यांना अवतार असें ह्मटलेलें आहे. सांख्यशास्त्राची योग्यता इतकी मोठी आहे कीं, महा भारतामध्यें नारद ऋषींनीं दक्ष प्रजापतींच्या मुलांना सांख्य शास्त्राचें अध्ययन करण्यास सांगितलें आहे. सांख्य मत निरीश्वर वादी आहे. इतर बहुतेक सर्व धर्म अगर पंथ ज्या एका सर्वशक्तिमान ईश्वराचें अस्तित्व मानतात अगर ज्या शक्तीच्या योगें हें विश्व चालतेंअसें समजतात, तें मत कपिलांना मान्य नाहीं. हें विश्व चालविण्याला एका सर्व शक्तिमान परमेश्वराची जरूरी आहे असें त्यांना वाटत नाहीं. ते ह्मणतातः–

\+ * +

प्रकृति व पुरुष ह्या दोनच सद्वस्तु होत. पुरुष ह्मणजे आत्मा. हा निर्विकार आणि निष्क्रीय असा असून फक्त साक्षी असतो. जगांत ज्या घडामोडी होतात त्या प्रकृतीच्याच योगें होत. प्रकृतीच हे सर्व खेळ खेळण्याला समर्थ आहे. प्रकृतीमध्यें सत्व, रज, आणि तम हे गुण ज्यावेळीं सारखे असतात त्या वेळीं ती साम्यामध्यें असते व यांत जेव्हां बिघाड होऊं लागतो तेव्हां प्रकृति आपले खेळ खेळण्याला सुरवात करते. आत्म्याचें मात्र तसें नाहीं. तो केवळ साक्षी असतो. प्रकृतीची गांठ पडली ह्मणजे आत्म्याचें शुद्ध आणि निर्विकार स्वरूप मूळ स्वरूपापासून भिन्न होतें. आत्म्याला जें दुःख भोगावें लागतें तें प्रकृतीच्या संगतीमुळें होय. हिच्यापासून मुक्त होण्याची तयारी करणें ह्मणजेच पूर्व स्वरूपास जाऊन मिळणें होय.

* * *

ह्यावरून कपिलमुनीचें मत काय आहे हें कळून येईलच. त्यांच्या मतें ह्या विश्वचालनाला सर्व शक्तिमान परमेश्वराची गरज नाहीं. हें करण्याला प्रकृतीच समर्थ आहे आम्हीं अगर इतर बहुजन समाज ज्या एका सर्व शक्तिमान परमेश्वराचें अस्तित्व मानतों तें मत त्यांना बिलकूल पसंत नाहीं. ते ह्मणतात परमेश्वर मुक्त स्थितींत असला पाहिजे. तरी अशा मुक्त स्थितींत असलेल्या परमेश्वराला तेथें त्या स्थितींत कोणत्याहि तऱ्हेच्या इच्छा उत्पन्न होणें शक्य नाहीं. असें जर आहे तर त्यानें हे विश्व विनाकारण कां उत्पन्न करावें?

\+ + +

अशा ईश्वराचें अस्तित्व जरी कपिलमुनी मानीत नसले तरी पण ते दुसऱ्या एका परमेश्वराचें अस्तित्व मानतात. ते द्वैतवादी आहेत- त्यांच्यामतें पुरुष अनंत आहेत व प्रत्येक आत्मा आपापल्यापरी मुक्तावस्थेस जाण्याचा प्रयत्न करीत आहे. यावरून जो आत्मा मुक्त होतो तो त्याची इच्छा असल्यास नव्या कल्पाच्या वेळीं सर्वज्ञ असा रूपानें अवतीर्ण होतो व त्या कल्पापुरतें विश्व नियमनाचें कार्य त्याच्याकडे येतें. यावरून कोणत्याहि मनुष्याला मुक्त स्थितींत पोंचल्यावर परमेश्वर होतां येतें मात्र हें परमेश्वरत्व चिरकाल टिकणारें नाहीं असें कपिलाचें ह्मणणें आहे. प्रत्येक पुरुषाला मुक्त होण्याचा मार्ग ह्मणजे चांगलीं कर्में व ज्ञान हीं होत.

\+ + +

आतां गौतम बुद्ध काय ह्मणतात तें पाहूं. बौद्धधर्म ईश्वरवादी कीं निरीश्वरवादी याबद्दल बरेच मतभेद आहेत व अद्यापपर्यंत या वादाचा पक्का निर्णय लागलेला नाहीं. याचें कारण त्या धर्माचे संस्थापक जे गौतमबुद्ध त्यांनीं आपल्या हयातींत या बद्दलचा पक्का निर्णय दिलेला नाही. जेव्हां जेव्हां त्यांना याबद्दल प्रश्न करण्यांत येई तेव्हां तेव्हां ते बहुतकरून संदिग्ध अशीं उत्तरें देत व कधीं कधीं मुग्धता स्वीकारीत बाबू सत्येंदनाथ टागोर हे आपल्या 'बौद्धधर्म' या पुस्तकांत ह्मणतात. जीवात्मा, परमात्मा, सृष्टि, परकाल याविषयीं मानव हृदयांत ज्या स्वभावताच शंका उत्पन्न होतात त्यांना बौद्धधर्म शास्त्रामध्यें संतोषजनक असें कोणतेंच उत्तर नाहीं. याचे कारण बुद्ध देव हे सर्व प्रश्नाचीं उत्तरें देण्याला संकोच धरीत असत.

\+ + +

एकदां त्यांना मालुंख्यपुत्र नावांच्या एका शिष्यानें याविषयीं उपदेश करण्याबद्दल विनंति केली असतां ते ह्मणाले:– मालुंख्यपुत्र तूं शिष्य झालास तर या प्रश्नाचीं उत्तरें देईन असें आपणाला कधीं सांगितलें होतें काय ? त्यानीं नाहीं असें उत्तर दिलें. त्यानंतर बुद्धदेव ह्मणाले. हे मालुंख्य पुत्र, आपण रोगानें पीडित होऊन औषधाकरतां माझेकडे आलां आहां, करतां आपणाला आरोग्यदायी औषध मी सांगितलेलें आहे, मी जें प्रकाशित करूं इच्छित नाहीं तें तसेच ठेवा व जें व्यक्त केलें आहे तें प्रकाशित करा.

\+ * +

या त्याच्या मुग्धतेमुळें त्याचें खरें मत काय याबद्दल पुष्कळांना कोडें पडलेलें आहे. बौद्धाचा मिलिंद प्रश्न या नावांचा एक ग्रंथ आहे त्यांत यवनराजा मिलिंद व बौद्ध पंडित नागसेन यां यामध्यें झालेला संवाद वर्णन केलेला आहे. त्या यवन राजानेंहि याबद्दल जेव्हां त्या बौद्ध पंडिताला प्रश्न केला त्यावेळीं त्यानें असें उत्तर दिलें कीं, अशा प्रश्नांना निरुत्तर रहाणें हेंच उत्तर होय. या प्रश्नानां कांहींच उत्तर नाहीं, उत्तरें दिल्यास त्यापासून फायदा नाहीं. अशा प्रश्नानां उत्तरें देऊन वाक्यव्यय करणें बुद्धदेवानां पसंत नव्हतें.

* + *

कित्येकांच्या मतें उपनिषदांतील ब्रह्म हेंच बुद्धांचे निर्वाण होत व तें कांहीं अंशीं खरें असेल तरीपण बुद्धांना ईश्वराची प्रार्थना वगैरे करणें अनावश्यक वाटत होतें. त्याचें असें ह्मणणें होतें कीं, लोक ईश्वराकडे जाण्याच्या मार्गाकडे दुर्लक्ष करून फक्त ईश्वरास शोधित असतात. एकदां त्यानीं याबद्दल एका शिष्याला असा दृष्टांत दिला कीं, समज तूं एकाद्या गांवाला जातानां अत्यंत खोल अशी नदी लागल्यावरून तुला तींतून जाणें शक्य नव्हतें. अशा वेळीं जर तूं एका काठावर बसून दुसऱ्या कांठाची प्रार्थना करूं लागला तर तो कांठ कांहीं अलिकडे येणें शक्य नाहीं. त्याकरतां तुला होडीचाच आश्रय करून दुसरा कांठ गांठला पाहिजे. यावरून त्याचें असें सांगणें होतें कीं नुसत्या प्रार्थनादींनीं परमेश्वराकडे जाणें शक्य नाहीं तर ईश्वराकडे पोंचण्याचा खरा मार्ग ह्मणजे इंद्रियांचा जय करून मनाची शुद्धि करणें हा होय व या मार्गाचेंच जास्त विवरण त्यानीं आपल्या हयातींत केलें.

\+ × +

या सर्व विवेचनावरून त्यांना मूर्तिमंत ईश्वर personal god मान्य नव्हता असें दिसतें. त्यांचा या गोष्टीवर फार कटाक्ष होता ते असें ह्मणत असत कीं, मनुष्यें स्वतःच्या बऱ्या वाईट कर्माचें कर्तृत्व स्वताकडे न घेतां ईश्वरावर टाकतात व आपण मुक्त होऊं पहातात. यावरून पापाचा कोणी शास्ता नाहीं व पुण्याचा पुरस्कर्तीहि कोणी नाहीं. याकरतां देव आराधना अनावश्यक आहे, असें सांगत असत.

\+ + +

इतकें जरी ते सांगत असत तरी वेदांतानें जें स्थान ईश्वराला दिलें तें स्थान बुद्धांनीं कर्मवादाला दिलें. त्यांचें असें सांगणें असे कीं पापाचा शास्ता जरी कोणी नाहीं तरी पण त्याची फळें मिळाल्यावांचून मात्र रहाणार नाहींत. आपण जीं बरीं वाईट कर्में करतों त्या बऱ्या वाईट कृत्याचे परिणाम आपणाला भोगावेच लागतात. बौद्धांचा कर्मवाद इतका जबरदस्त आहे कीं, त्यांतून कांहीहि सुटणें शक्य नाहीं. आपण जीं वाईट कर्में करतों त्या कर्माचें क्षालन होईपर्यंत आपणास या मृत्युलोकीं रहावें लागणार व त्या कृत्याचे परिणाम भोगावेच लागणार. भोगितल्यावाचून सुटका होणें शक्य नाहीं व त्यांत कांहीं रदबदलीहि होणें शक्य नाहीं. करतां जर आपणाला उच्च स्थिति प्राप्त करून घेऊन मुक्त व्हावयाचें असेल तर आपण चांगल्या कर्माचें अवलंबन करून शेवटीं निर्वाण पद प्राप्त करून घ्यावें.

\+ × +

मूळ बुद्धदेवांचें जरी असें मत असलें तरी थोडक्याच काळांत त्याचें रूपांतर होत गेलें. कारण मानव स्वभावच असा आहे कीं त्याला ईश्वर मानल्याशिवाय गत्यंतर नाहीं आणि त्या कारणामुळेंच त्या धर्मांत महायान नावांचा एक नवा पंथ उत्पन्न होऊन त्यानें आपल्यांत बेधडक ईश्वराला स्थान दिलें व आज बौद्ध धर्माची स्थिति चालू हिंदुधर्माप्रमाणेंच आहे यांत शंका नाहीं.

के. भारती

# हिंदुस्थानचें राजकारण

(लेः— संजय, मुंबई.)

'भारत'ाच्या एका अंकांत गोव्याच्या कौन्सिलांत घडलेल्या प्रसंगाची हकिकत प्रसिद्ध झाल्यावर, बऱ्याच अंशीं सारख्या स्वरूपाच्या ब्रिटिश पार्लमेन्टमध्यें घडलेल्या प्रसंगाची तार २–४ दिवसांपूर्वीं इकडील वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली आहे. पार्लमेन्टच्या बैठकींत वादविवाद चालला असतां ले. क. ॲमेरी ह्यांनीं दुसऱ्या स्कॉटिश सभासदांस आक्षेपार्ह वाटणारें असें कांहीं विधान केलें. बैठक आटोपल्यावर ले. क. साहेबांची ह्या गृहस्थाबरोबर त्या संबंधीं बाचाबाची होऊन त्यानां 'कुत्रा' 'डुक्कर' व 'गटारांत लोळणारा' ह्या विशेषणाचा अहेर करण्यांत आला. एवढेंच नाहीं, तर त्यांनीं एकमेकांस चोपण्यास सुरवात केली व शेवटीं आजुबाजूच्या मंडळीस मध्यें पडावें लागून ही मारामारी थांबवावी लागली.

परवां मुंबई कॉर्पोरेशन मध्यें दुसरा पण अगदीं वेगळ्या स्वरूपाचा प्रकार घडला. कॉर्पोरेटर डॉक्टर मुखिया ह्यांना त्या दिवशींच्या वादविवादासंबंधीं कांहीं शास्त्रीय स्वरूपाचे उतारे वाचून दाखवावयाचे होते. ते वाचून दाखविण्यापूर्वीं (विनोदानें) ' मी वाचणार असलेला मजकूर ऐकणाऱ्यांना समजला पाहिजे, नाहीं तर 'डुकरापुढें मौक्तिकें' टाकण्याचाच प्रकार व्हावयाचा अशी प्रस्तावना केली. वास्तविक ह्या वा[illegible]ांत आक्षेपार्ह असें कांहींच नव्हतें. 'डुकरापुढें मौक्तिकें' हा इंग्रजी शब्दप्रयोग आपल्या 'गाढवास गुळाची चव' किंवा 'मूर्खांपुढें गीता पठण' असल्या शब्द प्रयोगांसारखा, पण, एकंदर परिस्थिति ध्यानांत घेतां ह्या प्रयोगांनी ध्वनित होणारा निंदाव्यंजक विनोद शक्य तेवढ्या कमी प्रमाणांत असलेला, असा आहे. ह्मणजे ज्यांत (वैद्यकी सारख्या शास्त्रीय ज्ञानाच्या क्षेत्रांत येणाऱ्या) ह्या विषयांत जरूर असलेलें प्राथमिक ज्ञान नाहीं त्यानां आपण वाचणार असलेल्या मजकुरांतील मुद्यांचें नीट आकलन होणार नाहीं असें डॉक्टर साहेबास सुचवावयाचें होतें. पण बॅ. जमनदास मेहतानां 'डुक्कर' हा शब्द आक्षेपार्ह वाटला व तो वापरणाऱ्यांनें तो परत घ्यावा अशी अध्यक्षांकडे मागणी केली. अध्यक्ष श्री. विठ्ठलभाई पटेल ह्यांनीं हा शब्द 'पार्लमेन्टरी' असल्याचा निकाल दिला व बिचाऱ्या बॅरिस्टर साहेबानां अध्यक्ष सुद्धां 'डुक्कर' ह्या सदराखालीं येतात

माजासाठीं असें समतोल धोरण राखिल्यावांचून कोणचाहि समाज सुखी होणार नाहीं. यःकश्चित मनुष्यसुद्धां हिंदु समाजाला फोडूं शकतो. व्यक्तिनिष्ठ मनुष्य स्वार्थ संपादून श्रीमंत झाला ह्मणून समाज श्रीमंत होत नाही. समाजाच्या प्रत्येक घटकानें स्वोन्नति करून घेतली ह्मणजे पर्यायानें समाज सुखी होईल हें ह्मणणें तत्वत: सोपें आहे, पण त्यामध्यें जर योग्य परंपरा असेल तरच समाजाची उन्नति होईल. परतंत्र होणें असा या सेवाधर्माचा अर्थ नव्हे. समाजसेवकाला पारतंत्र्याचें दुःख होणार नाहीं; कारण ती प्रेमाची भक्ति असते. स्वार्थ संपादनाचा सुखाचा मार्ग सोडून खिसे मोकळे करणारा हा समाजसेवेचा धंदा कोणी सांगितला ? असा एक प्रश्न उभा राहील. ज्या भरत भूमींत निष्काम कर्माचीं तत्वें प्रत्येकाच्या अगांत भिनलीं होतीं तेथेंच या प्रश्नाचा विचार करणें दुदैवानें भाग आहे. समाजसेवा हेंच मनुष्याचें इहलोकचें आद्य कर्तव्य होय. राष्ट्ररूपी जीवित शरीराचें समाजसेवा हें काळीज होय. या सेवा धर्मापासुन मनुष्याच्या सदसद्वासना त्याला उगीच बसूं द्यावयाच्या नाहींत. केवळ राजकीय स्वातंत्र्यानेंच आपलीं सर्व दुःखें नाहींशीं व्हावयाचीं नाहींत. कांहीं थोडीं कमी होतील पण तें मिळविण्यासाठीं प्रत्येकानें स्वतःची शारीरिक मानसिक व आर्थिक उन्नति करून घेतली पाहिजे. आधीं स्वार्थ मग परमार्थ; स्वार्थ हा मनुष्याच्या जीविताचा पाया असून परमार्थ हा कळस आहे. (अपूर्ण)

## उत्सवप्रीय गोमांतक

गेला सबंध आठवडा गामाच्या फेस्ताचा गेल, मोठ्या शहरीं थाटानें व लहान शहरीं लहान सभारंभानें हें फेस्त साजरें करण्यांत येऊन आधींच फेस्तांनीं व जत्रानीं बजबजलेल्या ह्या गोमांतकांत आणखीं एका नव्या फेस्ताची भर घालण्यांत आली.

आमचें गोमांतक हें फेस्तांचें व जत्रांचें माहेरघर आहे. किती तरी जत्रा व किती तरी फेस्तें ह्या आपल्या गोमांतकांत उजळ माथ्यानें आपला हैदोस घालीत आहेत; व याची पूर्व परंपरा बऱ्याच वर्षांपासून चालून आलेली आहे. पोर्तुगीज लोकांनीं ज्या कांहीं वस्तु आह्मांस समुद्रापलीकडील आणून दिल्या त्यांत ‘व्हीन्य’ व ‘फे ’ ह्या दोन होत. व या दोनहि वस्तूनीं आज आपला अंमल इतका बसविलेला आहे कीं, एखाद्या धान्याचा दुष्काळ शेंकडो वेळां पुरवेल परंतु ‘व्हीन्यां’चा दुष्काळ मात्र कदाकाळीं न येवो ही प्रार्थना ईश्वराकडे आह्मांला करावी लागत आहे.

पोर्तुगीज लोक मूळ व्यापाराच्या आशेनें आले व त्यानीं येतानां धर्मालाहि बरोबर आणलें. ह्या धर्माला ही गोव्याची समशीतोष्ण हवा बरीच मानवून त्यानें आपलेंहि राज्य इकडे स्थापन करण्यास सुरवात केली. विचारे त्या काळचे पोर्तुगीज लोक या लोकापेक्षां परलोकावर ज्यास्त भरवंसा ठेवणारे होते ह्मणूनच त्यानीं राज्य विस्तार संपुष्टांत आणून येनकेन

पाच्या साम्राज्यस्थापनेकडे विशेष लक्ष्य दिलें.

धर्माचें साम्राज्य नेंहि अत्याचारांच्या व तरवारीच्या बळावर. मग काय ? फेस्तांचेहि पाय हळुहळु पसरूं लागून सबंध गोमांतक फेस्तांनीं गजबजला गेला. त्या वेळीं बिचाऱ्या जत्रांना राजाश्रय नसल्यामुळें त्यांना डोंगरांत पळून जावें लागून निर्जन अरण्यांत आपलें आयुष्य कंठावें लागलें. जत्रांची हकालपटी सरकारी बळावर डोंगरांत केल्यावर फेस्तांनां आपला हैदोस उजळ माथ्यानें पाहिजे तसा घालतां येऊं लागला.

पोट भरल्यावर नसते ढंग सुरू होतात हें खोटें नाहीं व त्याप्रमाणें प्रथमच्या पोर्तुगीज लोकांना ही सुवर्णभूमि मिळाल्यावर त्यांच्या फेस्तांना उत येऊं लागला. डीलाव्हीला या नावांचा एक प्रवासी १६२३ मध्यें गोव्यांत आलेला होता. त्यानें आपलें प्रवास वर्णन लिहून ठेवलेलें आहे. तो ह्मणतो **गोवें शहरांत जितके उत्सव आणि समारंभ होत तितके जगांतील दुसऱ्या कोणत्याहि शहरीं होत नसतील.** याचें कारण तेथें धर्मपंथच पुष्कळ असून पाद्री लोकांची संख्या जरूरीपेक्षां ज्यास्त व सधन होती. गोव्यांचे खिस्ती लोक आळशी व निरुद्योगी असल्यामुळें अशा उत्सवांत कालक्षेप करणें त्यांस आवडे. खिस्ताच्या मरणाच्या उत्सवांत त्याचें चित्र दाखविण्यांत आलें त्या वेळीं सर्व बायका पुरुष मोठमोठ्यानें रडूं लागले. बायकांना तर रडण्याचा इतका आवेश आला होता कीं, त्या आपला बरोबरीच्या दासीनां सुधां रडण्यास सांगत. इतकेंहि करून दासी न रडल्या तर त्यांस मोठमोठ्यानें मारीत. तेणें करून त्यांचें रडणें दूरवर ऐकूं येई. ( पहा मु. रियासत ७९४पृ.) सारांश काय कीं चारशें वर्षांपूर्वीं जी फेस्तांविषयीं स्थिति होती तीच आज आहे. गोव्यानें फेस्तें व शिमगेजत्रांशिवाय अद्याप कांहीं केलेलें नाहीं. गोव्यांतील लोकांचा उत्सवप्रीय स्वभाव अद्याप बदलला नाहीं. बदलला असता तर आधींच सहासहा महिने पगार नसलेल्या ह्या देशांत आणखीं एका नव्या फेस्ताची भर पडली नसती ऋण काढून सण करणारे लोक जर जगाच्या पाठीवर कुठें असतील तर आपल्या गोमांतकांतच होय.

सरकारला चौदा हजार खर्च,कामांना पुतळे उभारण्याचा खर्च, व लोकांना ‘व्हीन्यं’व ‘दांस’ या करतां खर्च. इतका खर्च सोसून गोमांतकांतील जनतेनें हें फेस्त साजरें केलें. कौन्सिलमधील एकाहि मेंबरनें ह्या कामीं हरकत घेतली नाहीं. कल्पनां पुढें मांडण्याचा अवकाश तोंच फेस्तप्रीय गोमांतकानें ती घट्ट कवटाळून धरली. असा फेस्तप्रीय गोंयबाबूंतील एकाद्या इसमानें त्याविरुद्ध आपलें मत दिलें किंवा तटस्थ वृत्तिसुद्धां दाखविली तर ह्या आवतोनोमीच्या राज्यांत राजद्रोह होण्याची भीति. सारांश गोमांतकांत सर्व कांहीं औरच.

हिंदूनी ह्या फेस्ताला बराचसा तटस्थपणा दाखविला. परंतु आतां त्यांच्या जत्रांना उत आला आहे. फातर्पेंच्या जत्रेला किती तरी हिंदु लोक भटकत असतानां दिसले असतील

त्या नंतर ह्या लोकांना प्रसिद्ध हाडोळची जत्रा आहे तेथें कित्येक दिवस मौजेनें कालक्रमणा केल्यानंतर शिमग्याचा धुडगूस सुरू होणार आहे. अशा तऱ्हेनें वर्षांमधील बरेचसे दिवस फेस्तां, जत्रा व शिमगे यांत जातील या तिघां अवदसानीं आपल्या जबड्यांत ह्या गोमांतकाला धरलेलें आहे. त्यांच्या जबड्यांतून जेव्हां आपण सुटूं तेव्हांच गोमांतकांतील लोकांकडून कांहीं कार्य होईल. गामाच्या फेस्ताला तटस्थपणा दाखविणाऱ्या हिंदूंनीं जत्रा व शिमगे यांकडेहि तटस्थपणा दाखविल्यास फार चांगलें होईल.

## वर्तमानसार

—“रा. राजाराम पं. कुडचडकर ह्यांनीं येथील हिंदुसमाजावर भीरुत्वाचा शिंतोडा वृथा उडविलेला पाहून वस्तुस्थितीचा विपर्यास करण्यास त्यानें बरेंच कौशल्य मिळविलें आहे असें वाटतें. वस्तुतः सरकार अंकीत बनलेले, वरिष्ठांची इतराजी होऊं नये ह्मणूनच, फक्त दोन तीन हिंदु कामगार, हें गामाचें पवित्र श्राद्ध मोठ्या त्रासानें चालविण्यास हजर होते रोषनाई गडगडाड इत्यादि वरिष्ठांच्या हुकुमान्वयें कामरानें स्वखर्चानें केले होते. त्यांत कोणत्याहि हिंदूनें भाग घेतला नाहीं. असें असतां त्याच्या माथ्यावर हें खापर फोडणें अन्याय नव्हे काय ? रा. कुडचडकर यांनीं निरर्थक भारताची जागा अडवून पराचा कावळा करून लेखनकौशल्य दाखविण्यापेक्षां जर त्या दिवशीं निषेधार्थ सभा भरविली असती, तर त्या सभेला लोकांची गर्दी कशी उसळली असती हें समजलें असतें. येथील जनता कांहीं नेभळट नाहीं.गोव्यांतील सबंध महालांत नोकरशाहीचा पाणउतारा अगर फजिती जर कोठें होत असेल तर येथेंच. असें असतां हिंदूंनीं व्हिवा व्हिवा घातल्याचें दृश्य रा. कुडचडकर यांनां स्वप्नांत तर दिसलें नसेल ना?” असें दुर्गा पां. गायतोंडे पाळोळें–काणकोण, हे लिहितात.

—डॉ० जुवांव कामोयेन्स यांच्याच हातांत गोमांतकाचीं राज्यसूत्रें जातील, असें पोर्तुगालच्या पत्रांचें ठाम मत आहे.

—बांदें–सांवतवाडी येथील गोसेवा संघाचीं विनंति पत्रें प्रसिद्ध झालीं असून, संघाला मदत करणें प्रत्येक हिंदूचे पवित्र कर्तव्य होय.

—गव्हर्नर साहेबांच्या इच्छेनुरूप शिक्षणखाते, व्हार क्रीम व कोंसेंव्हादोरीस कमी करण्यांत येतीलच, असें ह्मणवत नाहीं ! .

—महात्मा गांधी यांस गोमांतकस्थ हिंदूनीं हा प्रांत पाहण्याचें आमंत्रण दिल्याची अफवा उठविण्यांत आली असून, हिंदूविरुद्ध येथील युरोपियनाचीं मनें कलुषीत करण्याचा कांहीं मडगांवच्या खिस्ती ब्राह्मणांनीं उपद्याप आरंभिला आहे.

## आजचें पोर्तुगीज सदर

**अग्रलेख:—**

कागदी साम्राज्य व त्यापासून होणारे तोटे.

**स्फुट विचार:—**

गोमांतकस्थ हिंदु व म. गांधी; पणजीचें पत्र; हिंदुव्देष्टे खिस्ती ब्राह्मण; सागें मुनिसिपालटीचें जाहीर पत्रक; हिंदूंचे राजकीय मार्ग इ. इ. इ.


## ANUNCIOS

Vende-se, em hasta, em globo ou em glebas.

Predio Silva–Batta em que existem 3 casas e 2 lojas, sito na séde do concelho de Quepem, no dia 25 de janeiro proximo pelas 11 horas, na residencia do sr. tabelião Salinho da Silva, reservando o signatario deste a quem pertence retirar da praça não lhe convindo o preço. O arrematante depositará no acto 10% do preço. Quepem 22 de Dezembro de 1924.

*Jeronimo Francisco da Silva*

## विष्णु रामचंद्र केणी यांचें दुकान

**जुना बाजार—मडगांव.**

स्थापना १८५०

सचोटीबद्दल प्रसिद्ध असलेल्या या अत्यंत जुन्या दुकानांत सर्व तऱ्हेच्या मालाचा भरीव स्टॉक असतो. निरनिराळ्या जातीच्या शाई, रंग, सिमीट, व्हेर्नीज, आवोक, हरतऱ्हेचें लोखंडी सामान ( खिळे, करवती वगैरे ) नाना रीतीचे जस्ताचे व तांब्याचे पत्रे व इतर सर्व संसारोपयोगी वस्तू सदर दुकानांत माफक दरानें विकल्या जातात.

दर एक, माल चोख, व्यवहार रोख

**अनुभवानें खात्री करून घ्या !**

Parece assim que o cérebro dos conselheiros eleitos do povo está escravizado ao govêrno pois nem refletiram que num país onde os servidores do Estado não estão pagos em dia dos seus vencimentos, são um luxo na miséria estas diversões, festejando a morte com *Te-Deum*, iluminações, concertos musicais e foguetes.

Se *OBharat* tivesse registado a mesma coisa nas suas colunas, nao faltariam por ai fora patriotas que lhe atribuissem o tal "pendor anti portuguez" tao familiar ao outro Cunha que, quando se faz politico, vomita so' disparates no seu *Heraldo*.

Mas, quem da'-o que pode, nao esta' obrigado a mais.

## ESTAMOS ENTENDIDOS...

Sob a epigrafe *Orçamento da India* le-se no nosso colega *O Heraldo* de ontem:

"Em resposta ao telegrama circular enviado aos governadores das nossas colonias, pedindo as suas opinioes sobre o equelibrio dos orçamentos coloniais, o sr. Carlos de Vasconcelos, ministro das Colonias, recebeu as seguintes respostas—do governador da India dizendo ser possivel a reduçao de 100.000 rupias na parte relativa ao diploma colonial n° 38 que se refere ao funcionalismo. Propoe o mesmo governador a iliminaçao de 3 conservadores judicias, a extinçao de vara civel de Goa e extinçao da Direcçao da Instrucçao, com cujas medidas assegura o equilibrio do orçamento daquela provincia."

A informaçao transcrita e' do *Comercio do Porto*, o que nos garante a sua veracidade.

Ainda que nos ultimos tempos as informaçoes que os leitores conhecem segundo as circunstancias do momento ou conveniencias da ocasiao, ora dissessem que o nosso deficit era pavoroso, ora afirmassem que a situaçao do tesouro nao era tao precaria como se supunha, o que e' certo e' que era facto a existencia do deficit, assim como era certo que, pavoroso ou nao, esse deficit ia aumentando sempre ...

De forma que, governantes e governados, a todo o momento, se iam convencendo de que a hora do sacrificio soara para todos!

A informaçao acima transcrita porem, deante do que, como viram foi ...do ao ministro das colonias, ... o novo ano, a grata ...sse sacrificio se ... cessando ...go numa previsao lugubre, o proprio abismo. Agora? Esta' assegurado o ebuilibrio. Como? Com esse enorme sacrificio de governantes e governados? Felizmente, nao, porque o sacrificio se limita a muito pouco. Quere dizer, sao apenas sacrificados:

a) **3 CONSERVADORES JUDICIAIS**
b) **A VARA CIVEL DE GOA**
c) **A DIRECÇAO DE INSTRUCÇAO**

Entretanto se, de alguma forma nos fosse permitida uma opiniao sobre o *assegurado equilibrio*, no's talvez, poderiamos ainda mostrar que em vez de serem sacrificados em proj do citado equilibrio, os tres serviços acima apontados, bastava que, para o fim em vista, fossem sacrificadas, tao somente, 3 pessoas, abaixo indicadas:

a) *Dr. Amilcar Ribeiro*
b) *Dr. Taumaturgo Pereira*
c) *Luis de Menezes*

E, por nosso turno, assegurariamos positivamente, que o resultado seria o desejado...

Eis o que escreve o *Diario da Noite*.

Nao comentamos, porque ha coisas que dispensam, por completo, comentos odientos ou vingativos por sua demasiada clareza.

Mais um facto, pois, indicativo de como entre no's brota o servilismo!

## RA'PIDOS COMENTA'RIOS

E' para meditar o que no jornal metropolitano *O Mundo* escreve o sr. Antonio Ribas de Avelar sobre a maneira como um certo juiz encarou a sua independencia e sobre o resultado das nossas sindicancias.

Leiam o seguinte:

Ouvi dizer que havia um juiz que se recusava a dar cumprimento a um acordao do Supremo Tribunal de Justiga. Achei extranho, mas fui averiguar e tenho de confessar que o caso e' verdadeiro. O Juiz e' independente nos seus julgamentos, mas, para que essa independencia lhe seja garantida necessaria se torna uma puniçao imediata para quem abusa. E aquele juiz nao tem o direito de querer uma independencia, em nome da qual abusa, recusando-se a cumprir o que superiormente lhe e' ordenado. E, a proposito do procedimento do juiz, diz-se mal da justiça, como se ela tenha culpa desta excepçao.

As sindicancias no nosso pais so tem servido de fonte de receita para os sindicantes. Algumas nunca mais acabam. Ninguem e' punido quando se prova, nem quando se nao prova, embora seja sempre patente a justiça da sindicancia. Quando se prova, a prolitiquice abafa o caso e dai resulta que em outras se nao faz ...a porque as pessoas chamadas a ...e recusam a falar verdade, ... que uns sejam filhos ...ssim fica tudo ... a men-...

भारत

मिति पौष शु० १३ शी शके १८४६

## मिळालेल्या हक्कांस जपा !

आज १४ वर्षें होऊन गेलीं. पण त्या दिवसाची आठवण अजून बुझाली नाहीं व ती बुझणें शक्यहि नाहीं. हिंमतदार हिंदुस्थानाच्या पश्चिम सीमा रेषेवर 'सुखंचमे शयनंचमे ' हा आप्पल पोटेपणाचा मंत्र जपीत नासिकाग्रीं दृष्टि रोंखून पाश्चात्य सुधारणेशीं तन्मयता नव्हे, एकरूपता गांठण्यासाठीं टपून बसलेल्या आमच्या गोमांतकाच्या पूर्व क्षितीजावर एकाएकीं स्वराज्य सूर्याचा अनाहुतपणें अकल्पित उदय झाला.

निसर्गाचा नियंत्रित नियम असा आहे कीं, दर प्रभातीं रव्युदयापूर्वी उष:काल प्राप्त होऊन तत्समयीं क्षितीजावर उषेचा आल्हाददायक उगम होतो. व त्या मागून सूर्यसारथी अरुण तीची जागा पटकावण्यास पुढें सरतो. हे सर्व प्रकार यथाशास्त्र घडून आल्यानंतरच प्रतापशाली प्रभाकर आपले सोनेरी किरणशलाक हळुहळु क्षितीजावर फेंकून सारी सृष्टी आनंदवून सोडतो. आदित्योदयाची वेळ झाली; यापुढें झोंपेंत निमग्न न होतां उठून आपापल्या नित्यनैमिक कृत्यांस सुरवात करा हें दाही दिशांस व जगांतील प्रत्येक प्राण्यांस सुचविण्यास्तव निसर्गाला देखील वरील परिपाठ पाळावा लागतो; पण आमच्या उद्योन्मुख गोमांतकांत स्वराज्य रविउदयास येईपर्यंत उपरिनिर्दिष्ट प्रकारांपैकीं एकहि दृश्य स्वरूपांत आला नाहीं. आधींच नृपनीतीला विचित्र स्वभावी वारांगनेची सार्थ उपमा दिलेली व तशांत पोर्तुगीज सरकारचें तर सारेंच विचित्र. सन १९१० च्या ५ आक्टोंबर रोजीं सर्वत्र, गोमांतकाला रिपब्लिकचे अधिकार दिले गेल्याचें, विद्युत्संदेशानें जाहीर होईपर्यंत अज्ञ व अप्रबुद्ध जनतेला तर सोडाच पण स्वत:स सुज्ञ व सुप्रबुद्ध ह्मणवून घेणाऱ्या वरिष्ट सरकारी कामदारांना देखील ह्या अवचित राज्य सूत्रकंपाचा मागमूस लागूं दिला गेला नव्हता. गोमांतकांतील जनतावर्ग स्वराज्याला हपापला होता ह्मणून नव्हे तर पोर्तुगीझ सरकाराच्या कांहीं पडद्याआड गुपचुप घडले. त्या गुप्त खलबतांचा प्रभाव ह्याच नात्यानें आमच्या गोंव्याला हे स्वराज्याचे हक्क दिले गेले होते हेंच ह्या प्रसंगाच्या अकल्पिततेचें कारण होय!

अशा रीतीनें आमच्या पूर्वजांची—किती जन्मींची कोण जाणे—सबळ पूर्वपुण्याई फळास आल्यावर अखिल गोमांतकीयांत व विशेषत: देशहिताकांक्षी तरुण पिढींत आनंद ...न जोरदार लाट उसळली इतरेजनाची गोष्ट न उल्लेखितां लिहावयाचें ह्मणजे स्वराज्य प्राप्तीच्या त्या अनुपम व अवर्णनीय उल्हासांत क्षणभर देहभान विसरून स्वत: आह्मीं पोर्तुगीज सरकारचा त्यांनीं दाखविलेल्या औदार्याबद्दल व दिलेल्या समतावादास सक्रीय सहानुभूतीबद्दल उदोउदो (व्हीव्ह, व्हीव्ह) केला व त्या आनंदाच्या उर्मीत नाचलोंहि. कां नाहीं नाचणार ? स्वज्ञातीभाई व स्ववर्गबंधू आर्यलंडांत जवळ जवळ दीडशें वर्षें स्वराज्यासाठीं तोफा, सैनिक, आरमार इत्यादि प्राणघातक शक्तीच्या भरपूर पुरवठ्याच्या जोरावर इंग्लंडशीं झगडत असतां, त्यांच्या मागणीकडे ढुंकून देखील बघण्याची ब्रिटिश सरकारची तयारी नाहीं हें दृश्य धडधडीत डोळ्यापुढें दिसत असतां, अर्ज, विनंत्या, डेप्युटेशनें ह्या लोकसमाजाच्या प्रगतिकडील ओढीचे निदर्शक अशा प्रकाराची मुळींच वाट न बघतां, केवळ कर्तव्य ह्मणून आवतोनोमीचें गाठोडें रिपब्लिकनच्या फडक्यांत गुंडाळून आह्मां 'जितीवाच्या ' व ' काळ्या युरोपियनाच्या ' हातांत हळूच देतानां पाहून कृपाळु पोर्तुगीज सरकारच्या न्यायदानाविषयीं कोणा ' मायेच्या पूता ' च्या तोंडून प्रशंसोद्गार निघणार नाहींत व कोण मायेचा पूत त्यांना धन्यवाद देणार नाहीं ?

पण दयाळु पोर्तुगीज सरकारनें आपल्या प्रजाहितदक्ष (?) स्वभावानुसार गोमांतकाला दान दिलेल्या स्वराज्याचा उपयोग स्वोन्नति गांठण्यांत आह्माला झाला काय ? गोमांतकाच्या प्रजेतर्फेचे असे निवडून कौन्सिलांत गेलेले सभासद आजपर्यंत कोणत्याहि महत्वाच्या बाबतींत सरकारच्या विरूद्ध जाण्यास, सद्सदविवेक बुद्धीस जागून, धजावले आहेत काय ? गोमांतकाच्या प्रगमनपर गतीवर गदा आणणाऱ्या कृत्यांबद्दल त्यांनीं आजपर्यंत निषेध प्रगट केला आहे काय ? गरिबांस पोटापाण्यास लावण्याचा तर सोडाच पण आहे त्या स्थितींत त्यास सुखी राखण्याचा—निदान त्यांस त्रास तरी न देण्याचा—एकादा ठराव त्यांनीं आजपर्यंतच्या आपल्या कौंसिलांतील कारकिर्दीत पास केला आहे कांय ? इतउत्तर आह्मीं असें विचारतों कीं, आपण कौन्सिलांत जाऊन लोकहिताचीं कोणकोणतीं कार्यें केलीं ह्याची ते जरा आह्मांस यादि देऊं शकतील काय ?

वरील सर्व प्रश्नांस उत्तर जेथें नकारात्मकच ठेवलेलें तेथें कोणी झालें तरी काय लिहील ! गरिबांचें हित ज्यांत बेधडक लाथाडलें जातें त्यास स्वराज्य ह्मणून त्या पवित्र शब्दास विटाळणें महापातक होय.

ज्या दिवशीं पोर्तुगाल सरकारनें गोमांतक ' रेपुब्लिक ' केलें तो दिवस गोंव्यांत अजून पाळला जात आहे. वास्तविक वाढदिवस ह्यासाठीं पाळले जातात कीं त्या दिवशीं प्रत्येकानें मी गेल्यावर्षी माझ्यांत कोणकोणती सुधारणा केली व त्याच्याहिपुढें ह्या वर्षीं मी कसा व किती जावें हा विचार करावयाचा असतो. पण ५ आक्टोबर हा

# मोठ्या माणसांचे छोटे संदेश

### महात्माजींची मुलाखत

रविवारीं दुपारीं ११ वाजून ४५ मिनिटांवर आमच्या प्रतिनिधीनीं अध्यक्षांच्या कोटेजमध्यें महात्माजींची भेट घेतली. त्यावेळीं खालील प्रश्नोत्तरें घडलीं.

प्रश्नः—ह्याच वर्षीं आमच्या गोमांतकानें राष्ट्रीय महासभेच्या कार्यांत भाग घेतला ह्याबद्दल आपणांस काय वाटतें ?

उत्तरः— खरोखर मला त्याचा फार आनंद वाटत आहे. गोमांतक हिंदुस्थानापासून विभक्त नाहीं. ह्याची त्यांस आतां तरी जाणीव झाली ही महत्वाची गोष्ट होय.

प्रश्नः— गोमांतकाला व भारताला आपला काय संदेश आहे ?

**उत्तरः— चरका, चरका चरका. चरका फिरवा हाच माझा गोमांतकाला संदेश आहे. चरक्यांच्या प्रसारार्थ झटण्याविषयीं भारताला माझा निरोप कळवा.**

—— २८।१२।२४

### देवी सरोजनीची मुलाखत

रविवारीं सकाळीं ८ वाजतां आमच्या प्रतिनिधींनीं श्रीमती सरोजनी देवीची भेट घेतली. त्या वेळचीं प्रश्नोत्तरें खालील होत.

प्रश्नः— गोमांतकानें ब्रिटिश हिंदुस्थानच्या राजकारणांत भाग घ्यावा कीं त्यापासून त्यानें अलिप्त रहावें ?

उत्तरः— राजकारण बिजकारण मी कांहींच ओळखीत नाहीं; पण इतकी मात्र गोष्ट खरी कीं आपल्या विपद्ग्रस्तबांधवांस आपत्कालीं मदत करणें हें प्रत्येकाचें कर्तव्यकर्म होय व तें बजावल्याशिवाय बंधुत्वाचें नातें सांगणें मूर्खपणा ठरेल.

प्रश्नः— पण राजकीय बाबतींत गोमांतक हिंदुस्थानापासून विभक्त नाहीं काय ?

उत्तरः—म्हणून त्याला आपल्या बांधवांस मदत करण्यास प्रतिबंध होऊं शकेल काय ? तुम्हांला स्वराज्य मिळालें आहे; मग तुमच्या विवेक बुद्धीस वाटेल तसें वागण्यास मुभाच आहे.

प्रश्नः— आम्हांस मिळालेल्या स्वराज्यानें आचार स्वातंत्र्याचा हक्क आम्हांस दिला जातो असा आपला समज आहे काय ?

उत्तरः— हें गाऱ्हाणें आम्हांला सांगून काय उपयोग ? त्याचा विचार तुम्हींच करावा. तुम्हीं नामर्द आहां काय ? तुमचे खिस्तीभाई तुम्हांस विरोध करीत असतील तर त्यांनां तुम्हीं समजाविलें पाहिजे. आमच्या सहानुभूतीचा काय उपयोग ?

प्रश्नः— पण तुमचे असे दोन शब्द उपदेशादाखल आम्ही गोमंतकीयांस काय सांगावे ?

उत्तरः— गोमांतकीयांना माझी सध्या सांगणी इतकीच कीं, त्यानीं गोव्यांत उद्योग धंदे, कलाकौशल्य वाढवावें. खादीबरहि नकशी काम करण्यास शिकावें, व दरवर्षी परदेशास जाणारे लाखों रुपये थांबवावे.

—— २८।१२।२४

### लाला लजपतराय यांची मुलाखत

शनिवारीं रात्रो ९ वाजता लालाजींनीं आमच्या प्रतिनिधींस दिलेल्या मुलाखतीचा गोषवारा:—

प्रश्नः— हिंदुमुसलमान ऐक्याची व राष्ट्रीय महासभेच्या यशस्वीतेचीं सांगड आपण कशी घालाल ?

उत्तरः— परस्परांतील छोट्या छोट्या वर्गांकडे थोडा वेळ तरी दुर्लक्ष्य करून हिंदु व मुस्लीम ह्या दोन्हीं हिंदुस्थानांतील बहुसंख्यांक ज्ञातीनीं कांहीं विशिष्ट अटींवर राष्ट्रीय ऐक्य करणें आज अगत्याचें होऊन बसलें आहे; जातीजातींतील व धर्माधर्मांतील तंटे मिटवून सर्वांनीं एकमतानें राष्ट्रासाठीं झगडण्यास तयार होईपर्यंत स्वराज्य मिळणें तर दूरच पण कोहाटसारख्या अत्याचारांची पुनरावृत्ति होऊन राष्ट्रीय महासभेस पुढें पाऊल टाकतांहि येणार नाहीं. ह्या दोन्हीं ज्ञातींतील तेढीचा समाधानकारक निकाल लावण्यासाठीं सर्व पुढाऱ्यानीं व विशेषतः वृत्तपत्रकारानीं झटलें पाहिजे.

प्रश्नः— सूताच्या वर्गणीच्या अटीस आपण नापसंति दर्शविण्याचें कारण काय ?

उत्तरः—ह्याचें कारण इतकेंच कीं सूताची व्यवहार्यता व्यक्तिशः जरी पसंत असली तरी तत्वशः ज्यानीं त्यास महात्माजीच्या भीडेखातर ती मान्य केली, त्यांपैकीं पुष्कळांस नापसंत होती. अशा स्थितींत सद्सद्विवेक बुद्धीची फसवणूक केली जाऊं नये असा माझा इरादा होता.

प्रश्नः— ब्रिटिश हिंदुस्थानांत जसे हिंदु व मुस्लीम असे दोन वर्ग आहेत तशाच आमच्या गोमांतकांतहि हिंदु व खिश्चन अशा दोन ज्ञाति आहेत व त्यांचे ध्येय शोधक मार्गहि परस्पर विसंगत आहेत हें आपणास माहीत आहे काय ?

उत्तरः—ह्याची मला थोडीशी माहिती मिळाली होती; त्या वरून मी आपणाला इतकेंच सांगू शकतों कीं गोव्यातील तुम्हीं हिन्दूंनीं एका विशिष्ट मंडळाच्या एकछत्री अमलांत संघटित व्हावें व स्वधर्माचें रक्षण करावें. तुमच्या ‘ भारत ’ पत्रानेंहि अशी एखादी संघटनेची टूम निघाल्यास तीस मदत करावी, मात्र ज्ञातीज्ञातींत द्वेश पसरूं नयेत.

ता. २७।१२।२४

——

### टी. प्रकाशम् यांची मुलाखत

सोमवारीं सकाळीं १० वाजून २५ मिनिटांवर भारत प्रतिनिधीनीं टी. प्रकाशम् [ संपादक दैनिक ‘ स्वराज्य ’ मद्रास ] यांची भेट घेतली त्या वेळचीं प्रश्नोत्तरें:—

प्रश्नः— राष्ट्रीय महासभेंतील सुताच्या अटी विषयीं आपणास काय वाटतें ?

उत्तरः— ती अट मला पूर्णशी पसंत नसली तरी तीनें माझ्या समाधानीस मुळींच धक्का दिलेला नाहीं. त्यांत घातलेलें प्रत्यक अक्षर तोलून व दोन्हीं पक्षांस बांधून घेण्याजोगें घातलें आहे. मात्र ती अट प्रत्येकानें बिनचूक पाळली पाहिजे.

प्रश्नः— हिंदुमुसलमानांचें टिकाऊ ऐक्य होण्यास त्यांच्यांत कोणत्या प्रकारची ‘ देवाण घेवाण ’ व्हावी ?

उत्तरः— माझी अशी खात्री आहे कीं मुसलमानांस जर हिंदु बंगालमध्यें व पंजाबमध्यें लोकसंख्येच्या प्रमाणानें सरकारी नोकऱ्यांत, कौन्सिलांत प्रवेश करण्यास मोकळीक देतील तर हे सर्व तंटे मिटतील. मारामारी करण्यांत हात जरी मुसलमानाचे असले तरी डोकें तिसऱ्याचेंच असतें व वरील प्रमाणें व्यवस्था झाल्यास तें डोकें थंड पडेल. एकमेकांत तंटे उपस्थित करण्यांत अर्थ नाहीं कारण मुस्लीम पातशाही तर सध्या नाहींच पण हिंदवी राज्याचाहि नायनाट झालेला आहे; मग भांडणांत उपस्थित काय होईल?

प्रश्नः— स्वराज्य चरख्यानें मिळेल असें तुम्हांस वाटतें काय ?

उत्तरः— स्वराज्य कांहीं माझ्या जन्मांत मला हिंदुस्थानास प्राप्त झालेलें पहावयास मिळेल असें वाटत नाहीं. वास्तविक स्वराज्य म्हणजे गरिबांचें राज्य. व त्याच दृष्टीनें पाहूं गेल्यास चरख्यानें स्वराज्य मिळेल कीं नाहीं हा प्रश्न सुटूं शकेल. भिकारी बनलेल्या हिंदुस्थानांतून दर वर्षी परदेशास कपड्यापायीं जाणाऱ्या ६० कोट रुपयांपैकीं १५ कोट रुपये जरी आमच्या राष्ट्रांतील गरिबांत वाटले जातील तरी भरपूर होतील. गोमांतकानेंहि हाच धडा गिरवावा.

ता. २९।१२।२४

——

### डॉ. ना. दा. सावरकरांचें भाषण

( हिंदुमहासभा, बेळगांव )

माझ्यापूर्वी बोललेल्या वक्त्यानीं हिंदु-मुसलमानाची आजची स्थिति सविस्तर सांगितली आहे. हिंदु धर्म—मी खात्री देऊं शकतों—उदार आहे, पवित्र आहे व परधर्मसहिष्णुताहि त्यांत आहे, पण त्याला ह्यापुढें तसें रहातां येत नाहीं. जगांतील प्रत्येक राष्ट्र संपत्तीसाठीं, स्वार्थासाठीं व धर्मप्रसारासाठीं सध्या ‘ चोर ’ बनून गेलें आहे; ह्या वेळीं हिंदुधर्म जर आपल्या औदार्यावर व ‘ साव ’ स्वभावावर विसंबून आपलें परधर्म सहिष्णुतेचें दुकान उघडें सांडील तर त्यांतील प्रत्येक वस्तु चोरीस जाऊन उलट मूर्खपणा मात्र त्याच्या डोक्यांत बसेल. प्रत्यक्ष कुबेर जरी अवतरला तरी संबंध दुनियेंतील भिकाऱ्यानां संपत्ति वाटून देतांना तो स्वतःच एक दिवशीं भिकारी बनून जाईल; मग आमच्या हिंदुधर्माची काय कथा ? हिंदुधर्म हा हिमालय आहे. तो हिमालयासारखा स्थिर व अचल आहे; पण माझे मुसलमान भाई हिमालयावरील बर्फाच्या थरांवरून तो सारा डोंगर मऊ मेणासारखा आहे अशी आपली समज जर करून घेतील, तर मी त्यांस बजावून सांगतों कीं आकाश भेदून गेलेल्या ह्या हिमालयावरील बर्फाच्या थरांच्या आंत ज्वालामुखीचा कडकडाट होत आहे, व त्याला संतप्त करून सोडल्यास तो ज्वालामुखी पेट घेईल व त्यांत तुमच्या मुस्लीम धर्माची केव्हा आहुति पडेल ती तुम्हास समजणार देखील नाहीं. माझ्या हिंदु बधूनों ! तुम्ही संघटित व्हा; आपल्यांत संघशक्ति निर्माण करा म्हणजे जगांतील एकाहि राष्ट्राला वर मान करून हिंदुधर्माच्या तेजस्वी तेजाकडे पहावणार सुद्धा नाहीं, मग विरोधाची काय बिशाद ! मुसलमान भाईनों जोंपर्यंत हिंदुस्थानांत हिंदु आहेत तों पर्यंतच तुम्हास हिंदी म्हणून मिरवण्यास मिळेल. मी माझ्या हिंदुधर्मबंधूनां पुन्हा बजावून ठेवतों कीं तुम्ही निद्रस्थ केसरी आहांत पण झोंपून रहाण्याची सध्या वेळ नाहीं, तेव्हा जागे व्हा, डोळे उघडा, आयाळ हालवा; व आपल्यावर चढ करून येऊं पहाणाऱ्या शत्रूवर एकदम हल्ला करा.

---

—सांगें मुनिसिपालटीनें एक पत्रक प्रसिद्ध केलें असून, आपल्या कारकीर्दीचें जाहीर स्पष्टिकरण करण्याचें त्यांत अभिवचन दिलें आहे.

—कराची व मुंबई येथील गोवानिजांनीं गामोत्सव मोठ्या थाटानें पाळला.

—गेल्या ५ तारखेला कोंसेल्य लेजिस्लातीव्हाच्या नवीन सभासदांची बैठक झाली.

---

दिवस पवित्र म्हणून पाळीत असतां वरील विचार आमच्यापैकीं किती जणाच्या डोक्यांत येत असतील बरें ?

ह्या आमच्या हलाखीच्या स्थितींचें कारण जर कांहीं असेल तर ती —आम्ही स्पष्ट सांगू शकतों— आमची अपात्रता होय. स्वराज्य आपण होऊन दिलें जात नाहीं, तें घेतलें पाहिजे. ( Swarajya is taken, never given ) ह्या इंग्लीश म्हणीचा उघड उघड असा अर्थ होतो कीं, आधीं आपण स्वराज्य राखण्याची पात्रता अंगांत आणली पाहिजे. ह्याच कारणासाठीं आमचे ब्रिटिश हिंदुस्थानस्थ प्रांतबंधु केतें कितेक वर्षे स्वराज्याची पात्रता आपल्या अंगांत आणण्यास खर्ची घालणार आहेत; पण आम्हाला स्वायत्तेचे हक्क मिळाले आहेत व आतां आम्हीं ते राखण्यासाठीं झटणें हेंच योग्य आहे. हे मिळालेले हक्क राखण्याची पात्रता आपल्या अंगीं बाणवून घेण्यासाठीं प्रथम आपण राजकीय धर्तीवर संघ अगर स्वतंत्र पक्ष निर्माण केले पाहिजेत व त्या संघाद्वारें आपण गोमांतकीयांच्या हितास व हक्कांस जपण्याचा प्रयत्न केला पाहिजे हें उघड आहे.

## शांतिसम्राट महात्म्याचा संदेश

अंतःकरणाचे डोळे उघडून अखिल आर्यावर्तांतील हिंदहितैषि जीव उत्साहातिरेकाच्या उत्सुकतेनें ज्या राष्ट्रींय महासभेची —भारत वर्षांतील लोकसत्तेच्या अनियंत्रित व अनिभिषिक्त राजसभेची—वाट पहात होते, ती तर हां हां ह्मणतां भरून व आपलें येत्या सालचा कार्यक्रम आंखण्याचें कार्य करून मोकळीसुद्धां झाली. 'पुनरागमनायच, ह्मणून हा राष्ट्रीय सभेच्या ह्या सालच्या बेळगांवच्या बैठकीचा गणपती त्याच विघ्नेश्वराच्या कृपाप्रसादानें निर्विघ्नपणें उदकांत बुडविल्यावर बेळगांवकरांच्या अंगावरील जबाबदारी दूर झाली असेल पण ज्या कार्यासाठीं ही गणेशपूजनाची आटाहाटी त्यांस करणें प्राप्त झालें होतें तें प्रधान कर्तव्य तर जशाचें तसें पडून राहिलें आहे. एक चालू वहिवाटीची वार्षिक बाब ह्मणूनच जर कॉंग्रेसची बैठक प्रत्येक वर्ष अखेर बिनचूक भरविली जात असती तर तिची आह्मांस राष्ट्रोन्नतीच्या बाबतींत काहींच जरूर नव्हती व नाहींहि. पण ही महासभेची बैठक दरसाल भरविण्यांत वरील उद्देशाचा नामनिर्देशहि नसल्यानें ती समज चुकीची समजणें क्रमप्राप्त आहे. ह्याचा अर्थ अर्थातच असा होतो कीं, कांहीं तरी महत्वांश पूर्ण राष्ट्रकार्य उरकण्याकरितांच ही राष्ट्रीय महासभेची बैठक भरविण्यांत राजकीय पुढाऱ्यांचा वेत होता. त्या दृष्टीनें विचार केल्यासहि कर्नाटकाची महासभा पुढील एका सबंध वर्षाचा मार्ग आंखून देण्यांत यशस्वी झाली असली तरी लोकपक्षाच्या अंगावर तीनें जबाबदारीची केवढी मोठी धोंड टांकली आहे ह्याचा आह्मीं विचार करूं.

कलकत्त्यास पसार झालेल्या महात्मादास नेहरु पॅक्टवर पसंतीचा शिक्का मोर्तब ठोकून दुफळीच्या कडवट कचाट्यांतून तीनें पहिल्या प्रथम आपली भोकळीक करून घेतली. फेरवाल्या पक्षानें नाफेरवाल्यांच्या सुताच्या वर्गणीस मान्यता दिली व नाफेरवाल्यांनींहि उलट कॉंग्रेसच्या व तिनें स्वराज्य पक्षाचा कौन्सिल प्रवेश मान्य केला इतकेंच नव्हे तर विदेशी कपडा खेरीज करून इतर चारहि बहिष्कारांस जमिनीखालीं गाडण्यास—मग तें कांहीं विशिष्ट मुदतीपर्यंत असो—सक्रीय संमति देऊन आपल्या उज्ज्वल राष्ट्राभिमानावर पक्षाभिमान त्यागाचा सोनेरी कळस चढविला. सूताची वर्गणी स्वराज्य पक्षानें नाफेरांच्या आग्रहास्तवच कबूल केलीं असें धरुन क्षणभर चालल्यास असा प्रश्न उद्भवतो कीं नाखुषी दर्शविल्यास दुसऱ्याकडून काढवून पाठविलेली सुताची वर्गणी चालेल असें कलकत्त्याच्या तहनाम्यांत कां लिहिलें गेलें ? सूतानेंच स्वराज्य मिळेल असें जरी स्वराज्यवाद्यांची सदसद्विवेक बुद्धि त्यांस सांगत नसली तरी कौन्सिलांतून स्वराज्यप्राप्ति होईल ह्याची जिम्मेवारी हे फेरवाले स्वराजीष्ट होण्यास तयार आहेत काय ? कायदेभंगाचें निर्वाणीचें शस्त्र उपसल्याशिवाय स्वायत्ततेचे हक्क मिळणें नाहीं हें स्वराजीष्ट नाकबूल करूं शकतात काय ? नाहीं ना ? मग कौन्सिलें काबीज करून कांहींच फायदा होणें नाहीं. ह्या ठाम मतास चिकटलेल्या कट्टरानींच बेळगांवास महात्माजींच्या मनीषेपुढें मान वांकवून आपलें सर्वस्व स्वराज्यवाद्यांना केवळ महात्माजींची इच्छा ह्मणून लुटूं देण्यांत अधिक निमकहलालपणा दाखविला हें निःसंशय आहे.

झालें तें सुरेखच झालें असें ह्मणून ह्या पुढें प्रत्येकानें, महात्माजींनीं आपलें अधिष्ठान इरेस घालून राष्ट्राकडे केलेली मागणी पुरवण्यास्तव जीवापाड झटलें पाहिजे. विजयानगरींतील दोंदिवसांच्या अधिवेशनांत राष्ट्रीय महासभेनें राष्ट्रापुढें पूर्ततेसाठीं एकच प्रोग्राम टांकला आहे व तोच महात्माजींची—शांतिसम्राट गांधीची—भारतवर्षांतील सर्व पक्षांकडे आग्रहाची मागणी होय. 'चरक्याचा प्रसार, हिन्दु मुसलमानाचें ऐक्य व अस्पृश्यता निवारण' ह्या तिनहि महत्वाच्या बाबींचा प्रसार सबंध राष्ट्रांत होऊन स्वावलंबनाच्या व राष्ट्रीय ऐक्याच्या संघटित पायावरच महासभेच्या येत्या बैठकीनें आपल्या कार्याची इमारत उभी करावी हेंच काल्च्या राष्ट्रीय महासमेनें एकमतानें प्रतिपादिलें व आज्ञापिलें आहे. निवडक शब्दांनीं आपलें वाचिवीरत्व प्रगट करण्याचे आबादानीचे दिवस आतां राहिले नसल्यानें आपापसांतील तुरळक भेदाभेद राष्ट्रकार्यार्थ विसरून सर्वांनीं राष्ट्रीय सभेच्या व महात्मा गांधीच्या 'चरका' छाप निशाणाखालीं एकत्र जमणें आज कालपरत्वें अगत्याचें होऊन गेलें आहे. चरक्यानेंच स्वराज्य मिळेल असा जर नाफेरवाल्यांचा निश्चय निर्णय असेल तर त्यांनीं ह्या एका सबंध वर्षांत चोंहोंकडे चरक्याचा भरजोर प्रसार करून परदेशास दर वर्षी जाणाऱ्या ६० कोट रुपयांचा खो घालावा; व स्वराज्य वाद्यांनीं राष्टसंघटनेच्या कामांत, त्यांस योग्य व साधेल ती मदत पुरवून दोघांनाहि ग्रासावयास टपून बसलेल्या शत्रूस एक मतानें व एक दिलानें जोराचा प्रतिकार करावा हीच अजात शत्रू शांतिसम्राटाची त्यांस आज्ञा आहे.

---

## अभिप्रायार्थ माल व जाहिराती पाठवा.

### जाहिराती—संग्रह

या पुस्तकाचे वर्षांतून चार भाग प्रसिद्ध होत असून ज्यानीं आमच्या ऑफिसांत नांवें नोंदविलीं असतील त्यांना ते फुकट पाठविण्यांत येतात. **अभिप्रायार्थ पाठविलेल्या मालावर विस्तृत अभिप्राय दिला जातो.** जाहिराती मराठी, पोर्तुगीज व इंग्लिश या तिन्हीं भाषांतून प्रसिद्ध करण्याची व्यवस्था असून, त्यांचा दर पुढील प्रमाणें आहे. सिंगल कॉलमच्या दर ओळीस ४ आणे व डबल ओळीस ८ आणे पडतील.

पत्ता— एम. के. पे. गांवकर
पैंगीण—काणकोण—गोवा.

## बाल-वाचन-मंदिर संस्थेच्या व्याख्यानमालेचा रिपोर्ट

ता. २३ । ११ रोजीं श्री. विष्णु सखाराम खांडेकर यांचें व्याख्यान झालें. समाजसेवा हा त्यांचा विषय होता. सभागृहांत श्रोतृवर्गाचा समुदाय बराच होता. व्याख्यानाला बरोबर ५॥ ला सुरवात झाली. ईशस्तवन वगैरे प्राथमिक गोष्टी उरकल्यावर श्री. कामत यानीं, आज महाराष्ट्रांतील एक प्रसिद्ध कवी, विनोदी लेखक व शिरोडें शाळेचे हेडमास्तर श्री. खांडेकर यांच्यासारख्या विद्वान व कसलेल्या वक्त्यांच्या व्याख्यान प्रसंगीं तशाच अधिकारी सभापतीची आवश्यकता आहे. तेव्हां आमचे विद्वान गृहस्थ प्रो. केणी यानीं अध्यक्षस्थान स्वीकारवें अशी विनंति केली, व त्यास अनुमोदन दिलें गेल्यावर अध्यक्ष प्रो. केणी स्थानापन्न ह्याले. अध्यक्षस्थान स्वीकारतानां ते ह्मणाले कीं, या जागेला मीं बहुतेक नवशिका आहें. अनुभवामुळें माझ्याकडून काम योग्य प्रकारें होईल कीं नाहीं हा संशय आहे. तेव्हां माझ्याकडून जे कांहीं प्रमाद घडतील त्यांची माफी करावी. श्री. खांडेकर यांची ओळख श्री. कामत यांनीं करून दिलीच आहे. शिवाय काल उपवक्ता या नात्यानें त्यानीं जें भाषण केलें त्यावरून त्यांच्या विद्वत्तापूर्ण वक्तृत्वाची थोडीशी चुणूक आपणांला लागलीच आहे व आतां त्यांचें बुद्धिवैभव प्रकट होणारच आहे, इतकें सांगून कार्यक्रमास सुरवात करण्याची त्यानीं सूचना केली. लगेच मुलांकडून स्वराज्याचें तोरण या नाटकाचा पहिला अंक करून दाखविल्यानंतर व्याख्यात्यानीं भाषणास सुरवात केली. ते ह्मणाले कीं, वक्त्याची ओळख असल्यावर प्रास्ताविक भाषणाची गरज नसते. मीं या प्रांतांत सर्वस्वी अपरिचित आहें. ओळख करून देतानां संस्थेच्या चालकानीं जीं माझी स्तुती केली तिला मी लायक नाहीं स्वतःच्या करमणुकीकरितां मी लेखन व्यवसाय करीत असतों व टलाट जोडून थोडीशी कविताहि करितों. त्यावरून माझ्यापासून उच्च विचारसरणीची आपण अपेक्षा करूं नये. व्याख्यानमालेचें मी आमंत्रण स्वीकारलें तें गोव्यांची परिस्थिति पहावी, चार स्नेही मंडळी जोडावी व थोडें देऊन जास्तीची प्राप्ति करून घ्यावी या व्यवहारी धोरणानेंच स्वीकारलें होतें. आजचा व्याख्यानाचा विषय समाजसेवा हा आहे. या विषयाला भरपूर असें मला ज्ञान नाहीं. शिक्षक असल्यामुळें शिक्षण विषयक चर्चा माझ्याकडून चांगली झाली असती. परंतु समाजामध्यें जो विषय प्रचलित आहे त्याचें चर्वितचर्वण योग्य नव्हे. ह्मणून हा विषय घेऊन त्याचें शक्यतेप्रमाणें विवरण भी करणार आहें. कांहीं काळापूर्वीं समाजसेवा हा प्रश्न प्रचलित नव्हता. आजच्या सारखी बंधयुक्त व आंचलेली स्थिति त्यावेळीं नव्हती. समाजसेवा याचा अर्थ समाजाची आपल्या हातून होणारी सेवा. समाजाकरितां करतां येणारी सेवा असा होय. समाजाचा अर्थ अतिशय व्यापक आहे. आपण सर्व एका ईश्वराचीं लेंकरें आहोंत असें मानलें – विश्वबंधुत्वाची कल्पना केली – तर सर्व "मानवी समाज" असा अर्थ होईल. धार्मिकदृष्ट्या हिंदु, खिस्ती, मुसलमान, बुद्ध असे निरनिराळे समाज होतील. यांचेहि प्रांतपरत्वें महाराष्ट्रीय समाज, बंगाली समाज असे भाग पडतील; शिवाय प्रार्थना समाज ब्रह्मसमाज, आर्यसमाज वगैरे विशिष्ट ध्येयानें एकत्र जमलेले लोक असाहि अर्थ करतां येईल. मी अखिल मानव समाज असा अर्थ करीत नाहीं. विश्वबंधुत्वाची कल्पना करणारा उच्चवातावरणीय साधु असला पाहिजे. कल्पना सोपी पण आचरणांत आणणें अवघड आहे. समाज शद्वाचा व्यवहारांतील संकुंचित अर्थ करून एक प्रकारच्या हिताहितानें निगडीत झालेले लोक, असा अर्थ धरून अखिल हिंदी समाज हीच कल्पना गृहीत धरितों. मनुष्य ह्मणजे कळप करून रहाणारा प्राणी असा अर्थ एका शास्त्रज्ञानें ठरविला आहे. मनुष्य एकटा राहूं शकत नाहीं; तपीतापसी एकटे रहात असतात. एक तर त्यानीं हृदय मारलेलें असतें कींवा ते उच्चवातावरणांत तरी पोंचलेले असतात. दोन माणसें एकत्र असलीं तर शत्रूत्व सुद्धां विसरतील. मनुष्य हा स्नेहाचा भोक्ता आहे. प्रेम नसतें तर मनुष्यप्राणी जगला नसता. पतिपत्नी एकमेकांच्या प्रेमावरच जगतात. समाजरूपीसागर व्यक्तिरूपी बिंदूंचा बनलेला आहे. त्याचा अफाटपणा व खोली हीं सर्व त्या जलबिंदूंच्या संघटनावर अवलंबून असतात. प्रत्येक बिंदुनें पळता पाय काढला तर विस्तिर्ण सागरा ऐवजीं भयाण वाळंवंट मात्र दिसेल. प्रत्येकानें स्वतःपुरताच विचार केला तर चांगलें नव्हे. प्रत्येकजण स्वार्थामागें लागेल तर मानवी सद्गुण जळून खाक होतील. समाजाविषयीं प्रेमबुद्धि व समाजहिततत्परता यांचा प्रत्येक व्यक्तींत अभाव असल्यास, समाजाचीहि सागराप्रमाणेंच स्थिति होईल. देशकार्य व समाजसेवा यांत अंतर नाहीं. देशबांधवांचें कार्य ह्मणजेच समाजकार्य. रॉबिन्सन क्रुसोसारखें राहणें कुणालाहि आवडणार नाहीं. प्रत्येक विरक्त मनुष्य देखील समाजप्रीय असतो. आपण ज्या समाजाच्या उन्नतीचा फायदा घेत असतों त्याच्या उत्कर्षाकरितां झटणें अवश्य होय. परंतु दुर्दैवानें आमच्या हिंदु लोकांची समाजप्रीयता सकुंचित धोरणाची व नाइलाजाची आहे. समाजामध्यें आपण राहतों; व सर्व व्यवहार करितों इतकेंच. समाजरूपी देवतीची खऱ्या भावनेनें पूजा करण्याचें बाळकडूच आपणाला नाहीं. आजच्या आमच्या अवनतीचीं कारणें अनेक असलीं तरी समाजसेवा प्रवृत्तीचा बहुतेक ठिकाणीं आढळणारा अभाव हेंच त्यांतील प्रमुख कारण आहे. थोडेसे समाजसेवक सोडले तर आमच्यांत समाजाची कल्पना नाहीं. मूर्तिपूजेप्रमाणेंच एकीनेष्टनें समाजपूजा केली पाहिजे. हिंदुसमाज पूजेच्या बाबतींत मात्र नास्तिक आहेत. हिंदूंची ईश्वरावर श्रद्धा —आसक्ती आहे. पण समाजेश्वराविषयीं पूर्ण विरक्ती ! समाज व्यक्तीसांठीं व व्यक्ति स-

Ano 9 N. 42

[...]a 15 de Janeiro de 1925

[A]SSINATURA
[C]ada ano tres rupias

[A]NUNCIOS
por c[...] [...]ada que repetida uma tanga
[...] avulso uma tanga

[DIRECT]OR E EDITOR
[G. P.] Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक ४२

गुरुवार ता. १५ जानेवारी सन १९२५

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. ( आगाऊ )

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केंपें–गोवा

S. R. Biblioteca Nacional Pangim

# MUCH ADO ABOUT NOTHING

A *India Portugueza* de Margão formula, na sua edição de 8 do corrente, uma especie de libelo acusatorio contra os hindús que se mantiveram alheios aos festejos do Centenario de D. Vasco da Gama, lembrando ao mesmo tempo, ao governo *o dever de punir severamente os que pretenderam arvorar a bandeira da rebelião, os insensatos que assumiram uma atitude subversiva, altamente condenavel* perante os mesmos festejos, *os dementados que se sublevaram audaciosamente contra a* comemoração do centenario, *os exaltados que pretendem desorientar as massas com uma propaganda sediciosa*, finalmente, *a meia duzia de tresloucados que, pelos desvairos*, procuraram pôr em perigo *os interesses da Soberania Nacional* e afrontar *os Brios Nacionais.*

Não sabemos o que admirar nessa *scintilante* e *faiscante* prosa da *India Portuguesa*, se a crassa ignorancia de quem imaginou factos que se não deram, se a sua manifesta má fé, se, finalmente, a sua acendrada má vontade para com os hindús, traduzida numa adjectivação insultuosa e impertinente!

Mas ¿que *loucuras* cometeram os tais *de meia duzia de cérebros escandencidos*? ¿Que *movimento asnatico promoveram* contra o centenario do Gama? ¿Em que consistiu a sua *rebelião, a sua atitude subversiva*, a *afronta feita* por elês *aos Brios Nacionais*, periclitando *os interesses da Soberania Nacional*?

Scilencio profundo, nem um pio a êsse respeito. Há sò alegações atrevidas — ¿e porque não petulantes? — e não existe coisa alguma que as comprove, que as justifique, nem por [i]sto. Multiplicam-se aí só *as generalisações que são sempre perigosas*. Só isto e nada mais.

O *Bharat* pouco se preocuparia com a *brincadeira* da *India marganense*; mas, como essa brincadeira é de mau gosto, dimanada, sobretuto, duma pessôa em quem, por erro de visão, julgavamos arraigados bom senso, rara acuidade de vistas e indefectivel ponderação na analise e apreciação dos actos e factos — torna se forçoso repelir as insinuações maldosas com que, levianamente, o aludido hebdomodario pretendeu atingir-nos, deturpando, ou por ignorancia ou por petulancia, a verdadeira significação das coisas.

* * *

Vejamos, agora, se no ambito da adjectivaçao acusato'ria, maldosa e insultuosa da *India marganense*, podera', embora remotamente, ficar compreendido o *Bharat* ou qualquer outro que, como ele, tenha procedido nas festas do Centenario.

O *Bharat*, como orgao independente dopiniao hindu', analisou, no seu pleno direito da liberdade de expressao, a personalidade historica do Gama, apreciando lhe sob varios pontos de vista a obra e o seu resultado. Tanto a mesma analise como a referida apreciaçao se alicerçaram nos dados fornecidos pelas proprias autoridades historicas portuguesas. Nada acrescentou nem nada suprimiu por iniciativa propria. *O Bharat* fez-se, por assim dizer, sem mais nem menos que uma especie de "porta-voz" ou "gramofone" da Historia. E para ser coerente com os ditames da consciencia moral, formada pela Mestra da Vida, o nosso jornal absteve-se, pura e simplesmente, de tomar parte nos festejos do Gama.

A isto e so' a isto e' que se circunscreveu o nosso papel perante *as comemoraçoes do 4° centenario.*

¿Sera' alguem capaz de descobrir no nosso franco e sincero proceder o mais ligeiro vislumbre, enxergar a mais palida sombra de "atitude subversiva" de "rebeliao," do perigo "dos interesses da Soberania Nacional, da "manifestaçao de chauvenismo" de afronta aos Brios Nacionais" e de outras coisas de que a *India* acusa, a torto e a direito, ao ar e genericamente, prontificando se ate' *a estar ao lado do governo*, "enquanto se tratar de punir seja com que violencia for," os...criminosos?

¿Desde quando para a *India*, a simples abstençao, como consequencia dos ensinamentos da Historia, passou a significar "rebeliao, subversao, perigo dos interesses da Soberania Nacional" e outras coisas semilhantes?

Simplesmente piramidal!!

O que a propria *A Provincia* nao foi capaz de dizer, insinuou a *India* tentando maliciosamente criar uma atmosfera de suspeiçoes contra os que tiveram a franqueza inocente de dizer o que sentiram, sem ofender minimamente a Republica e os Brios Nacionais que todos os hindu's, todos sem exepçao, amam mais do que tudo!

Essa "diversidade" que e' bem significativa, como o leitor deve ter bem compreendido, confirma mais uma vez o que tantissimas vezes temos dito aqui: se os destinos do nosso Paiz fossem confiados aos da laia da "India Portuguesa" e nao houvesse ca' europeus liberais e magnanimos que animaram e animam sempre o progresso dos hindu's, deixariam de estes existir!

A "India Marganense" foi, pois, infeliz em fazer insinuaçoes perigosas e nao tardara' que se arrependa do seu passo impensado.

* * *

Quem sabe, porem, que a *India* de Margao e' uma metamorfose de "Popular, Rebate, Opiniao e Lanterna" conhece tambem o passado politico do seu director, passado que varreramos da memoria mas que, agora, se torna forçoso revolve-lo, mau grado.

¿Pensa, por ventura, o sr. Loiola que os hindu's andam esquecidos da sua "atitude subversiva, da sua rebeliao, das suas manifestaçoes de chauvinismo, da sua afronta," contra a Republica, contra a "Soberania Nacional" e contra os "Brios Nacionais" quando eles festejavam, entusiastica e delirantemente, a implantaçao do regime de 5 de outubro que guerreou sem descansó, negando ate', por muito tempo, obediencia a' bandeira verde-vermelha?

¿Supoi Sua Excia. que os hindu's nao trazem gravada na memoria aquela sua celebre expressao que dizia que "O regosijo dos hindu's e' o lucto dos cristaos," juntamente com a tentativa de estrangular a' nascença o amor dos indios pela Republica?

¿Imagina que a gente nao se lembra da odienta campanha de descredito fomentada contra o regime democratico a cujas expensas ora se regala em troca da renegaçao dos principios que aparentava professa-los?

Os hindu's nao sao nem nunca serao capazes disso. Eles sao e serao sempre republicanos devotados. E, se alguns deles se abstiveram de tomar parte nas festas do centenario, foi precisamente, porque quizeram se[r] coerentes com a Historia; mas, se [se] convencerem, em face da mesma Historia, e nao com adjectivaçao maldosa e insultuosa, de que laboraram no erro, de que foram "injustos e ingratos, nao terao eles duvida em corrigir publicamente, esse seu erro e penitenciar-se de sua falta. --

A "India" quiz, pelo visto, julgar outros por si; mas enganou-se com o nu'mero da porta...

## QUEM NASCEU TORTO...

No Congresso Nacional Social, reunido em Lucknow, um congressista *reformer* apresentou uma proposta no sentido de se permitir divorcio aos hindu's. Houve acalorada discussao sobre a mesma these que, afinal, foi regeitada *in limine* por uma maioria esmagadora.

E' de notar que tomaram parte na discussao varios graduados em diferentes Universidades de Londres e da India Britanica, os quais, na sua quase totalidade, frisaram que a civilisaçao indiana nao era de molde a poder *digerir* o divorcio.

¿Que dirao, agora, a isto os que defendem, *a' outrance*, o divorcio requerido por tal senhora hindu' de nobre estirpe, mas duma familia cujo rico chefe manifestou-se, publica e espalhafatosamente, contra o simpatico movimento da fusao de sub-castas entre os bramanes *sarasvatas*?

O divorcio requerido pela referida senhora de nobre estirpe foi, pois, — repetimos mais uma vez e repetiremos sempre—um mau exemplo de piores consequencias sociais e de pessimo resultado moral.

Mas, quem nasceu torto nunca se endireita...

## रिंगणी सरबत

( SYRUP SOLANUM COMPOUND )

रिंगणी, अडुळसा, डोर्लीमुळ, पिंपळी, जेष्टमध इ. वनस्पतीपासून हें सरबत बनविलें आहे. हें घेण्यास गोड आहे. जुनाट खोकला, दमा व श्वास यांवर हें अत्यंत गुणकारी आहे. फुप्फुसाच्या कोणत्याहि विकारांत याचा चांगला उपयोग होतो. छातींत दुखणें, कफांतून रक्त पडणें, क्षयांतील खोकला-ढास लागणें, फुप्फुस दाह, श्वासनलिकादाह, मुलांचा डांग्याखोकला, आंकडी इ० विकारांवर हें गुणकारी आहे. यानें चिकट कफ पातळ होऊन तो त्रासाशिवाय बाहेर पडतो. आठ औंस ( २० तोळे ) बाटलीस किंमत ३॥ रुपये ट. ख. निराळा.

**अडुळसा सरबत**— (SYRUP ADHAT TODAVASAKA) हें सरबत अडुळशाचे ताज्या पानापासून बनविलें आहे. कमी जोराचा व साधा खोकला, दमा पडणें, येणें, जबरदस्त सर्दी इ० विकारांवर हें गुणकारी आहे. चार औंस बा. १ रुपया.

इतर औषधांचे माहिती करितां क्यॅटलाग मागवा.

आमचेकडे सर्व प्रकारचीं आयुर्वेदिक औषधें मिळतात.

**धी इंडियन मेडिकल फार्मसी, बुधवार पेठ, पुणें शहर.**



## व्होदीन

जुनाट संधिवात, मस्तक शूळ, कपाळ दुखणें या व्याधींवर उत्तम फ्रेंच औषध 'व्होदीन'च्या १२ वड्यांनीं खात्रीनें गुण येतो. तसेंच थंडी वाजणें, इंन्फ्लुयंझा, संधीज्वर (टायफड) व साधारणपणें सर्व जंतुत्पादक तापांवर या औषधाचा फारच उपयोग होतो. २० वड्या असलेल्या बाटलीची किंमत फक्त दहा आणे.

मिळण्याचीं ठिकाणें

पणजी— द्रोगारी—फार्मसी आझावेद. | फार्मसी गास्पार आलेमांव, **फोंडें.**
द्रोगारी आर्यन. | हिंदु फार्मसी, **पणजी.**

**लुझो इंदियान दवाखाना, पणजी**



रंगभूमि मासिकांतून प्रसिद्ध झालेले

कै० राम गणेश गडकरी यांचे

## विनोदी लेख

कांहींतरी विनोद, नाटक कसें लिहावें, नाटकाची उत्पत्ति वगैरे विषय आले आहेत, किं. १२ आणे.

## महाराष्ट्रीय नट

सुंदर २५ फोटोसह महाराष्ट्रांत पूर्वी होऊन गेलेले व हल्लीं रंगभूमीवर काम करीत असलेल्या नटांचीं संपूर्ण चरित्रें किंमत दहा आणे.

## महाराष्ट्रीय नाटककार

सुंदर १५ फोटोसह महाराष्ट्र नाट्यकलेचा संपूर्ण इतिहास समजण्यास हें पुस्तक उपयोगी आहे. किं. दहा आणे.

तिन्ही पुस्तकें एकदम घेणाऱ्यास व्ही. पी. सह दोन रुपये.

पुस्तकें— किर्लोस्कर संगीत मंडळी, सोलापूर,

किंवा— म्यानेजर किर्लोस्कर बुकडेपो, १९९ कसबा, पुणें शहर. १२-२



## ESTABELECIMENTO COMERCIAL
DE
## Visnum Ramachondra Quenim

**FUNDADO EM 1850**

MERCADO VELHO-MARGAO

CONTA já mais de 73 anos de fundação o sobredito estabelecimento comercial. E' portanto um dos mais antigos da vila de Margão, mantendo relações com as mais afamadas firmas comerciaes e industriais da Europa e da America, paizes donde, em regra, importa todas as qualidades de tintas, aboc, oleos, verniz, linhança, cimento, gis etc. toda a sorte de artigos de ferro, como pregos, aldraves, cadeados, bisagras, parafusos, canos de ferro etc. especialidades de pastas de zinco lisas e concavas e as de cobre.

NO REFERIDO estabelecimento vendem-se tambem artigos alimenticios da primeira necessidade e todas outras mercadorias de que se acha bem provido.

**BEM SERVIR O FREGUEZ E' O SEU LEMA**

Experimentem que sempre lhes será proveitosa a experiencia !



## किर्लोस्कर लोखंडी नांगर

यंदाच्या मोसमांत किर्लोस्कर नांगरच आपल्या शेतावर वापरण्याचा निश्चय करून ते मोसमाच्या सुरवातीलाच मागवून ठेवा.

माल उत्कृष्ठ !! किंमत माफक !!

## किर्लोस्कर बंधु लिमिटेड.

पो. किर्लोस्करवाडी ( जि. सातारा सं. औंध )

## चोहोंकडे हेच पसंत



## धि नेशनल राइस & फ्लॉवर मिल्स

मडगांव—गोवा

आमच्या कारखान्यांत निर्मळ असें उत्तम प्रकारचें पीठ तयार होत असून, त्यापासून तयार होणारे सर्व तऱ्हेचे पदार्थ दिवसें दिवस लोकांस आवडावयास लागले आहेत. हा एकच पुरावा आमच्या पिठाचा उत्कृष्टपणा सिद्ध करण्यास पुरेसा आहे बाहेरचें अशुद्ध व जुनेंपुराणें पीठ खाण्यापेक्षां स्वदेशी, पवित्र व ताजें पीठ खाण्यांत स्वार्थहि आहे व परार्थहि आहे, हें गोमांतकीय जनतेनें विसरतां कामा नये.

भारत

मिति पौष कृ० ५ मी शके १८४६

## पीयूषकांती घोषांची मुलाखत

राष्ट्रीय महासभेच्या आठवड्यांत विजयानगरांत भरलेल्या परलोकविद्या परिषदेचे नियोजित अध्यक्ष व कलकत्त्यास प्रसिद्ध होणाऱ्या दैनिक 'अमृतबझार पत्रिके'चे संपादक बाबु पीयूषकांती घोष सध्या गोमांतकाच्या गतवैभवाची व सद्य:परिस्थितीची खात्रीलायक माहिती मिळविण्याकरतां इकडे आले आहेत. गेल्या बुधवारीं आमच्या प्रतिनिधीनीं सांवर्डे स्टेशनावर त्यांची मुलाखत घेतली. त्या वेळीं आमच्या प्रतिनिधीनीं यंदांच्या राष्ट्रीय सभेच्या यशस्वीतेविषयीं आपणास काय वाटतें ? असा प्रश्न त्यांस विचारतांच त्यांनीं खालील उत्तर दिलें.

राष्ट्रीय महासभेनें यंदा जो कार्यक्रम सभासदांपुढें ठेवला आहे तो ज्या प्रमाणांत पुरा केला जाईल त्यावरून राष्ट्रीय सभेच्या यशाचें अनुमान निघण्यासारखें आहे. पण महात्माजी आदिकरून निरनिराळ्या प्रांताच्या पुढाऱ्यांनीं 'खादी व चरका' ह्या दोहोंवर दिलेल्या शक्तिसर्वस्वपूर्ण जोरावरून तर्क करावयाचा झाल्यास 'खाद्दर प्रोग्राम' पुरा करण्याकडेच प्रत्येकजण आपली वेळ वेंचील अशी माझी खात्री आहे. दुसरी आनंदाची गोष्ट ही कीं, ह्या महासभेंत सुदैवानें स्वराजिस्ट व नाफेर ह्या पक्षांमध्यें खटका उडाला नाहीं. महात्माजींच्या विनंतीस मान देऊन त्यांनीं द्वेषबुद्धीस तात्पुरती जलसमाधी दिली आहे व वास्तवच खादी प्रसाराचें कार्य जीवाच्या जोमानें करण्याची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली आहे. महात्मा गांधी ही एक कामकरी व्यक्ति असल्यानें त्यांना कामाशिवाय दूजें कांहींच माहीत नाहीं. आणि दुसऱ्याकडून त्यानां केव्हाहि कामाचीच अपेक्षा असते. त्यानीं सेक्रेटरींची निवडहि अशाच धर्तीवर केली आहे कीं, खादीची निपज धडाडीनें व्हावी. महासभेनंतर दोन दिवसानीं भरलेल्या "खादी व कॆंधॆ कॉन्फरन्स"मध्यें महात्माजींना सर्वांकडून प्रोत्साहनपर, उत्साहवर्धक व समाधानकारक असें वचन–अर्थातच पुढील कार्याचें प्रोत्साहन मिळालें आहे. स्वराज्य संपादनांत महात्माजींचें मुख्य तत्व खादी हेंच आहे. खादीशिवाय त्यांस कांहींच प्रीय नाहीं. ह्याचसाठीं खादी प्रसाराचें कार्य ज्या महात्म्याची गणना जगांतील अत्यंत श्रेष्ठ व्यक्तींत होते त्यांच्या नियंत्रणाखालीं एकत्र आचार, विचार व उच्चार करणाऱ्या एकंदर पक्षाकडून तडीस नेलें जाईल असें मला वाटतें.

बंगालविषयींच सांगावयाचें झालें तर तेथें स्वराजिष्टांनीं संघटनेच्या जोरावर बरीच मजल मारली आहे. बंगाल्यांतील बहुतेक डिस्ट्रीक्ट बोर्डें, मुनिसिपालट्या व इतर स्थानिक स्वराज्य संस्था कलकत्ता मुनिसिपालटीसह स्वराजिष्टांनीं पुन्या काबीज केल्या आहेत. काँग्रेसचा हुकूम व कार्यक्रम पाळण्याची अवघड जबाबदारी त्यानीं आपण होऊनच स्वत:वर ओढून घेतली आहे. शिवाय त्या पक्षाच ध्येय काँग्रेसनें पसंत केलें असल्यानें त्यांस आतां कुरकुर करण्याचें कोणतेंच कारण राहिलेलें नाहीं; तर उलट त्यांच्या कार्यास जोरच मिळाला आहे. ह्यावरून मी खात्री देऊं शकतों कीं, बंगालांत तरी निदान जोराची चळवळ केली जाईल.

## स्फुट विचार

**सत्यमेव जयते नानृतम्:—** ब्रिटिश हिंदुस्थानच्या व्हाइसरॉय साहेबांची स्वारी लवाजम्यानिशीं कांहीं सरकारी कामासाठीं गेल्या महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत मुंबापुरीस येणार असल्याचें जेव्हां निश्चित झालें, तेव्हां त्याचें अपालोबंदरावर स्वागत करून आपल्या राजभक्तीचें प्रदर्शन करण्याविषयीं निमंत्रणवजा हुकूम सर्वत्र सुटले होते. पण मुंबई कोर्पोरेशनचे अध्यक्ष ह्या नात्यानें श्री. पटेलांस जें आमंत्रण पाठविलें गेलें होतें तें जरा आग्रहाचें व विनवणीचें असेंच होतें. वास्तविक लाट साहेबांस दिल्या जाणाऱ्या 'बड्याखान्यांत' भाग घेण्याविषयीं सरकाररीत्या जाहीर आमंत्रण म्हणजे आपल्या आयुष्यांतील अगर कारकिर्दीतल एक अत्यंत महत्वाचा व स्वर्गीय आनंदाचा प्रसंग पूर्वापार वहिवाटीनुसार समजला जावयाचा; पण श्री. पटेल यानीं अध्यक्ष ह्या नात्यानें स्वागत समारंभांत उत्साहानें भाग घेण्याचें आपलें कर्तव्यकर्म असतां ती विनंति लाथाडली. हें निमंत्रण फेंटाळतानां श्री. पटेलानीं स्पष्ट जाहीर केलें कीं 'ज्या हातानें बंगाल ऑर्डीनन्स सारख्या वैयक्तिक स्वातंत्र्यावर घाला घालणाऱ्या जादा हुकुमावर सही करण्याइतकी उद्दाम वृत्ति दाखविली, त्या हातार्शी आपला हात भिडवून स्वत:स विटाळून घेण्याची आपली मुळींच तयारी नाहीं; पण कोर्पोरेशनच्या अध्यक्षानीं ह्या राजभक्ति प्रदर्शनांत भाग घ्यावा असा ठराव बहुमतानें पास केल्यानें श्री. पटेलांस अध्यक्षपदाचा राजिनामा खरडून सदसद्विवेक बुद्धीस जागणें भाग पडलें. अशा रीतीनें कर्तव्यकर्म व विवेकबुद्धि ह्यांमध्यें लागलेल्या लढ्यांत विवेकबुद्धीचाच विजय झाला; व हिन्दी लोकशाहीच्या स्वाभिमानाचें प्रत्यंतर व्हाईसराय साहेबांस दाखविलें गेलें. पण सत्य तें केव्हांहि झालें तरी सत्यच. दिव्य तेजाच्या हिऱ्यावर चढलेला मळ काढून टांकतांच तो ज्याप्रमाणें तिप्पट ताकदीनेंच चकाकूं लागतो त्याचप्रमाणें कोर्पोरेशनच्या अध्यक्षांच्या निवडणुकींत गेल्या आठवड्यांत श्री पटेल ह्यांचीच बहुमतानें अध्यक्षपदावर नेमणूक झाली व जोहुकुमवर्गालाहि सदसद्विवेकबुद्धीपुढें मान वांकविणें अपरिहार्य झालें.

**महात्माजी व गोमांतकीय खिस्ती वर्ग:—** थोडक्याच दिवसांत म० गांधी गोमांतकास भेट देणार असल्याचें जाहीर झालें मात्र, तोंच आमच्या खिश्चन प्रांतबंधूनीं अकांडतांडव करून आकाश पाताळ एक करून सोडण्याचा घाट घातला. आधींच ठरून गेल्याप्रमाणें महात्माजींची भेट घेण्यास गेलेल्या गोमांतकीय शिष्टमंडळाचेंच हें सारें कुटिल कारस्थान असा काकतालीय न्यायाचा संशय घेऊन त्यांनीं ह्या राजकारणाच्या नसत्या उठाठेवी व उलाढाली करणाऱ्या हिंदूंना त्याबद्दल प्रेमभावानें शिव्यांची लाखोलीहि वाहिली. महात्मा गांधी ! आणि तेहि गोमांतकांत ! पोर्तुगीज सरकारच्या हक्काच्या व मालकीच्या कुरणांत ह्या जिंतीबांना त्यांनीं आपली एक उदार अंत:करणानें फिरकावयाची चरावयाची नव्हे, तो हक्क पोर्तुगीजांचा किंवा बाटग्या खिश्चनांचा– मालकीक दिली; ह्मणून का त्यानीं ह्या राज्यक्रांत्या करणाऱ्या गांधीलाहि आंत आणावें? हें बायबलच्या कोणत्या भागांत आहे ? व जें बायबलांत नाहीं अगर पाद्र्यांच्याहि तोंडीं नाहीं तें त्यांनीं कोणत्या आधारावर करूं द्यावें ? महात्मा गांधी हे चालू ब्रिटिश राज्यपद्धतीचे कट्टे शत्रू समजले जातात अर्थातच आमच्या पोर्तुगीज राज्यकारभाराचाहि कदाचित् अनुभवानें त्यास किळस यावयाचा. हें अगदीं उघड उघड दिसत असतां आपल्याच पायावर धोंडा पाडून घेण्यास आमच्या परधर्मीय प्रांतबंधूंनीं कसें तयार व्हावें? हिंदूंचा हा कोठला न्याय ? मडगांवांस महात्माजींच्या छायाचित्र मिरवणुकीस जी अधिकारी वर्गानें बंदी केली तीनें 'सावधान' न होतां ह्या काळ्या कातडीच्या रानवटानीं महात्मा गांधींना गोमांतकांत येण्याविषयीं आमंत्रण देऊन बाबाची संध्या मूळावर कां आणावी ? वरील प्रकारचे विचार आज गोमांतकातील हिंदुद्वेष्ट्या मंडळीच्या डोक्यांत वावरत आहेत. बरें झालें कीं, कांहीं जरूरीच्या कामासाठीं महात्माजींना अहमदाबादेस जावें लागलें व ह्मणून त्यांची वेंगुर्ल्याहून गोंव्यांस येण्याची खेप चुकली ! व त्यांच्या आगमनानें जिकडे तिकडे अराजकता पसरून बंडाळी माजल्याचें कल्पनाचित्र रेखाटण्याचे आमच्या खिस्ती बांधवांचे श्रम वांचले.

## आजचें पोर्तुगीज सदर

अग्रलेख:—

**मडगांवच्या 'इंदिय पोर्तुगेज' पत्राला उत्तर; गामोत्सव व गोमांतकस्थ हिंदु.**

स्फुट व इतर विषय:—

**घटस्फोट व लखनौची हिंदी सामाजिक परिषद; दो० सुब्राय विठ्ठल प्रभु देसाई यांचा सांगें मुनिसिपालटीसंबंधींचा लेख, इ.**

## वर्तमानसार

—रायबंदर येथील श्री शारदा वाचन मंदिराचा बारावा वाढदिवस मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. याप्रसंगीं भरलेल्या सभेंत रामचंद्र नारायण प्रभू लंवदे, सुब्रायें विठ्ठल मांद्रेकर [अध्यक्ष], नारायण राया धोंड, इत्यादि गृहस्थांचीं भाषणें झालीं.

—ज्या सरकारी हुकुमान्वयें सांगें मुनिसिपालटीच्या मेंबरांची बदनामी करण्यांत आली, त्याचा विचार करण्यासाठीं सांवर्डे येथें येत्या २१ तारखेला सांगें तालुक्यांतील नागरिकांची जाहीर सभा भरणार आहे.

—सिलव्हेस्त्र परेर नांवांच्या एका सर्जंटानें कुंडई येथील एका प्रतिष्ठित गृहस्थावर दारूच्या निशेंत अत्याचार केल्यावरून फोंडें–तालुक्यांत गडबड उडाली आहे. दिवसेंदिवस पोलीस लोकांविषयीं लोकांत अप्रीति वाढण्यास वरील गोष्ट कारणीभूत होईल,हें उघड आहे.

—प्रो० आत्माराम पाणंदीकर–मडगांवच्या पाठशाळेचे तात्पुर्ते अध्यापक–यांस कामावरून बडतर्फ केल्याची बातमी आहे!

—गामोत्सव सोडून बेळगांव काँग्रेसला हजर राहिलेल्या कित्येक सरकारी नोकरांची हकालपट्टी करण्यांत येईल, अशी बोलवा आहे ! खरें खोटें राम जाणें !

—कांहीं हिंदुद्वेष्ट्यांनीं गामोत्सव प्रकरणाचा फायदा घेऊन हिंदूंविरुद्ध भलभलत्या कंड्या उठविण्याचा एकसारखा सपाटा चालू ठेविला आहे !

## वर्गणीदारांस—

भारताचें नववें वर्ष संपत आलें असून ज्यांकडून चालू व मागच्या वर्षांची वर्गणी आली नसेल, त्यांनीं ती ताबडतोब चुकती करण्यांची कृपा करावी. म. भारत

# समाज सुधारणा

## विवाह

### लेखांक १ ला.

आपल्या देशाच्या उन्नतीकडे आज बऱ्याच लोकांचें लक्ष्य लागलेलें आहे. इतर देशाकडे पहातां आपल्या देशाची स्थिति फारशी आशाजनक नाहीं. असें जरी असलें तरी पण पुष्कळ विद्वानांचें लक्ष्य त्या कामीं लागलेलें असून त्यांचे निरनिराळ्या दिशानींहि प्रयत्न चाललेले आहेत. ही अत्यंत समाधानाची गोष्ट होय. देशाची उन्नति होण्याला या देशामध्यें उच्च प्रकारचें वाङ्मय तयार व्हावें लागतें. त्याप्रमाणें आज देशी भाषांमध्यें निरनिराळ्या विषयांवरील उत्तम प्रकारचे ग्रंथ तयार होत असून आपल्या देशाची उन्नति फार दूर नाहीं अशी खात्री बाळगण्याला कोणतीच हरकत नाहीं.

हिन्दुस्थानामध्यें अनेक भाषा आहेत. परंतु राष्ट्रीय भाषेचें स्थान हिंदीनें पटकावलेलें आहे. सर्व हिन्दुस्थानची एक भाषा होण्याला हिन्दी हीच योग्य आहे व ती झालेलीहि असुन उच्च प्रकारचें वाङ्मय तयार करण्याकडे त्या भाषेंतील विद्वानाचें लक्ष लागलेलें आहे. राष्ट्रीयशिक्षणाकरतां

# Pela verdade !

O *Bol. Of.*, n.º 3 da serie corrente publicou uma portaria, dissolvendo a Camara Municipal de Sanguem.

Essa portaria e' uma especie de "pano de amostra" para a gente orientar-se "a' priori" sobre o modo de ser de nossa administragao politica, como o leitor vai ver nas seguintes linhas explicativas, tragadas apenas para desfazer equivocos que por ventura ela provoque em volta da honestidade do signatario.

Diz a portaria que a Camara nao submeteu a' aprovagao do Governo o seu orgamento ordinario; mas ha' documentos comprobativos de ter-lhe sido ele enviado mais de tres vezes. O que o Governo fez e', sempre, devolve-lo, "determinando" ao municipio alteragoes nas receitas criadas, sem, todavia, ter-lhe indicado disposigao legal a que se socorrer nem tao pouco haver-lhe demonstrado a ilegalidade da criagao das mesmas receitas!

Refere se, em seguida, a portaria a' queima de papeis, livros e documentos a' falsificagao destes e ao desvio de dinheiro, envolvendo nesses actos toda a vereagao que afirma ter sido ouvida no inquerito, havido por tais causas. A verdade, porem, e' que nem o signatario como presidente nem o vice-presidente foram acusados na sua queixa por tal municipe, da queima ou de qualquer outro acto e muito menos ouvidos no inquerito referido!!

¿Teria, porventura, sido ordenado o inquerito para apurar apenas a acusagao, ouvindo so' o queixoso e suas testimunhas, sem audigao dos acusados e de sua defesa?

Vejo que laborei no mais crasso erro, quando julguei que os inqueritos eram para o descobrimento da verdade, ouvidos os acusadores e acusados.

A que chegamos?!

Acrescenta-se, tambem, que se provou ter o tesoureiro aproveitado as receitas da Camara em proveito proprio e falsificado os documentos, mas nao se individualisam nem as mesmas

r... eceitas nem se especificam os mes
m... os documentos!
N... linguem se queixa da queima dos
docu... mentes, entrados na Camana
desde ... 1918 ate' hoje; e, todavia, en-
volve..s ... e a vereagao dissolvida na sus-
peigao ... la fantastica queima...
Tera' o ... esaparecido o que nao exis-
tiu ?

Afirma a... nais a portaria que foi ne-
cessario "or... denar" a desligagao do
tesoureiro, qu... ando e' certo que o pro-
prio Governo "... o desligou sem ouvir a
Camara," por u... ma portaria sua pela
qual foi ate' nom... eado outro, ninguem
sabendo com que ... atribuigoes legais?

¿Teria sido orde... nado tambem pelo
Governo o "senetea... mento" do Cofre
municipal? E em virt... ude de que lei?

Pelo visto, para o ... Governo estao
em vigor so' a Base 57 ... e suas alineas
e se acham revogados a ... Base 22.a as
suas alineas *a* e *b*. ou a s... cgao 2a. do

mesmo Decreto!

Antes dessa portaria da dissolugao da Camara, esta representara ao Governo no dia 3 do corrente a situagao perplexa criada pela portaria n.º 817 da desligagao do tesoureiro, tendo na nota de 5 do corrente pintado o quadro fiel do estado das coisas municipais, nota em que se solicitara a nomeagao duma comissao composta de cidadaos extranhos a' politiquice local para fazer um inquerito aos actos da Camara e Administragao do Concelho. Na mesma nota pedia ate' a Camara a sua dissolugao no caso de nao ser atendida a sua petigao visto que se tornara insuportavel a atitude impertinente dos delegados do Governo.

A curiosa e *furiosa* portaria nao faz, porem, minima alusao a tudo isso.

Em suma: a queima de papeis, a falsificagao dos documentos, o inquerito de que a Camara nunca teve conhecimento oficial, a historia do orgamento, a desligagao do tesoureiro e outras coisas e loisas nao represntam senao uma pura mistificagao, resultado da politiquice local que encontrou esteio firme na protecgao de quem devia conservar-se alheio ao jogo maquiavelico das intrigas.

Mas O *Bharat* e' pequeno e o que o signatario tem a dizer sobre a politica municipal de Sanguem e' muito, o que fara' por meios constitucionais e competentes, mas ja', para que se conhega a verdade toda, nu'a e cru'a.

*Subraia V. Dessai*

# MUITO GRAVE!

Recebemos a seguinte carta:

"Ontem á noite (8-1-925) deu-se um caso bastante grave na aldêa Mardol deste concelho cujos habitantes presencêaram uma das mais tristes scenas de que foi autor um sargento de Policia de Pondá, de nome Silvestre Pereira o qual perpetrou barbaridades que só desacreditam a nossa Policia que é criada para manter ordem e não para causar desordem.

Esse sr. sargento depois de praticar escandalos e desordens nas casas de algumas bailaderas donde foi enfim enxotado entrando pelas 8 horas de noite no edificio do Templo de Xri Malsá de Mardol, agrediu por um motivo verdadeiramente fútil, o tesoureiro da referida mesa um cidadão altamente cotado neste meio e que gosa de simpatias gerais, ofendendo-o com palavras indecentes e injuriosas em presença de centenas de individuos que ai acorriam para lhe pedir que não praticasse tal acto. Mas o *brioso* sargento, ainda mais furioso, ameaçando-o de matar com tiros de pistola em punho e no meio de geral sossôbro prendeu aquele ilustre cidadão e o conduziu ao Posto de Mardol, acompanhado de praças armadas cobrindo-o durante o trajecto de enxovalhos e apodos infamantes!

O caso, porem, não parou aqui.

Sua Exa. depois de o deixar preso nesse Posto, amarrou-o com uma grossa corda de cairo, juntamente com um gatuno e mais um servente do proprio agredido, fazendo andar a todos tres, acompanhados de praças armadas, por todo o bazar de Mardol com o fim de vexá los perante os comerciantes e povo que tanto o estimam! Este espectaculo fazia crer que a Lei Marcial estava proclamada!

Não cessando o seu rancor ainda com este acto deshumano, o tal sargento levou-o arrastando naquele estado lá pela alta hora de noite, por algumas aldêas circunvizinhas, tais como Manguexa, Cundaim, Boma, etc. e deixou numa longiqua choupana no mato de Boma, ameaçando o ai, a cada momento, com o revolver.

Que é isto, sr. Director do *Bharat*? Estamos na Republica Portuguesa ou estamos na anarquia? Onde estamos?!

Este acontecimento tem causado geral indignação por todo o concelho de Pondá e ainda fóra dele. ¿Que idêa farão da nossa Policia centenas de mazanes estrangeiros do Templo de Xry Malsá?

¿E' como a Policia zela pela honra da nossa Republica!?"

(*Garantida*) De V...*N*.

*N. da R.*—Não comentamos. Esperamos, apenas, que os srs. Tenente-Coronel Craveiro Lopes e Comandante de Pondá que certamente, presam mais a justiça e a honra do glorioso exercito portuguez tomarão sobre o caso medidas energicas.

# Convite

São convocados os srs. Municipes do Concelho de Sanguem para uma reunião nas casas dos srs. Sanvordencares em Sanvordem no dia 21 do corrente para ouvirem os vereadores da Câmara Municipal que se acha dissolvida, vereadores, que tambem ficam convidados e resolverem sobre a atitude a ser tomada perante a portaria da dissolução, segundo o que fôr apurado na mesma reunião.

Aos 11 de janeiro de 1925.

*Govinda J. Porobo Dessai*
*Maruti Sinai Monercar*
*Gunó R. P. Dessaī*


## ANUNCIOS

Vende-se, em hasta, em globo ou em glebas.

Predio Silva-Batta em que existem 3 casas e 2 lojas, sito na séde do concelho de Quepem, no dia 25 de janeiro proximo pelas 11 horas, na residencia do sr. tabelião Salinho da Silva, reservando o signatario deste a quem pertence retirar da praça não lhe convindo o preço. O arrematante depositará no acto 10% do preço. Quepem 22 de Dezembro de 1924

*Jeronimo Francisco da Silva*


# पत्रव्यवहार

श्रीयुत सारस्वत यांचा जीवनार्थ कलह हा लेख वाचून व मीही एक 'रणसंग्राम' साप्ताहिकाचा वर्गणीदार असल्यानें रा. कोल्हटकर यांची लबाडी चव्हाटयावर यावी असें वाटलें. तरी कृपा करून हें पत्र प्रसिद्ध कराल, अशी आशा आह.

मीं रणसंग्राम साप्ताहिकाच्या सुरवातीच्या चार अकांनंतर वर्गणीदार झालों व दोन रुपये पाठविले तेहि व्ही पी. आल्यावरून. त्यानंतर लौकरच, रणसंग्राम साप्ताहिक वृत्तपत्र दैनिक झालें. व आह्मांस अंक येण्याचें बंद झालें. कांहीं दिवसांनंतर ह्मणजे तारीख २ आगष्ट १९२४ रोजीं चाबुकाचा पहिला अंक रा० अच्युत बळवंत कोल्हटकर यांच्याच संपादकत्वाखालीं बाहेर पडला व त्यावर, रणसग्रामच्या वर्गणीदारांचें नुकसान होऊं नये ह्मणून युगांतर किंवा चाबूक पाठवूं असें सदहू कोल्हटकर यांनीं जाहीर केलें त्याप्रमाणें मीं त्यांस चाबूक पाठविण्यास लिहिलें. त्याप्रमाणें चाबूक वृत्तपत्राचा दुसरा अंक पाठविला व त्यानंतर पासून तों आतागायत एकहि अंक पाठविला नसून वर्गणी मात्र गिळंकृत करण्याची फसवेगिरी या प्रतिष्ठित संपादकांनीं केली. मी कितीतरी पत्रें पाठविलीं, परंतु त्यानीं दाद दिली नाहीं.

त्याचप्रमाणें रा० केशव विष्णु भट हे राहणार, वाडातळें धारगळ यांनीं युगांतराची वर्गणी भरून त्याचे आश्रयदाते झाले, व नंतर त्यांस कांहीं अंक आले व नंतर तें युगांतर येण्याचेंच बंद झालें असें स्वतः त्यांनीं मला कळविलं होतें. व अजूनहि येत नाहीं.

रामचंद्र शंकर कुळकर्णी
धारगळ—गोवा.

## विरोधीचा फोलकट पुरावा

भारताच्या गेल्या ता. २७ नवंबरच्या अंकांतील 'विरोधी' च्या सर्वथा असत्य आणि कुत्सित विधानाबद्दल, त्यानें प्रकाशांत येऊन योग्य पुरावा द्यावा ह्मणून आह्मीं ११ डिसेंबरच्या भारतांतून जें आव्हान केलें होतें, त्या संबंधीं समर्पक पुराव्याच्या अभावीं २५ डिसेंबरच्या अंकामध्यें विरोधीनें ' रामशास्त्री प्रभुण्यासारखे उघड पुरावा देणारे निस्पृह कितीसे मिळतील याची वानवाच आहे ' अशा मिषानें ' स्वतःचें अंतःकरण शोधून पहा ' या मथळ्याखालीं आपल्या पूर्व विधानाला आणखी लबाड्यांची पुस्ती जोडून, स्वतःच्या अंगावर अधिक पुराव्याची जबाबदारी मात्र ' बुडत्याचा पाय खोलांत ' या ह्मणी प्रमाणें ओढून घेतली आहे; व असें करतानां त्याच्या समर्थनार्थ बऱ्याच गुलदस्तांतल्या सामग्रीचें प्रदर्शन करून केवळ निराकाराचा मायावी रावण बनवण्याची कारागिरी दाखविली आहे, तीचें कौतुक केलें पाहिजे.

कैकयी राणीनें आंगठ्यावरून रावण काढला होता अशी कथा आहे. सदर बाईच्या रावणाला एक आंगठ्याचा तरी आधार होता, पण आमच्या विरोधीरावांनीं रावणरचनेचें नखशिखांत काम फक्त अनृत कल्पनेच्या आधारावरच उभारून दाखविलें आहे ही मोठी तारीफ करण्याजोगी गोष्ट आहे.

' आपल्या हातून कळत नकळत घडलेल्या गोष्टीचा खुलासा ' एकंदर नव्हे 'बऱ्याच हिंदु पाहुण्यास' 'खर्च खुषीनें नसला तरी केवळ भीडेखातर केला' 'गावच्या एका हिंदु गृहस्थाच्या घरीं ' इ० सत्य–विरोधी वचनें विरोधीरावांच्या कृत्रिम रावणाचे अवयव आहेत. खुद्द यजमानास नकळत घडलेल्या गोष्टीचा संबंध–ती घडलीच असली तरी–आमच्या येथील मुंजी समारंभास विरोधीनें काय ह्मणून लागू करावी ? न जाणो, विरोधीच्या खास कांहीं अथवा बऱ्याच परिचितांकडून तें कुकर्म घडलें असेल, तरी पण तत्संबंधीक बरीच खर्चाची रकम मुंजी समारंभाच्या खर्चाला कशी जोडावी ! कदाचित ' तो उग्रवास ' नाकांत जाऊन त्यामुळें झालेल्या गुंगींत विरोधीला तसें वाटल्यास नवल नाहीं. पण त्यांतल्या त्यांत विरोधीचा उपकारच मानावयाचा कीं, कुंकळ्ळींत बरीचशी दारू विक्रीचीं दुकानें आहेत. त्या सर्व दुकानांत त्या समारंभाचे दिवशीं झालेल्या दारूखपाचा हिशेब आकारून तो एकंदर आंकड्याचा बोजा समारंभाच्या खर्चाशीं सामील करण्याचें त्याच्या डोक्यांत आलें नाहीं !

मूळ विधानांत ' मुंजी समारंभास आलेल्या हिंदु पाहुण्यास ' असा सर्व समुदायाची उद्देश करून, आतां ' एकंदर नव्हे बऱ्याच हिंदु पाहुण्यास ' अशा दुरुस्तीचा चावटपणा करितानां, निदान त्या चुकीबद्दल सर्व पाहुण्यांची माफी मागण्याचें कर्तव्य कां केलें नाहीं ? वरील ' बऱ्याच पाहुण्यांस गांवच्या एका हिंदु गृहस्थाच्या घरीं नेऊन दारू पाजण्यांत आली!' हें कृत्य कोणीं केलें व कोणत्या वेळीं घडलें ? त्या हिंदु गृहस्थाचें नांव तरी काय ? तर ' या गोष्टीचा उघड पुरावा देणारे रामशास्त्री प्रभुण्यासारखे निःस्पृह मिळण्याची वानवाच आहे. ह्मणून ' कान असून ऐकायाचें नाहीं डोळे असून पहायाचें नाहीं, जीभ असून बोलायाचें नाहीं ' अशी बादशहाच्या पोपटासारखी बिचाऱ्या विरोधीची स्थिति होण्याची वेळ आली आहे. तर मग, ' जुवेबाजी, रंडीबाजी, दारूबाजी, चैनबाजी वगैरे सर्व बाजींशीं हटकून आपला विरोध आहे ह्मणून छाती बडवून घेऊन कै० आगरकरांच्या तोडीचा समाजसुधारकाचा बाणा व्यक्त करण्यामध्यें कोणता अर्थ शिल्लक राहिला ? मुंजीसमारंभांत आलेले बरेच [ पुष्कळसे ) दारूबाज हिंदु पाहुणे, गांवचा एक घरवाला हिंदुगृहस्थ, त्या पाहुण्यानां दारू पाजणारा कोणी एक अध्याहृत कर्ता, आमंत्रणास मान देऊन आलेला पण दारूबाज नसलेला प्रत्येक पाहुणा, अर्थात सगळेच पाहुणे, त्यांतहि विशेषेंकरून आमचा एक सोय संबंधीचा पाहुणा आणि स्वतः आमचा विरोधीराव एक, मिळून एवढी भक्कम पुराव्याची सामग्री एकवटली तरी आमच्या आव्हानाचें किंवा आपल्या विधानाचें अंशतः तरी समाधान ह्मणून एकहि नामनिर्देश विरोधीला पुराव्याच्या उपयोगीं पडूं नये हें विरोधीचें दुर्दैव नव्हे काय ?

कोणाची इच्छा नसतां वेळीं अवेळीं आपण मोजीत असलेलीं दोषांचीं मापें घालण्यासाठीं बळेंच लोकांचे पदर ओढूं पाहणाऱ्या विरोधीनें आमच्या पदरांत इच्छित पुराव्याचें माप घालण्यास कमी केलें नसतें. पण ' पुरावा उलट पुरावा देतां घेतां अनेक दारूबाजांचा नाम निर्देश होणार असल्यामुळें ' (केवळ त्यांच्या भीडेखातर अथवा न जाणो एखादा दारूबाज उठून आपली मानगुटी धरील या भीतीखातर ?) तितक्या पुरती आपली अनावर लेखणी आवरती घेण्याचा शहाणपणाचा बहाणा विरोधीकडून दाखविण्यांत येत आहे; परंतु भारतामधूनच धर्मगुरूंवर मोघम टीका करून आजपर्यंत कैकवेळां ' विरोधी'चें रुपडें घालून स्वकीय समाजांतील, धर्म निष्ट, कर्तव्य-निष्ट, कुलीन इ० गुणविशिष्ट अशा थोर व्यक्तींची, नुसता नामनिर्देशच नव्हे तर तिच्या नावांचा पुकारा जगभर करितांना, गईचा पर्वत करून मनसोक्त निंदा करण्यांत ज्यांच्या स्वैर लेखणीनें तिळप्राय क्षिति बाळगली नाहीं, त्या लेखकाच्या वरील मानभावीपणावर भारताचे चाणाक्ष वाचक थोडाच विश्वास ठेवणार आहेत !

येथपर्यंत सापेक्षपणें करावें लागलेल्या स्पष्टिकरणावरून आमच्या विरोधीरावांच्या कृत्रिम रावणाचे अवयव कशाचे बनविले आहेत याचा पुरता निर्णय, त्याच्या मुख्य धडाची पुढीलप्रमाणें झालेली अवस्था पाहूनं, भारताचे प्रीय वाचक सहज करणार आहेत. आणि त्यामुळें विरोधीच्या अंतःकरणांतहि पण कमी प्रकाश पडणार नाहीं. आमच्या येथील मुंजीचा समारंभ गत रुधिरोद्गारी सं० माघ शु० १० मी मितीस झालेला असून दत्तकसंबंधीं कायदेशीर विधान ( दुअसांवचें इस्त्रीतुर ; चालू रक्ताक्षी सं० भाद्रपद व० ८ मी मितीला ह्मणजे सात महिने १३ दिवसांच्या अंतरानें मागाहून झालें आहे हें पुष्कळांस माहीत आहे. असें असतां ' विरोधी ' आपल्या मूळच्या लचकत्या विधानाला मजबूत टेंका देण्यासाठीं मानवर करून सांगतात:– " त्याच्याहि ( मुंजी समारंभाच्या ) पूर्वीं ह्मणजे मुलाचें दत्तक विधान कायदेशीर करतांना या असल्या ( यजमानांस दारू पाजण्याच्या ! ) पाहुणचारास आंरंभ झाला होता; तो या मुंजी समारंभानें पूर्ण झाला" [?]. ह्याप्रमाणें विरोधीच्या गंधर्व नगरांतील सामग्रीच्या रावणाची ' ऊर्ध्वपादावधःशीर्ष ' अशी केवील वाणी स्थिति झालेली पाहून, विरोधीराव, आतां पुन्हा एकवार या प्रकरणीक आमूलाग्र हकिकत मननपूर्वक वाचून तुह्मींच स्वतःचें अंतःकरण चांगलें शोधून सांगा: भारताच्या प्रत्येक वाचकानें कींव कोणाची केली पाहिजे ? भटजी पुरोहिताच्या कोणा तरी हितचिंतकाच्या कान फुंकणींवरून विरोधीच्या मेंदूला विकृति झाली आणि त्यामुळें भलतींसलतीं विधानें करून विरोधीला विनाकारण गोत्यांत पाडून घ्यावें लागलें ह्मणून ती तुमचीच करायाला नको काय ?

विरोधीला इतक्या थरावर ही गोष्ट येईल व आपला कोणी हिशेब घ्यावयाला तयार होईल याची कल्पनाच नसून नेहमी या संवयीप्रमाणें दूषणप्रीय जनांचें रंजन करणाऱ्या कुत्सित विधानांनीं आपण केलेला सत्याचा खून राजरोसपणें पचून जाईल असा ठांव भरंवसा होता; परंतु ते पापाचे घडे किती दिवस टिकून राहतील ? ' खुनाला वाचा फुटते, हें तत्व खरोखरीच विरोधीला उमगलें असेल तर, रामशास्त्री प्रभुण्यासारख्या निःस्पृह न्यायाधिशाच्या समोर सदर खुनाचा खटला चालता तर त्याच्या कर्त्याला आनंदीबाईच्यापेक्षां विशेष मानाची जागा प्राप्त झाली असती असें जाणून इत उत्तर त्याची खुनी वाचा बदच पडली पाहिजे. !

आमच्या पुरोहितकीच्या नात्याचे पुष्कळ यजमान, ज्यांस आमचीं मद्यपान निषेधाचीं तत्वें किती जागृत आहेत याची पूर्ण जाणीव असून विरोधीच्या ' परोपदेशे पांडित्यम् ' अशा धर्तीच्या शहाजोग विधानांची खूबशी ओळख आहे, ते आह्मीं, आमच्या वैदिकी कर्तव्यापुढें अशा आड राहून खडे मारण्याराच्या निंद्य कृतीला मुळीं महत्वच देणं प्रशस्त नव्हतें अस ह्मणतील व तें बरोबर नाहीं असें नाहीं; परंतु आह्माकडून स्वप्नांत सुद्धां जी गोष्ट घडली नाही, तीचें एकाएकीं विभत्स चित्र रेखाटून दाखवून आमच्या येथील मुंजीच्या धार्मिक समारंभास लांछन देण्याचें आणि उपकारबुद्धीनें आलेल्या सर्व सद्गृहस्थ पाहुण्यांची बेअब्रू करण्याचें धाडस करणारा अनामीक कोण आहे, त्याचें नांव-तोंड तरी लोकांपुढें दिसून यावें ह्मणून आह्मांला आव्हान देणें भाग झालें. असें असतां अजून तें बाहेर दिसलें नाहीं, तथापि त्याचें अंतरंग केवळ ' खलःसर्षपमात्राणि परच्छिद्राणि पश्यति ' अशाच स्वरूपाचें सर्वकाळ कसें आहे त्याचें प्रदर्शन जगापुढें व्हावयाचें कार्य त्याच्या बुरख्याच्या तोंडाकडूनच झालें, असें जाणून यापुढें विरोधीनें बुरखा तसाच ठेवून आह्माविषयीं कितीहि कल्पित विधानांची परमावधी केली तरी त्यास काडीचेंहि महत्व दिलें जाणार नाहीं.

सरतेशेवटीं या सहज ओघानें लांबलेल्या लेखाची रजा घेण्यापूर्वी विरोधीच्या आमच्या भाषेबद्दलच्या तक्रारीचें थोडेंसें समाधान करणें इष्ट आहे. विरोधीला आमची भाषा बरीच कडू लागली आहे. त्यानां मधुरशा शब्दांची सौम्य भाषा आपल्याकरितां पाहिजे होती व कोणाहि विरोधीसारख्या कोमल भाषावादी परनिंदकाची अपेक्षा अशीच रहाणार. परंतु कुचाळखोर बुद्धीनें दुसऱ्याचें छिद्रान्वेषण करून त्यावरील मिथ्या दोषारोपाच्या मंडणाचें काम जसें मंजूळ; कोमलशा भाषेनें होणें अगदीं सोपें असतें, तसें त्याच्या खंडणाचें नसून तेथें कितीहि सौम्यपणा पतकरण्याचा यत्न केला तरी, ' शुनःकपाले लगुडप्रहारः ' हाच न्याय अभिमुख होतो, आणि तदनुसार आह्मास अवलंबाव्या लागलेल्या भाषेपासून विरोधीच्या नाकाला कांहीं मिर्च्या लागल्या असल्यास त्यानीं रुसावा करण्याचें कारण नाहीं.

कुंक्कळी पौष शु० १०मी शके १८४६
पांडुरंग शाणू कामत,

---


## अभिप्रायार्थ माल व जाहिराती पाठवा.

### जाहिराती–संग्रह

या पुस्तकाचे वर्षातून चार भाग प्रसिद्ध होत असून ज्यानीं आमच्या ऑफिसांत नांवें नोंदविलीं असतील त्यांना ते फुकट पाठविण्यांत येतात. अभिप्रायार्थ पाठविलेल्या मालावर विस्तृत अभिप्राय दिला जातो. जाहिराती मराठी, पोर्तुगीज व इंग्लिश या तिन्हीं भाषांतून प्रसिद्ध करण्याची व्यवस्था असून, त्यांचा दर पुढील प्रमाणें आहे, सिंगल कॉलमच्या दर ओळीस ४ आणे व डबल ओळीस ८ आणे पडतील.

पत्ता— एम. के. पै. गांवकर
वैंगीण–काणकोण–गोवा.

दहा लाख रुपये देणारे काशीचे बाबू शिव प्रसाद गुप्त यांचे एक आत्मीय बा. गोकुल चंद गुप्त यानीं आपले मयतबंधु बा. मंगला प्रसाद यांच्या नावानें चाळीस हजार रुपये हिन्दी साहित्यसंमेलनाकडे दिलेले असून त्याचें व्याज बाराशें रुपये प्रत्येक वर्षी उत्तम ग्रंथ तयार होईल त्या ग्रंथकारास देण्याची व्यवस्था केली आहे. गेल्या सालीं हें बक्षीस जुन्या इतिहासाचे संशोधक रा. गौ. हि. ओझा यानीं लिहिलेल्या ‘ भारतीय प्राचीन लिपिमाला ” या ग्रंथास दिलेलें आहे. या ग्रंथाची किंमत २५ रुपये असून ग्रंथकर्त्याच्या पुष्कळ वर्षांच्या परिश्रमाचें तें फळ आहे. असो. अशा प्रकारें हिन्दी भाषेच्या वाङ्मयाभिवृद्धीची खटपट त्यांच्याकडून चालू आहे.

हिन्दी भाषेमधील वाङ्मयाचें पहिलें स्थान अद्यापि बंगालला आहे असें जरी असलें तरी पण त्या खालोखाल हिन्दी वाङ्मयाचा नंबर लागेल यांत शंका नाहीं. शिवाय एक भाषा या दृष्टीनेंहि सर्वांचें लक्ष्य त्याच्याकडे लागलेलें आहे. याचें प्रत्यंतर पहावयाचें झाल्यास यंदांच्या चवदाव्या साहित्य संमेलनाकडे लक्ष्य दिल्यास कळून येईल. या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष रा. नरदेव शर्मा हे मूळ महाराष्ट्रीय देशस्थ ब्राह्मण असून आतां आर्यसमाजिष्ट आहेत. तसेंच सभेचे अध्यक्ष रा. सप्रे हेहि महाराष्ट्रीय आहेत. या दोघानींहि हिन्दी वाङ्मयाभिवृद्धिकरतां फार परिश्रम केलेले आहेत.

एकंदरींत देशांतील सर्व लोकांचें लक्ष्य त्या भाषेकडे लागलेलें आहे. परंतु आपल्या गोमांतकांत मात्र बरीच अनास्था दिसून येते. हिंदी, बंगाली, गुजराथी व मराठी या भाषांचें परस्परांशीं इतकें साम्य आहे कीं थोड्या फार परिश्रमानें त्या वाङ्मयाचा आस्वाद आपणाला घेतां येईल. रा. न. चिं. केळकर यानीं ‘पतिपत्नीप्रेम’ या कादंबरीला प्रस्तावना लिहितानां असें ह्मटलें आहे कीं ‘बहुतेक देशी भाषा परस्परानां इतक्या जवळ आहेत कीं, कोणत्याहि दुसऱ्या देशी भाषेचा अभ्यास कोणाहि हिंदी मनुष्यास एक वर्षात चांगला करितां येईल. असली तर कानडीची गोष्ट वेगळी ठरेल पण हिंदी बंगाली, मराठी व गुजराथी ह्मणजे सुमारें तेरा चवदा कोटी लोकांच्या मिळून या चार भाषा परस्परानां इतक्या निकट आहेत कीं, त्यांतील कोणतीहि भाषा, तींतील ग्रंथांचें भाषांतर करण्या इतकी शिकण्यास एक वर्षाहून अधिक काळ लागणार नाहीं. आज बंगाली वाङ्मय बरेंच समृद्ध आहे. हिंदीहि जोराचे प्रयत्न करीत आहे. तेव्हां आपल्या लोकांनीं त्या भाषांचा अभ्यास करण्याकडे प्रवृत्ति वळवावी, अशी आह्मीं आग्रहाची सूचना करतों.

हिन्दुस्थानची आजची स्थिति फारसी आशाजनक नाहीं. निरनिराळ्या दिशानीं प्रयत्न होणें इष्ट आहे. तरच आपण इतर राष्ट्राशीं टक्कर देऊं शकूं ही गोष्ट पुष्कळ विद्वानांच्या लक्ष्यांत येऊन ते वाङ्मयद्वारा या गोष्टी आपल्या लोकांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न करीत आहेत. आपला देश कसा आहे, देशांत दारिद्य किती वास करीत आहे, शारीरिक दृष्ट्या आपण किती खालावलेलों आहों, आपलें शिक्षण कस आहे, आपल्यांतील सामाजिक चालीरीति कशा अनिष्ट आहेत व त्यायोगें आपला समाज कसा अधोगतीला गेला आहे ही स्थिति सुधारून आपल्या देशाची सर्वांगीण उन्नति होण्याला आपण काय केलें पाहिजे हें दाखविण्या करतां आज निरनिराळ्या विद्वानांनीं बरेचशे ग्रंथ प्रसिद्ध केलेले असून त्याद्वारें लोकजागृतीचें बरेंचशें कार्य होत आहे.

अशा उत्तम ग्रंथांपैकीं काशीमधील विद्वान ठाकूर शिवनंदसिंह यानीं लिहिलेला “ देशदर्शन ” या नावांचा हिंदीमधील ग्रंथ होय. हा ग्रंथ १९१७ मध्यें प्रसिद्ध झालेला असून महात्मा गांधीना अर्पण करण्यांत आला आहे. आजपर्यंत याच्या तीन आवृत्या प्रसिद्ध झालेल्या असून पुष्कळ विद्वानानीं त्यांची मुक्त कंठानें प्रशंसा केलेली आहे. ग्रंथ प्रसिद्ध होतांच गुजराथी मधील श्रेष्ट मासिक विसमीसदी ( विसावें शतक. आतां बंद आहे. ) या मासिकाच्या संपादकानीं त्याचें साग्र व सचित्र भाषांतर आपल्या मासिकामधून चालू केलें होतें. तसेंच बंगालींतील श्रेष्ट मासिक **भारतवर्ष** यानेंहि या ग्रंथाची प्रशंसा केली.

**देशदर्शन** हा ग्रंथ आपल्या लोकानीं वाचण्याजोगाच नव्हे तर अध्ययन करण्या जोगा आहे. लेखकानें निरनिराळ्या पन्नास साठ ग्रंथांचें अध्ययन करून हा ग्रंथ लिहिलेला आहे. हा ग्रंथ ह्मणजे हिंदुस्थान देशाचा चित्रपट होय. आपल्या देशाची स्थिति आज काय आहे हें कळून येण्याला या सारखे ग्रंथ आपण अवश्य वाचले पाहिजेत तेव्हांच आपणाला आपल्या देशाची खरी स्थिति कळून येईल. ज्यानां थोडी फार हिन्दी भाषा येत असेल त्यानीं मूळ ग्रंथ अवश्य वाचावा. ह्या ग्रंथाचें मराठी भाषांतर प्रसिद्ध होणार अशी जाहिरात दोन वर्षामागें निघाली होती, परंतु अद्याप काहीं पुस्तक बाहेर आलें नाहीं. पुढेंमागें आल्यास निदान भाषांतर तरी अवश्य वाचावें अशी आह्मी शिफारस करतों.

आपल्या गोमांतकांतील जनतेपुढें त्यांतील काहीं भाग यावा अशी आमची इच्छा असल्यामुळें व तूर्त विवाहाचा हंगाम सुरू असल्यामुळें आह्मीं त्या ग्रंथांतील **विवाह संस्कार** हें प्रकरण भाषांतर करून पुढें मांडणार आहोंत. तेव्हां विवाह करूं इच्छिणाऱ्या तरुणानीं तरी हे लेख अवश्य वाचावेत अशी आग्रहाची परत सूचना करून भाषांतराकडे वळतों.

## विवाह संस्कार

**जगांतील कोणत्याहि देशामध्यें, कोणत्याहि धर्मामध्यें, कोणत्याहि जातीमध्यें विवाह संस्काराचें महत्व आर्यग्रंथांमध्यें जसें गंभीर व पवित्र दिसून येतें तसें दिसून येत नाहीं.** आनी बेझंट

विवाहपद्धतीच्या संक्रमणाचा इतिहास फारच मनोरंजक व शिक्षादायक आहे. तो पाहूं जातां ही गोष्ट सिद्ध होते कीं, मानव जातीच्या बाल्यावस्थेमध्यें कोणत्याच प्रकारची राजव्यवस्था अगर समाज व कुटुंबव्यवस्था नव्हती. स्त्री पुरुषांचा संबंध आणि माता पिता पुत्र इत्यादि नातीं मूलस्थितींमध्यें आज जशीं पशुपक्षांमध्यें आहेत तशीं अनियमीत होतीं. स्त्रीपुरुषांचा नियमीत संबंध राज्यव्यवस्था व सभ्यता यांच्या वाढीमुळें स्थिर झालेला आहे.

पुष्कळ देशांच्या इतिहासाकडे पाहिलें असतां असें दिसून येतें कीं, समाजाच्या प्रथम अवस्थेंमध्यें लोकांची प्रवृत्ति युद्धाकडे होती. विजयी लोक पराजित झालेल्या लोकांच्या स्त्रियानां कैद करून आणीत व ती आपली मालमत्ता असें समजत. कांहींजण त्यांच्याकडे विवाह करीत तर कांही त्याना दासींचे स्थान देत व कांहीं जण त्यानां विकीत असत. या स्त्रियानां कुटुंबांतील प्रधान पुरुषांच्या आधीनतेमध्यें रहावें लागे जसा जसा सभ्यतेचा विस्तार होऊं लागला तशी तशी दास्यत्वापासून स्त्रियांची मुक्तता होऊं लागली.

स्वाधीनतेमुळें स्त्रियांची योग्यता वाढूं लागली; त्यांच्याविषयीं प्रेमादर व अभिमान वाटूं लागला; स्वयंवराची चाल पुढें आली; हळुहळू विवाह संस्काराला धार्मिक विधीचें स्वरूप प्राप्त झालें व विवाह ह्मणजे एक आवश्यक संस्कार असें लोकांना वाटूं लागलें.

समाज शास्त्रवेत्ता स्पेन्सर यानें एका ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, “ विवाहाचा उद्देश ह्मणजे त्यामुळें समाज व राष्ट्र यांची उत्कर्षावस्था चिरकाल रहावी व त्यामुळें भावी संततीचें व देशाचें कल्याण व्हावें हा होय. ज्या विवाहांमुळें या गोष्टी सिद्ध होत नाहींत ते विवाद केव्हांहि समाजाला हितकारक होणार नाहींत ”. आरिस्टाटल ह्मणतो कीं, “ स्त्रियांची उन्नति व अवनति यांवर राष्ट्राची उन्नति व अवनति अवलंबून आहे.ग्रीक लोक आपल्या स्त्रियांना केव्हांहि दासींप्रमाणें वागवीत नसत तर आपल्या राष्ट्रोन्नतीच्या कामामध्यें सहाय्यक असें समजून त्यांच्या मानसिक, शारीरिक, व आत्मिक उन्नतीमध्येंनेहमीं लक्ष देत व याच कारणामुळें ग्रीक लोकांनां बारबरियन जातीवर विजय मिळवितां आला.

इतिहासकार गिबन असें ह्मणतो कीं, रोमन राष्ट्र आपल्या स्त्रियांनां ग्रीक लोकांपेक्षां अधिक मान देत असे व याच कारणामुळें तें राष्ट्र अधिक बलवान होऊन ग्रीक लोकानां सुद्धां त्याच्यापुढें नमावें लागलें.

रोमसारख्या छोट्या राष्ट्रानें आपलें स्वामित्व सगळ्या जगावर स्थापन केलें. ज्याप्रमाणें रोमन राष्ट्राची उन्नति आश्चर्यजनक आहे त्याचप्रमाणें त्याची अवनतिहि अत्यंत हृदयद्रावक आहे. टरिसन हा इतिहासकार ह्मणतो “ रोमन जातीच्या उत्कर्षांचे वेळीं रोमन स्त्रियांमध्यें पातिव्रत्य, स्वावलंबन, स्वार्थत्याग धैर्य वगैरे जे अनेक सदगुण दृष्टीस पडत होते ते सर्व त्यांच्या अवनतीच्या काळामध्यें नष्ट झालेले होते व चांगल्या गुणाच्या जागीं दुराचार अज्ञान कलह वगैरे दुर्गुणाचें साम्राज्य स्थापन झालेलें होतें. या कारणामुळेंच जर्मन जातीनें रोमन लोकांवर आपलें स्वामित्व स्थापन केलें.अरण्यांत रहाणाच्या काळीं सुद्धां जर्मन लोकांची कुटुंबव्यवस्था फारच चांगली होती.”

( महाभारत:—लढाई होण्यापूर्वी रोमन साम्राज्याप्रमाणेंच हिंदुस्थानामध्येंहि स्त्रियांची स्थिति अवनत होत चाललेली होती. याचीं उदाहरणें देणें झाल्यास खालील गोष्टींकडे लक्ष दिल्यास कळून येईल. १ कौमार्यामध्यें गंगादेवीचे पुत्र विसर्जन २ आपले बंधु विचित्र वीर्य याच्या विवाहाकरतां काशी राजाच्या मुली अंबा, अंबिका व अबालिका यांचें भिष्माकडून बलात्कारानें आणणें व त्यांचा अनादर ३ धीवराची कुमारी कन्या सत्यवतीशीं पराशर ऋषीचा संभोग, वेद व्यासाचा जन्म व पुढें राजकुलांत विवाह ४ कुंतीचें कौमार्यामध्यें कर्णाचा जन्म, त्याला नदीतिरावर टाकणें तसेंच ही गोष्ट गुप्त ठेवणें व राजकुलामध्यें विवाह करणें ५ द्रौपदीचें पांच पुरुषाकडे लग्न होणें इत्यादि गोष्टी राजांच्या व ऋषींच्या ह्मणजे मोठमोठ्या लोकांच्या आहेत. सामान्य प्रजेची स्थिति काय होती याची कल्पना वाचकांनींच करावी. )

हिंदुस्थानचा इतिहास पाहिल्याअंतीं अंगावर रोमांच उभे रहातात. या अभागी देशाची सुदशा व उन्नतीचे दिवस अतिप्राचीन भूतकालाच्या अंधेरी छायेमध्यें झांकून गेलेले आहेत. बाल विवाह व स्त्रियांच्या पराधीनतेची अशी अवनत दशा जगांतील सुधारलेल्या कोणत्याच राष्ट्रांमध्य नाहीं.आपला हिंदुस्थान देश आज बरींच वर्षे पारतंत्र्य त जखडलेला दृष्टीस पडत आहे. महाभारत युद्धामुळें हिंदुस्थानाला अवनतावस्था प्राप्त झालेली नाहीं तर भारत गारत झालेला होता. वरूनच महाभारत लढाई उत्पन्न झाली.

विवाह संशोधन व अन्य सामाजिक सुधारणेची दिशा याचा विचार करण्यापूर्वी आपणाला आज काल स्त्रियांची स्थिती काय आहे व ही केव्हांपासून सुरू झाली तसेंच प्राचीन व अर्वाचीन विवाह पद्धतिमध्यें कोणकोणते गुणदोष आहेत याचा विचार करणें अवश्य आहे. तेव्हां पुढील लेखांकांत वेदकालामध्यें विवाह पद्धति कशी होती याचा विचार करूं.

## बाल-वाचन-मंदिर संस्थेच्या व्याख्यानमालेचा रिपोर्ट

शारीर शास्त्राप्रमाणें वागलें तर जीविताची शारीरिक उन्नति होईल, १०० वर्षे जगेल. पण मानसिक व आत्मिक उन्नतीशिवाय मनुष्यजीवित व्यर्थ होय. रानटी मनुष्याला सुद्धां परोपकार बुद्धि असते. एखादा चांगला शिक्षक पगारापुरतें काम करीन ह्मणेल, तर तें होणार नाहीं. चांगल्या गुरूचे पगाराप्रमाणें श्रम असत नाहींत. सज्जन वैद्य सुद्धां फी प्रमाणें औषध देत नाहींत. आपली सर्वशक्ति समाजकार्याला लावावी ही प्रत्येक मनुष्याची इच्छा असली पाहिजे. प्रत्येकाला नांवांची आवड आहे. हें नांव पाळण्यांतलें नव्हे तर सुकीर्तीचें नांव होय. केवळ नांवासाठीं परोपकार करणें योग्य नव्हे. निष्काम कर्म आचरणाऱ्यांसच समाजसेवक ह्मणतात. केवळ राजकीय चळवळ करितो, तोच देशकार्य करितो असें नाहीं. पुण्यशील कर्वे यांनीं केलेली स्त्रीशिक्षणाची कामगिरी दुसऱ्या कोणत्याहि समाजसेवकापेक्षां कमी दर्जाची नाहीं. आजकाल आह्मीं जोरदार बोलणारा व लिहिणारा यानांच देशभक्त ह्मणतों. गरीब कर्व्यांला ही पदवी देण्याला तयार नाहींत. आमच्या समाजाची उन्नति होण्यासाठीं धार्मिक सुधारणा घडवून आणिली पाहिजे. उच्च वेदकालीन धर्माला – ज्या धर्माकडे आजचें सुधारलेलें जग आदरानें पाहतें त्याला – परिस्थितीमुळें जें विकृत स्वरूप प्राप्त झालें आहे; तें विकृत स्वरूप धार्मिक एकीनें दुरुस्त केलें पाहिजे. समाजामध्यें धार्मिक बंधनानीं जी फाटाफूट पडली आहे ती नाहींशी करून संघशक्तीनें कामें चालविलीं पाहिजेत. समाज मंदिरांतील जातिभेदाच्या भिंती दगडी किंवा लोखंडी आहेत त्या लांकडी · ह्मणजे प्रसंग विशेषीं नाहींशा करितां येणाऱ्या ह्या स्याशिवाय हिंदी समाजाचा तरणोपाय नाहीं. तशीच औद्योगिक उन्नति झाली पाहिजे. किर्लोस्कर ओगले हेच खरे समाजसेवक होत. वाङ्मयसेवा हीहि राष्ट्रसेवा होय. वाङ्मय हा राष्ट्राचा प्राण होय. वाङ्मयसेवक स्वतःची प्रतिभा खर्ची घालून, लोकांच्या विचारांना वळण देतात. चिपळूणकर, आगरकर यांच्या लेखणीनें पुष्कळ राष्ट्रकार्य केलें–आमच्यांत जागृती उत्पन्न केली. समाजाच्या उन्नतीसाठीं ज्या ज्या करण्यास योग्य गोष्टी असतील तीच समाजसेवा; कोणतीहि सेवा केली तर ती समाजाला सारखीच वंद्य आहे. समाजसेवा दैवी शक्तीशिवाय व्हावयाची नाहीं ही कल्पना चुकीची आहे· प्रत्येकाला समाजसेवक होतां आलेंच पाहिजे. अति गरिबाला सुद्धां समाजसेवा करितां येईल. समाज कोणाच्याहि सेवेची उपेक्षा करीत नाहीं. तो सांगतो कीं, तुमच्या गरीब कष्टांची मालकी व मोठ्यांची मोठी सेवा सारखीच आहे कितीहि मोठा जगाला गवसणी घालूं शकत नाहीं. प्रत्येकानें श्रमविभागानें एक एक काम केलें तर समाज सर्वांग परिपूर्ण होईल. फूल–फळझाडांप्रमाणें कांटेरी झाडांचाहि मनुष्याला उपयोग होतो. ईश्वराच्या दारांत ज्याप्रमाणें कोणालाहि मज्जाव नाहीं त्याचप्रमाणें समाजाच्या दारांत कोणाच्याहि सेवेला मज्जाव नाहीं· समाजसेवेचें पवित्र कार्य आबाल वृद्धानां व स्त्री पुरुषांना करितां आलें पाहिजे व त्यानीं तें केलें पाहिजे. आज चुलीचें सिंहासन, फुंकणीचा राजदंड, पोतेऱ्याचा भगवा झेंडा हींच स्त्री राज्यांतील भूषणें झालीं आहेत. ही शोचनीय स्थिति बदलून 'अनृतं साहसं माया' या श्लोकाऐवजीं 'गृहिणी सचिवः सखी मित्रः' हा श्लोक सर्वत्र ह्मटला गेला पाहिजे. ऋषीकाळी जें शिक्षण मिळत असे, तेंच शिक्षण आज प्रचारांत आलें पाहिजे. प्राचीनकाळीं आमची हिंदभूमी सुवर्णभूमी होती असें आह्मीं ह्मणतों. बुद्धिमान् ऋषींच्या कीर्तीमुळें आज आह्मीं जगांत उजळ माथ्यानें फिरूं शकतों. आम्हीं असें केलें पाहिजे कीं, आमच्या वंशजानां भूतभूत काळाकडे न पाहतां भूतकाळाकडेच पहावें. आम्हीं आमच्या समाजाचा अर्धाभाग · अखिल नारी जनता – आंधळा केला असल्यामुळें प्रगतीला पुष्कळ अडथळा उत्पन्न झाला आहे. ही स्थिति बदलून कशाचाहि विचार केला तरी स्त्रियानां त्यांत भाग घेतां आला पाहिजे. त्यांची उन्नति झाल्याशिवाय समाजाची उन्नति होणार नाहीं. सरकार स्वतंत्रता देऊं शकेल पण उत्तम गृहिणी देऊं शकत नाहीं. कुटुंबाच्या सुधारणेशिवाय इतर सुधारणा निष्फल होत. समाजसुधारणेच्या विचारांत स्त्रियानां वगळून उपयोगी नाहीं. आपल्या समाजसेवेंत पुरुषांइतक्याच स्त्रिया भागिदार आहेत. निसर्गानें कांहीं गोष्टी प्रतिकुल व कांहीं अनुकुळ आहेत. विवेकाची मदत वृद्धानां तर उत्साहाची मदत तरुणानां असते. त्या त्या प्रमाणें त्यानां कामें दिलीं पाहिजेत.

आपण सर्व एकाच हिंदी राष्ट्राचे नागरिक आहोंत अशी एकराष्ट्रीयत्वाची कल्पना सर्वत्र फैलावली पाहिजे. पूर्वींच्या सारखी संकुचित परिस्थिति आज नाहीं. कधीं काळीं भाषाभिन्नत्व दूर झालें तर सर्व जगाचें एकराष्ट्र बनूं शकेल. आह्मांला जगाच्या शर्यतींत धांवावयाचें आहे हिंदुस्थानानें योगसमाधी लावली तर जग त्याची धुंदी उतरवील. धर्मभिन्नत्व आहे ह्मणूनच तुमच्यांत एकी होत नाहीं; हा प्रश्न उपस्थित होऊं देतां कामा नये. धर्म किंवा जाती विचारी पुरुषांच्या आड येऊं शकत नाहींत. अति उत्तम गोष्ट ह्मणजे हिदुधर्म, व अति नीच गोष्ट ह्मणजे त्याचें आजचें स्वरूप होय हिंदु धर्म गंगेचें शुद्धपाणी खोलीवर राहून नासका कुजका भाग वर आला आहे. हा कुजगा भाग ह्मणजे रूढी होत.

( रिपोर्टाचा पुढील भाग येत्या अंकीं संपूर्ण होईल. )

सं. भारत.

---


**ESTABELECIMENTO COMERCIAL**
DE
**Visnum Ramachondra Quenim**
**FUNDADO EM 1850**

MERCADO VELHO-MARGAO

CONTA já mais de 73 anos de fundação o sobredito estabelecimento comercial. E' portanto um dos mais antigos da vila de Margão, mantendo relações com as mais afamadas firmas comerciaes e industriais da Europa e da America, paizes donde, em regra, importa todas as qualidades de tintas, aboc, oleos, verniz, linhança, cimento, gis etc. toda a sorte de artigos de ferro, como pregos, aldraves, cadeados, bisagras, parafusos, canos de ferro etc. especialidades de pastas de zinco lisas e concavas e as de cobre.

NO REFERIDO estabelecimento vendem-se tambem artigos alimenticios da primeira necessidade e todas outras mercadorias de que se acha bem provido.

**BEM SERVIR O FREGUEZ E' O SEU LEMA**
Experimentem que sempre lhes será proveitosa a experiencia !

विक्रीस तयार ! विक्रीस तयार ! !

अत्यंत परिणामकारक सामाजिक
संगीत
**विवाहरहस्य**
नाटक

किंमत एक रुपया. ट. हं. शिवाय. घाऊक घेणारांस भरपूर कमिशन.

अनंत तातोबा कामत
हरंबल, पेडणें--गोवा.

**विष्णु रामचंद्र केणी यांचें दुकान**
**जुना बाजार—मडगांव.**
स्थापना १८५०

सचोटीबद्दल प्रसिद्ध असलेल्या या अत्यंत जुन्या दुकानांत सर्व तऱ्हेच्या मालाचा भरीव स्टॉक असतो. निरनिराळ्या जातीच्या शाई, रंग, सिमीट, व्हेर्नीज, आबोक, हरतऱ्हेचें लोखंडी सामान ( खिळे, करवती वगैरे ) नाना रीतीचे जस्ताचे व तांब्याचे पत्रे व इतर सर्व संसारोपयोगी वस्तू सदर दुकानांत माफक दरानें विकल्या जातात.

दर एक, माल चोख, व्यवहार रोख

अनुभवानें खात्री करून घ्या !

## आतां शाब्दिक वाद पुरे !

'उत्तर गोमंतकांतील एक वीर' अशा मथळ्याखालीं ता. २१ नव्हेंबरच्या 'हिंदू'त श्री. श्रिनिवास दामोदर नायक यांचें माझ्या ता. ७ नव्हेंबरच्या 'हिंदू'त प्रसिद्ध झालेलें 'मडगांवकरांस इशारा' या पत्राचें उत्तर वाचून कोणासहि त्यांच्या अगाध ज्ञानाबद्दल कींव आल्याशिवाय राहणार नाहीं.

वरील गृहस्थ मी माझें नांव प्रसिद्ध न केल्यामुळें माझा भ्याडपणा व्यक्त केला आहे असें म्हणून मला बाळ उत्तराची उपमा देतात. त्यामुळें त्यांच्या अंगांत वसत असलेला अविचारीपणाचा गुण स्पष्ट दिसून येतो. मी माझें नांव स्पष्टपणें संपादक 'हिंदु' यांस कळवून माझा मुंबईचा व गोव्याचा पत्ता खुलासेवार लिहिला होता; व प्रसिद्ध करण्यास पाठविलेल्या पत्राची जबाबदारी मी माझ्यावर पूर्णपणें घेतली आहे, असें त्यांस माझ्या दोन्हीहि पत्रांत स्पष्ट कळविलें होतें. जर माझें नांव वरील लेखकास कळलें नाहीं तर माझ्या व माझ्या गांवच्या नावांवर त्यानीं कोणत्या आधारावर टीका केली, हें ते कृपा करून सांगतील काय?

ज्यावेळीं मत्स्य पुरावर कौरव सैन्यानें स्वारी करून तेथील गाई हरण केल्या त्या वेळीं त्या राजधानींत एकहि यौद्धा नव्हता सर्व शहर हतबल स्त्रियानीं भरून गेलें होतें. अशा प्रसंगीं उत्तरासारखा अगदीं कोवळ्या वयाचा मुलगा शस्त्रविद्येंत अगदीं अपारंगत असतांसुद्धां पुढें सरला व एवढ्या मोठ्या कौरव सैन्यावर एका स्त्री सारथ्यानिशीं चाल करून गेला, हें त्यास भूषणास्पद नव्हे काय ? बाळ उत्तर जर कौरव सैन्यावर धावून गेला नसता, तर स्त्रैण वेश धारण करून राहणाऱ्या अर्जुनाला पराक्रम करण्याची संधि तरी मिळाली असती काय ? अर्जुनाच्या अंगांतलें स्त्रैण जाण्याचें व त्यांत वीर्यत्व उल्हसीत करण्याचें श्रेय शहाणे लोक उत्तरालाच देतात हें वरील लेखकास अजूनहि कळलें नाहीं काय?

श्री. नायक यानीं मला उत्तर ठरवून आमच्या नोकरशाहीस कुरु कटकाची उपमा दिली व आमच्या मडगांवकर बंधूंस स्त्रीया ठरविल्या. मला उत्तर ठरविल्याबद्दल वरील लेखकाचें किंचित सुद्धां मला वाईट वाटत नाहीं पण सर्व मडगांवकर बंधूनां त्यानीं अप्रत्यक्ष रीतीनें स्त्रियांची उपमा देऊन ते अगदीं हतवीर्य असल्याबद्दल जें विधान ठोकलें त्याची वाट काय ?

माझ्या लेखास उत्तर देण्याजोगी जर त्याची किंमत नव्हती तर त्यानीं अशीं खोटीं अविचारीपणाचीं विधानें ठोकण्याची तसदी तरी कां घेतली ? एक गोष्ठ खरी कीं जर असलें काम त्यानीं हातीं घेतलें नसतें तर माझ्या नावांवर अप्रत्यक्ष विभत्स टीका करण्याची संधि मात्र त्यांनां केव्हांच मिळाली नसती व यामुळें त्यांच्या थोरपणांत विशेष महत्वाची भरहि पण केव्हांच पडली नसती.

श्री. नायकानीं दिलेली दुसरी एक लक्ष्मीधराची उपमा वाचून त्यांना नाटकाचा नादबराच असावा असें वाटतें. न पेक्षां वाटेल ती असंबद्ध उपमा देण्याचें त्यांना कांहींच कारण नव्हतें. मी 'हिंदूस' पाठविलेल्या पत्रांत माझें नाव गांव पूर्ण असून तें संपादक 'हिंदू'नीं रा. नायक यानां दाखविलें असलें पाहिजे. न पेक्षां 'सावईवेरें व रवळनाथाचें कूळ' वगैरे बडबड करण्याची संधि त्यानां मिळाली नसती.

रा. नायक 'कायदेभंग करून अशी (मनाई हुकूम असलेली) मिरवणूक काढावी काय ?' असा जो सवाल करतात, त्यांस मी असें विचारतों कीं कायदेभंग करण्यास कोणी सांगितलें ? जर मडगांवकरांची तयारी मिरवणूक यशस्वी रीतीनें पार पाडण्याजोगी नव्हती तर त्यानीं उगीच अव्यापारेषु व्यापार तरी कां करावा ? ज्या महात्माजींच्या फोटोची मिरवणूक त्यानीं काढूं घातली ती त्यांच्या कोणत्या गुणाबद्दल हें ते जरा सांगतील काय ?

व्यावहारिक गरज नसतां लायसनं मागून कायद्यांस रंग देणारे मडगांवकर कायदेभंग तरी कसे करणार ? त्यानीं फक्त लेक्चरें देऊन घसा कोरडा करावा व ब्रिटिश हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांपुढें आपल्या देशभक्तीची टिमकी वाजवावी एवढेंच त्यांस माहीत ! दुसरें काय ?

"मनुष्यास अत्यंत जिव्हाळयाचा जो धर्म त्याचा अमानुष छळ **होत असतां** ज्या प्रांतांत तो निमूटपणें सहन करण्यांत आला त्या देशांत सत्याग्रहाची अपेक्षा करणें म्हणजे चालू परिस्थितीचें अज्ञान व्यक्त करणें होय."

वरील मथळयांत रा. नायक आपल्या पूर्वजांचे वंशज म्हणून भित्रे असण्याचा आपला जन्मसिद्ध हक्क पस्थापित करतात. हें पाहून कोणासहि त्यांच्या कोत्या मनाबदल कींव आल्याशिवाय राहणार नाहीं. आमच्या पूर्वजांच्या त्या वेळच्या परिस्थितींत व आतांच्या परिस्थितींत जमिन अस्मानाचा फरक आहे. त्यावेळीं सर्वत्र पुंढाई माजल्यामुळें करील त्याचा कारभार व मारील त्याची तरवार हा कायदा लागू होता. खऱ्या न्यायासाठीं कुणाच्याहि तोंडाकडे पहाण्याची गोष्टच नव्हती. अशा दुर्धर प्रसंगीं आमच्या पूर्वजांच्या धैर्याची, शौर्याची, धार्मिक भक्तीची व सहनशीलतेची खरी परीक्षा झाली. कमकुवत मनाचे लोक जीव संभाळण्यासाठीं राज्यकर्त्यांस शरण गेले व ख्रिश्चन बनून राहिले. आणि आमचे पूर्वज अस्सल पट्टे असल्याकारणानें आपला धर्म इतक्याहि त्रासांतून पूर्णपणें सांभाळून राहिले. अशा वीर्यवंतांस रा. नायक भित्रे समजतात याबद्दल त्यांस काय म्हणावें ?

त्या वेळच्या परिस्थितींत व आतांच्या परिस्थितींत आणखी एक फरक आहे. त्यावेळी इतर हिंदुस्थानसुद्धां धामधुमींत असल्यामुळें तेथील पुढाऱ्यांस इकडे येण्यास मुळींच सवड नव्हती. व याचसाठीं मडगांवसारख्या शहरांत व्याख्यानाचा मुळींच सुळसुळाट नव्हता. आतां मडगांवांत धार्मिक, राजकीय व सामाजिक बाबतींत, भले लांबलचक व्याख्यानें झोडणारे वक्ते उत्पन्न झाल्यामुळें आतां प्रत्येकास राजकीय हक्क पूर्ण समजत आहेत. सर्वांच्या अंगांत वीरश्री उत्पन्न करणारे, प्रत्येकास आपापले हक्क समजून देणारे लेखकहि आम्हांत पुष्कळ आहेत. गोव्यास आवतोनोमीय व रिपाब्लिकहि पण मिळालीं आहेत. इतक्या सर्व सोयी असतां कायदेभंग करावा काय, असा जो प्रश्न रा. नायक करतात तो किती विचित्र आहे ! मी त्यांस "कायदेभंग करण्यास मुळींच सांगत नाहीं कारण स्वतःचा हक्क सांभाळण्याची ज्यांस अक्कल नाहीं ते कायदेभंग काय करणार ?

'प्रस्तुतचे काळीं कराचीं ओझीं एक सारखीं लादलीं जात असतां त्याचा प्रतिकार करण्यापर्यंत ज्यांचा संतापाचा पारा चढत नाहीं या प्रांतांतील लोकांकडून मग ते मडगांव सारख्या शहरांतील असोत किंवा सावईवेऱ्यांसारख्यां खेड्यांतील असोत, सत्याग्रहाची अपेक्षा करणें म्हणजे चालू परिस्थितीचें अज्ञान प्रगट करणें हें होय !'

वरील प्याऱ्यांत रा. नायकानीं चालू परिस्थितीबद्दल असलेलें स्वतःचें अज्ञान मात्र व्यक्त केलें आहे. वाटेल तसा कर लादून घेण्यास फक्त शहरवासी लोक मात्र तयार असतात. खेडेगांवचे लोक कधींहि आपल्या इच्छेबाहेर कर लादून घेत नाहींत. आज पर्यंत खेडेगावांवर लादलेले निरनिराळे कर किती पटीनें यशस्वी झाले ? दारूच्या माडावर चढविलेल्या कराबद्दल खेडेगावांतील सत्याग्रहामुळेंच सरकारास कच खावी लागली. होडेकरांच्या वाढत्या कराचें काय झालें ? वेशीवर ठेवलेल्या सहा आण्याच्या करानें सत्तर महालांतील खेडवळांचा सत्याग्रह व्यक्त करून दाखविला ना ? व तो उठवणें सरकारास भाग पडलें ना ? सध्या फाल्गुन पोर्णिमेस चालणाऱ्या रोमटांस सुधारलेल्या शहरांत व महालांत लायसन लागतें. पण तेंच अत्यंत खेडवळांस लागू करण्याविषयीं पुष्कळदां हुकूम सुटले असतां सुद्धां खेडवळांच्या थवेच्या थवे लायसन न काढतां तुरुंगांत जातात पण लायसन काढीत नाहींत. या परता २ रा सत्याग्रह कोठें राहिला ? एक गोष्ट खरी कीं या सत्याग्रहांत व्याख्यानें देणारे व त्याबद्दल वर्तमानपत्रांतून कॉलमच्या कॉलम लिहून पाठविणारे पुढारी सध्या खेडेगावांत नाहींत. व ही गोष्ट जराशी गैरसोईची आहे. ही गैरसोय मडगावांतील सुधारलेले पुढारी आपल्या आगमनानें व हृदयंगम व्याख्यानानीं दूर करतील काय? अथवा रा. नायक हे असल्या पोकळ डौलां पुढाऱ्यांस पाठवून व आपण स्वतः येऊन खेडेगांवचा सत्याग्रह पुरा करतील काय? असें केले तर मात्र माझें गाढ अज्ञान चटकन नाहींसें होईल.

रा. नायक मला ईश्वरानें बनविलेलें रवळनाथाचें कूळ म्हणतात. होय. ईश्वर निर्मित रवळनाथाचें कूळ असल्यामुळेंच खेडवळ असून सुद्धां सत्याग्रहाचे विचार मला सुचले. आणि या शुक्राचार्यांच्या शिष्यांना राक्षसानें बनविल्यामुळें मडगांवसारख्या शहरांत असून सुद्धां व वारंवार ब्रिटिश पुढाऱ्यांचीं लेक्चरें ऐकूनसुद्धां त्यांस आपल्या हक्काची जाणीव अजून उत्पन्न होत नाहीं.

रा. नायक म्हणतात कीं येथील प्रतिष्ठित अगर स्वतंत्र वृत्तीचे गृहस्थ राजिदोरींत व आदमिनिस्त्रासावांत एकाद्या निरोपा सरसे धावून जातात व गरज नसतां लवण्या नमण्याचे प्रयोग करितात. या बोलण्यानें रा. नायक सर्व श्रीमंतांस व प्रतिष्ठित गृहस्थांस विनाकारण घर बसल्या कां दुखवतात ? गरज नसतां राजिदोरींत व आदमिनिस्त्रासावांत धावून जाणारे व तेथें लवण्या नमण्याचें प्रयोग करणारे श्रीमंत व प्रतिष्ठित गृहस्थ रा. नायक यांचे मडगांवकर अनुयायी असावेत असें वाटतें. कारण गरज नसतां लवण्याचें नमण्याचें कृत्य त्यानीं आदमिनिस्त्रासावांत लायसन मागून स्पष्ट करून दाखविलें आहे. व हें कृत्य पुन्हा सर्व प्रतिष्ठित मनुष्यास लावून सर्व गोमांतकास काळिमा लावण्याचें धाडस माझें पत्र वाचलें असतांसुद्धां ते करितात याबद्दल फारच नवल वाटतें.

मी केलेल्या जाहीर विनंतीस आव्हानाचें स्वरूप देऊन त्यास उत्तर म्हणून ते मला विचारतात कीं सदहू विद्यार्थ्यांनीं कोणती तरवार बहादुरीचीं कामें करून यश संपादन केलें आहे म्हणुन त्यांस आम्ही मदतीस बोलवावें.

पण मी त्यांस असें विचारतों कीं कोणत्या युगांत कोणत्या वीरानीं विद्यार्थी **दशेंत** असतानां तरवार बहादुरी करून यश संपादन केलें आहे? तरवार बहादुरीची **वेळ** निघून गेली. सध्याचा काळ शांततेचा **आहे.** अशा वेळीं स्वतःच्या हक्कास प्रत्येक मनुष्यानें अवश्य जागलें पाहिजे. उगीच **वाटेल तो** प्रश्न वाटेल त्याला विचारून आपल्या अकलेचे तारे तोडण्याचें कारण तरी रा. नायकानां काय होतें ?

गामाच्या श्राद्धास नापसंती दर्शविणारी जाहीर सभा भरवून चळवळ करण्याविषयी रा. नायकानीं मला जो हुकूम केला त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. जाहीर सभा भरविणें व लांबलचक व्याख्यानें झोडणें यांत मडगांवकर पुढाऱ्याची जितकी प्रगति आहे तितकी इतर सर्व गोमांतकांत कुठेंच सांपडणार नाहीं. याच साठीं एवढ्या मोठ्या जबाबदारीचा कामगिरी माझ्यासारख्या अज्ञान विद्यार्थ्यांवर सोंपविण्याऐवजीं आमचे मडगांवकर पुढाऱ्यांनीं ती स्वतःच करून दाखविली असती, तर त्यांत लगी मजा होती मात्र सत्याग्रहाचा प्रसंग आल्यास त्यानीं आम्हां विद्यार्थी लोकानां अवश्य बोलवावें. म्हणजे आम्हीं आमच्यासारख्या खेडवळ विद्यार्थी बंधूंबरोबर विमा कंपनीची पोलीसी उतरून त्याच्या मदतीस अवश्य धांवून जाऊं. खऱ्या धैर्याची परीक्षा सभा भरवण्यांत व लेक्चरें झोडण्यांत नसून सत्याग्रहांत असते. हें रा. नायक यांस ब्रिटिश हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांचीं लेक्चरें ऐकून सुद्धां अजून कळूं नये काय ?

रा. नायक यांस आपल्या तर्फेचा नायक करून जे वीर या वादांत लढतात त्यांस माझी एवढीच विनंति आहे कीं त्यानीं आपल्या शाब्दिक चातुर्यास व पोकळ व्याख्यानास आतां रजा द्यावी. अंगांत खऱ्या देशभक्तास साजणारी धमक असतां केवळ शाब्दिक वादाचें प्रस्थ न माजवतां व दुसऱ्याचीं उणी पाणी न करितां, आपलें चातुर्य व विद्वत्ता जर ते खऱ्या देशकार्यास लावतील तर मग आम्हीं सर्व विद्यार्थी त्यांचे दासानुदास होऊन राहूं यांत तिलप्राय शंका नाहीं.

रवळोबा विश्वासराव सरदेसाई

Ano 9 N. 43

Quinta-feira 22 de Janeiro de 1925

ASSINATURA
Por cada ... rupias

AN...
por cada linha ainda ... cada uma tanga
Numero av... tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

# भारत.

BHARAT.

वर्ष ९ वें. अंक ४३

गुरुवार ता. २२ जानेवारी सन १९२५

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. ( आगाऊ )

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें-गोवा

## MAIS UM PROCESSO

Por causa do seu artigo *Seculos depois...*, publicado no° 38 de Dezembro findo, acaba de ser instaurado mais um processo crime contra o *Bharat*.

O digno Agente do M. P. que o requereu, deve ter, na sua alta sabedoria, JULGADO o artigo incriminado capaz de periclitar o prestigio das instituiçoes que nos regem e que —que ironia !—o *Bharat* sempre as aplaudiu.

Conquanto seja verdadeira a filosofia dum ditado marata que diz— *ninguem chora a morte de quem sempre morre*,—nao e' menos verdadeiro, tambem, que a convivencia quase constante com os processos crimes tem sido para o BHARAT um habito inveterado, uma segunda natureza, um estimulo para se sacrificar, cada vez com mais energia, em prol dos interesses patrios.

Fique, porisso, sabendo, o digno Agente do M. P. que a sua atitude nao nos causou FRIO mas sim CALOR para prosseguirmos ainda com mais VIDA na nossa missao jornalistica a que temos dado tudo o que somos, material e moralmente.

De colo erguido, pois, o BHARAT se sujeitara' a mais este seu julgamento, preparando-se a receber, sempre com um sorriso a bailar nos labios, SORTE que o insondavel Destino lhe marcar.

O que tem de ser, ha' de ser e nao serao as perseguiçoes ou favores humanos que o evitarao. E a gente que segue a doutrina dum semilhante BREVIARIO, nao desfalece contra quaisquer contratempos que, porventura, pretendam aterrorisa-la.

### PARA A SEMANA QUE VEM

A falta de espaço obriga o BHARAT a reservar para o n°. imediato muita materia ja' composta, nomeadamente e'cos sobre o incidente "Jovens hindus e Centenario de Vasco da Gama."

Nada se perdera' com a demora, desde que esta' ainda em continuaçao a campanha anti—hindu', promovida astutamente por parte dalguns nossos irmaos cristaos.

## Ao veio do tempo ...

### UM BANQUETE DE SUBSCRIÇAO NO PALACIO DO GOVERNO—NARRA--SE UM SIMPLES BOATO QUE CORRE COM MUITA FORÇA—A VERDADE DOS FACTOS SOBRE A ATITUDE DA ACADEMIA NAS FESTAS DO GAMA.

Circula entre pessoas graudas, conselheiros do Estado, oficiais de alta patente, chefes de serviço uma lista de subscriçao para um estrondoso baile de subscriçao que vai ter lugar no palacio do Governo—ignoramos se no do Cabo ou no do Hidal Khan—; porem, onde quer que seja, no nosso modesto modo de ver isto e'um autentico sinal dos tempos... Nao se sabe para o que se ... memorar; ao que nos consta nao ha nenhum SANTO de CASA a celebrar com estrondo e espavento. La' se foram, na voragem do nada, as belas 14.000 rupias que muita fome haviam de saciar e matar muita sede. Mas, basta que pode estar la' suspensa sobre a nossa cabeça a terrivel espada de Damoclos. E, porisso ponto

*Crispim*

P.S. Em 'posto escriptum' fique bem patente que e' um mero boato e nada mais, o que ai fica. O mais que vier soara'

C.

Apo's o rabisco destas linhas para este numero, aparece-me A EPOCA de Mapuça', cujo correspondente de "Alem", um A. N. R. que pelas iniciais, nos parece tal como um Antonio de Noronha Rodrigues, o eximio representante da Academia, da Comissao magna das festas do Gama que, ignoramos, porque alçapao ou porque artes encafuou-se sem dar sinal da sua pessoa, a tantos titulos ilustre da mesma magua comissao.

Este sr. na sua ultima cronica sob a sub- epigrafe "Fim do Começo" refere- se ao incidente havido entre a Academia e o Governo nas festas. No's, por simples pudor deixaramos de nos referir mais de largo a' dita tragi comedia. Por artes do sr. Pereira Batalha a quem o A. N. R. se acha filiado, ligado pelos laços fraternais de ir...na loja *India*, foi nomeado vogal da Comissao magna quase representante da Academia. Foi o rastilho; a Accademia, a sua fina- flor agitou-se e, com razao, deliberou nao tomar parte nas festas, como de facto nao tomou. Houve muitas *demarches* no sentido de se apaziguar a Academia, mas todas elas redundaram num grande fiasco. A Academia terminantemente expressava se dizendo que A. N. R. nao era seu representante, pois quem devia representar a Academia era um 5° anista da Medicina e mais ninguem e porisso estatuiram uma condiçao *sine qua non*, a de irradiar o mesmo A. N. R. da Comissao, e como isto nao teve lugar, a Academia, celebrando a festa do Liceu, absteve-se de tomar parte nas festas. Tanto e' que para o tal numero do programa em que a Academia tomava parte arrebanharam-se rapazes das escolas primarias da Capital, de Pilerne, Nerul e muitas outras, cada um com o respectivo uniforme que dava a impressao duns homens de *brincos*. Se os rapazes foram a Cidade Velha foram como simples cidadaos e...como ninguem mais. E nao sei se se possa chamar a Academia a umas duzias de academicos da Cidade e aldeias circunvisinhas que ai estiveram, por uma curiosidade muito natural.

Fica, pois, restabelecida a verdade dos factos que o A. N. R. deturpou com intuitos mesquinhos. A questao academica ouvimos a um Academico que nos merece inteira fe' e que e' *alguem* na Academia.

Portanto, como se ve, nao foi um cavalo de batalha feito pelo *Bharat*, ja' ele por sua natureza o era,

*Crispim*

## Os hindus

...Sr. Director do *Bharat*

Em *N.* da *R.* a uma carta que escrevi ao ULTRAMAR, desmentindo a balela do convite ao *Mahatma Gandhi* e pedindo-lhe a fineza de me declarar os nomes das pessoas que fizeram parte da suposta deputaçao a que se atribuia o mesmo convite, dispensa..se o mesmo jornal de declinar "os nomes dos respectivos informadores, um dos quais e' hindu, por nao se julgar obrigado a isso,"

Nao e' de peso o que o *Ultramar* alega para se esquivar ao dever de declinar os nomes dos informadores cuja existencia, segundo os rodeios de que lança mao, nao deve ser senao imaginaria. E, depois, quem nao deve, nao teme.

Isto de dizer que a noticia nao ofende pessoa alguma e' uma evasiva que so' teria valor, se a mesma noticia nao ofendesse verdade, porque so a verdade nao ofende ninguem. E, porque a noticia inserta nas colunas do *Ultramar* desvirtuava a verdade dos factos, e' que me apressei a desmenti..la e nao por qualquer "terrivel desarmonia que presentemente entraram de reinar na classe hindu, desorientando uma parte dela."

Espalhar noticias imaginarias, como a que o *Ultramar* registou na "A ultima hora" de 2 do corrente, e' sempre ofensivo e, porque o era, repito —escrevi- lhe aquela carta.

De resto, nem os *jovens* nem os *velhos* hindus teriam duvida de dizer alto e bom som, que dirigiram convite ao *Mahatma* se, de facto, o tivessem feito, porque sabem eles, demais, que nao e' nenhum crime desejar ca' presença de quem, hoje, constitui gloria universal.

Por quem e', porem, nao editem noticias imaginarias, na suposiçao de que *nao ofendem pessoa alguma*.

E ponto.

Margao 16/1/1925.

De V. etc.

*Esvanta Suria Rau Sar Dessai*

## Uma carta

*Recebemos a seguinte carta:*

Sr. Director do *Bharat*

Numa local, subordinada ao titulo *Panico* escreve a TERRA entre outras coisas, o seguinte:

"Correm explicaçoes de que foi removida a tipografia ( do jornal marata HINDU ) pelo facto de constar que tendo sido feita ilegalmente a concessao dum valioso edificio publico, vai ser revisto o processo, visto ser forçoso reverter aquela ao Estado e ate' hoje nao haver sido utilisada para o fim a que se distinava, mas a bem diferentes, julgando as estancias oficiais que se abusou da munificencia ou generosidade do chefe da provincia com actos subversivos."

Entendo ser, absolutamente, despropositado entrar na apreciaçao da remoçao da tipografia do HINDU, porque ela nao, diz directamente, respeito a' instituiçao de que sou secretario. Cabe-me, apenas, derrama-

## रिंगणी सरबत

( SYRUP SOLANUM COMPOUND )

रिंगिणी, अडुळसा, डोलींमुळ, पिंपळी, जेष्टमध इ. वनस्पतींपासून हें सरबत बनविलें आहे. हें घेण्यास गोड आहे. जुनाट खोकला, दमा व श्वास यांवर हें अत्यंत गुणकारी आहे. फुप्फुसाच्या कोणत्याहि विकारांत याचा चांगला उपयोग होतो. छातींत दुखणें, कफांतून रक्त पडणें, क्षयांतील खोकला ढास लागणें, फुप्फुस दाह, श्वासनलिकादाह, मुलांचा डांग्याखोकला, आंकडी इ० विकारांवर हें गुणकारी आहे. यानें चिकट कफ पातळ होऊन तो त्रासाशिवाय बाहेर पडतो. आठ औंस ( २० तोळे ) बाटलीस किंमत ३॥ रुपये ट. ख. निराळा.

**अडुळसा सरबत**— (SYRUP ADHAT TODAVASAKA) हें सरबत अडुळशाचे ताज्या पानापासून बनविलें आहे. कमी जोराचा व साधा खोकला, दमा पडणें, येणें, जबरदस्त सर्दी इ० विकारांवर हें गुणकारी आहे. चार औंस वा. १ रुपया.

इतर औषधांचे माहित्ती करितां क्यॅटलाग मागवा.

आमचेकडे सर्व प्रकारचीं आयुर्वेदिक औषधें मिळतात.

**धी इंडियन मेडिकल फार्मसी, बुधवार पेठ, पुणें शहर.**



## व्होदीन

जुनाट संधिवात, मस्तक शूळ, कपाळ दुखणें या व्याधींवर उत्तम फ्रेंच औषध 'व्होदीन'च्या १।२ वड्यांनीं खात्रीनें गुण येतो. तसंच थंडी वाजणें, इन्फ्लुयंझा, संधीज्वर (टायफड) व साधारणपणें सर्व जंतुत्पादक तापांवर या औषधाचा फारच उपयोग होतो. २० वड्या असलेल्या बाटलीची किंमत फक्त दहा आणे.

**मिळण्याचीं ठिकाणें**

पणजी— द्रोगारी—फार्मसी आझावेद. द्रोगारी आर्यन. | फार्मसी गास्पार आलेमांव, **फोंडें.** हिंदु फार्मसी, **पणजी.**

**लुझो इंदियान दवाखाना, पणजी**



रंगभूमि मासिकांतून प्रसिद्ध झालेले

कै० राम गणेश गडकरी यांचे

## विनोदी लेख

कांहींतरी विनोद, नाटक कसें लिहावें, नाटकाची उत्पत्ति वगैरे विषय आले आहेत, किं. १२ आणे.

## महाराष्ट्रीय नट

सुंदर २५ फोटोसह महाराष्ट्रांत पूर्वी होऊन गेलेले व हल्लीं रंगभूमीवर काम करीत असलेल्या नटांचीं संपूर्ण चरित्रें किंमत दहा आणे.

## महाराष्ट्रीय नाटककार

सुंदर १५ फोटोसह महाराष्ट्र नाट्यकलेचा संपूर्ण इतिहास समजण्यास हें पुस्तक उपयोगी आहे. किं. दहा आणे.

तिन्ही पुस्तकें एकदम घेणाऱ्यास व्ही. पी. सह दोन रुपये.

पुस्तकें— **किर्लोस्कर संगीत मंडळी, सोलापूर,**

किंवा— **म्यानेजर किर्लोस्कर बुकडेपो, १९९ कसबा, पुणें शहर.** १२—२



## RODOLFO RODRIGUES



**HERBOLAR E DROGUISTA**

Possue segredos eficazes sobre varias doenças consideradas dificeis de cura.

Cura febres palustres e outras de mau caracter com o inofensivo emprego dos medicamentos aiurvedicos.

Pode ser procurado a toda a hora nas suas FARMACIA INDIANA e DROCARIA POPULAR estabelecida em Amonã, de Quepem



## बांकु नासियोनाल उल्त्रामारीनु

**लिमिटेड कंपनी**

जगांत अत्यंत नाणावलेली ही बँक व्यवहारकुशलतेमुळें आपल्या लौकिकांत दिवसेंदिवस भर घालीत आहे.

मुख्य ठिकाणः— **लिजबोअ**

सर्व खंडांत, बेटांत व वसाहतींत प्रस्तुत संस्थेच्या **एजन्सीस** पसरल्या आहत.

सामायिक भांडवलः ४८.०००.०००$०० यस्कूद

कामचलाऊ भांडवलः २४.०००.०००$०० ,,

रिझर्वः ३२.२००.०००$०० ,,

**वसाहतींतील शाखा**

पश्चिम आफ्रिका:— काबु व्हेर्दि, सां. तोमे, सां. तियागु, बिझाउ, बोलान, कॉंगु बेल्ग, काबींद, लोआंद, नोव्ह रेदोंदु, लोबितु, बेंगेल, व्हील सीलुस पोर्तु मोसामेदिस आणि लुबांगु.

पूर्व आफ्रिका:— लौरेंस मार्किस, इंजांबानि, बैर, शिंदु, तेति, केलीमाव मोसांबिक, आणि इबु.

इंडिया:— नोव्ह गोवा, मोर्मुगांव, मडगांव, मुंबई.

माकाऊ तिमोर इ. इ.

या बँकचे सर्व तऱ्हेचे व्यवहार जगांतील सर्व ठिकाणीं होत असतात.

भा र त

मिति पौष कृ० १२ शी शके १८४६

## "विनाशकाले विपरीत बुद्धि"

गोमांतकाविषयीं ज्यांच्या ज्यांच्या ह्मणून अंतःकरणांत पवित्र पुज्यभाव व अज्ञात अभिमान वास्तव्य करीत आहे, परशुराम क्षेत्राचा हा विभक्त विभाग पुन्हां एकदा उत्तुंग उन्नतिशिखरावर विलसूं व तळपूं लागलेला ईश्वरदत्त चर्मचक्षूंनीं अवलोकन करून डोळ्यांचें पारणें फेडण्याचें महद्भाग्य – आपल्या फुटक्या नशिबीं नसलें तर नसो बापडें पण – भावी पिढीस तरी निदान लाभावें हीच ज्यांची अढळ आकांक्षा आहे, व त्या विषयीं ज्यांस उत्कट उत्कंठाहि लागून राहिली आहे, त्यापैकीं बहुसंख्यांक जनसमाज आज दिवसा गोमांतक बंगाल बनविलें जाणार काय? हाच प्रश्न स्वतःशींच सोडविण्याचें साहस करण्यास उद्युक्त झाला आहे. गोमांतक दुसरा बंगाल बनणार काय? ह्या पंचावयवी प्रश्नानें आज एखाद्या जादुविद्याकुशल पंचाक्षराप्रमाणें प्रगतिपंथावलंबी प्रजापक्षाच्या हृदयावर मुरळ घालून तें भारून टाकलें आहे. ह्या प्रश्नाचा गूढार्थच तितका गहन आहे; किंबहुना गोमांतकाच्या भावी इतिहासाचीं पानें लालभडक रक्तानें रंगविलीं जावीं किंवा नयेत, गोमांतकांत सैतानी सत्तेची शोटेशाही साम्राज्य सुरू व्हावें अगर होऊं नये, बंडाळी व बेबंदशाही ह्या दुदैवप्रणीत दुकलीचा मूर्तीमंत अवतार ह्मणून गोमांतकाकडे इतर प्रांतानीं बोट दाखवावें किंवा दाखवूं नये हे तिन्ही महत्वपूर्ण समास त्या एकाच सवालावर हवाला टाकून स्वतः नाम निराळे राहिले आहेत असेंच ह्मटल्यास चालेल. आणि ह्याचसाठीं वरील प्रश्नाचें उत्तर नकारात्मक आलेलें कोणाहि समंजस माणसास हवें!

गोमांतकानें बंगाल बनणें जें आह्मांस भीतिजनक वाटतें त्याचा अर्थ जर एखादें 'देवाघरचें रत्न' असा घेऊं लागेल की महर्षि देवेंद्रनाथांसारखे तपोनिधी, जगदीशचंद्रांसारखे जगद्वंद्य तत्ववेत्ते, राजकवि रवींद्रनाथांसारखे कविसम्राट व देशबंधू दासांसारख अतुलनीय स्वार्थत्यागी राष्ट्रवीर गोमांतकासाठीं–आपल्या देशमातेसाठीं–ज्याचें रक्त तिळतिळ तुटणें परिस्थितीनुरूप जरुरीचें झालें आहे- त्या तडफदार व कार्यकर्त्या उसळत्या उमरीच्या तरुण पिढींतून निपजणें देशहित विघातक होय असा आमचा समज आहे; तर आह्मीं त्यांस पुन्हां पुन्हां बजावून ठेवतों कीं त्या बाबतींत तरुण गोमांतकानें बंगालचा धडा बेधडक गिरवावा, इतकेंच नव्हे तर बंगालच्या पाऊलांवर आपलें पाऊल टाकून वीरमातेच्या पवित्र सिंहासनावर जेव्हां गोमांतक अधिष्ठित होईल तेव्हाच गोमांतकीय तरुण पिढीच्या कल्पना सृष्टींत सुद्धां स्पष्टपणें दृगोचर होत नसलेलें सुराज्य दृश्य व मूर्त स्वरूपांत येण्याची स्वल्प तरी आशा दाखविणें शहाणपणाचें ठरेल. एरवीं नाहीं. हा आमचा पूर्वग्रह आज देखील अबाधित आहे; इतकेंच नव्हे तर त्यास दिवसें दिवस पुष्टीच मिळत चालली आहे.

पण ज्या बाबतींत गोमांतकानें बंगालची 'री' ओढलेली आह्मांस नको आहे, जिचा कोणाहि समंजस व सुविचारी पुरुषास तीन्ही त्रिकाळ बेंबीच्या देंठापासून कंटाळा व किळसच येईल अशी आह्मांस खात्री वाटते, ती बाबत निराळीच. गोमांतकानें बंगालसारखें विद्वान, सुशील, बाणेदार व कर्तृत्वशाली बनावें असा आमचा आग्रह आहे खरा, पण त्याचबरोबर अत्याचारी व सूडाच्या भावनेनें पूरीत होऊं नये हाहि हट्ट घेऊन बसण्याचा आमचा हक्क आहे. कठोर हृदयी कर्झन साहेबांनीं वंगभंगाखातर लोकशाहीचीं हृदयें तुडविण्यांत व लाथाडण्यांत जी अधिकार बहाद्दुरी व बेफाम वृत्ति जगाच्या निदर्शनास आणली तिचा आमच्या गोमांतकांतील वरिष्ट सरकारी अंमलदारांनीं उपयोग करून, खाल्या घराचे वांसे मोजण्याइतकी उद्दाम वृत्ती दाखवून, 'विषाची परीक्षा' पहाण्याचें मौर्ख्य पदरात घेऊं नये असें आह्मांस वाटतें. कारण ह्या निंद्य व गर्ह्यणीय कृत्यांनीं खवळून गेलेला लोकसमाज राग व अविचार ह्या दुकलीस मानवी स्वभावानुसार बळी पडून अत्याचार करण्यास कदाचित प्रवृत्त व्हावयाचा! बंगाल गव्हर्नर लॉर्ड लिटन साहेबांनीं व्हाइसराय साहेबांच्या वट हुकुमाच्या जोरावर जी सध्या बंगाल्यांत बेबंदशाही सुरू केली आहे तिचें प्रतिबिंब आमच्या गोव्यांतहि दिसूं लागावें हें इष्ट व व्यवहार्य नाहीं. वैयक्तिक स्वातंत्र्यावर व सार्वजनिक स्वास्थ्यावर घाला घालण्याचा पोर्तुगीज सरकारास मुळींच अधिकार नाहीं. व अधिकारबाह्य बेकायदेशीर कृत्य करण्यास जर अंमलदार वर्ग धजावला तर त्यास प्रतिकार करणें प्रत्येकाचें –हिंदू–ख्रिश्चन, ब्राह्मण–ब्राह्मणेतर, जित–जेते, ख्रिश्चन–द्वेष्टे, हिंदु–द्वेष्टे ह्या सर्वांचें आद्य कर्तव्य ठरतें. सार्वजनिक स्वास्थ्याची किंमत कोणास कळत नाहीं. सर्वांस सारखीच समजते. ह्मणून आह्मीं ह्मणतों कीं राजकर्त्यांना कुबुद्धि सुचूं नये. प्रजेचें वित्त व जीवित रक्षण्याकरितांच गरिबांनीं घामाच्या धारा पिळून व रक्ताचें अर्घ्य अर्पून मिळवलेल्या पैशांतून ह्या अधिकाऱ्यांचा पींड पोसला जातो हे आतां प्रत्येक सुशिक्षित अशिक्षितास समजून व उमजूनहि चुकलें असून मनास वाटेल तसा कारभार करून प्रजेस जुलमानें बेजार करणाऱ्या अंमलदारास काय शिक्षा द्यावी ह्याचा विचार करतांना बंगालचें सद्यःकालीन दृश्य लोकशाहीचे पुढारी ह्मणविणाऱ्यांच्या डोळ्यांपुढें दिसूं लागण्यापूर्वीं अधिकाराचा दुरुपयोग करण्यास सरसावलेल्या कामदारांनीं सावध व्हावें हें अत्युत्तम. पण इतका विचार त्यांच्या डोक्यांत घोळायला डोकें कुठें थाऱ्यावर आहे. अधिकारी वर्गाचें गोमांतकस्थ हिंदु वर्गानें यंदां राष्ट्रीय महासभेच्या कार्यक्रमांत भाग घेतल्यामुळे वरिष्ट कामदारांनीं कॉंग्रेसला हजर राहिलेल्या सरकारी कामगारांना नोकरीवरून दूर करण्याचा निश्चय व्यक्त केला असल्याचें नुकतेंच कानावर आदळल्यामुळें उपरिनिर्दिष्ट विचारांनीं आमचें डोकें भंडावून सोडलें आहे. ब्रिटिश अनुकरणाची सवंय आमच्या पोर्तुगीज सरकारास फार दिवसांपासून जडली असून चालू बबंदशाही हे तिचेंच एक प्रत्यंतर असेल!

अशा आणीबाणीच्या वेळीं आमच्या खिस्ती व्यवसाय बंधूंनीं जें धोरण पत्करलें आहे तें मात्र अनुदारतेची कमाल दर्शविणारें आहे. पाश्चात्य संस्कृतीच्या कर्दमांत लोळत पडलेल्या ह्या महिपीनंदनांना त्यांतच सुख वाटतें ह्मणून ह्मणा, अगर अव्यापारेषु व्यापार केल्यामुळें शेंपटी तुटलेल्या कोल्ह्यानें जसा इतरांसहि 'लांडे' बनण्याबद्दल सभ्यतेचा आव आणून मारे एखाद्या वृद्ध कपिंजलाप्रमाणें उपदेशामृताचें पान पाजण्यास सुरवात केली, तशीच ह्यांचीहि अवस्था झाली असल्यानें ह्मणा, हिंदूंचें हितशत्रुत्व करण्यांतच ज्यांचें सारें आयुष्य खर्चीं पडलें त्या आमच्या बाटक्या व्यवसाय बंधूंनीं चारी बाजूंनीं संकटांत सापडलेल्या हिंदु धर्मानुयांयांचा पुरा सूड उगवून घेण्याचा निश्चय केला आहे. गामाच्या मरणोत्सवांत हिंदूनीं दाखविलेली तटस्थ वृत्ति ह्यांचें पित्त खवळविण्यास कारणीभूत झाली असून सूडाच्या भावनेची कावीळ झाल्यामुळें ह्या पत्रकारांना चोहींकडे पिंवळी अराजकता दिसत आहे. मडगांवच्या 'आ इंदिय पोर्तुगेज, पत्रानें हिंदूंवर बंडाचा आरोप लादण्या इतकी आघाडी मारण्याचा पुरुषार्थ गाजविला आहे. ह्या भ्रमित चित्त पत्रकर्त्यांना आह्मीं गेल्या अंकीं पोर्तुगीझांत सडतोड उत्तर दिलेंच आहे ह्या वेळीं 'धनीं एक हात तर कुत्रें सात हात' ह्या वाक्प्रचाराची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. स्वतः आमच्या विषयीं सांगावयाचें झाल्यास आमच्या Mad cap मॅडकॅप परधर्मीय प्रांतबंधूनां आह्मीं एवढेंच बजावून ठेवतों कीं हिंदू धर्मांत ज्या ज्या बाबी निषिद्ध मानल्या आहेत त्या सर्वांस विरोध करण्याचें कार्य आह्मीं मागें बजावलें, सध्या तर बजावतोंच, व पुढेंहि शक्य तोंवर बजावूंच. गामाला आपला उद्धारकर्ता ह्मणण्यास आह्मी केव्हांहि तयार नसल्यानें गामोत्सवी कार्यक्रमांत भाग घेण्यास तर सोडाच पण तत्समयीं तटस्थ वृत्तिहि दाखविण्यास आह्मीं कबूल नाहींत; मग त्याबद्दल आमच्या अर्धनारी नटेश्वरांचा आमच्यावर रोष होवो अगर अंमलदारांस आमचा राग येवो.

झाल्या गोष्टींचा अशा रीतीनें ऊहापोह केल्यानंतर आह्मीं अधिकार बाह्य वर्तन करणाऱ्या अंमलदारांस व अर्ध्या हळकुंडानें पिवळे झालेल्या हिंदु द्वेष्ट्यांस इतकेंच कळविण्याची तसदी घेतों कीं:—

**दोरी तुटे पर्यंत ताणूं नका! बंगाल मध्यें सध्या काय चाललें आहे ह्याकडे जरा दृष्टि फेंका व वेळींच सावध व्हा! पुढें कांहीं भलतेंच घडून आल्यास आह्मीं जबाबदार नाहीं. ईश्वर तुह्मांस सद्बुद्धि देवो.**

## स्फुट विचार

**भारतावरील खटलाः—** भारताच्या गेल्या ३८ व्या [१९-१२ २४ रोजीं प्रसिद्ध झालेल्या] अंकांत 'कांहीं शतकांनंतर' ह्या सदराखालीं पोर्तुगीज भाषेंत प्रसिद्ध झालेल्या लेखांत कांहीं आक्षेपार्ह भाग आहे, असें निमित्त दाखवून पोर्तुगीज सरकारकडून भारतावर ता. १९ रोजीं खटला भरण्यांत आला आहे. ह्यांच नमुन्याचे आजपर्यंत ७ खटले व हा आठवा आपणांवर ओढून घेण्यांत आह्मीं दाखवलेला कोडगेपणा अगर कांहीं लोकांच्या शब्दानें सांगावयाचें ह्मणजे निलज्जपणा जनतेस कांहीं नवा नाहीं. आणि जोंपर्यंत अधिकारी वर्गाच्या 'हम करेसो कायदा' ह्या लोकसत्ताक राज्यपद्धतीस कालिमा फांसणाऱ्या तत्वास त्यांच्याच हातून हरताळ फांसला जाणार नाहीं, तोंपर्यंत लोकसत्तेखातर सर्वस्वीं आपलें जीवित ज्यानें वाहून घतलें आहे त्या 'भारत'पत्रास आपला कोडगेपणा-कांहींच फरक न करितां-कायम ठेवावा लागेल. जनतेचें मुख ह्मणून वावरणाऱ्या 'भारता'च्या कोडगेपणास अधिकाऱ्यांची विकारवशताच कारण होय. ज्या गामानें सत्याचा व न्यायाचा दिवसा ढवळ्या खून केला त्या पोर्तुगीजांच्या उद्धारकर्त्याचीं कृष्ण कृत्यें व त्यानंतर इतर गामाभक्तांनीं केलेले अनन्वित अत्याचार चव्हाटयावर मांडतानां आह्मांवर हा प्रसंग ओढवणार ह्याची आह्मांस जाणीव नव्हती असें नाही परंतु बेकायदेशीर वर्तणुकीचा, मग ती भले लठ्ठ पगार खाणाऱ्या अमलदारांकडून केली गेली असो, अगर दोन प्रहरच्या ददातीनें व्यग्र झालेल्या भणंग भिकाऱ्याची असो–मात्र ती सार्वत्रिक हितास अनुलक्षून असली पाहिजे–परिस्फोट करून तिच्या जन्मदात्यांचा जाहीर धिक्कार करणें आमचें कर्तव्य होतें व आहे.

**सत्य संकल्पाचा दाता भगवान! :–** वास्तविक उपरोक्त लेखांत ह्या पांढऱ्या कातडीच्या देव माणसांनीं ह्या देशांत पांय दिल्यापासून जीं कांहीं अनन्वित व उद्वेगजनक कृत्यें केलीं, ज्यांना 'पवित्र' करण्याकरितां ह्या ख्रिस्त प्रेषितांस हा देश घशाखालीं उतरविणें नाइलाजानें प्राप्त झालें; ज्या आमच्या रानटी(जितांव) पूर्वजांचा त्यांनीं अमानुष छळ करण्यांत जें प्राविण्य दाखविलें तें साधार व सप्रमाण जनतारूपी जनार्दनापुढें कांहींहि आड पडदा न ठेवतां मांडण्याचा आह्मां प्रयत्न केला होता. पोर्तुगीज सत्तेच्या अमलाखालीं हा देश गेल्यापासून त्याची कसकसी पायरी पायरीनें अवनति होत गेली व आज तो बेबंदशाहीच्या गर्तेंत कसा खितपत पडला आहे ह्याचें स्पष्ट व मुद्देसूद वर्णन आह्मीं आरोपीत लेखांत केलें होतें. त्यात आह्मी जे कांहीं विचार प्रगट केले आहेत ते सत्यास सोडून असते तर लोकसमाजाची योग्य पुरावा सादर करून खात्री केली गेली असती; व भारताच्या खोडसाळपणाचें माप त्याच्या पदरांत प्रतिपक्षानें घालण्याची कुशलता दाखविली असती तर त्याविरुद्ध सरकारचे हात धरण्यास अगर तोंड दाबण्याचा कोणीच मूर्खपणा केला नसता. पण औदार्य, व्यवहारकुशलता व कायदा कशाशीं खातात ह्याचीहि ज्यांस पुरती कल्पना नाहीं अशाच माणसांची अधिकारी वर्गांत रिक्रूड भरती होत असल्यामुळें हे साधे मार्ग त्यांस पसंत पडणें असंभवनीयच होतें! आह्मीं जें लिहिलें आहे त्याविरुद्ध बचावाचें साधन जवळ पास मुळींच न मिळाल्यामुळें अंमलदार वर्गानें आपल्या हातांत असलेलें हें खटल्याचें शस्त्र भारतावर उगारलें आहे. परिणामीं कांहीहि होवो पण भारतानें प्रगट केलेले विचार सत्यास, ध्येयास व परिस्थितीस धरून असल्यामुळें असले पांचशें खटले एकदम करण्याचें शौर्य जरी सरकारानें दाखविलें तरी आह्मी डगमगत नाहीं व त्यास जुमानीतहि नाहीं.

luz sobre as trevas em que o mencionado bissemanario pretende, com manifesta ma' fe', envolver a concessao feita pelo Governo ao *Sarasvat Bramana Samaj* desta vila. E' o que passo a fazer a seguir em rapidas linhas.

Antes de mais saiba a TERRA que o que o Governo concedeu ao *Samaj* e' o terreno e nao o edificio que foi comprado, ainda que neste contrato a instituiçao tenha sido objecto de atençois por parte de quem a beneficiou com a importante concessao do terreno, favor este pelo qual o *Samaj* se confessa sempre grato ao Governo.

Tenho a dizer ao mesmo jornal, em segundo lugar, que a concessao *nao foi feita ilegalmente*, como maliciosamente insinua, procurando, desta feita, criar em volta dum acto justo e legal uma atmosfera de descredito.

A concessao de que se trata e' tao legal que iguais tem sido feitas em Pangim e em Mapuga'.

Quanto a' historia de reversao, e' ela uma prova flagrante de quanto a TERRA odea os hindus e o seu despertar; porquanto, apesar de ser publico e notorio que se estao coalhando fundos para a construçao dum edificio apropriado para a referida instituiçao e que o mesmo terreno concedido se utilisa actualmente para exercicios gimnasticos da populaçao escolar do SAMAJ, — afirma menos escrupulosamente, baseada no tal "Correm", que " a concessao se distinava a fins bem diferentes " !

Querendo malquistar o SAMAJ com o generoso chefe da provincia que pelo seu atilado tino sabe, de resto, separar " o trigo do joio " nao se esquece a TERRA de supor que "as enstancias oficiais julgavam que se abusou da munificencia ... com actos subversivos!!!

Tanta maldade em tao poucas linhas so' podia brotar do bico da pena da genial TERRA!

Inda bem que o Governo a conhece melhor do que no's, nao lhe passando desapercebidos os seus processos politicos!

A mim nao me admirou, de resto que a TERRA procurasse pescar nas aguas turvas, aproveitando o incidente da festa do Gama, porque sei que o seu editor dera mostras de visivel descontentamento a quem, entusiasmado pela concessao e comovido pela gratidao, fora dar-lhe a sua grata nova. O ilustre jornalista dissera ate', entao, que o Governo nao devia ter-lhe concedido um terreno tao bom e tao no centro...

Depois de semilhantes precedentes, so' seria para estranhar que a TERRA se conservasse " calada " sem falar sobre supostos " actos subversivos " que ninguem sabe nem ela diz o que sejam.

Ja' que se referiu aqui a' concessao, nao vao estas desataviadas linhas registadas sem o agradecimento do SAMAJ ao Governo, mais uma vez repetido neste lugar, pela requintada generosidade com que animou a acçao patriotica da instituiçao

E creio que nao e' preciso por mais na carta...

Margao 15/1/925

De VExa. etc.
*Quessoa Ananta Naique*
Secretario do S. B. S.

# ANUNCIOS

Pelo juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivao do 1 ° oficio Redcar, á instancia do exequente Augusto Piedade Martins de Ambelim de Velim, cessionario dos primitivos exequentes João Antonio Fernandes, de Sernabatim e seu cessionario Vitorino Gregorio Constancio Coutinho vai a venda em hasta publica pela segunda vez á porta do Tribunal Judicial desta comarca no dia viute e sete de Janeiro corrente pelas dez horas, pela metade do preço da sua avaliação, o predio rustico denominado " Butram roinim Soclem-mola" situado em Fatorpá com exclusão da terceira adiçao ou sejam primeira e segunda adições do mesmo predio que é cultivado de coqueiros, discrito na conservataria desta comarca sob o n ° 5135 afl. 124 do Livro B 16 e avaliado por 2500 rupias nos autos da carta precatoria vinda da comarca de Salsete e extraida dos autos de execução hipotecaria que o dito exequente Martins promove contra Joganata Sinai Quencró e sua mulher Maturabai Sinainim e outros, de Cuncolim. Quem o quizer arrematar compareça nos indicado dia, horas e local correndo por conta do arrematante as despezas da praça e a contribuição do registo por inteiro. Por este são citados nos termos e para os efeitos da lei, todos os credores incertos dos ditos executados bem assim os co-proprietarios, ficam tambem igualmente citados os representantes dos credores falecidos Frederico Francisco Xavier Ligorio Raimundo Rebelo, Visnum Sinai Quirtonim e Madu Sinai uirtonim, todos que foram de Margão, sendo o crédito do 1 ° na importancia de 1300 rupias o do 2 ° na de 20 rupias e finalmente o do 3 ° na de 200 rupias. E para ser publico se expediu este, Quepem, 13 de Janeiro de 1923

O escrivao de direito do 1° ofi.
*Babú V. Camotim Redcar*
Verifiquei
O Juiz de Direito
*A. A. de Brito e Nascimento*

Pelo Juiz de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do segundo oficio Barreto vao ser vendidos em hasta judicial a' porta do tribunal situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige a' estaçao de Sanvordem, no dia 27 do corrente mez a's 10 horas em segunda praça e pela metade do preço porque foram avaliados os seguintes bens. Direito a' terça parte do predio rustico . denominado " Vadevo " da cultura de arroz, Predio rustico denominado " Madamodilsordo " da cultura de arroz, Predio rustico denominado " Diguivangana " da cultura de arroz. . Predio rustico denominado " Calemnomosso Sordo " da cultura de arroz. e predio rustico denominado " Gorbata bagaeta " da cultura de coqueiros e outras arvores todos sitos em Gocoldem e discritos na conservatoria predial desta comarca respectivamente, sob os nos. 16658, 16659 16660, 16661 e 16662 afl. 170 v. ate' fl. 172 v. do Livro B 45 e avaliados tambem respectivamente por 55, 110, 120, 100 e 150 rupias. Penhorados nos autos civeis de execuçao por custas que o Digno Agente do Ministerio Publico nesta comarca promove contra LocximaGauncarina, viuva de Janum Gauncar e outros de Gocoldem por apenso aos autos de inventario orfanologico procedido pelo falecimento do dito Zanum Gauncar. Sao por este citados todos os credores incertos dos ditos executados e os coproprietarios e quinhoeiros nos termos e para os fins da lei. A contribuiçao do registo por inteiro ficara a'cargo do arrematante. Para ser publico se expediu este,

Xeldem, 12 de Janeiro de 1925
O Escrivao de Direito do 2 ° oficio
*Aires Manuel Barreto*
Verifiquei
O Juiz de Direito
*A. A. de Brito e Nascimento*

## PAGODE DE SRI MOLI CARJUNA DE MOLCORNEM

No dia 1 do seguinte mez de Fevereiro, pelas 16 horas, irá á praça a avença da receita do arecal Agora Murmuttem, para o periodo de nove anos desde 1925 a 1933, com as condições constantes do respectivo calculo, que estarão patentes no acto de arrematação no dito Pagode. Aos 21 de Janeiro de 1925. O escrivão da mesa *Ramacrisna Ananta Narcornim*. Visto. O presidente *Zaivanta Ganaxama Molcornencar*

## VENDE-SE

Vende-se, em hasta, em globo ou em glebas.

Predio Silva-Batta em que existem 3 casas e 2 lojas, sito na séde do concelho de Quepem, no dia 25 de janeiro proximo pelas 11 horas, na residencia do sr. tabelião Salinho da Silva, reservando o signatario deste a quem pertence retirar da praça não lhe convindo o preço. O arrematante depositará no acto 10% do preço. Quepem 22 de Dezembro de 1924.

*Jeronimo Francisco da Silva*

## अभिप्रायार्थ माल व जाहिराती पाठवा.

### जाहिराती–संग्रह

या पुस्तकाचे वर्षांतून चार भाग प्रसिद्ध होत असून ज्यानीं आमच्या ऑफिसांत नांवें नोंदविलीं असतील त्यांना ते फुकट पाठविण्यांत येतात. अभिप्रायार्थ पाठविलेल्या मालावर विस्तृत अभिप्राय दिला जातो. जाहिराती मराठी, पोर्तुगीज व इंग्लिश या तिन्हीं भाषांतून प्रसिद्ध करण्याची व्यवस्था असून, त्यांचा दर पुढील प्रमाणें आहे. सिंगल कॉलमच्या दर ओळीस ४ आणे व डबल ओळीस ८ आणे पडतील.

पत्ता— एम. के. पे. गांवकर
पैंगीण–काणकोण–गोवा.

## वर्तमानसार

--गामाच्या श्राद्धोत्सवासंबंधीं मडगांवच्या 'हिंदु' पत्रावरहि खटला भरण्यांत आला आहे! कुटिल कुळकर्ण्याप्रमाणेंच 'तो अद्वितीय प्राणी' मरणोत्तर सुद्धां हिंदूनां छळीत असल्याचें पाहून आश्चर्य वाटण्याऐवजीं हंसूं येतें!

--गामोत्सवासंबंधीं खुद्द पोर्तुगालांत जिकडे तिकडे तटस्थपणाच स्वीकारण्यांत आला होता, असें तेथील पत्रांवरून समजतें!

—अपरिहार्य कारणांमुळें या खेपेला पुरवणी प्रसिद्ध करणें शक्य झालें नाहीं.

—'भारत' व 'हिंदु' या पत्रांसंबंधीं पिकत असलेल्या भलभलत्या कंड्यांवर लोकांनीं विश्वास ठेवूं नये अशी आमची लोकांना सूचना आहे.

—डॉ० जाइम मोराइस यांची नेमणूक आंगोलच्या हाय कमिशनचे जागीं झाली असून, त्यांच्या ऐवजीं येथें जुवांव कामोयेंझस हे येतील.

—फाझेंदाचे मुख्याधिकारी तिनोकु, पब्लिक वर्कस खात्याचे मुख्य मेंदोंस व डॉ० जाइम मोराईस हे लवकरच पोर्तुगालला रवाना होणार आहेत.

Ano 9 N. 44

Quinta-feira 29 de Janeiro de 1925

Por ... as

AN...

ada linha ainda q... ...nga

Numer... avulso

DIRECTOR E EDITOR

*G. P. Hegdo Dessay*

Quepem-Goa



S. R.
Biblioteca Nacional
Pangim


# भारत.

BHARAT


वर्ष ९ वें. अंक ४४

गुरुवार ता. २९ जानेवारी सन १९२५

वर्गणीचे दर.

सालीना ट. ख. सह ३ रु. ( आगाऊ )

जाहिरातीचे दर.

समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.

गो. पु. हेगडे देसाई

केपें–गोवा


## DE RELANCE...

A si proprios se contradizem aqueles que simultaneamente atribuem aos hindús propaganda *gandhista* e movimento *separatista*.

E' que o *gandhismo* condena tudo o que, de perto ou de longe, directa ou indirectamente se prenda ao *separatismo*. Onde ha *gadhismo*, não existe *separatismo*.

¿Como, pois, nestas condições, os hindús, considerados como autores do crime da propaganda *gandhista* podem, ao mesmo tempo, ser acusados do crime do movimento *separatista*?

Gandhi é comparado com Cristo e a doutrina dêste é, na sua essencia, igualada á daquele. As personalidades de ambos se confundem como se unificam os seus principios. Quem faz a propaganda do ideal do primeiro protege, portanto, indirectamente, o triunfo da moral do segundo.

Logo, os promotores da propaganda gandhista não podem ser atingidos, como o fazem alguns discolos cristãos, pelo epiteto de *inimigos dos catolicos*.

Os hindùs de Goa acompanham o movimento dos seus irmãos do imperio visinho, imitando-os no que lhes fôr possivel e preciso.

¿Que mal poderá daqui advir ás nossas instituições politicas? ¿Será a imitação dos visinhos em todos os ramos de sua actividade capaz de aluir a Republica, a ponto de se lobrigar na mesma imitação espirito de *sedição*, *rebelião* e *subversão* contra a Nacionalidade portuguesa?

Quem tal pensa, denota lamentavel ignorancia dos factos sobre que incide a tão injustamente criticada imitação que foi que principalmente deu forte impulso ao progresso dos hindús que, não há pouco, constituiu objecto dos mais rasgados elogios ao sr. *M. Dias*, distincto colaborador da *India Portuguesa*, de Margão.

A imitação que os hindús goezes fazem do movimento dos seus irmãos da India Britanica é, pois, tão inofensiva como a propria inocencia e tão pura como a propria puresa.

Insinua-se, de quando em vez, que os hindús conseguiram colocações em diferentes ramos de administração pública, devido á *munificencia* ou *generosidade* do Governo. Fazer uma afirmação semilhante é acusar ao mesmo tempo de injusto o Governo e de incompetentes os hindùs, quando é certo que os lugares de destaque que êstes alcançaram e alcançam na burocracia foram e são por concursos públicos, abertos pelo Governo nos termos de leis e regulamentos, feitos a *todos os cidadãos portugueses*!

A *história* de *munificencia* ou *generosidade* é, pois, uma detestavel manifestação do invejoso odio que alguns nutrem aos hindús, pelo seu rapido progresso.

Mas ¿Porque é que os hindús elogiam, então, a cada passo o liberal e magnanimo elemento europeu?

E' porque êste, alheio ás digladiações da politiquice local cristã tem envidado e envida os seus milhores esforços por forma a que justiça lhes fosse e seja feita.

¿Quantas vezes, os europeus liberais e magnanimos tem-nos livrado da acintosa perseguição religiosa e politiqueira, que lhes foi movida pelos *irmãos não hindús* de antiga geração?

Não acusem, pois, os hindús de *crimes* que não cometeram e unamo-nos todos para equilibrar o orçamento provincial, matando o terrivel *deficit* que a todos nós está perseguindo, cruelmente...

## SERENAMENTE!

O nosso presado colega de *A Epoca* escreve na sua edição de 20 do corrente, sob a epigrafe de *Errada Orientação*, o seguinte:

"Nao passa de errada visao dos factos, a orientaçao de certos hindu's que, mais antes pelo espirito de curiosidade do que da politica, foram ate' Belgaum assistir a's sessoes do Congresso Nacional Indiano reunido naquela cidade em 25 de dezembro findo.

Os hindu's de Goa, merce da generosa naçao Portuguesa, gosam de regalias politicas cuja uma metade nao lograrao obter os do imperio visinho por longos anos por vir. Nao e' portanto por este lado que se pode filiar o entusiasmo manifestado.

E' somente pelo espirito de curiosidade de conhecer pessoalmente os *leaders* do movimento, especialmente o *Mahtma' Gandhi*, seu ilustre presidente e outros *leaders* do movimento politico, pois o discurso do presidente do *comite'e* da receçao foi proferido em *canarese*, lingua desconhecida da maioria ou do geral dos goezes e os trabalhos conduzidos em lingua inglesa igualmente nao conhecida dos visitantes.

E' portanto, uma errada concepçao, se e' que ha', da parte dos hindu's de quererem imitar os seus irmaos do imperio visinho.

Mas a imitaçao nao se sabe para que fim?

Nao pode ser para fins politicos como se viu, nem para nenhuns outros que no's temos de lhes invejar.

No entanto, dizem que esta concepçao causou ja' uma vitima, tendo o governo dado um exemplo de firmeza e de bom senso.

Pena e' que o sr. dr. Jaime de Morais nao tivesse tido semilhante gesto em outras ocasioes e das mais atrozes consequencias.

¿Nao terao havido muitas ocasioes para se fazer justiça rigorosa durante os longos 5 anos da sua comissao?

Que as houve, sabem-no todos, mas no Olimpo reinou profundo silencio.

Nao aplaudimos a atitude dos hindu's, pelo contrario reprovamo la por insensata e estouvada.

E eles proprios devem ter voltado desiludidos e mais lavados de ideas com o que lhe respondeu a poetiza mrs. Sorojini Naidu, recomendando-lhes que andassem unidos aos cristaos — como temos lido."

Francamente, nao conseguimos atingir o intuito que ditou a prosa transcrita. Na ida de certos hindu's ao Congresso de Belgaum ou prevaleceu o espirito de curiosidade ou sobressaiu a intençao politica. E, como o proprio colega confessa ser verdadeira a primeira disjuntiva, conclui-se que a assistencia dos mesmos hindu's ao referido Congresso nao obedeceu a qualquer fim politico. Tanto isto e' verdaque diz: "E' S'OMENTE pelo espirito de curiosidade de conhecer pessoalmente os *leaders* do movimento etc."

Ate' aqui esta' perfeitamente bem O que nao faz sentido e' a referencia do colega a "uma errada concepçao da parte dos hindu's, de quererem imitar os seus irmaos do imperio visinho" sobretudo, quando logo a seguir assegura "nao poder ser a imitaçao para fins politicos, nem para nenhuns outros que a *Epoca* tem de lhes invejar."

Ora, se na assistencia dos hindu's ao Congresso se nao lobriga nem o espirito politico nem a imitaçao para fins a serem *invejados* ¿como diacho o presado colega admite, ainda que em tom vacilante, uma *concepçao errada* da parte dos mesmos hindu's?

A referencia de *A Epoca* a' uma *errada concepçao* e', pois, descabida como inoportuna e' a censura com que profliga a atitude dos hindu's sendo por completo injusta a parte final do trecho reproduzido, por quanto a comuninade hindu' nunca *errou concebendo* qualquer plano contra os seus irmaos cristaos.

Quanto ao que o mesmo semanario regista no tocante a' vitima da concepçao errada, temos a significar-lhe que a ser verdadeiro o que lhe transmitiram, merece-nos, simplesmente reprovaçao. E' que ninguem pode, em boa razao, ser punido por causa de sua boa ou ma', errada ou nao concepçao que nao e' nenhum crime previsto pelo Codigo Penal. Porque o pensamento nao pode ser *opened by censure*, ainda que esteja em conflagraçao todo o mundo e mais o fundo do inferno.

A Republica se nao fez para que o governo seja autor dos "exemplos de firmeza e de bom senso," infligindo castigos aos "criminosas de concepçoes."

¿Nao acha a *Epoca* que seriamos, entao, piores do que negros?

# समाज सुधारणा

### लेखांक २ रा.

हिंदु दांपत्याचा संबंध एक ईश्वरीय कार्य मानलें जात आहे. सृष्टिकर्त्यानें पत्नीला त्याच करतां उत्पन्न केलेलें आहे असा नव त्याचा पूर्ण विश्वास आहे. हिंदु बायकांचा असा विश्वास आहे कीं, पति एक असतो, एकच वेळ लग्न करतां येतें व पतिपत्नीचें नातें अनेक जन्मपर्यंत स्थिर झालेलें असतें.

हिंदु विवाहसंबंध ईश्वरप्रणीत आहे. तो अचल व धर्माच्या सांखळीनें बांधलेला आहे. हा संबंध इहलोक व परलोक या दोन्हीं करतां आहे.

हिंदु दांपत्याचा संबंध सांसारिक नाहीं परंतु धार्मिक आहे. हिन्दु आपण आपल्या पितृऋणांतून मुक्त होण्याकरतांच विवाह करीत आहे, केवळ विषय वासना तृप्त होण्याकरतां हिंदुलोक विवाह करीत नसतात. पशूप्रमाणें मन मानेल तसा संभोग करणें हा त्यांचा धर्म नाहीं; तर त्याकरतां नियमहि केलेले असतात. त्या नियमाप्रमाणें जिवन कालामध्यें थोडेच दिवस विषयभोगा करतां प्राप्त होत असतात. व हेहि दुसऱ्या कोण त्याच उद्देशानें नाहीं तर केवळ धर्माची आज्ञा पालन करण्या करतां असतात.

हिन्दु विवाहाचा असा उद्देश आहे कीं, दोन योग्य आत्म्यांना एका संपूर्णावस्थेमध्यें आणण्याकरतां त्यांची जोड घालून द्यावी. त्यामुळें व्यक्तीचें सुख तथा स्वास्थ्य वाढून त्या द्वारा मनुष्यमात्राची सामाजिक उन्नति व्हावी.

हिन्दुविवाह संस्काराचें स्वरूप अतिशय गंभीर आहे. विवाह करतेवेळीं आपण ईश्वराला साक्षी ठेऊन जन्मभर पर्यंत पवित्र भावानें रहाण्याविषयीं प्रतिज्ञा करीत असतों. सामाजिकदृष्ट्या याचा अभिप्राय असा आहे कीं, स्त्रीपुरुषांत भेदभाव नसतो तर तनमनधन सर्व आपण एकमेकांना अर्पण करीत असतों. वेदामध्यें पुरुषाला "भ्राज्य तोऽग्ययः" अर्थात गरम, उत्साहप्रद तचेंच उष्णता उत्पन्न करणाऱ्या सूर्याची उपमा दिलेली आहे व स्त्रीला "विरस्मय" ह्मणजे प्रकाश देणारी तसेंच प्रेमाचें केंद्र असें ह्मटलेलें आहे.

प्रजापतीनें प्राण व रथी यांच्या द्वारा सृष्टीची रचना केली. तसेंच दोन पवित्र आत्मे एक झाल्यामुळें मानव प्राण्यांची स्थिति व वृद्धि होत असते. खऱ्या प्रेमाच्या पवित्र विवाहसंस्कारामुळें मनुष्यमात्रानां पुष्कळ फायदे होऊन समाजाचें अतिशय कल्याण होतें.

**समञ्जन्तु विश्वेदेवा समापो हृदयानि नौ**
**सं मातरिश्वा संधाता समदेष्ट्री दधातु नौ ॥**

ह्मणजे- आंह्मीं दोघेंहि या विद्वानाच्या समोर प्रतिज्ञा करतों कीं, आमचें हृदय दोन प्रकारच्या जलांप्रमाणें मिळून जावो. जीवना करतां जसा प्राणवायु, सृष्टी करतां जसा सृष्टीकर्ता, उपदेशाका करतां जसे श्रोतृगण त्याप्रमाणें आह्मीं पतिपत्नी एकमेकानां प्रीय होऊं.

सिनीवालि पृथुष्टुके या देवा नामासि स्वसा ।
जुषस्व हृव्य माहुतं प्रतांदेवी दिदिड्डि न ॥ यजुर्वेद ३४-१०

ह्मणजे- कुमारीनों तुम्हीं ब्रह्मचर्य व्रताचें पूर्णपण पालन करून उत्तम प्रकारच्या विद्या शिकून आपल्या इच्छेप्रमाणें व आपल्या परीक्षेनें आपणा करतां उत्तम प्रकारचा वर शोधून काढा व त्याच्या बरोबर आनंदपूर्वक गृहस्थाश्रमांत प्रवेश करून उत्तम प्रजा उत्पन्न करा.

**ब्रह्मचर्येण कन्या ऽ युवानं विन्दते पतिम्**
**अनड्वान ब्रह्मचर्येणाश्वो घास जिगीषति ॥ अथर्ववेद ११-१८**

ह्मणजे- ब्रह्मचर्याश्रमांतून कन्येनें पूर्ण विद्याभ्यास केल्यानंतर तारुण्यामध्यें तरुण पुरुषाला आपला पति करावा तसेंच पुरुषानेंहि सुशील व धर्मात्म्या पत्नीबरोबर विवाह करून एकमेकांच्या सुखदुःखामध्यें सहाय्यकारी व्हावें; कारण पशूना सुद्धां पूर्ण तारुण्य प्राप्त होईपर्यंत जर मुनिनियमांमध्यें ठेवलें तर ते अत्यंत बलवान होऊन निर्बल जीवाना पराजित करूं शकतात.

वैदिककालामध्यें ज्यावेळीं भारताची विद्वत्ता पूर्णावस्थेला पोंचलेली होती त्यावेळीं उपनिषद न्याय व दर्शनशास्त्र वगैरे उच्च प्रकारचें वाङ्मय तयार होत होतें. ज्याकाळीं धर्मशास्त्र व वैदिकमंत्रांची रचना तयार होत होती, ज्या काळीं हिन्दुस्थानचो आत्म विद्या पूर्णावस्थेला पोंचलेली होती त्या काळीं स्त्रिया पुरुषांची बरोबरी करीत असत. त्या काळी स्त्रीपुरुषांमध्यें समानतेचा व्यवहार होता. स्त्रीपुरुषांचे सामाजिक व आत्मिक संबंध बरोबरीचे होते.

इतिहासावरून असें अनुमान करतां येतें कीं वैदिककाळीं आजच्या सारखी स्त्रियांची अधोगति नव्हती. आज स्त्रियांनां आपण शुद्राप्रमाणें वागवून मानसिक व आत्मिक उन्नतीला पारखें करून सोडलेलें आहे. ज्या स्त्रियांनीं वेदमंत्राची रचना केली त्यांनां आज ते मंत्र ऐकण्याचा सुद्धां अधिकार नाहीं. ही अत्यंत शरमेची गोष्ट होय. आज आमच्या बहिणींनां व मुलींनां आमच्या मातांनीं रचलेले वेदमंत्र ऐकण्यास न मिळणें यासारखी लाजिरवाणी गोष्ट दुसरी नाहीं.

आजच्याकाळीं स्त्रियांनां मानसिक व आत्मिक उन्नतीला पारखें करून ठेवलें जात आहे. त्यांनां मौंजिबंधनाचा अधिकार नाहीं. त्यांचे सर्व धार्मिक अधिकार काढून घेतलेले आहेत.

हारित आपल्या धर्मशास्त्रामध्यें ह्मणतो "स्त्रियांचे दोन प्रकार आहेत. ब्रह्मवादिनी व सद्योवधु हे होत. ह्यापैकीं ब्रह्मवादिनी स्त्रियानां उपनयन, अग्नीबंधन, वेदाध्ययन व स्वतःच्याच घरांत भिक्षा ही कर्मे करतां येतात. सद्योवधु स्त्रियांना असा विधि नाहीं. यावरून असें ह्मणतां येतें कीं, स्त्रियांचा धार्मिक संस्कार पुरुषाप्रमाणें होणें इष्ट आहे

आनी बेझंट आपल्या Wake up India पान ५५ यांत ह्मणतात: "पूर्वकाळीं मुलींचा उपनयनसंस्कार करीत असत, त्यानां वेदाध्ययन करण्याचा अधिकार होता व त्या गायत्रीमंत्राचाहि जप करीत असत. बाप किंवा चुलता अगर मुलीच्या भावाला त्यांनां विद्या शिकविण्याचा अधिकार असे इतरानां हा अधिकार नव्हता.

**कन्याऽप्येवं पालनीया शिक्षणीया नियत्नतः**

याचा अर्थ असाआहे कीं, मुलींना मुलाप्रमाणेंच पालन करून शिक्षण दिलें पाहिजे.

**आनी बेझंट** वरील पुस्तकांत ह्मणतातः वैदिककालामध्यें स्त्रियावर विवाह करण्याबद्दल सक्ति नव्हती तर त्या आपल्या मानसिक व आत्मिक बलाप्रमाणें बालब्रह्मचारिणी रहात असत व मोक्षाच्या प्राप्ती करतां सन्यास घेऊन ब्रह्मज्ञान मिळवीत असत.

बाल ब्रह्मचारिणी 'सुलभा' ब्रह्मज्ञानावर वादविवाद करतानां राजर्षि जनकाना सांगते "माझा जन्म क्षत्रिय कुलांत झालेला आहे. मला माझ्या आवडीप्रमाणें किंवा गुणाप्रमाण योग्य पति मिळाला नाहीं या वरून मी पवित्र भावानें मोक्षप्राप्ति करतां सन्यास घेतलेला आहे.

याप्रमाणेंच गार्गी व अनेक ब्रह्मचारिणी स्त्रियानीं जन्मभर विवाह न केल्याबद्दलचीं अनेक उदाहरणें आहेत. त्यांना त्या काळच्या पद्धतीप्रमाणें पितृसंपत्तीचा भाग व धार्मिक शिक्षण मिळालेलें होतें. पवित्र भावनेचा संचार त्याच्यांत झाल्यामुळें आपल्या देशाच्या तसेंच आपल्या बहिणबांधवांच्या कल्याणाकरतां सर्वस्व अर्पण केलेलें होतें. वैदिक कालामध्यें विवाहसंस्काराचा असा उदात्त आदर्श मिळत आहे कीं, तो पाहून भारतीय प्राचीन सभ्यता तसेंच स्त्रियांविषयींचा आदर याचें अनुमान करतां येतें. भारतीय स्त्रियानां तो काळ अत्यंत अनुकूल होता. त्या स्वातंत्र्यतापूर्वक साहित्य व विज्ञान यांचा अभ्यास करीत. वेदांचा अभ्यास तसेंच ब्रह्मविद्या यामध्यें त्या निपूण असत. राजनीतीची त्यानां माहिती होती. व पुरुषसुद्धां त्यांच्याकडे वेळीं अवेळीं सल्ला घेत. एकंदरींत त्या काळीं स्त्रियानां पुरुषांप्रमाणेंच कोणतेंहि काम करण्याची हरकत नव्हती. पुरुषाप्रमाणेंच सर्व अधिकार स्त्रियानाहि होते हें खालील उदाहरणावरून दिसून येईल.

१ बालब्रह्मचारिणी गार्गी इनें याज्ञवल्क्य ऋषीकडे सर्व शास्त्रांमध्ये वाद केलेला होता. आपल्या उच्च शिक्षणानें व गंभीर ज्ञानानें राजसभेमध्यें याज्ञवल्क्य ऋषींना निरुत्तर करून घालवून दिलेलें होतें.

२ मैत्रेयीनें गृहस्थाश्रमांतून निघाल्यावर मानसिक व धार्मिक योग्यतेवर विचार करून आपल्या पतीला आपणाला ब्रह्मज्ञानाचा उपदेश देण्याबद्दल विनंति केली व ती तिच्या पतीला मान्य होऊन त्याप्रमाणें तें ज्ञान तिला मिळालें गेलें.

३ महाराणी कैकयी रणक्षेत्रामध्ये जाऊन लढत होती.

४ गांधारी राजसत्तेंत जेथें राजकीय विषयांचा खल होत होता तेथें जाऊन त्या विषयावर आपलें मत देत होती. लढाईत न पडण्याबद्दल तीनें अनेक वेळां दुर्योधनाला सांगितलेलें होतें.

अशीं पुष्कळच उदाहरणें देतां येतील. परंतु आजची स्थिति निराळी आहे. आज आमच्या आया बहिणींनां राजकीय विषयां वर विचार करण्याला मिळत आहे काय? आपल्या मुलांच्या नैतिक चुका पाहून आज किती मातांकडून त्यांना उपदेश मिळत आहे? आपण मोठ्या अभिमानानें असें सांगत आहों कीं, स्त्रियांचा राजनीतीकडे संबंध काय? परंतु ही खरोखर लज्जास्पद गोष्ट आहे.

स्त्रिया कितीहि पतिव्रता, स्वार्थत्यागी असल्या तरी पण पुरुषसमाजामध्यें त्यानां मान नाहीं आपण कोणत्याहि कामामध्यें त्यांचा सल्ला घेण्यास इच्छित नाहींत कारण त्यांच्याबद्दल आपणाला आदर नाहीं. त्या जन्मताच अज्ञानी असतात असें नाहीं तर आपण त्यानां शिक्षण न देतां अज्ञानांत ठेवलेलें आहे.

महाराणी कुंतीनें आपल्या पुत्रानां लढाईवर जातेवेळीं सांगितलें कीं, "क्षत्रिय माता केवळ रणांगणामध्यें युद्ध करण्याकरतांच पुत्रानां जन्म देत असतात, या करतां जाऊन युद्ध करा" एकटी कुंतीच त्या काळीं अशा प्रकारची नव्हती तर कुंतीसारख्या अनेक स्त्रिया त्या काळीं होत्या.

कुंती अशा प्रकारची वीर माता, द्रौपदी अशा प्रकारची वीर पत्नी, उत्तरा अशा प्रकारची वीर बहीण व शिखंडी अशा प्रकारची वीर कन्या होती. आपण लक्षांत ठेवलें पाहिजे तें हें कीं, शिखंडीनें पुरुषवेष धारण करून महाभारतामध्यें मोठमोठ्या वीरांकडे लढाई केलेली होती. दोन गोष्टींच एकमेकाकडे परस्पर संबंध आहे तो हा:-

१ स्त्रियांचें शिक्षण त्यांची मानसिक व धार्मिक व शारीरिक उन्नति. २ त्या जातीची उन्नतावस्था. त्या काळीं आपल्या हिन्दुस्थानामध्यें अशा प्रकारच्या योग्य माता होत्या व त्या वीर व देशाभिमानी पुत्र उत्पन्न करीत. परंतु आतां बाल अज्ञानी मातांकडून भिरू व देशाचा अभिमान न बाळगणारे पुत्र उत्पन्न होत आहेत. कारण व कार्य. कारण सुधारून कार्य नीट करणें सर्वस्वी आमच्या हातांत आहे. प्राचीनकाळीं आपल्या देशांत स्त्रियांबद्दल किती आदर होता हें मनुस्मृतींतील खालील श्लोकावरून कळून येईल.

"जेथें स्त्रियांचा सत्कार होतो तेथें देवता वास करीत असतात व जेथें स्त्रियानां मान नाहीं तेथें सर्व क्रीया निष्फळ होतात."

"ज्या घरांमध्यें स्त्रियांना दुःख प्राप्त होतें तें घर लवकरच नष्ट होईल व ज्या घरांमध्यें त्यानां सुख मिळतें तें घर आनंदानें नांदत राहील."

असो. एकंदरींत वेदकालामध्यें विवाहसंस्कार व स्त्रियांची स्थिति कशी होती याचें दिग्दर्शन केलेंच आहे. आतां पुढच्या लेखांकांत आजच्या काळीं विवाह संस्काराची अधोगति कशी झाली आहे त्याचें दिग्दर्शन करूं.

## तीन तांगे त्रयस्थ

श्री. भारतकर्ते यांस नम्र विनंति.

आपल्या सन्मान्य पत्रांत अशा तऱ्हेचे पत्र व्यवहार पुनः पुनः येण्यापेक्षां दुसरे चांगले पुष्कळ विषय आहेत; परंतु त्रयस्थास जबाब दिल्याशिवाय राहणें निरुपायाचें ह्मणून खालीं लिहिलेले चार शद्ब प्रसिद्ध करण्याविषयीं आपणास नम्र विनंति करतों.

ता. २५-१२-१९२४ च्या भारताच्या अंकांत 'राशिनकरांची कथा' सांगण्याच्या निमित्तानें कोणी एका त्रयस्थानें आपला 'सांसर्गिक अडाणीपणा' दाखविण्यास सुरवात कली आहे. आमची अशी अपेक्षा होती कीं 'राशिनकरांची कथा' सांगण्यास सुशिक्षितं श्रोता आपलें सुशिक्षित तोंड लपविणार नाहीं पण वेड्याच्या सुशिक्षितपणातील मत्सरीपणा मुरलीधर समाजानें चव्हाट्यावर आणल्यामुळें किंवा जन्माचा भ्याड असल्यामुळें कुठें दिवंगत झाला कीं काय ? पण छे ! वेड्यानें आपलें सुशिक्षित डोकें त्रयस्थाच्या पायांखालीं घालून ह्या तीन तांग्या त्रयस्थास पुढें केलें आहे. श्रोता मत्सरी आहे किंवा नाहीं याचा भरपूर पुरावा आमच्याकडे आहे. असें श्रोत्यास स्पष्ट बजावलें असताना हा तीन तांग त्रयस्थ पुढें आला आहे. या त्रयस्थास उत्तर देण्याची आह्मास जरूरी नव्हती. परंतु या तीन तांग्या त्रयस्थाची न्यायी ह्मणविणारी नजर कशी आंधळी आहे ती न दाखविल्यास समाजांत असले त्रयस्थी न्यायशुन्य चाळे चालविण्यास ह्याला मोकळा सोडला असें होईल आणि हा पत्रव्यवहार 'श्रोत्याचा शिमगा' आह्मास चालू ठेवायाचा नसल्यामुळें जें कांहीं सांगायाचें तें याच लेखांत शेवटचें सांगून आह्मीं हा पत्रव्यवहार बंद ठेवणार. मग कोणास या संबंधीं ज्यास्त माहिती पाहिजे असल्यास समाजाकडे पत्रव्यवहार करावा. मुरलीधर समाजानें राशिनकर बुवांस कीर्तन करण्यास लावलें आणि तें कीर्तन ऐकण्यास श्रोता गेला होता हें त्यांच्याच सांगण्यावरून सिद्ध होत आहे. मग त्याच समाजानें घडघडीत आपल्या उघड्या नावानें श्रोत्यास उत्तर दिलें आहे कीं, मत्सराचा भरपूर पुरावा पाहिजे असल्यास श्रोत्यानें उघड नावांनें पुढ यावें. असें बजावलें असतानां भ्याडासारखा श्रोता दिवंगत तर झालाच- परंतु हा कुठला भांडखोर त्रयस्थ घडघडीत समाजानें आपल्या नावानें लेख प्रसिद्ध केला असतानां, उलट समाजालाच नांव ठेवण्यास पुढें येतो, त्यावरून या त्रयस्थाच्या डोळयांत कुसळें मुसळें तर आहेतच, शिवाय मत्सराळ श्रोताहि याच्या डोळयांत खुपून राहिला आहे वाटतें—वाटतें कशीं!—मत्सराळ श्रोता आणि भांडखोर त्रयस्थ हे एकच सांसर्गिक आहेत हें त्रयस्थाच्याच लेखावरून सिद्ध होत आहे. ही एक 'आपली मंडळी' आहे. नाहीं तर एका श्रोत्यास आमचें उत्तर असताना या भांडखोर त्रयस्थास आह्मीं 'आपल्या मंडळीकडे' मांडतो आहों असें वाटल नसत. कव्हांहि झालें तरी खरें तेंच बाहेर निघतें. पहिल्या लेखांतील विधानें खोडून काढलीं नाहींत असें त्रयस्थ लिहितो पण सर्व लेखासंबंधीं लीहिण्याची आह्मांस गरज नाहीं असें स्पष्ट लिहिलेलें त्रयस्थाच्या भांडखोर दृष्टीस कसें पडणार ! दुसऱ्या लेखांतील उलटे स्वल्पविराम त्रयस्थास दृष्टीस पडले पण दुसऱ्या लेखांतील उलट्या स्वल्पविरामाच्या आंत लिहिलेले सारे शद्ब पहिल्या लेखांतील श्रोत्याच्या किटलेल्या काळजांतील आहेत हें दर्शविण्याकरीतांच उलटया स्वल्पविरामांत लिहिले हें उलट्या काळजाच्या त्रयस्थास न समजल्यास नवल नाहीं. राशिनकरबुवांच्या कीर्तनाची फी रुपये दहा आह्मीं ठरविल्याप्रमाण दिली हें सिद्ध करण्यास मडगांवच्या ज्या सारस्वत समाजामार्फत राशिनकरबुवांस आमंत्रण दिलें तो समाजसुद्धां हें सिद्ध करून देईल असें असतांना मत्सराळ श्रोत्याचें २५ रु. फी ह्मणून किटलेल्या काळजांतील केलेलें खोटें विधान सुशिक्षितपणास कुं लावणारें असतानां हा त्रयस्थ तें खोटें विधान झांकण्याकरितां आपले तीन टांगी कसरी पांघरूण घालून आपण एक सायंटीफीक आहे हें दाखविण्याकरीतां 'संख्यावाचकत्व' 'गुरुत्व' वगैरे जड शद्ब वापरून २४-१२ आणे कां नव्हे असे दुसरे लेखक अप्रत्यक्षपणें प्रश्न करतात असा दुसऱ्याचा हवाला देतो पण असे तीन टांगे कसरी त्रयस्थाप्रमाणे अप्रत्यक्ष प्रश्नच उपस्थित करण्यास पाहिजे तर २४-१५-११ पै पर्यंत वाव आहे पण ही २४-१२ आणे कां नव्हे या तीन तांगे कसरी अकलेस हा भांडखोर त्रयस्थच पात्र आहे यांत अतिशयोक्ती नाहीं. शेवटीं इतकेंच सागायाचें कीं, हा न्याय करण्यास आलेला त्रयस्थ न्यायशुन्य आंधळा तर आहेच पण श्रोत्याप्रमाणें मत्सराळ हि असून वरती भांडखोर आहे हें असें सिद्ध होतें कीं दुसरा लेख मुरलीधर समाजातर्फे + × + असा प्रसिद्ध झाला असतांना उगीच भांडण्यांस निमित्य पाहिजे ह्मणून किंवा त्याच्या भांडखोर जन्मस्वभावावरून समाजाचे पूर्ण नांवसुद्धां त्याच्या भांडखोर दृष्टीस पडलें नाहीं आणि 'विठोबाच्यातर्फे × × × बदलावा लागेल असा आपला भांडखोर स्वभाव प्रदर्शित केला आहे तेव्हा हा कोणतरी पांडुरंगानुयायी भांडखोर आहेसें वाटत. बाकी श्रोता आणि त्रयस्थ हे दोन्ही इतके एकरूप आहेत कीं दोघांच्या नावांत सुद्धां तितकीच व तींच अक्षरें असून त्रयस्थांत मात्र थकार जास्त आहे. आणि श्रोत्यांचे मात्रारूपी डोकें त्रयस्थात ज्यास्त असलेल्या थकाररूपी पायाखालीं त्रयस्थाच्या उलटया काळजाप्रमाणे उलटें घातलें —आणि तें अप्रत्यक्ष घातलेंच आहे —ह्मणजे त्रयस्थांत थुकार ज्यास्त झाला तेव्हां त्रयस्थाची नजर न्यायी तर नाहींच पण थु ह्मणून थेण्यास मात्र पात्र आहे हे स्पष्ट दिसून येत आहे.

आत यापुढें आह्मांस असल्या पत्रव्यवहारास जबाब देण्याची गरज नाहीं हें सुज्ञ वाचकच समजतील. तरी श्रोता व त्रयस्थ यानां आणखी खुलासा पाहिजे असल्यास आपल्या खऱ्या नावानें – मुरलीधर समाज ह्मापसें येथें पत्रव्यवहार करावा किंवा समक्ष भेटून खुलासा करावा.

ह्मापसें ता. ७ जानेवारी १९२५

मुरलीधर समाजतर्फे * * *

गोविंद अ. शेटये

---

## बाल-वाचन-मंदिर संस्थेच्या व्याख्यानमालेचा रिपोर्ट

या रूढी बदलून धर्माचा प्रक्षिप्त भाग वर काढिला पाहिजे. आज 'शास्त्रात् रूढी बलीयसी' आहेत. ज्यांना समाजाची, ध्येयाची कल्पना नाहीं अशानींच रूढी केल्या. व मनूला जिंकिलें. स्त्रिशिक्षण, अस्पृश्योद्धार, जातिभेद यानां रूढी आड येते. या रूढी बदलणें सरकारच्या हातीं नाहीं तर समाजाच्या हातीं आहे. या सुधारणा समाजाच्या अंतःकरणांतून निघाल्या पाहिजेत. हें काम या विद्यार्थी वर्गाचें आहे. रूढीच्या शृंखला तोडल्याशिवाय जगाच्या तोडीला हिंदुस्थान बसूं शकणार नाहीं. धार्मिक प्रश्ना इतकाच शारीरिक उन्नति हा प्रश्न समाजापुढें आहे. मनाइतकीच शरीराची गरज आहे. तसेंच वाङ्मय, कला, शास्त्रें यांची आवश्यकता आहे. शास्त्रांच्या अभावामुळें इतर राष्ट्रांनीं हिंदुस्थान जिंकलें. राष्ट्राची सुधारणा करावयाची असल्यास सर्व राष्ट्रांच्या सुधारणा आमच्यांत पाहिजेत. वाङ्मय व शास्त्रें हे समाजाचे डोळे आहेत. आपण सर्व एका राष्ट्राचे आहोंत ही कल्पना सर्वत्र फैलावणें वाङ्मयाच्या योगानें शक्य होईल. मराठी स्वराज्याची स्थापना शिवछत्रपतीकडून व मराठ्यांकडून समर्थांच्या दासबोधानेंच घडवून आणिली. समर्थ ह्मणजे त्यावेळचा चालता बोलता छापखानाच होता. प्रत्येक संदेश कानाकोंपऱ्यांत पोंचविण्याला वाङ्मयाची आवश्यकता आहे. आमच्या तरुणांच्या विचारांना वळण देणारा वाङ्मय सेवक आज पाहिजे आहे. तरवारी इतकीच वाङ्मय सेवकाची गरज आहे. अपुऱ्या असलेल्या सर्व उणीवा भरून काढण्यासाठीं बालांपासून वृद्धांपर्यंत व स्त्रियांनीं सुद्धां तास अर्धातास खर्चावा. लिहावयाला येईल त्यानें राष्ट्राकरितां कांहींतरी करावें. लेखन प्रतिभा ईश्वरदत्त आहे पण प्रयत्न सर्वसाध्य आहेत. हे कामाचे डोंगर वाढत चाललेले आहेत ते कमी कमी करणें हें आजच्या तरुणाचें कर्तव्य आहे. भावी पिढी आह्मांला जबाबदार धरील व कलंक लावील अशी स्थिती न होऊ देण्याचा आह्मीं प्रयत्न केला पाहिजे. इतकें सांगून व्याख्यात्यांनीं आपलें भाषण संपविलें. नंतर एका विद्यार्थ्यानें येथें एक तालीमखाना काढावा अशी सूचना केल्यावर, कोणीहि उपवक्ता नसल्यामुळें अध्यक्ष श्री. केणी समारोपास उठले. ते ह्मणालेः आजच्या वक्त्यांनीं विषय इतका उत्तम प्रतिपादन केला कीं, विशेष कांहीं बोलण्याची आवश्यकताच नाहीं. आजच्यासारखीं विद्वत्तापरिप्लुत व अस्खलित भाषणें क्वचितच ऐकावयास सांपडतात. विषय व्यापक असल्यामुळें थोड्या वेळांत भरपूर विचार करणें अशक्य आहे. व्याख्यात्यांनीं कांहीं मुद्यांचा विस्तार केला व कांहींचें त्रोटक दिग्दर्शन केलें. समाजसेवा हा शद्ब या पन्नास वर्षांतच रूढ झाला. समाजाची कल्पनाच आमच्या लोकांना झाली नाहीं. सर्व हिंदूंचा एक समाज आहे ही कल्पना आह्मांला परकीयांनीं दिली. मुसलमान लोकांनीं ज्यावेळीं हिंदुस्थान जिंकिला त्यावेळीं हिंदुसमाजाला ते आपल्यापासून दूर राखूं लागल्यामुळें सर्व हिंदूंचीं सुखदुःखें एक आहेत. आपण सर्व एक असून मुसलमानांचे जित आहोंत ही भावना त्यांच्या मनांत उत्पन्न होऊं लागली. यापूर्वी हिंदूनीं मोठमोठीं साम्राज्यें केलीं. सुधारणेच्या शिखरावर जाऊन पोंचले, पण आपण सर्व हिंदू एक समाजीय आहोंत ही कल्पना कधींच केली नाहीं. आपल्यामध्यें त्यावेळीं फक्त जातीच होत्या व जातिभेद हे या कल्पनेला विघातक आहेत. पारशी भाषेमध्यें 'हिंदु' या शब्दाचा अर्थ पाखंडी, काळा, असा आहे. व बहुतकरून हिंदु हें तुच्छता दर्शक नांव मुसलमानानीं आह्मांला दिलें असावें. आमच्यामध्यें Sentimento nacional ह्मणजे एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेचा पूर्ण अभाव आहे. ही भावना उत्पन्न होण्याला समाजाची व राष्ट्राची गरज आहे. जियें समाज नाहीं तियें हा प्रश्न मुळीं संभवतच नाहीं. मुसलमानांच्या त्रासानें, तात्पुरते आह्मीं एक झालों पण समरस कधींच झालों नाहीं. मुसलमानांचा जाच कमी झाल्याबरोबर जातिद्वेष पुढें आणला व मराठी राज्यें बुडविलीं. जिझीयाकरांसारखे जुलूम झाल्यामुळें मराठे एक झाले व शिवाजीला स्वराज्याची संस्थापना करितां आली. समाजाच्या कल्पनेला एकराष्ट्रीयत्वाची भावना उत्पन्न झाली पाहिजे., अर्थात् जातिभेद नष्ट केला पाहिजे. हिंदूंची व्याख्या फारच व्यापक असून तींत सर्व जातींचा समावेश करिता येतो. व त्याच दिशेनें प्रयत्न सुरू केले पाहिजेत नास्तिकाला सुद्धां हिंदु होता येतें. हिंदुधर्म हा अनेक पंथांचा समुच्चय आहे. चार्वाक नास्तिक होता पण हिंदु होता. लिंगाईत शिखाहीन आहेत, वेद मानीत नाहींत पण हिंदु आहेत. हिंदूला अमुकच लक्षणें असलीं पाहिजेत असें नाहीं. आह्मीं आमच्या स्त्रियांना शुद्रांच्या पंक्तीला बसविलें आहे. स्मृतमध्यें तर त्यानां कसलाहि अधिकार नाहीं. आजच्या काळीं स्मृतींप्रमाणें अनुकरण करणें योग्य नाहीं. व्याख्यात्यांनीं सांगितल्याप्रमाणें अस्पृश्यता निवारण करणें अवश्य आहे. आज हिंदुधर्म व संस्कृति यांची जी स्थिति आहे ती तशीच कायम ठेवण्यापेक्षां मरूं देणेंच चांगलें होईल. संस्कृतीला पूर्वकालीन उज्ज्वल स्वरूपांत जगापुढें आणावयाची असल्यास स्त्रीदास्यत्व व अस्पृश्यता आदि काळिमा नाहींसा केला पाहिजे. असो. व्याख्यात्यांनीं सांगितल्याप्रमाणें समाजाच्या संघटनास विघातक असे दोष नष्ट करून टाकावेत. व ज्या योगानें भिन्न भिन्न जाती समरस होऊन स्वातंत्र्य व सुख वाढेल असें करावें. मीं माझें चऱ्हाट वाढवून व्याख्यात्यांच्या भाषणानें श्रोतृवर्गावर झालेला गोड परिणाम नष्ट करूं इच्छित नाहीं इतकें सांगून अध्यक्षांनीं समारोप संपविला.

# ECOS & CRITICA

### O CASO DO DR. DEHTINHO

Duma carta de Pangim:—

"O assunto desta semana e' a carta do sr. dr. Dentinho Junior, professor diplomado do Liceu Central desta cidade, publicada no jornal *Noticias* de Algarve e transcrita e comentada pelo *Heraldo* de 24 do corrente.

A carta contem afirmagoes tam precipitadas e falsas que elas vao ferir todo o goez ilustrado na sua honra e dignidade. O seu autor que e' um dos "dois diplomados" entre todos os professores liceais da India e de outras colonias portuguesas, qualifica de "asilos de inuteis para todo e qualquer genero de trabalho" todos os estabelecimentos de instrugao, incluindo a Escola Medical. O ilustre literato diz, entre outras coisas, que ca' na India nao ha' unico professor primario que saiba falar e escrever a's direitas o portuguez, generalisando imprudentemente esta sua afirmagao a todos os professores do L. Central e doutras escolas secundarias! E' edificante, nao acha?

Tanto o corpo docente como discente do Liceu Central estao em ebuligao. A confidencia feita por S. Exia, a um jornal publicado num canto de Portugal, veio a' luz e a sua situagao causa compaixaol S. Exa falou a um seu amigo do Algarve como quem fala a seus confidentes, encerrando-se no gabinete, cousas que ate a parede pode comunicar.

E' de notar que homens como Dentinho e outros que sabem *muito* pouco do portuguez, e' que acham "pretuguez," (e' o que sua exa chama na aula ao portuguez falado pelos naturais daqui) o portuguez daqui mesmo falado correcta e correntemente.

Que a pronuncia do portuguez falado entre no's difere da dos portugueses, ninguem nega, porque ela e' o resultado de diversas condigoes dum pais, variadas as quais varia tambem. Mas escrever mal, falar fo'ra das regras gramaticais, isto e' que nao se explica. Claro esta', pode haver aqui quem nao saiba falar bem o portuguez. Mas daqui ninguem va' dizer que na India nao ha unica pessoa que saiba escrever e falar o portuguez duma maneira correta e corrente, pois isso seria um agravo a's faculdades intelectuais dum povo que e' reputado inteligente."

Parece que o doutor ainda nao *visetou* manicomios nem *bibeu cha' a casa* dalgum professor primario, secundario ou superior da India.

E' *su'mente* para lamentar.

De resto a prosa do sr. Dentinho e' significativa e dela iremos tratando aos poucos.

Gralha e' gralha e pavao e' pavao!

### PORQUE ?

O sr. Atmarama X, Palondicar, professor proviso'rio do Liceu Municipal de Margao foi exonerado do seu lugar.

Desejava o *Bharat* saber os ponderosos e poderosos motivos que determinaram a mesma exoneragao, se eles nao constituirem *segredo* do Estado. De resto, nao acreditamos no que se esta'a propalar a' boca piquena a proposito da mesma exoneragao...

### AGRADECENDO

Dum nosso amigo:

"Um abrago de solidariedade ao amgo, pelo contratempo que acaba de bater a' porta do *Bharat*. Bem sei que e' uma crise de...purificagao, que so' vai fazer bem ao jornal, como sucedeu durante tantas crises por que ele tem passado.

Nao sabe o que disse Gandhi no seu discurso presidencial em Belgao? Pois vou recordar lhe "A represssao e' para os povos o que o fogo e' para o oiro—purifica."

Cartas de igual teor, o *Bharat* as esta' recebendo todos os dias, desde que foi processado, o quanto ele representa prova irrefragavel de quanto ele e' estimado, apesar de sua modestia.

Rendidos agradecimentos, caros amigos!

### ESCREVEM-NOS :

"Sabido de todos e' que o falecido Deao Almeida, de saudosissima memoria confiou, ao morrer, a administragao dos seus vastos bens, e por uma licença regia, ao cabido de Se' Primacial de Goa nao com outro fim sen o de perpetuar a sua obra, tao digna de louvores, impondo-lhe deveres e obrigagoes para serem fielmente cumpridos.

Ora, acontece que por estes dias tem se levantado entre os manducares do dito Deao grande celeuma por falta do cumprimento de legados e distribuigoes referentes a estes, como por exemplo: 1° distribuigao de panos que sobretudo neste ano tem sido bastante arbitraria.; 2° Dotes que conforme o testamento sao em numero de 10 sendo a cada um 70 serafins ou 8:10:8 sao actualmente pagos em 40 serafins ou 4:5:4; acresce a isto que por estes ultimos anos os dotes distribuidos nao vao para alem de 5 quando parece que a soma destinada de 200 serafins, deveria ser distribuida pelos casamentos que houvesse anualmente. — Ao terminar estas breves linhas acrescenta remos um facto curioso que se deu por estes dias: um certo pobre tendo requerido ao Cabido para suas urgentes necessidades uma esmola foi concedida esta (10 rps.), mas quando se apresentou a recebe la, qual nao teria sido o seu espanto quando o mui digno encarregado para apresentar o seu maximo zelo de bom e fino administrador apresentou uma divida passada em presença do Con. Gracias que, por estes dias esteve ca', divida que era do tempo de gripe (1918) que de resto tinha sido perdoada pelo entao administrador Con. Justiniano a este como tambem aos outros manducares na igualdade de circunstancias.

Por estes e varios outros motivos, ouve se dizer, que a freguesia na maioria seus manducares, vai dirigir uma representagao ao Governador Geral nao pedindo regalias para si mas apenas o estrito cumprimento dos legados.

### PRORRGANDO

Informam nos que o sr. Governador Geral prorrogou ate' o fim de Fevereiro p, seguinte o praso para pagamento de primeiras duas prestagoes de obrigagoes do tipo A. (C. C R.)

### ANUNGIO

Pelo Juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1° oficio Redcar a requerimento de Roque Piedade Pinto de Assolnã, correm éditos de trinta dias a contar da segunda publicação deste no Boletim Oficial citando as executadas Locximibai, mulher de Datarama Vitola Sinai Volvoctar e Moturabai mulher de Gopala Vitola Sinai Volvotcar, de Cuncolim, ora ausentes em Narsobavadi do territorio Britanico, para renovação da instancia dos autos civeis de execução hipotecaria que o dito Roque Piedade Pinto, como cessionario de Lúciano Xavier Dias, de Sarzorá move ás ditas citandas e outros. E para ser publico se expediu este. Quepem 22 de Janeiro de 1925.

O escrivão de Direito
*Babú V. Camotim Redcar*
Verifiquei
O Juiz de Direito
*A. A. de Brito e Nascimento*

### आजचें पोर्तुगीज सदर

अग्रलेख:—

**म० गांधी व गोमांतकस्थ हिंदु; हिंदु व सरकारी नोकऱ्या; नोकऱ्या व युरोपियन.**

लेख दुसरा:—

**झापसेंचें आ येपोक व हिंदु; समजुतीचा घोंटाळा.**

स्फुट व इतर विषय:—

**प्रो० देंतीन्जुं प्र ण; प्रो० पाणंदीकरांचा राजीनामा; भारतमित्रांचे संदेश इ० इ० इ०**

—बडोदें सरकारनें २२००० हजार रुपयांची देणगी बडोदा संस्कृत लायब्ररीस दिली.

—सुबत्तेच्या दिवसांत हिंदुस्थानांत १ कोट टन गहूं पिकतो आणि इतका गहूं पिकला म्हणजे परदेशांत अदमासें १० लक्ष टन गहूं निर्गत होतो.

—डेक्कन सभेच्या विद्यमानें न्या. मू. रानडे यांची पुण्यतिथी ता १६ जानेवारी रोजीं पुणें येथें साजरी करण्यांत आली.

## वर्तमानसार

—सरकारच्या रोषास पात्र झालेल्या सांगे मुनिसिपाल्टीनें स्वसमर्थनार्थ एक पुस्तक प्रसिद्ध केलें असून, सरकारास त्यांत सडेतोड उत्तर दिलें आहे! या मुनिसिपालटीसंबंधानें आह्मांस बरेंच लिहावयाचें आहे.

—दो० सुब्राय वि. प्रभु देसाई यानींहि एक 'फोल्येत' प्रसिद्ध केली असून, तींत मिनासंबंधानें सरकारची कान उपटणी केली आहे.

—झापशें येथें वैश्य समाजातर्फे उभारण्यांत येणाऱ्या "वैश्य भुवना"चा पाया वैश्य समाजोपाध्यायांकडून गल्या चार रोजांत घालण्यांत आला.

—'दिरेक्सांव द इंस्त्रुसांव' खातें रद्द करण्यांत आलें असून, प्रस्तुतच्या दिरेक्तराची नेमणूक 'शिक्षणाचा नवीन' मसुदा तयार करण्याचे कामीं करण्यांत आली आहे.

—आवदीतोरीच्या नोकर वर्गाचीहि छाटाछाटी करण्यांत आली आहे.

—प्रो० कोत कुझानीं वकिलीची परीक्षा दिल्याचें वर्तमान प्रसिद्ध झालें आहे!

—'विवाह' विषयाचा ३ रा लेखांक येत्या अंकीं प्रसिद्ध होईल.

—'भारता'च्या खटल्यासंबंधानें ठिकठिकाणाहून स्फूर्तिदायक संदेश येत आहेत. संदेशकरांचा भारत अत्यंताभारी आहे.

—बार्देस प्रांताचे लेजिज्लातीव्ह कौन्सिलचे नवे प्रतिनिधि दो० जयराम खलप हे ता. ५ जानवारीच्या कौन्सिलच्या पहिल्या बैठकीस हजर राहून परत झापशास येतानां त्यांचें बारदेशकरांनीं थाटाचें स्वागत केलें. बँडच्या व गर्नालच्या आवाजांत त्यांची मिरवणूक काढून ज्ञानप्रसारक मंडळीच्या दिवाणखान्यांत त्यांस हारतुरे देऊन त्यांचा सन्मान केला. शहरांतील सर्व मराठी शाळांतील मुलांस त्यानीं खाऊकारितां लाडू वगैरे वांटले होते.

—'भारत' व 'हिंदु' हीं साप्ताहिकें सरकारनें बंद केल्याची जी एक पुण्याच्या स्वराज्यांत बातमी प्रसिद्ध झाली आहे, ती निराधार असल्याची गोष्ट सिद्ध करण्यास दुसरा पुरावा नको!

—गोव्यांतील बिनसरकारी मराठी शाळांत ब्रिटिश हिंदुस्थानांतील शिक्षकांकडून शिक्षण दिलें जातें, या गोष्टीबद्दल सरकारांत भलभलतीं खलबतें चालू आहेत असें कळतें!

—येत्या अंकापासून श्री. सारस्वताची कोंकणी भाषेवरील लेखमाला सुरू होईल.

—प्रो. देंतींज्यु यांचें आक्षेपार्ह पत्र खासगी स्वरूपाचें होतें व तें केवळ नजरचुकीनें प्रसिद्धीस आलें, असा प्रोन्हींसकर्त्यांनीं 'मल्लीनाथी' शास्त्रार्थ लढविला आहे! आणखीं कोणकोणतें नवीन शास्त्रार्थ निघतात ते पाहूं! या ताज्या प्रकरणांमुळें गामप्रकरण थंडावत चाललेलें आहे, ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट होय!

—येथील प्रोकुरादोर जेराल दो. रोश दिनिज यांची मकाव येथें झालेली नेमणूक रद्द होऊन ते येथेंच आपल्या हुद्यावर स्थिर होतील अशी बोलवा आहे.

—मुंबईच्या आंग्लो-लुजितानांनेहि गामोत्सवाविषयीं व्यक्त केलेल्या तटस्थपणाबद्दल आपली नापसंति प्रदर्शित केली आहे! पण यांच्या नापसंतीची पर्वा करतो कोण?

———

भारत

मिति माघ शु० ५ मी शके १८४६

# हृदयाविष्करण

**नवै राजन्न राजसीन्न दण्डो नच दण्डिकः**
**धर्मेणैव प्रजाः सर्वा रक्षन्ति स्म परस्परम्**

लोकमताचा वारा कोणत्या दिशेस वहात आहे व त्या विषयीं बेफिकीर राहिल्यास परिणाम काय होईल ह्याची आह्मी वरचेवर जाणीव करून देत असतांहि अनियंत्रित अधिकाराचें तारूं भलत्याच दिशेस हांकण्यास नोकरशाहीची नादानवृत्ति प्रवृत्त होत आहे ही अत्यंत असमाधानकारक गोष्ट तर खरीच; पण निदान आह्मांला तरी त्यांत आश्चर्यकारक काय हें कळत नाहीं. गोमांतकांत माजू घातलेल्या बेबन्दशाहीस कारणीभूत होणाऱ्या नोकरशाहीचें बेताल डोकें बेफाम व बेदरकार बनूं न देण्यासाठीं दिसण्यांस अप्रीय पण परिणामीं गोड अशा चार उपदेशाच्या गोष्टींचा त्यांस बोध देण्यास आह्मीं सरसावतों खरे; परंतु आपला लांडा कारभार वाटेल त्यांत घुसण्यास सोकावलेल्या वशिल्याच्या वर त्याचा मुळीं सुद्धां परिणाम न होतां पुन्हां ते कोरे ठणठणीत गोटेच रहातील ह्याची खुणगांठ आह्मीं पूर्वींच बांधून टांकीत असतों. भारतीय युद्धापूर्वी दुर्योधनाशीं शिष्टाई करण्यासाठीं पांडवांतर्फेचा वकील ह्या नात्यानें कौरव सभेंत जातांना 'आपला अपमान झाला तरी बेहत्तर पण भावी अनर्थपात टाळण्याचा शक्यतोंवर यत्न करावा, हा भगवान श्रीकृष्णाचा हेतु होता हें जितकें सत्यास धरून आहे तितकेंच 'फलनिष्पत्ति कांहींच होणार नाहीं ह्याची त्यास खात्री होती हें सत्यांशपूर्ण आहे. त्याच प्रमाणें इतिहासाच्या पुनरावृत्तीकडे ध्यान देऊन ' केवळ कर्तव्य ह्मणूनच, अधिकारी वर्गाची शक्य तेथें कान उघडणी व जरूर तेथें कान उपटणी करण्याचा आमचा हक्क आह्मीं प्रस्थापित करीत असतों. नुसतें नावांपुरते कां होईना, लोकसत्ताक राज्यपद्धतींत वावरणाऱ्या गोमांतकीय लोकशाहीचें प्रमुख मुखपत्र असल्यानें भारतावर लोकसत्तेच्या सार्थक्याखातर भांडण्याची दुप्पट जबाबदारी पडलेली आहे; जनतेच्या हक्कांस जपण्याची पहिली व हिंदुत्वावरील प्रतिपक्षांच्या हल्ल्यांस प्रतिकार करणें ही दुसरी. ह्याचा परिणाम कधीं कधीं असा होतो कीं आह्मास सरकार व खिस्ती वर्ग ह्या दोहोंकडूनहि तिरस्कृत व्हावें लागतें. सरकार तर भारतास उघड उघड बंडखोर समजत असून खिस्ती प्रांतबंधूंनां तो खिस्त द्वेष्टा वाटतो. पण ह्यामुळें आमच्या प्रगतीपर गतीस कांहींच अडथळा येऊं शकत नाहीं हें स्वाभिमानाचें फळ नव्हे तर काय ?

भारतावर गेल्या आठवड्यांत गुजरला गेलेला खटला हे आह्मीं गतांकीं अनुमान केलेल्या 'विनाशकाले विपरीत बुद्धीचें' द्वितीय प्रमाण होय. 'बुडत्याचा पाय खोलांत' ह्या ईश्वरी न्यायानुसार आमच्या अधिकारी वर्गाच्या बुद्धिभ्रंशाचें प्रमाण दिवसेंदिवस कलेकलेनें वाढतच असून वृत्तपत्रांची मुस्कटदाबी करण्यापर्यंत अरेराव बहाद्दरानीं मजल मारलेली पाहून अमलदारशाहीच्या पापांचे घडे भरल्याचें कोणी अनुमान केल्यास तें निराधार किंवा अनाठायीं ह्मणतां येत नाहीं. भारताची आशेवरील आसक्ति सुदैवानें अगर दुर्दैवानें इतकी जबर आहे कीं त्यास अजून पर्यंत तसें वाटत नाहीं; मात्र अधिकारी वर्गाची अरेरावी अशीच ' मागील खेपेवरून पुढें चालू' राहिल्यास—नोकरशाहीनें आपल्या अरेराव पातशाहीच्या सोटेशाहीची सीमा लोकसमाजाच्या स्वाभाविक सहनशीलतेच्या परम सीमेस भिडविल्यास त्याचा परिणाम भीषण व भयंकर होऊन प्रक्षुब्ध लोकमताच्या त्वेषपूरित निश्वासानें सारें वातावरण दुमदुमून राहील आणि तेव्हां 'अवश्यमेव होणारा पश्चात् + ताप निरर्थक ठरून 'शिष्यापराधे गुरोर्दंडः'चा प्रकार होईल ही त्याला आज दिवसादेखील भीति वाटते. व तेवढ्यासाठींच भारत बहकल्या बुद्धीच्या, बेदरकार वृत्तीच्या व बेकायदेशीर वर्तनक्रमाच्या अंमलदारांकडून चालवल्या जाणाऱ्या व अविचाराच्या उतरणीवर भर वेगानें धांवणाऱ्या गाडीचें भावी अनर्थ परंपरेपासून रक्षण करण्यासाठीं दोन्ही हातानीं लाल बावटा हालवून एकसारखा कंठशोष करीत आहे; पण अधिकार गुंगीनें धुंद झालेल्या ड्रायव्हर साहेबांचा तिकडे कानाडोळा होत आहे व गाडी त्याच्या अंगावरून नेण्याचा घाट घातला जात आहे त्याला भारत काय करूं शकेल ? आपलें अंग चेंगरलें ह्मणून भारतास भीतीचा लवलेश देखील शिवत नसून 'पुढें काय ?' ह्याच प्रश्नानें त्याला बेजार करून सोडलें आहे !

जो लेख आरोपीत धरून भारतावर सरकारकडून खटला भरण्यांत आला आहे त्या पोर्तुगीज लेखाचें समग्र व शब्दशः मराठी भाषांतर भारताच्या येत्या अंकीं मुद्दाम दिलें जाईल. ज्याच्या दप्तरांत आमची सेवाचाकरी रुजू व्हावी अशी आम्ही इच्छा बाळगतों, त्या जनतारूपी जनार्दनाच्या निःपक्षपाती न्यायासनासमोर तो जशाचा तसा ठेवण्यांत येईल. तो लेख आमूलाग्र शुद्ध अंतःकरणानें निर्विकार मनानें व पक्षपातहीन नजरेनें वाचून त्याचें स्वस्थ चित्तानें मनन करणाऱ्या विचारी पुरुषाच्या डोळ्यांपुढें ' हें काय गौडबंगाल ?' हा प्रश्न उभा राहील. आमच्या मतें त्यांतील चुकीची विचारसरणी कांहींच नसतां सरकारच्या केवळ दृष्टी दोषामुळें व अंमलदारकीची वस्त्रें स्वीकारणाऱ्या उल्लु लोकांच्या बुद्धि भ्रंशामुळें तो आरोपीत ठरविला गेला असल्यानें आह्मी त्याचें पुनः रूपांतर प्रसिद्ध करणार आहोंत. हें ज्या कोणास कायद्यास सोडून असल्याचा संशय येईल त्यास आम्ही एवढेंच विचारण्याची परवानगी घेतों कीं:--

ह्या सुवर्णभूमीचीं द्वारें पांढऱ्या पायांच्या परकीयांस सताड उघडीं टाकलीं जाऊन त्यांतील एकूण एक चिज वस्त पसार केली जाऊन--थोड्याच शतकांच्या अवधींत जींत एकेकाळीं सोन्याचा धूर निघत होता त्या पुण्यभूमीच्या मालकांस ' भिक्षापात्र अवलंबिणें । जळो जिणें लाजिरवाणें' ही तुकोबांची अभंगवाणी कानांत दुमदुमत असतां वीतभर पोटाची टीचभर खळगी भरण्यासाठीं आमच्याच गाठोडीवर गब्बर झालेल्या गठडीखादांपुढें नोकरीसाठीं ( भिक्षेसाठीं? ) तोंड वासण्याचा प्रसंग येऊन त्यावेळीं ' तुम्ही भारतकडे नोकरी मागा ' असा गालफडात जिभली घालून जबाब दिला जावा व ह्या आमच्या नैतिक व आर्थिक अधःपतनास कारण झालेल्या गामाच्या पुण्य (?) तिथींत भाग घेण्याबद्दल हिंदूंवर जबरी केली गेल्यास तें कायदेबरहुकूम असें आपण ह्मणूं शकाल काय ? ज्या व्यक्तीनें आम्हां हिंदूंवर अमानुष अत्याचार करून ज्याची नुसती आठवण झाल्यास अजून अंगावर कांटा उभा रहातो असा हिंदूंचा धर्मांतरासाठीं छळ करण्यांत पहिलें प्राविण्य पदक संपादन केलें त्या व्यक्तीच्या उत्सव समारंभांत आपल्या वंशजानीं भाग घेऊं नये एतदर्थ स्वर्गातून आह्मांस संलग्न हृदयाच्या नेत्रपल्लवीनें निरोप पाठवून आमच्या हृदयास पाझर फुटावा ह्मणून डोळ्यांतून ढळढळां अश्रुधारा गाळणाऱ्या पूर्वजांच्या विनवणीनें हृदय पिळवटून गेल्यामुळें हिंदूंनीं श्राध्दोत्सवांत उदासीन वृत्त स्वीकारली, ह्या साठीं त्यांना जुलमाखालीं भरडून काढण्यांत आल्यास तें कायद्याबरहुकुम आहे असें आपणांस वाटतें काय ? राष्ट्रीय सभेस गेलेल्या सरकारी नोकरांतून एका विशिष्ट संस्कृत्यनुयायांची हकालट्टी केली जात असल्यास त्यास काय द्याचा आधार आहे काय ? कायदेबहाद्दरानों ! कायदे अमलांत आणण्याकरिताच नेमलेली नोकरशाही स्वतः कायदेमोडीत असतां इतरांनांच ते पाळण्याविषयीं 'परोपदेशेपांडित्यं' दाखविलें जावें व तेंहि लोकसत्तेच्या राज्यकारभारांत, हें कायद्याचें कोणतें कलम ?

सरकाराच्या हातांत कायदा असेल, न्यायदानाच्या तराजूचा कांटा हवा त्या बाजूस झुकविण्याचें कौशल्य प्रतिपक्षाच्या मारवाडी डोक्यांत असेल पण सत्याचा पाठिराख्या परमेश्वराचें पाठबळ भारतास आहे !

---

--केपेंचे जज्ज सां–तोमें येथें नेमले जाणार असून त्यांचे जागीं बार्देसचे कोंसेल्हदोर दो० रोदोल्फ कुलास, हे येतील, अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे.

## स्फुट विचार

**विद्यार्थी वर्गाचें महत्वः—** कार्यकर्त्या तरुणपिढीच्या कर्तृत्वशक्तीची मागच्या अग्रलेखांत दिग्दर्शित केलेल्या रीतीनें वासलात नव्हे विल्हेवाट लाविल्यानंतर उत्साही विद्यार्थी वर्गाच्या बाणेदार वृत्तीकडे व हृदय संशोधनाकडे विचारशक्ती साहजिकच ओढ घेते. कोणत्याहि देशाचा अगर राष्ट्राचा वर्तमान काल त्यांतील तरुण पिढीच्या साहसी स्वभावर सर्वस्वी अवलंबून असतो हें जेवढ्या प्रमाणांत सत्यांशपूर्ण ह्मणतां येईल त्याच्याहून शेकडा शंभर टक्के ( cent percent ) त्या राष्ट्राचा भविष्यकाळ निराशांधःकारानें काळाकुट्ट करावा किंवा यशोरवीच्या उज्जल दिप्तीनें प्रकाशित करावा हें ठरविण्याचा व सत्यसृष्टींत आणण्याचा पूर्ण मक्ता ( sole agency ) सृष्टीनिर्मित्या परमेश्वरानें विद्यार्थ्यांच्याच खास पदरांत टाकला आहे. शोकाची पहिली सर ओसरतांच एखादी नवविधवा ज्याप्रमाणें आपल्या उदरांत जन्म घेतलेल्या चिमकुल्या बालकाकडे पाहून जिवाचें समाधान करून घेते तद्वतच तरुणपिढी नादान व निमकहराम निपजली तरी विद्यार्थी वर्गाकडून मिळणाऱ्या आशेच्या अंधुक प्रकाशावर नजर ठेवण्याचा व त्यांच्या सडेतोड वृत्तीकडे कुतुहलपूर्ण दृष्टीनें पहाण्याचा प्रत्येक राष्ट्राला हक्क पोहोंचतो.

**शाबास ! भलेगाजी ! शाबास ! :—** पण दुःखात सुख एवढेंच कीं, गोमांतकाला ह्या बाबतींत निराशेचा स्पर्श देखील व्हायाला नको. नुसत्या विद्यार्थी वर्गाची शालीनता, सडेतोड व निर्भयवृत्ती ह्यांकडेसच लक्ष्य दिल्यास जगातील इतर कोणत्याहि राष्ट्रापुढें आघाडी मारण्याची ताकद अजून शरीरांत भिनलेली नसली तरी गोमांतकानें ब्रिटिश हिंदुस्थानाच्याहि वरचा नंबर पटकावला आहे असेंच ह्मणावें लागतें. पोर्तुगीझ उच्च शिक्षण ( लिसेवाचें ) घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कर्तत्वशक्तीकडे व आत्मविश्वासाकडे पाहिलें ह्मणजे ' ये बी दिन जायें गे ' ह्मणण्यास भरपूर आधार मिळतो. तीन वर्षांपूर्वी ह्या विद्यार्थ्यांनीं 'गांधी टोपी' प्रकरणांत हिंदूंचें आत्मिक बल व संघशक्तीचें सात्विक सामर्थ्य कितपत ' कर्तुम कर्तुमन्यथा कर्तुम ' आहे हें खिस्तो प्रोफेसरांच्या प्रत्ययास आणलें होतें. तसेंच गेल्या महिन्यांत झालेल्या व आज सर्वत्र गाजून राहिलेल्या गामाच्या श्राद्धापासून बारा हात दूर, अलग व अलिप्त राहण्यांत जी सत्यावरील अढळ निष्ठा व्यक्त केली व 'कॉलेजतर्फे, ह्या सदराखालीं घातल्या जाणाऱ्या घागडधिंग्यावर ' येशुभक्तांतर्फे ' हा अन्वर्थक छाप ठोकला त्याबद्दल ते खरोखरीच स्तुतीस पात्र आहेत. विद्यार्थी बंधूंनो ! कायमच्या कर्तव्यास जागृत रहा !

**वेडगळ प्रलापः–** 'गोव्यांतील उच्च, मध्यम व प्राथमिक शाळांच्या व पाठशाळांच्या शिक्षकानां व विद्यार्थ्यांना पोर्तुगीज भाषा धड बोलतांहि येत नाहीं व धड लिहितांहि येत नाहीं' अशा अर्थाचें एक निंदा-

# ANUNCIOS

O *Bharat*, ano 9 ° n ° 44 de 29 de Janeiro de 1925

Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida

Numero avulso 1 tanga

Pelo juizo de direito da Comarca de Quepém e cartorio do Escrivão do 2 ° oficio que este assina correm editos de 30 dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio, nos termos do § 2 ° do artigo 197 do Cod. da. Proc. Civ. citando os interessados Gunum e marido Hori Jeganata Seil, residentes em parte incerta de Carvar do territorio Inglez, para assistirem a todos os termos do inventario orfanologico requerido por obito de Bissó Naique, por outro nome Bissó Naique Delencar, morador que foi de Delem, de Canacona, sendo inventariante Putú Narana Folo, de Mudcuda de Canacona e deduzirem querendo nele os seus direitos sem prejuize de seu devido e regular andamento. E para ser publico se expediu este.

Xeldem da Comarca deQuepém, 10 de Janeiro de 1925.

O Escrivao de Direito do 2 ° oficio
*Aires Manuel Barreto*

Verifiquei
O Juiz de Direito
*A. A. de Brito e Nascimento*

Pelo Juizo de Direito da comarca de Quepém e cartorio do escrivão do 1 ° oficio Redcar, á requerimento da inventariante Etermina Enriques que é a mãe administradora da sua filha menor Maria Antonieta Eronia Anastásia das Dores Fernandes, aquem foi autorisada a venda em hasta publica por deliberação do respectivo conselho da familia e ouvido o Sr. Dr. Curador dos Orfãos, vai á venda em hasta pública pela segunda vez, á porta do tribunal judicial desta comarca no dia tres do Fevereiro proximo pelas 10 horas, pela metade do preço da sua avaliação, a metade da metade do predio denominado Quelo-xiachi nomoxi" que fica ao nascente com metade sul do terreno que fica ao nascente denominado Soncreachem mola de cultura de coqueiros, arroz jaqueiros e outras arvores, sito em Cola de Cabo de Rama, discrito na conservatoria desta comarca sob o n ° 5495 afl-146 do livro B. 17, avaliada por 1.250 rupias, nos autos da carta precatoria vinda a este juizo e extraida dos autos de inventario orfanologico aqui se procedeu no Juizo de Direito da Comarca de Salsete, por obito de Faustino AleluiaFernandes que foi de Cavelossim, sendo inventariante a sua viuva dita Etermina Henriques. Quem a quizer comprar compareça nos indicados dia, horas e local correndo por conta do arrematante as despesas da praça e a contribuição de registo por inteiro. Por este são citados nos termos e para os efeitos da lei todos os credores incertos, coproprietarios e outos quaisq er preferentes E para ser publico se expediu este

Quepem 17 de Janeiro de 1925

O escrivao de direito do 1° ofi
*Babú V. Camotim Redcar*

Verifiquei
O Juiz de Direito
*A. A. de Brito e Nascimento*


## अभिप्रायार्थ माल व जाहिराती पाठका.

जाहिराती-संग्रह

या पुस्तकाचे वर्षातून चार भाग प्रसिद्ध होत असून ज्यानीं आमच्या ऑफिसांत नांवें नोंदविलीं असतील त्यांना ते फुकट पाठविण्यांत येतात. अभिप्रायार्थ पाठविलेल्या मालावर विस्तृत अभिप्राय दिला जातो. जाहिराती मराठी, पोर्तुगीज व इंग्लिश या तिन्हीं भाषांतून प्रसिद्ध करण्याची व्यवस्था असून, त्यांचा दर पुढील प्रमाणें आहे. सिंगल कॉलमच्या दर ओळीस ४ आणे व डबल ओळीस ८ आणे पडतील.

पत्ता— एम. के. पे. गांवकर
पैंगीण-काणकोण-गोवा.

## काळजी कां करितां ?

तुह्मांस शालोपयोगी पुस्तकें पाहिजेत ना? तर मग वेळ न करतां चला, व अनंत व्यं. शे. नावेलकर यांच्या दुकानांत आपणांस पाहिजे तीं शालोपयोगी पुस्तकें घेऊन मुलांस श्री रवळनाथ विद्याभुवन शाळेंत पाठवा.

विद्याप्रसारक फंड कमिटी-पोंगुर्पे.

## ESTBELECIMENTO COMERCIAL
DE
## Visnum Ramachondra Quenim
**FUNDADO EM 1850**

MERCADO VELHO-MARGAO

CONTA já mais de 73 anos de fundação o sobredito estabelecimento comercial. E' portanto um dos mais antigos da vila de Margão, mantendo relações com as mais afamadas firmas comerciaes e industriais da Europa e da America, paizes donde, em regra, importa todas as qualidades de tintas, aboc, oleos, verniz, linhança, cimento, gis etc. toda a sorte de artigos de ferro, como pregos, aldraves, cadeados, bisagras, parafusos, canos de ferro etc. especialidades de pastas de zinco lisas e concavas e as de cobre.

NO REFERIDO estabelecimento vendem-se tambem artigos alimenticios da primeira necessidade e todas outras mercadorias de que se acha bem provido.

**BEM SERVIR O FREGUEZ E' O SEU LEMA**

Experimentem que sempre lhes será proveitosa a experiencia !

## रबरस्टॅंप मॅन्युफॅक्चरींग कंपनी



आमच्या कारखान्यांत नावांच्या पाट्या, नाटकाचे पडदे, पत्र्याचीं कायम टिकणारीं क्यालेंडरें, सर्व प्रकारचे सुंदर रबरी शिक्के, लाखेवर उठविण्याच्या मोहोरा, ब्लॉक्स, रबर स्टंपची शाई, रबरी टाइपाच्या पेट्या, डेटर्स नंबर्स, व फोटोच्या फ्रेमी, वगैरे तयार करून मिळतील.

प्रो० धारणकर, मडगांव-गोवा.

## विष्णु रामचंद्र केणी यांचें दुकान

जुना बाजार—मडगांव.

स्थापना १८५०

सचोटीबद्दल प्रसिद्ध असलेल्या या अत्यंत जुन्या दुकानांत सर्व तऱ्हेच्या मालाचा भरीव स्टॉक असतो. निरनिराळ्या जातीच्या शाई, रंग, सिमीट, व्हेनींज, आबोक, हरतऱ्हेचें लोखंडी सामान ( खिळे, करवती वगैरे ) नाना रीतीचे जस्ताचे व तांब्याचे पत्रे व इतर सर्व संसारोपयोगी वस्तू सदर दुकानांत माफक दरानें विकल्या जातात.

दर एक, माल चोख, व्यवहार रोख

अनुभवानें खात्री करून घ्या !

Ano 9 N. 45

..nta-feira 5 de Fevereiro de 1925

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
..r cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

# भारत.

BHARAT

वर्ष ९ वें. अंक ४५

गुरुवार ता. ५ फेब्रुवारी सन १९२५

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. ( आगाऊ )

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें-गोवा

S. R. Biblioteca Nacional Pangim

## POLITICA HINDU'

Mais duma vez, tem-se dito e repetido nêste mesmo lugar que a politica hindú não admite violencia no emprego de meios para a consecução do seu já delineado fim.

A nossa aspiração é justa e democratica. E, porque justa e democratica ela é, não pode, de maneira alguma, ferir interesses legitimos de quem quere, e muito menos do liberal e magnanimo elemento europeu que a tem protegido e que a protege com um carinho puro e desinteressado.

¿Envolve *sedição* a dita aspiração que, afinal de contas, se reduz a uma perfeita discentralisação, completamente livre da central intervenção?

Não, certamente, porque *sedição*, que tira a sua origem do latim *seditio*, significa *tumulto, revolta contra o poder estabelecido*

¿Pretenderam os hindus concretisar a sua aspiração, *por meio da revolta contra o poder estabelecido*?

Se não, ¿como se atrevem os seus detratores a desvirtuar a puresa do seu movimento politico? ¿E só, por ocasião da inofensiva abstenção nas festas do Centenario?

Mas não só os hindùs abstencionistas que deixaram de tomar parte nas referidas festas por motivos, já agora, do dominio publico. Delas se absteve tambem a Academía; com elas se não entusiasmaram os empregados famintos; com elas se não importaram, até, alguns funcionarios europeus de destaque, cada qual por causa dos seus *motivos privados*.

Nestas condições, ¿porque é que *tão sómente* levantaram escarceu e fizeram zaragata contra os hindús abstencionistas, atribuindo-lhes propositos sediciosos e intenções revolucionarias e criando suspeições descabidas em volta da politica hindú?

Chegaram, até, *as criticas* a ponto de condenar, vibrantemente nos hindús o espirito de imitação das mais nobres e elevadas qualidades do movimento social, instructivo, industrial e moral dos seus irmãos do visinho territorio!!!

¿Pode lá haver ignorancia tão crassa, como a que revelaram as mesmas criticas, superficiais e levianas, politiqueiras e interesseiras?

E', simplesmente, lamentavel que, no regime de *fraternidade*, irmãos queiram guerrear irmãos, sem motivo justificado e que haja tendência para lutas fratricidas, por um *qüi pro quo* fútil!

A politica hindù é, sempre, franca e despida de violencia, não encerrando ela nenhuns fins ocultos que mereçam reprovação a quem ame a *liberdade* e a *igualdade*, tomadas estas palavras no seu verdadeiro e rigoroso significado.

Calem-se, pois, as *más linguas* e partam-se as *penas suspeitas*!

### A B C

O sr. Francisco Luiz S. Mergulhao, acreditado proprietario da *Livraria Moderna* obsequiou-nos com um exemplar do A B C do estilo e da composiçao do sr. Antonio Figueirinhas para uso das escolas primarias, 1a, 2a e 3 classes.

Na inauguraçao do seu novo metodo *racional e pratico*, o sr. Figueirinhas tem revelado profundo conhecimento da scicologia infantil, em todos os seus graus, de sorte que o ensino primario, guiado pelo referido metodo nao pode—e' nossa convicçao—deixar de ser de alta utilidade racional e pratica aos estudantes.

Sob estes pontos de vista torna-se, pois, recomendavel a importante obra do sr. Figueirinhas que se escontra a' venda na aludida "Livraria Moderna" a cujo inteligente e amavel proprietario sr. Mergulhao agradecemos a oferta do mencionado exemplar.

## AO VEIO DO TEMPO

### UM CASO SINGULAR; AS SUAS CONSEQUENCIAS; OS SEUS EFEITOS — AO A. N. R.

Ja' este semanario se referiu ao caso que, por estes dias, e' o pao nosso citadino. Fe-lo com desassombro, como o fizeram varios outros jornais. Sim, uma acusaçao de tal monta em bora feita num jornal obscuro e ignorado de Portugal e' a sintese fiel, a verdade inteira que o sr. dr. Dentinho Jr. expendeu numa carta particular que nao se destinava a' publicidade. E porisso mesmo o caso e' grave, e as palavras que ai ficam tem um autentico cunho de sinceridade. Sao palavras que se fossem destinadas a' letra de forma nao viriam tal como elas agora vieram. Sairiam afrancesadas, fingidas, mentirosas: seria a sintese do seu pensamento deturpado, medido com receio da Opiniao Publica e mesclados dum sentimento de cobardia e de temor.

Mas nao compreendo, nem de certo ninguem podera' compreender a plena satisfaçao do Conselho Escolar do Liceu Central com as explicaçoes que o sr. dr. Dentinho deu e que tornou publicas. Sejam elas embora um *Confiteor* que s. exa. grave e contrito, rezou nao podem contudo satisfazer os atingidos e assoalhados.

A' culminancia de insultos devia corresponder, naturalmente, uma retrataçao igual.

Analisando, fria e serenamente, estas explicaçoes chego a' uma conclusao estapafurdia, inverossimil.

A alinea (a) foi ja' suficientemente dissecada no principio destas linhas.

A alinea (b) diz:

"as assserçoes nela contidas foram o resultado de impressoes de momento, baseadas no imperfeito conhecimento da India, seus usos e costumes e, em especial, do ensino aqui ministrado";

Ora, desde o momento em que s. exa. nao tinha conhecimento completo ensino aqui ministrado ignoro como s. exa. emitiu opinioes tao avançadas e criticou dum modo tam a'spero e grosseiro. Nao haja duvida, foi prosa facil que s. exa. fez. Mas, nunca se fazem juizos nem se escrevem assergoes apoiadas em impressoes do momento e baseadas em imperfeito conhecimento das coisas.

E demais a mais a um educador da mocidade! Isto da' a historia de gata apressada parindo filhos tortos!

As outras duas alineas nao dao lugar a notas a' margem; sao a conclusao natural das primeiras duas. Pois, nao sei como a permanencia de seis ou cinco meses na India e a convivencia com os seus colegas nao o tenham habituado a formar o seu juizo sobre os seus colegas e sobre o ensino aqui ministrado.

E vem agora a ultima alinea em que s. exa. pretende de algum modo agravar as melhores relaçoes que mantem com os seus colegas.

Nao atino com o motivo; apo's o excrando enxovalho com que os cobriu a todos com excepçao honrosa dele e a do Carmo Reis, nao sei como podera' manter com eles as melhores relaçoes que nao pretendia agravar! Que pretenderia s. exa?

Nao damos com o numero da porta.

Chegam nos tambem vagos rumores de pancadaria e disturbios entre os alunos da Escola Medica e o dr. Dentinho Jr. A cidade tem tomado um ar marcial. Quase em estado de sitio. Todas as opinioes emitidas, a' pressa, podem ser de efeitos contraproducentes.

Cale-se, pois, a minha pena.

*

Ao sr. Alberto Nogueira Ribeiro agradeço a fineza de se apresentar despido de *travesti* que eu, tao injustamente, lhe vestira.

Quanto a *umas duzias de academicos* tenho a dizer-lhe que e' uma maneira de dizer. Pois tratando-se de academicos tem que se toma'-los por uma corporaçao homogenea e una. E nao, assim, lançada aos bocados, dispersa, levada pelo simples respeito de curiosidade.

Porque a verdade e' essa: o numero em que a Academia devia ter a representaçao foi um grande e autentico fiasco, sendo necessario arrebanhar-se estudantes estranhos a' Academia panginense.

E ponto a' discussao pois nao estou disposto nem me' sobra *tempo* para entreter e alimentar *pole'micas*.

*Crispim.*

व्यंजक पत्र पोर्तुगालच्या एका कोंप. ऱ्यांतील साप्ताहिकांत प्रसिद्ध झाल्याचें पण- जींत प्रसिद्ध झाल्यापासून सर्वत्र असंतोषाच्या व त्वेषाच्या लाटा उसळावयास लागल्या आहेत. 'निरुपयोगी लोकांचीं वसतीस्थानें' अशा नांवानें येथील शिक्षणसंस्थानां संबोध ण्याचें पत्र-लेखकानें धाडस केलें असून गांवठी पोर्तुगीज वाक्प्रचाराचे कांहीं नमुने द्दार मासलेहि त्यानीं आपल्या त्या पत्रांत संग्रहीत केले आहेत. प्रारंभापासून अखेर पर्यंत पत्रांत खोडसाळपणा ओतप्रत भरलेला असून, तो पाहून कोणालाहि लेखकाची कींव च येईल! उपरोक्त 'प्रतिभासंपन्न' पत्रापासून मारामारीप र्यंत बेतल्याची बोलवा आहे! नवीनच आलेले पणजी-पाठशाळेचे प्रो. ड्युझे देंतीज्यु हे त्या पत्राचे युरोपियन कर्ते असून, सध्यां गोमंतकांतील एच्यावत् सुशिक्षित मिस्तीस व नेटीव्ह वर्ग त्यांच्या विरुद्ध बिथरून गेला आहे! सद्हू प्रोफेसर साहेब चे विचार आ झाला पसंत नाहींत, हें जरी खरें असलें तरी कांहीं युरोपियनांच्या मनांत येथील फिरंगा ळलेल्या लोकांच्या विद्वत्ता व पात्रता या गोष्टीं संबंधानें कोणती भावना वसत असते, हें कळून येण्याचें एक उत्कृष्ट साधन या दृष्टीनें त्या विचारांचें 'कौतुक' केल्याशिवाय आ मच्यानें रहावत नाहीं. कावळ्यांनीं कितीहि काळजीपूर्वक मोरांच्या पिसांत आपला कृष्ण देह वेष्टीला, तरी त्यांना मोराची संज्ञा मि ळणें कसें दुरापास्त असतें, याचा 'अर्ध्या बाटलीनें पाकळे बनलेल्या कंट्री साहेबांनीं अवश्यमेव विचार करावा, अशी आमची त्यांना सूचना आहे.

आश्रयदात्यांस विनंतिः—'भारता'- विरुद्ध भरण्यांत आलेल्या नवीन खटल्याचें स्वरूप पूर्वीच्या खटल्यांच्या मानानें पुष्कळ भिन्न असल्यानें बचावाच्या साधन सामुग्री- साठीं बऱ्याच पैशांचा धूर निघण्याचा संभव आहे. 'भारता'ची सांपत्तिक स्थिति मोठीशी समाधानकारक नसली तरी, स्वसंरक्षणाचा बोजा तो आश्रयदात्यांवर-अंशतः कां होइना लादण्यास तयार नाहीं. पडेल ती झंज धी तपणानें सहन करून, प्राप्तस्थितींतून तो य- शस्वी रीतीनें मुक्त होण्याची धडपड करीलच. मात्र वर्गणीदारानीं आपापली वर्गणी ताब डतोब चुकती करण्याची तसदी घेतली पाहिजे नुसती वर्गणीचीच फेड झाली, तरी 'भार- ता'ला प्राप्त संकटाशीं दोन हात करण्यास जोराचें स्फुरण येणार आहे. आश्रयदात्यांनीं केवळ खटल्यासाठीं म्हणून पदरमोड करावी अशी आमची बिलकूल इच्छा नाहीं. त्यांक डून नुसती बाकी असलेली वर्गणीच आली कीं, आह्मीं आमचा बचाव करण्यास शकूं. तेव्हां सर्व आश्रयदात्यानीं आपापली वर्गणी पाठवून प्रस्तुत संकटांत 'भारता'ला सहाय्य पुरवावें, अशी आमची त्यांस आग्रहाची विनंति आहे.

———

## एक विलक्षण कारखाना

संध्याकाळची वेळ. रिकामा बसून वेळ जाईना ह्मणून सहज बाहेर फिरण्यासाठीं निघालों. गिरगांव रस्ता मागें टाकून भुलेश्वर बाजूकडे जात असतांना वाटेंत एका ठि काणीं मोटार गाड्यांची बरीचशी गर्दी दि सली. काय आहे ह्मणून कुतूहलपूर्वक मी पहावयास लागलों तों बरेचसे खादी पोशाख केलेले लोक जातानां दिसले, कांहीं मोटारगाड्यांतून, कांहीं साध्या गाडीं- तून तर कांहीं पायीं येत होते अशी सर्व गर्दी पाहून या ठिकाणीं कांहीं तरी मोठा स- मारंभ असावा असा मी तर्क केला. वर प हातों तों भव्य अक्षरांनीं लिहिलेली एक पाटी दिसली. त्यावर "देशभक्त व पुढारी बन- विण्याचा कारखाना" असे शब्द ठळकपणें नजरेस पडले. ते शब्द वाचतांच मी आश्च- र्यानें थक्क झालों. आजपर्यंत मी पुष्कळ का- रखान्यांचीं नांवें ऐकलीं होतीं. पण "पुढारी व देशभक्त बनविण्याचा" एखादा कारखाना असेल अशी या वेळपर्यंत माझी कल्पना न- व्हती. शेवटीं काय होईल तें होवो हा कार- खाना एकदां नजरेखालीं घालावाच असा विचार करून मी त्या कारखान्यापाशीं जा- ण्यास निघालों परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, इतर ठिकाणाप्रमाणें या देशभक्तीच्या कारखान्यांत जाण्यास सुद्धां मज्जाव होता. दारावरच एक नखशिखांत खादीचा पो शाख केलेला हाडकुळा इसम "स्वयंसेवक" नाम धारण करून द्वारपालाचें काम करीत होता. डोळ्यास अमेरिकन फ्रेमचा चष्मा आहे, तोंडांतून परदेशी सिगारेटचा धूर बा हेर पडत आहे व बाहेरील खादीच्या झग्या आड आपली खचलेली छाती छपविण्याच्या हेतूनें घातलेला विदेशी गंजिफ्राक स्पष्टपणें दिसत आहे, अशा थाटांत असलेल्या ह्या देशभक्ताजवळ नम्रपणें मी आंत जाण्यावि- षयीं परवानगी मागितली.पण त्या महात्म्यानें माझ्याकडे नीट पाहिलें देखील नाहीं. मा- झ्याविषयीं धिःकार प्रदर्शित करण्याच्या हेतूनें त्यानें फक्त आपल्या सिगारेटचें थोट्क लांब भिरकावून दिलें व नाका तोंडांतून धूर का- ढीत आपली खचलेली छाती पुढें करण्याचा आविर्भाव केला.पहिल्या सपाट्यास या देश- भक्तास एक धक्का मारून आंत शिरकाव करून घ्यावा असें माझ्या मनांत आलें. पण लगेच "अनत्याचार" तत्वाची मला आ ठवण होऊन मी त्या क्षुद्र हेतूपासून परावृत्त झालों. त्या देशभक्ताच्या हृदयास द्रव यावा व आपण ह्याच्याचपैकीं एक आहों असें त्याला वाटावें या हेतूनें मी खिशांतून म० गांधी, शौकतअल्ली, महंमदअल्ली इत्यादि पुढाऱ्यांच्या तसबिरा त्याला दाखविल्या. तरी त्या देशभक्ताचें हृदय जरा सुद्धां द्रवलें नाहीं. शेवटीं पं. म जार्ज बादशहाचें चित्र असलेला एक रुपयाचा मुखवटा त्याला दा- खवितांच तो खूष होऊन इकडे तिकडे प- हात त्यानें तो खिशांत टाकला व मला आंत जाण्यास परवानगी दिली. देशभक्तीच्या ह्या रांत जातांना सुद्धां जवळ पैसा पाहिजे, हें तत्व त्या दिवशीं मला कळलें. असो. "येन केन प्रकारेण" आंत प्रवेश तर करून घे तला.

आंत जाऊन पहातों तों एक भव्य व विस्तीर्ण दिवाणखाना दृष्टीस पडला. तो अत्यंत मोहक पद्धतीनें शृंगारला होता भिं तीवर जागोजाग दादाभाई नौरोजी, मेथा, गोखले, टिळक आदिकरून भूतकालीन व महात्मा गांधी, मौलाना महंमदअल्ली शौक तअल्लीसह हिंदुस्थानांतील सरसकट विद्यमान मौलवी, मौलाना आणि उलेमा व इतर कि त्येक पुढाऱ्यांच्या तसबिरा टांगलेल्या होत्या. हिंदुस्थानांतील एक महत्वाचा पुढारी असा राहिला नव्हता कीं ज्याची तसबीर भिंतीवर नव्हती. प्रत्येक तसबिरीच्या खालीं अशींच मोहक वचनें निरनिराळ्या रंगांत छापलेलीं होतीं. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे" "स्वराज्याची तहान सुराज्यानें भागत नाहीं" अशीं आणखीं कित्येक व चनें निरनिराळ्या भाषांतून होतीं. उर्दू भा षेंत छापलेल्या बहुतेक वचनांत स्वराज्या च्या तहानेपेक्षां खिलाफतेची तहानच जास्त दिसत होती. या वचनांत देखील "हराम" "हलाल" "कुरबान" या शब्दांची रेलचेल होती. खालीं जमिनीवर सर्वत्र शुभ्र खादी पसरण्यांत आली होती. तात्पर्य अशा रीतीनें त्या दिवाणखान्यांतील सर्व वातावरण देश- भक्तीच्या पवित्र विचारांनीं सर्वत्र भरलेलें होतें अशा त्या पवित्र वातावरणांत मी कांहीं वेळ उभा आहें इतक्यांत एक शुभ्र खादी परिधान केलेला, दाढी बरीचशी वाढवि लेला, डोळे खोल गेलेला असा एक फिकट दिसणारा इसम आंत आला. या एवढ्या विस्तीर्ण दालनांत याच्याशिवाय दुसरा को- णीच नाहीं हें पाहून हाच या कारखान्याचा मालक असावा असा माझा ग्रह झाला व तो खराच होता. त्या गृहस्थानें अत्यंत नम्र पणें मला विचारलें कीं; "आपणांस पुढारी व्हावयाचें आहे कीं देशभक्त बनावयाचें आहे" हा प्रश्न ऐकतांच मी अगदीं भां बावून गेलों. "पुढारी" व "देशभक्त" हे शब्द अत्यंत मोहक आहेत आणि असा कोण प्राणी आहे कीं ज्याला अनायासें देशभक्त व पुढारीपण नको. पण देशभक्त बनावयाचें ह्मणजे त्याला तसाच अतुल स्वा र्थत्याग लागतो, हाल अपेष्टा सोसाव्या लाग तात; प्रसंगीं प्राणासहि मुकावें लागतें अशी माझी आजपर्यंतची प्रामाणिक कल्पना होती. पण ती खोटी आहे असें अनुभवांतीं मला कळू- न आलें. मला गोंधळलेला पहातांच तो पुण्य पुरुष हंसून ह्मणाला, "काय असे अगदीं गोंधळून गेलां, लक्षांत ठेवा हा कारखाना आहे व यांत वाटेल तसला कच्चा माल असला तरी आमच्याकडे असलेल्या विव क्षित यंत्रांत त्याला घातला कीं तो एकदम पक्क झालाच असें समजा. बोला देशभक्त व्हावयाचें असेल तर ह्या यांत्रिक कारखा न्याकडे रवाना करतों. पुढारी व्हावयाचें असेल तर नेमस्त, जहाल, असहकारवादी कोणत्या पक्षाचें व्हावयाचें तें सांगा ह्मणजे त्याप्रमाणें व्यवस्था करतों." मी हें सर्व ऐ- कून अगदीं थक्क झालों व घाबरलों देखील. मला यंत्रांची नेहमींच मोठी भिति वाटत असे. न जाणों यानें एकाद्या यंत्रांत मला घातलें व मृत्युलोकांत देशभक्त बनण्याऐ- वजीं मी जर का एकदम स्वर्ग लोकांतला देवभक्त बनलों तर. हा विचार मनांत येतांच मी देशभक्त व पुढारी होण्याचें दो- न्हीहि टाळलें व त्या महात्म्यास ह्मटलें, "म- हाराज, दुर्दैवानें आपल्या ह्या अलौकिक यंत्रांचें सहाय्य घेऊन देशभक्त व पुढारी बनण्याला मला तूर्त धैर्य व इच्छा नाहीं, पण आज अनायासें आपल्या कारखान्याचें व आपलें दर्शन झालेंच आहे. करिता आ- पल्या त्या दिव्य यंत्रांचें अद्भुत सामर्थ्य पाहण्याचा माझा विचार आहे. करितां आ- पण तो कृपा करून पूर्ण करा."

माझ्या तोंडून हे शब्द ऐकतांच कार- खान्याचा मालक हंसला व 'माझ्या पाठी मागून या तर' असें सांगून त्यानें मला दुसऱ्या एका दालनांत नेलें. या दालनांत पहातों तों जिकडे तिकडे खादीचे ढीग पडले होते. अनेक शिंपी "सिंगर सोइंग मशीन- वर" जोरानें काम करीत होते. खादीच्या टोप्या, खादीच्या कफनीवजा पैरणी, खादी- चे कोट, खादीच्या पाटलोणी अधांतरीं दो- ऱ्यांवर इतस्ततः लोंबत होत्या. अनेक देश- भक्त होऊं पहाणारे लोक या ठिकाणीं उमे होते. मध्यभागीं एक मोठें यंत्र होतें. त्याकडे बोट दाखवून कारखान्याचे मालक मला ह्मणाले, "हें आमचें सर्वांत मोठें व मह- त्वाचें यंत्र. बाहेरून कच्चा माल आला कीं आह्माला प्रथम या यंत्रांत घालावा लागतो. देशभक्त बनावयाचें असलें तर प्रथम या यंत्राचा आश्रय केलाच पाहिजे कपड्यां- वांचून सर्व कांहीं फुकट आहे. कपडे श्री- मंत मनुष्य बनवितात. कपड्यानेंच मनुष्य खरा सभ्य व "रिफाईन्ड" दिसतो, कप- ड्यामुळेंच मनुष्याची योग्यता समाजात वा- ढते व कपड्यानेंच देशभक्त व पुढारी ब- नतां येतें. डोकीवर खादी टोपी व आंगावर खादी असली ह्मणजे मग देशभक्त बनाव- याला मुळींच अवकाश लागणार नाहीं. हें यंत्र हल्लींच नवें बनविलें; पूर्वीचें एक यंत्र होतें पण तें आतां बंद करावें लागलें आहे. तें मग तुह्मांला दाखवीन" इतकें बोलून त्यानें यंत्राची कामगिरी दाखविण्यासाठीं ज- वळच्या कच्च्या मालापैकीं एक जणाला उचलून यंत्रांत टाकलें. या इसमाच्या डो- कीला एक जरीचा फेटा, आंगांत एक पर- देशी काळा कोट वगैरे पोशाख होता त्यामुळें तो देशभक्त असा मुळींच वाटत नसे. पण यंत्रांत टाकल्यावरोबर थोड्याच अवकाशांत त्याचा असा कांहीं बनाव झाला कीं तो चटकन् एक मोठा देशभक्त दिसूं लागला. डोकीस स्वच्छ खादीची टोपी, आंगांत एक खादीची पैरण व एक खादी पंचा यानें तो देशभक्तांत अग्रगण्य दिसूं लागला.

(अपूर्ण)

# ANUNCIOS

O *Bharat*, ano 9° n° 45
de 5 de Fevereiro de 1925

Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida
Numero avulso 1 tanga

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do Escrivão do 2° oficio que êste assina correm editos de 30 dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio, nos termos do § 2° do artigo 197 do Cod. da. Proc. Civ. citando os interessados Gunum e marido Hori Jeganata Seil residentes em parte incerta de Carvar do territorio Inglez, para assistirem a todos os termos do inventario orfanologico requerido por obito de Bissó Naique, por outro nome Bissó Naique Delencar, morador que foi de Delem, de Canacona, sendo inventariante Putú Narana Folo, de Mudcuda de Canacona, deduzirem querendo nele os seus direitos sem prejuize de seu devido e regular andamento. E para ser publico se expediu este.

Xeldem da Comarca deQuepém, 10 de Janeiro de 1925

O Escrivao de Direito do 2° oficio
*Aires Manuel Barreto*

Verifiquei
O Juiz de Direito
*A. A. de Brito e Nascimento*

Pelo Juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1° oficio Redcar a requerimento de Roque Piedade Pinto, de Assolnã, correm éditos de trinta dias a contar da segunda publicação deste no Boletim Oficial, citando as executadas Locximibai, mulher de Datarama Vitola Sinai Volvotcar e Moturabai mulher de Gopala Vitola Sinai Volvotcar, de Cuncolim, ora ausentes em Narsobavadi do territorio Britanico, para renovação da instancia dos autos civeis de execução hipotecaria que o dito Roque Piedade Pinto, como cessionario de Luciano Xavier Dias, de Sarzorá move ás ditas citandas e outros. E para ser publico se expediu este. Quepem 22 de Janeiro de 1925.

O escrivão de Direito
*Babú V. Camotim Redcar*

Verifiquei
O Juiz de Direito
*A. A. de Brito e Nascimento*

Pelo juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1° oficio Redcar, á instancia do exequente Augusto Piedade Martins de Ambelim de Velim, cessionario dos primitivos exequentes João Antonio Fernandes de Sernabatim e seu cessionario Vitorino Gregorio Constancio Coutinho, de Cuncolim, vai a venda em hasta publica pela terceira vez, á porta do Tribunal Judicial desta comarca, situado em Xeldem, ao lado da estrada que deQuepem se dirige á Curchorem, no dia 17 do corrente mez pelas dez horas, por qualquer preço, o predio rustico denominado "Butram roinim Soclem molo" situado em Fatorpá com exclusão da terceira adição ou sejam primeira e segunda adições do mesmo predio que é cultivado de coqueiros, discrito na conservatoria predial desta comarca sob o n° 5135 a fl. 124 do Livro B 16 e avaliado por 2500 rupias nos autos da carta precatoria vinda da comarca de Salcete e extraida dos autos de execução hipotecaria que o dito exequente Martins promove contro Jeganata Sinai Quencró e sua mulher Maturabai Sinainim e outros de Cuncolim. Quem o quizer comprar compareça nos indicados dia horas e local correndo por conta do arrematante as despezas da praça e a contribuição do registo por inteiro Por este são citados nos termos e para os efeitos da lei, t dos cs credores incertos dos ditos executados bem assim os co proprietarios, ficam tambem igualmente citados os representantes dos credores falecidos Frederico Francisco Xavier Ligorio Raimundo Rebelo Visnum Sinai Quirtonim e Madu Sinai Quirtonim, todos que foram de Margão, sendo o credito do 1° na importancia de 1300 rupias o do 2° na de 520 rupias e finalmente o do 3° na de 200 rupias. E para ser publico se expediu este. Quepem, 2 de Fevereiro de 1925.

O Escrivão do 2° oficio encarregado do 1°
*Aires Manuel Barreto*

Verifiquei
O Juiz de Direito
*A. A. de Brito e Nascimento*


## ESTABELECIMENTO COMERCIAL
DE
## Visnum Ramachondra Quenim
**FUNDADO EM 1850**

MERCADO VELHO-MARGAO

CONTA já mais de 73 anos de fundação o sobredito estabelecimento comercial. E' portanto um dos mais antigos da vila de Margão, mantendo relações com as mais afamadas firmas comerciaes e industriais da Europa e da America, paizes donde, em regra, importa todas as qualidades de tintas, aboc, oleos, verniz, linhança, cimento, gis etc. toda a sorte de artigos de ferro, como pregos, aldraves, cadeados, bisagras, parafusos, canos de ferro etc. especialidades de pastas de zinco lisas e concavas e as de cobre.

NO REFERIDO estabelecimento vendem-se tambem artigos alimenticios da primeira necessidade e todas outras mercadorias de que se acha bem provido.

**BEM SERVIR O FREGUEZ E' O SEU LEMA**

Experimentem que sempre lhes será proveitosa a experiencia !

## व्होदीन

जुनाट संधिवात, मस्तक शूळ, कपाळ दुखणें या व्याधींवर उत्तम फ्रेंच औषध 'व्होदीन'च्या १२ वड्यांनीं खात्रीनें गुण येतो.तसेंच थंडी वाजणें, इन्फ्लुयंझा, संधीज्वर (टायफड) व साधारणपणें सर्व जंतुत्पादक तापांवर या औषधाचा फारच उपयोग होतो.२० वड्या असलेल्या बाटलीची किमत फक्त दहा आणे.

मिळण्याचीं ठिकाणें

पणजी— द्रोगारी—फार्मसी आझावेद. | फार्मसी गास्पार [illegible]लेमांव, फोंडें.
द्रोगारी आर्यन. | हिंदु फार्मसी, पणजी.

लुझो इंदियान दवाखाना, पणजी

## विष्णु रामचंद्र केणी यांचें दुकान

जुना बाजार—मडगांव.

स्थापना १८५०

सचोटीबद्दल प्रसिद्ध असलेल्या या अत्यंत जुन्या दुकानांत सर्व तऱ्हेच्या मालाचा भरीव स्टॉक असतो. निरनिराळ्या जातीच्या शाई, रंग, सिमीट, व्हेर्नीज, आबोक, हरतऱ्हेचें लोखंडी सामान ( खिळे, करवती वगैरे ) नाना रीतीचे जस्ताचे व तांब्याचे पत्रे व इतर सर्व संसारोपयोगी वस्तू सदर दुकानांत माफक दरानें विकल्या जातात.

दर एक, माल चोख, व्यवहार रोख

अनुभवानें खात्री करून घ्या !

# ECOS& CRITICA

## UM COMPROMETIMENTO SERIO

A *India Portuguesa*, de Margao pretende, a seu modo, defender se das *baboseiras* e *insultos* que, em um momento de irreflexao e mau humor atirou, fera e iracunda, a's faces *dal guns hindu's que perante a comemoração do centenario assumiram*, no entender dela, *uma atitude subversiva*.

E', absolutamente, oca senao louca a defesa da *India* que se escuda numa argumentagao esteril, cheia dum palavreado desconexo, por quanto nao foi capaz de provar sequere uma so' de tantas acusagoes, petulante e levianamente, assacadas aos mesmos hindu's. E na imposibilidade de se livrar, airosa e decorosamente, do circulo de ferro em que ela propria se apertou, talvez mal aconselhada, a folha do Partido Indiano, vencida e desesperada, chama ao director do *Bharat* um desequilibrado, dizendo que lhe causa mais compaixao do que irritagao!

E' certo que na materia de insultos e baboseiras nao ha' na *India* quem leve a palma ao ilustre chefe do Partido Indiano, o qual, porem, pode estar certo que, cedo ou tarde, tera' que arrepender-se, politicamente, da falsa suspeigao que tentou criar em volta da pacifica e ordeira classe hindu'.

E' que ha agravos que se nao esquecem facilmente, sobretudo, feitos por quem tem a estricta obrigagao de pensar maduramente e obrar serenamente.

¿Ignora, porventura, a *India* que nao deve fazer a outrem o que nao quere que outros lhe fagam?

### "A TERRA"

Completou ja' oito anos da sua publicagao este intemerato bissemanario de Margao, que, pelos relevantissimos servigos que, com verdadeiros sacrificios e incontestavel abnegagao esta' prestando ao Paiz, merece especial mengao.

Em certos assuntos, a atitude de A TERRA se nao conforma com a nossa, o que, porem, nao e' motivo suficiente nem racional para lhe negarmos o valor e a sinceridade do patriotismo com que, em geral, toma ela conta de todos os problemas de interesse publico.

Numa palavra: o jornal A TERRA sabe viver decentemente, fulminando erros e verberando desatinos, causticando imoralidades e golpeando inconveniencias, o que e' raro nesta terra em que, sob a capa da politica, se cultiva so' o comodo egoismo.

Longa dura e perene ventura!

### LEGADOS E DELEGADOS!

Escrevem nos:

"Em breves linhas na edigao passada, apresentamos como corriam as coisas referentes a' administragao dos legados do falecido Deao Almeida, na parte que dizem respeito aos manducares. Agora voltando ao ponto nos referiremos tao somente ao encarregado do mesmo cabido. Pela administragao dos bens o cabido, como consta do testamento, tem de premi. 400 xerafins, soma esta que nos consta esta' elevada sem autorisagao nem escrupulo nenhum a 400 rps. pagando alem disso ao encarregado 30 rps. mensais e 6 candis de bate e 180 cocos ao ano, entidade esta que o testamento nao reconhece absolutamente, reconhecendo apenas a do jardineiro e mocadao que continuam nos seus respectivos postos desde a antiguidade. A isto acresce o subsidio de 2 rps. diarias e 10 rps como para viagem que recebe o conego administrador, quando esta' ca' para qualquer diligencia.

Ai esta' a aplicagao que tem o dinheiro que pertence ao cumprimento estricto dos legados.

Em abono da verdade, devemos dizer que o tal pobre a quem nos referimos na edigao passada recebeu de esmola 5 rps. tendo abatido as outras 5 em satisfagao do pagamento da divida de 1918!"

*A caridade deixa de ser caridade quando ela se comistura com o egoismo!*

### ENGANA-SE...

Supoe o nosso presado colega de *A Terra* que a concessao do terreno, feita pelo Governo ao *Sarasvat Braman Samaj*, de Margao e' ilegal. Pelo menos, da' mostras de se nao ter convencido da legalidade da mesma concessao. Chamamos, porisso, a atengao do referido bissemanario para o art. 123 do Regime de Concessao em vigor, aprovado por decreto n° 3602 e que diz:

> "O Governador Geral podera', quando o julgue conveniente conceder gratuitamente terreno em bairros a esse fim destinados, para construgao de pequenas casas de habitagao para os necesitados, quando estes comprovem a sua pobresa, e 'bem assim para edificios destinados a' beneficencia ou outros fins de utilidade publica'."

¿Nao acha a *A Terra* que se engana...?

### A'S CINZAS!

Reduziram se a's cinzas e nada duas tendas que se tinham levantado nos suburbios da mina do *Devandongor*, de Rivona. Destinavam se elas a'residencia do sr. Director de Agrimensura e de Minas e da sua comitiva.

Foi o fogo que devorou, segundo informam; e como o accidente se deu ao pe' da referida mina, recea-se que seja atribuida a destruigao ao respectivo manifestante que deve ter tido ai perto deposito de qualquer explosivo.

¿Nao conhecem a historia da mina de Pale? Pois, entao, e' escusado por mais cartas na mesa.

Preciso e' ver, agora, que fogosa atitude vai assumir o sr. Bernardino da Costa no *fogoso* assunto da Mina do *Devandongor*. Naturalmente Sua Exa. vai propor ao Governo uma multa de 6 contos ao tal manifestante.

O fogo causou ao Estado prejuisos no valor de tres a quatro mil rupias.

¿Que fogoso zelo?!

## वर्तमानसार

—कळविण्यास अत्यंत वाईट वाटतें कीं, शिरवडें येथील श्री. मंगेश कृष्ण गुडे हे गेल्या माघ शु॥ ५ मी रोजीं रात्रौ रक्ताच्या झटक्यानें ( congesto cerébral ) कैलासवासी झाले ! श्री. गुडे हे चांगल्या संपन्न स्थितींत असून शिरवडें येथें आणि इतरत्रहि त्यांचें वजन फार चांगलें होतें. हे विद्याव्यासंगीं असून वेदांत विषयांत त्यांची फार चांगली गति होती. आपलें सरकारी काम संभाळूनहि राहिलेल्या वेळीं ते त्याच विषयाचें अध्ययन करीत असत. वेदांत विषयाच्या चर्चेकरितांच एक वेदांती संन्याशी कित्येक वर्षांपासून अखेरपर्यंत त्यानीं आपल्या घरीं ठेवून घेतले होते. परवां वेदांताचा व्यासंग चालू असतांनाच त्यांच्यावर रक्ताचा पहिला हल्ला झाला; आणि तन्निवारणार्थ केलेले सर्व प्रयत्न निष्फळ होऊन अवघ्या दोनच तासांत त्यांचें देहावसान झालें ! ! श्री. गुडे यांच्या या आकस्मिक मरणानें त्यांचे दत्तक चिरंजीव ( पुतणे ) श्री. व्यंकटेश मंगेश गुड आणि बंधु श्रीं. गोपाळ कृष्ण गुडे यांच्यावर मोठाच दुःखद प्रसंग ओढवला आहे. पण परमेश्वरी सत्तेपुढें उपाय नाहीं या तत्वावर लक्ष्य देऊन पूर्ण विवेकानें ते आपल्या मनाचें शांतवन करून घेतील अशी आशा आहे. कै० गुडे यांच्या आत्म्यास परमेश्वर शांति देवो.

—इतर विषयांच्या गर्दीमुळें या अंकांत आरोपीत लेखाचें भाषांतर प्रसिद्ध करणें शक्य झालें नाहीं.

—येत्या अंकांत नवें वर्ष, नवें संकट हा एका नवीन विचारांच्या व नव्या जोमाच्या लेखकाच्या तडफदार लेखणींतून उतरलेला लेख प्रसिद्ध होईल.

—मौज साप्ताहिकाच्या मार्फत 'मौजच मौज' या नांवांचें एक नवीन मासिक लवकरच निघणार आहे.

—रिवण येथें तेथील एका मिनाच्या खाणी शेजारीं उभारलेल्या आग्रीमेंसूर खात्याच्या दोन तंबूंस आग लागून जवळ जवळ ३–४ हजारांचें नुकसान झालें. 'आंधळा दळतो व कुत्रें पीठ खातें.' !

—गोव्यांत जिकडे तिकडे देवीची सांथ जोरांत आहे.

—जास्ती कर भरणाऱ्या जमीनदारांच्या विरोधामुळें मुरगांव मुनिसिपालटीला अधिकार सूत्रें खालीं ठेवावीं लागलीं.

—सांगें येथील अंतस्थ धुसपूस जोरांत आहे.

—दुसरीकडे प्रसिद्ध झालेल्या डी. एम. नाडकर्णी यांच्या जाहिरातीकडे गरजूनीं अवश्य लक्ष पुरवावें, अशी सूचना आहे.

—राजा बहादूर नारायण लालजी यानीं सांगलीच्या मारवाडी बोर्डिंगास ५००० रुपयांची देणगी देण्याची केली आहे.

—प्रो० देंतीञ्जुं प्रकरणांत आणखीं दोघां युरोपियनांसहि चोप बसला होता, अशी वंदता आहे !

## आजचें पोर्तुगीज सदर

अग्रलेखः—

**हिंदूंची चळवळ व त्यांच्या शत्रूंची वळवळ; बंड ह्मणजे काय ?**

लेख दुसराः—

**प्रोफेसर देंतींञ्जू प्रकरण.**

स्फुट व इतर विषयः—

**सरकारी तंबूंची होळी; दियांव प्रकरण; 'तेन्ह' व सा. ब्रा. समाज; इ० इ० इ०**


## काळजी कां करतां ?

तुह्मांस शालोपयोगी पुस्तकें पाहिजेत ना? तर मग वेळ न करतां चला, व अनंत व्यं. शे. नावेलकर यांच्या दुकानांत आपणांस पाहिजे तीं शालोपयोगी पुस्तकें विकत घेऊन मुलास श्री रवळनाथ विद्याभुवन शाळेंत पाठवा.

**विद्याप्रसारक फंड कमिटी—पोंबुर्पें**

## रबरस्टँप मॅन्युफॅक्चरींग कंपनी



आमच्या कारखान्यांत नावांच्या पाट्या, नाटकाचे पडद, पन्याची कायम टिकणारीं क्यालेंडरें, सर्व प्रकारचे सुंदर रबरी शिक्के, लाखेवर उठविण्याच्या मोहोरा, ब्लॉक्स, रबर स्टॅंपची शाई, रबरी टाइपाच्या पट्या, डेटर्स नंबर्स, व फोटोच्या फ्रेमी, वगैरे तयार करून मिळतील.

**प्रो० घारणकर, मडगांव—गोवा.**

## ARTE DE ENCADERNACAO



EXECUTAM com a maxima nitidez, prontidao e barateza todas as obras concernentes a esta arte, simples e luxuosas.

**VENDEM** panos de encadernagao, papel almago, livros escolares maratas e tinta de impressao.

**D. M. Nadkarni & Cia.,**

**MARGAO-GOA.**

भारत

मिति माघ शु॰ २ शी शके १८४६

## आमचा धर्म तुह्मांसाठीं !

हिंदुस्थानच्या इतिहासाचें तात्विक दृष्ट्या परिशीलन केल्यास आपणास आढळून येईल कीं, 'आमचें राज्य तुह्मांसाठीं, तुह्मीं सुशिक्षित, दमदार व स्वराज्य चालविण्यास लायक झालां कीं आह्मीं आपलें चंबुगवाळें आटपून निजधामाप्रत गमन करूं, ह्या सारखी निष्फळ व बाष्कळ वडबड करणाऱ्या इंग्रजांचा व 'आमचा धर्म तुह्मासाठीं, आह्मीं उदार व भले माणूस असून, मुसलमानाच्या जुलुमांतून आह्मींच तुमची सोडवणूक केली असल्यानें तुह्मी आमचे ऋणी आहांत, आम्हीं होतों ह्मणून तुमच शेंडी शाबूत राहिली' अशी शेखी मिरवणाऱ्या पोर्तुगीझांच्या ह्या गरम हवेंत व काळ्या लोकत प्रवेश करण्याचा मूळ हेतु हिन्दीस्थानचा युरोपशीं चालणारा व्यापार वशात कोंबण्याचा होता. भारत वर्षाचें व्यापारी दळण वळण एक हाती करून आपण हस्तगत करावें ह्याच उद्देशानें पोर्तुगीझ दर्यावर्दी-ज्याचें श्राद्ध डिसेंबरच्या शेवटल्या आठवड्यात घालण्यांत आलें तो-वास्कोडिगामा इ. स १४९८ त कालिकट बंदरास उतरला व इंग्रजांचा वकील सर थोमासरो ह्यानें भावी धुळवडीचें पूर्वचिन्ह ह्मणून आपल्या पाढऱ्या पायाची तांबडी पायधूळ मोंगल बादशहा जाहांगीरच्या दिल्लीं दरबारांत सन १६१५ त झाडून तो पावन केला. हिंदुस्थानच्या व्यापाराचीं एकंदर सूत्रें आपल्याच हातांत असावीं, अशा इच्छेनें धडपड करणारें त्या वेळीं आणखीहि एक राष्ट्र होतें. तें फ्रान्स होय.

फ्रान्स, इंग्लंड व पोर्तुगाल ह्या तीनहि युरोपियन राष्ट्रांतील व्यापारी अशा रीतीनें हिंदुस्थानचा व्यापार गट्ट करण्याकरितां टपून बसले असतां बाकीच्या दोघानाहि जिभल्या चाटीत बसावयाला लावून शेवटीं एकलें इंग्लंडच हिन्दभूमीचा व्यापार, साम्राज्यसत्ता व मालमत्ता ह्या सर्वांचें नि:प्रतिस्पर्धी मालक बनलें व इतरांस ह्वा तितका लत्तांचा खुराक चारूं लाविण्या इतकें ताकदवान झालें ह्याचा अर्थ कांय ? एकट्या फ्रान्सची गोष्ट सोडून दिली तर पोर्तुगीज सत्तेची एवढी धूळधाण कां व्हावी? इंग्रज लोकांनीं आर्यावर्तांत प्रवेश करण्यापूर्वी १५२ वर्षें पोर्तुगीझांचा पाय मलबार किनाऱ्यास लागला होता व एतद्देशीय संस्थानिकाच्या राजकारणांत कोणत्याच रीतीनें भाग न घेण्याचें (non-interference with native states) धोरण कंपनी सरकारनें इंग्लंडच्या अनुमतीनें बदलण्यापूर्वी २३८ वर्षे प्रसिद्ध पोर्तुगीझ मुत्सदी आल्फान्सो ॲल्बुकेर्कनें गोमांतकांत पोर्तुगीज सत्तेची प्रतिष्ठापना केली होती पण शेवटीं अपयश पोर्तुगीझानांच येऊन त्यांस 'फेस्तें करीत व फोल्ग मारीत' रहावें लागलें, हें सर्व विश्रुत आहेच.

पोर्तुगीझ सत्तेचा ऱ्हास कां झाला ह्यावर ऐतिहासिक दृष्ट्या विवेचन करतांनां लोकमान्य इतिहासकार कै. नु. चंदाभाई ह्मणतो: **कांहीं कामदारांच्या क्रूर स्वभावामुळें व ख्रिस्ती धर्म प्रसाराच्या केलेल्या प्रयत्नांमुळें पोर्तुगीझांना एतद्देशीयांचा विश्वास व प्रेम संपादन करतां आलें नाहीं व हेंच पोर्तुगीझ सत्तेच्या अस्ताचें खरें कारण होय.**

आमचेंहि निश्चित मत वरीलप्रमाणेंच आहे. परिस्थितीला तोंड देण्यासाठीं पोर्तुगीजांना व इंग्रजानाहि हिंदुस्थानची सत्ता हातांत आणणें अपरिहार्य होतें खरें पण इंग्लंडची दृष्टि केवळ व्यापारावर होती व त्याच्या सुरक्षिततेसाठींच त्यांना राज्यकारभाराचीं सूत्रें हवीं होतीं. पोर्तुगीजाची गोष्ट तशी नव्हती. एकटा आल्बुकेर्क वजा करून इतर सर्व प्रांत प्रतिनिधींची दृष्टि व्यापारापेक्षां धर्मप्रसारावरच अधिक खिळून राहिली होती. हिन्दी लोक आपलें सर्वस्व परकीयानां हरण करूं देतील पण धार्मिक प्रकरणांत परक्यांनीं चाळवाचाळव केलेली त्यांस सहन होणें जन्मांतरींहि शक्य नव्हतें. हें त्यांस त्यावेळीं पटलें नव्हतें व आजहि पटलेलें दिसत नाहीं. हा त्यांचा वेडेपणा ह्मणावा कीं ईशघटना ह्मणावी हें आह्मांस समजत नाहीं. हिन्दी लोकाची धर्मश्रद्धा किती तीव्र अढळ व उदात्त असते ह्याचें उदाहरण त्यांस शीख गुरुद्वार प्रबंधक कमिटीच्या स्वयंसेवकानीं सध्या चालविलेल्या सत्याग्रहांत मिळालें असतें, पण तेवढी सुबुद्धि सरकारास कोठून यायाला ? बंधुप्रेमाच्या उत्कटतेमुळें बिभीषणानें केलेला उपदेश रावणास जर पटला असता तर रामाचें अवतार कार्यच मुळीं संपुष्टांत आलें असतें. त्यावेळीं उन्मत्त रावणानें बिभीषणास हांकलून देणें हेंच उचीत. रावणास बिभीषण राजद्रोही वाटला. कारण परस्त्री हरणाचें रावणानें केलेल निंद्यकृत्य त्यास पसंत न पडून सती पतिव्रता सीता रामचंद्राच्या हवालीं करण्याविषयीं व पश्चातापेन शुद्धता मिळविण्याबद्दल तो रावणास नाना तऱ्हानीं जीव तोडून विनवण्या करीत होता, पण व्हावयाचें तें होऊन जाण्याचें काहीं त्यायोगें चुकलें नाहीं.

गोमांतकांतील लोकप्रतिनिधींची अवस्थाहि सध्या बिभीषणासारखीच झाली आहे. प्रजेचो धर्मनिष्ठा हिरावून घेण्याचा जो गामाच्या फेस्तांत घाट घातला गेला होता त्याविरुद्ध त्यांनीं जोराची चळवळ केल्यामुळें सरकारनें त्यांवर बहिष्कार पुकारला आहे. 'जनपदहितकर्तात्यजते पार्थीवेन' ही संस्कृत उक्ति खोटी ठरल्यासच नवल ह्मणावयाचें.

देशभक्तां प्रासाद बंदिशाला ।
शृखलांच्या गुंफिल्या दिव्यमाला ॥
चिता सिंहासन शूळ राजदंड ।
मृत्यु सुंदर दे अमरता उदंड ॥

—विनायक.

## स्फुट विचार

**भारतावरील खटला:**— गेल्या शुक्रवार रोजीं—ता. ३०-१-२५—आक्षेपार्ह लेखाची येथील कोर्टाकडून तपासणी करण्यांत आली. येथील उभय ताबेलियांवाकडे ही महत्वपूर्ण जबाबदारीची कामगिरी संपविण्यांत आली होती. उपरोक्त परीक्षक द्वयानीं आरोपीत लेखावर कोणत्या अर्थाचा अभिप्राय व्यक्त केला असेल, त्यांत त्यांना 'राज्यद्रोह' दिसला असेल किंवा 'मत स्वातंत्र्य' भासलें असेल, हें साधनाभावामुळें आह्मांस अजुन पूर्ण ज्ञात झालें नाहीं. खटला सुनावणीस निघण्यापूर्वी केव्हांतरी एक दिवस लेखाच्या जबाबदारी संबंधानें आह्मांस जाब विचारला जाईल. त्यावेळीं खटल्याचे कागद आह्मांस पहाण्यास मिळण्याचा योग जुळून येणार असल्यानें परीक्षकांच्या परीक्षणाचें मनमुराद परीक्षणहि करितां येईल. तोंपर्यंत आह्माप्रमाणेंच आमच्या शेंकडो मित्रांचीहि 'तपासणी जिज्ञासा' तृप्त होणें दुरापास्त होय.

**लिसेवांतील भानगड:**— प्रो. देंतीझ्यांनो पोर्तुगालच्या एका साप्ताहिकांत आपल्या अकलेचे तारे तोडून जी भानगड उपस्थित केली होती, तीनें एक सबंध आठवडा गोव्यांत गडबड उडवून दिली होती. उपरोक्त प्रोफेसर साहेब व कियक मेडिकल विद्यार्थी यांची परस्परांत झोंबाझोंबी होऊन हें प्रकरण आतां बरेंच थंडावत चाललें आहे. 'नेटिव्ह विरूद्ध युरोपियन' अशा तऱ्हेचें विकृत स्वरूप उपरोक्त भानगडीस प्राप्त होणार होतें; परतु उभयपक्षीं शहाणपणाचें व दूरदर्शीत्वाचें धोरण राखलें गेल्यावरून ती आपत्ति वेळींच टळली, ही त्यांतल्यात्यांत आनंदाचो गोष्ट होय. लेखनबहाद्दर प्रोफेसरांनीं 'दियारियु दे नोयती' या पत्राच्या संपादकांवरहि अवचित व गुप्तपणें हल्ला करून, त्यांस बरेंच हैराण केलें होतें. सदहू संपादकहि आतां आजारांतून सुखरूपपणें निभावल्यावरून, 'खुना' शिवाय, एकंदर प्रकरणावर 'चुना' सारवला गेला ह्मणण्यास हरकत नाहीं! सविस्तर माहिती हातीं येतांच प्रस्तुत 'फाल्गुनोत्सवा' संबंधीं टीकात्मक चर्चा करूं.

**गामाचें श्राद्ध:**— गामोत्सवांत पुष्कळ हिंदूंनीं भाग घेतला नाहीं, हें जितकें सत्यास धरून आहे, तितकेंच पुष्कळशा ख्रिस्ती व युरोपियनांनींहि गामाच्या आत्म्यास पिंडदान वाहिलें नाहीं, हेंहि आहे. हिंदूंनी तर केवळ तटस्थवृत्तीच स्वीकारली होती; पण ख्रिस्ती व युरोपियन लोकांच्या तटस्थवृत्तीला विरोधाचीहि झांक झळकत होती. या खऱ्या वस्तुस्थितीकडे मुद्दाम डोळेझांक करून कांहीं ख्रिस्त्यानड्यांकडून हिंदूविरूद्ध चालू करण्यांत आलेली स्वार्थी व पोटार्थी मोहीम किती निंद्यनीय आहे, याचा वाचकानींच विचार करावा. आजच्या पोर्तुगीज अग्रलेखांत प्रस्तुत विषयाची आम्हीं सगोपांग चर्चा केली आहे. यामुळें तरी त्यांच्या डोळ्यांत अंजन पडून त्यांची धुंदी उतरो, अशी आमची इच्छा आहे.

## एक विलक्षण कारखाना

(मागील अंकावरून)

पण सर्वांत मोठा चमत्कार ह्मणजे त्याच्या चेहऱ्यावरील झालेला बदल. त्याचा चेहरा पूर्वी एकाद्या क्षुद्र चित्त्याप्रमाणें तारवटलेला दिसत होता. पण त्या यंत्रांतून तो बाहेर पडतांच हिमाळयांत अनेक वर्षें तपश्चर्या करून आलेल्या एका तपस्वी योग्याप्रमाणें शांत व गंभीर दिसूं लागला. हा त्याच्या चेहऱ्यावरील एकाएकीं झालेला बदल पाहून मला मोठें आश्चर्य वाटलें. मी मालकास ह्मटलें, "या सद्गृहस्थाच्या चेहऱ्यावर हा जो एकाएकीं बदल झाला आहे त्याप्रमाणें या गृहस्थाची मनोवृत्ती खरोखरीच बदलली आहे काय ?" त्या गृहस्थाला दुसऱ्या दालनांत पाठविल्यानंतर मालक जरा इकडेतिकडे पाहून हंसत ह्मणाला, 'अहो हा बोलून चालून यांत्रिक कारखाना. असे तुह्मीं अगदीं भोळे कसे ! या यंत्रांत अगदीं खालच्या बाजुला एक प्रकारच्या पावडरीनें भरलेले दोन खण आहेत. मनुष्याचें डोकें या यंत्रांत गेलें कीं दोन्ही बाजुला बसविलेले ब्रश ही पावडर त्याच्या तोंडावर मारतात व मग ताबडतोब चेहऱ्यावर इष्ट तो बदल होतो." यःकश्चित पावडरीच्या अंगीं एवढी शक्ती पाहून अगदीं आश्चर्यानें मूढ झालों. या पावडरीचें नांव तरी काय असा प्रश्न मी त्यांस करतांच, त्यानें त्या पावडरीचें नांव "दांभिकता" असें सांगितलें आणि आह्मीं तेथुन दुसऱ्या दालनांत जाण्यास निघालों.

या दालनांत एक जुने यंत्र पडलें होतें. अद्याप त्याचे कांहीं भाग चालू होते. पण नवीन कच्चा माल फारसा या दालनांत नव्हता. 'हा सर्व प्रकार काय आहे" असा प्रश्न करताच मालकानें मला "पुढारी" बनविण्याचें हें एक जुनें यंत्र आहे असें सांगितलें. हें यंत्र चांगलें आहे पण अलीकडे महात्मा गांधीच्या चळवळीमुळें या यंत्रांतला माल लोकांना फारसा आवडत नाहीं. असहकारितेच्या चळवळीच्या ऐन भरांत या मालाला कोणी कुत्रा सुद्धां विचारीत नव्हता. पण अलीकडे पुन्हां बाजारांत या मालास थोडी थोडी मागणी येत आहे. अद्याप बाजारभाव कदाचित सुधरेल असें वाटतें. या दालनांत जुन्या कारखान्यांत लागणाऱ्या अनेक मालानीं भरलेलीं निरनिराळीं कपाटें होतीं. त्यांत बऱ्याचशा सुंदर, झिळमिळ्या पगड्या, रेशीमकाठी धोतरजोडे करवतकाठी उपरणी, कानांतल्या भिकबाळया, आल्पाकचे कोट इत्यादि रद्दी माल पडला होता. "पूर्वीच्याकाळीं पुढारी बनविण्याला या साधनाचा फार उपयोग होत होता. व यामुळें आमचें टेलरींग खातें फार जोरांत चालू असे. पण अलिकडे गांधीजींच्या चळवळीमुळें हा सर्व धंदा बसून गेला आहे व यामुळें कारखान्यांतल्या बऱ्याचशा शिंप्याना रजा द्यावी लागली. विशेषतः पगडबंदांची जर अगदीं गैरसोय झाली आहे; देशांतल्या वाढत्या बेकारीला ही आणखी जादा मदत. अद्याप या यंत्राचे कांहीं भाग चालू आहेत. कारण 'नेमस्त' बाजारांतून अद्याप याच

# समाज सुधारणा

## विवाह

लेखांक ३ रा.

### • विवाह संस्काराची अधोगति

त्या उन्नत अशा वैदिक कालांमधून आपला भारत देश अत्यंत अवनत काला मध्यें प्रवेश करूं लागला. या काळीं अज्ञानानें आपला पगडा हिंदुस्थानभर बसवून जिकडे तिकडे अज्ञानांधःकारांत पसरून टाकला. नाना प्रकारच्या अडचणी उपस्थित होऊन भारताला गारत करूं लागल्या. स्त्रियांचा आदरसत्कार व स्वतंत्रता यांत कमतरता पडूं लागली. अज्ञानामुळें पुरुषानीं स्त्रियांचे अधिकार काढून घेण्यास सुरवात केली. त्यांनां गुरांसारखें वागविण्यांत येऊं लागलें व त्यांनां धार्मिक, मानसिक, आत्मिक अशा उन्नतीला पारखें करून टाकलें. पवित्र संस्कार 'यतो पवित गायत्री,' वेदपाठ इत्यादि सर्व चांगले मार्ग त्यानां बंद झाले. वेदमंत्राचे अर्थ बदलण्यांत येऊं लागले. नवेनवे ग्रंथ तयार होऊं लागले. मनुस्मृति. सारख्या ग्रंथांत नव्या श्लोकांची घुसडाघुसड होऊं लागली व बालविवाहाची अत्यंत वाईट चाल प्रचारांत आली.

वेदामध्यें स्त्रियांनां आपला वर स्वतः निवडण्याचा अधिकार दिलेला आहे. प्राचीन इतिहास व स्वयंवराची चाल यामुळें वरील गोष्टीला पुष्टी मिळत आहे. सीता, दमयंती, रुक्मिणी, द्रौपदी वगैरे पुष्कळांचे विवाह स्वयंवराच्या चालीनेंच झालेले होते. याशिवाय हिंदुस्थानच्या पडतीच्या काळांत संयोगीतेचा विवाह पृथ्वीराजाबरोबर स्वयंवराच्या चालीनेंच झालेला होता ज्या वेळीं कन्येची शारीरिक व मानसिक उन्नति होई व विवेक शक्तीप्रमाणें आपल्या गुणकर्म स्वभावानुसार वर शोधून काढण्याची पात्रता त्यांच्या अंगांत येई, त्याच वेळीं स्वयंवर करीत.

**त्रिंशद्वर्षो वहेत्कन्यां हृद्यां द्वादश वार्षिकीम् ।**
**त्र्यष्ट वर्षोऽष्ट वर्षां धर्मे सीदती सत्वरः॥**

मनूच्या वरील श्लोकाप्रमाणें ३० वर्षांचा नवरा व बारा वर्षांची नवरी, तसेंच २४ वर्षांचा नवरा, आठ वर्षांची नवरी यांचा विवाह करावा असें होतें. परंतु या श्लोका विषयीं मि. आनी वेझंट ह्मणतात कीं, 'एकाच झऱ्या मधून गोड व खारट असें दोन प्रकारचें पाणी केव्हांहि निघत नसतें. यावरून भगवान मनूच्या हातून वरील श्लोक लिहिला जाणें शक्य नाहीं, याबद्दल मला पूर्ण खात्री आहे. धूर्त लोक आपलें कार्य सिद्ध होण्याकरतां श्लोकांची फेरबदल करतात त्याप्रमाणें दुसऱ्या कोणी तरी हा श्लोक घुसडून दिलेला आहे.

बौद्धायनानीं सर्वां आधीं विवाह कालाच्या मर्यादेला शिथील करण्याचा यत्न केला. खालील श्लोकाचा अर्थ त्यानीं असा केला आहे कीं,

**त्रीणि वर्षाण्युदीक्षेत कुमार्यार्तुमती सती ।**
**ऊर्ध्वातु कालादेत स्माद्विन्देत सदृशं पतिम्**
**मनु ॥ ९।९०**

अर्थात 'कन्या रजस्वला झाल्यानंतर तीन वर्षेंपर्यंत वाट पहावी. जर त्याचे माता पिता तोंपर्यंत तिचा विवाह करून न देतील तर ती स्वतःचा विवाह करण्यामध्यें स्वतंत्र आहे.' हें लिहिते वेळीं त्यानें असेंहि लिहिलें आहे कीं, 'ती कन्या ब्रह्मचारिणी अगर नग्निका असली पाहिजे. बौद्धायनांच्या मताप्रमाणें कन्या_जर सोळा अगर याहून ज्यास्ती वयाची असली व पुरुषाशीं संसर्ग करतां येण्यासारखी असेल तर तिला नग्निका असें ह्मणावें.' सत्यव्रत व शौनिक यानींहि हाच अर्थ केलेला आहे.

सातव्या शतकांत निर्माण झालेल्या अमर कोशांत 'नग्निका' याचा अर्थ 'अनागतार्तवा' ह्मणजे जिला रजोदर्शन झालेलें नाहीं ती, असा केलेला आहे. यावरून तिचें वय बारा वर्षांवर आलें व बारा वर्षांच्या कन्येला 'नग्निका' असें समजूं लागले व त्याप्रमाणें त्याच्या आधारार्थ निरनिराळे श्लोक तयार होऊं लागले.

**प्राप्ते द्वादशे वर्षेय: कन्या न प्रयच्छति ॥**
**मासि मासि रजस्तस्या पिता पिबति शोणितम् ॥ यमस्मृति**

जर बारा वर्षांची कुमारी लग्न न होतां घरांत राहिली तर तिच्या बापानें तिचें रक्त प्याल्यासारखें होतें.

**माता चैव पिता चैव ज्येष्ठो भ्राता तथैवच ॥**
**त्रयस्ते नरकं यान्ति दृष्ट्वा कन्या रजस्वलाम् ॥**
**संवतस्मृति**

घरांत जर कन्या रजस्वला झालेली पाहिली तर आईबाप व थोरला भाऊ हीं तिघेंहि नरकामध्यें जातात. आठ वर्षांच्या कन्येला गौरी, नऊ वर्षांच्या कन्येलाहि गौरी व दहाव्या वर्षी तिला कन्या असें ह्मणतात. दहानंतर ती रजस्वला या नावाला पात्र होते.

**'संवर्त संहिता' ॥६६॥**
**उद्वहेदष्ट वर्षामेव धर्मो न हीयत ॥८७॥**
**अ ९ दशस्मृति**

आठ वर्षांच्या कन्येचा विवाह करावा. यांत धर्माचें कांहीं नुकसान नाहीं.

**विवाह प्रशस्त कालमाह सप्रति ॥३॥**
**निर्णयसिंधु**

विवाहाचा उत्तम काल सात वर्षांचा आहे व हा काल गर्भ धरलेल्या दिवसापासून मोजला गेला पाहिजे. अर्थात ६ वर्षे ३ महिनें हाच विवाहाचा उत्तम काल असें निर्णयसिंधु काराच्या मतानें होतें.

असो. स्मृतीची संख्या अठरा असें धरतात. परंतु प्रचलित स्मृतीची संख्या फारच अधिक आहे. यांतील पुष्कळशा ग्रंथांत त्या कालच्या आवश्यकतेनुसार मुलींच्या विवाह कालाची मर्यादा कमी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. दुर्भाग्यामुळें ज्या काळीं हिंदु धर्माला अवनत स्वरूप प्राप्त होत होतें. व देशांत अज्ञानाचा व अराजकतेचा उद्भव झालेला होता. त्या काळीं या स्मृतीची रचना झाली. आतां आपणाला बालविवाहासारखी वाईट चाल कां प्रचारांत आली व या वाईट चालीकडे स्मृतिकारांची बाजू कां झुकली गेली हें पाहिलें पाहिजे. कारण कोणतीहि चाल त्या त्या परिस्थितीप्रमाणें प्रचारांत आलेली असते. व त्याप्रमाणें त्याच्या आधारार्थ ग्रंथहि तयार होत असतात.

आनी वेझंट बाईनीं आपल्या Wake up India या ग्रंथांत ही चाल प्रचारांत येण्याला खालील तीन प्रधान कारणें दिलेलीं आहेत.

१ महाभारत लढाई व देशांत आपआपसांतील झगडा.

२ हिंदुस्थानाबाहेरील रानटी लोकांचे हल्ले व त्यानां बऱ्याच वेळां विजय प्राप्त होणें.

३ स्त्रियांविषयींचा आदर कमी होणें व त्यांचे मानसिक व आत्मिक अधिकार काढून घेणें.

वरील तीनहि कारणें बहुतेक सर्वस्वी खरीं आहेत. देशामध्यें जेव्हां अज्ञानाचें साम्राज्य पसरलें गेलें, लहान लहान जमीनदार आपणाला जेव्हां राजे समजूं लागून आपआपसांत झगडूं लागले, आपल्या जीवनाची व मालमत्तेची ज्या वेळीं लोकाना सुरक्षितता वाटेनाशी झाली, त्यावेळीं ही बालविवाहाची चाल प्रचारांत आली. लोकांना असें वाटूं लागलें कीं, लहान लहान मुलींचा विवाह करून देऊन त्यांनां एक संरक्षक उत्पन्न करावा कारण कदाचित् बापाचा देह जर लढाईंत पडला गेला तर त्याच्या मागें मुलीचा भार तिच्या नवऱ्यावर पडावा.

आपल्या हिंदुस्थानांतील लोकांची अशी समजूत आहे कीं, ते कोणतीहि गोष्ट धर्माच्या अंगांत समाविष्ट झाल्याखेरीज तिचा अंगिकार करण्यांस तयार होणार नाहींत. अधर्म करण्यापेक्षां मरण स्वीकारतील आणि याच कारणामुळें ह्या बालविवाहाच्या चालीबद्दल धार्मिक ग्रंथांत बरेच श्लोक मिळविले गेले व हळुहळू त्याचा परिणाम जनतेवर होऊन वेदकालांतील विवाह संस्काराचा उच्च आदर्श लोकानां पारखा झाला. व नवीन ग्रंथांतील विवाहाबद्दलचे उपदेश हेच आपले पुरातन धर्मसंस्कार आहेत, असें त्यांनां वाटूं लागलें. मुलींच्या विवाह मर्यादेबरोबर मुलांचीहि लग्नमर्यादा कमी होऊं लागली. व अशा रीतीनें ब्रह्मचर्याचा नाश होऊं लागला. या नव्या धर्मशास्त्रानें आमच्या मातृशक्तीची अधोगति करून टाकली. वैदिक कालांतील विवाहाची चाल नष्ट भ्रष्ट होऊन आपली ही पुण्यमय व पवित्र भारतभूमि अपवित्र झाली. या नव्या धर्मशास्त्रांच्या प्रचारानें वैदिक कालांतील २४, २१, व १७ वर्षांच्या विवाहाची मर्यादा पौराणिक कालांत १२, १० ८, व ६ यांवर येऊन ठेपली.

स्त्रियांची अधोगति खालील पांच कारणामुळें झालेली आहे.

१ स्त्रियांचें अविवाहीत रहाणें वर्ज्य केल्यामुळें.

२ त्यांचे मानसिक व आत्मिक अधिकार काढून घेतल्यामुळें.

३ प्रत्येक आईबापांच्या मनावर आपल्या मुलीचा विवाह बाल्यावस्थेमध्येंच झाला पाहिजे. नसल्यास नरक वगैरेचें कृत्रिम भय व खोट्या समजूतींचा पगडा धर्म ग्रंथ व उपदेश याच्याद्वारा बसविला गेल्यामुळें.

४ आपल्या स्वार्थाकरतां मध्येंच नवेनवे श्लोक रचून ते घुसडून दिल्यामुळें.

५ निंदासूचक शुद्रादि शब्दांचा प्रयोग स्त्रियांकरतां केला गेल्यामुळें.

त्या नंतर अधोगतीला आरंभ झाला. जीवन शक्तीचा लोप झाला. प्राचीन कालांतील विदुषी स्त्रिया अधोगतीच्या खाणींत जाऊन पडल्या. आमच्या विवाह संस्काराची चाल आमच्या सभ्यतेला एक लज्यास्पद व निंद्यनीय कार्य होऊन राहिली. हिंदुस्थानांमध्यें बालविवाहाची चाल प्रचलित झाली आज आमच्या या भारत देशामध्यें बालपत्नींची संख्या एक कोटीहून ज्यास्त आहे. यांत कित्येक अशा आहेत, कीं त्यानीं अद्याप आपल्या आईचें दूध पिणेंसुधां बंद केलेलें नाहीं. व त्यांचें वय थोडक्या महिन्यावर आहे. हिंदुस्थानांतील विवाह मर्यादा व बालविधवा यांची कल्पना खालील आंकड्यावरून अवश्य कळून येईल.

| वयोमर्यादा | बालपत्नी | बालविधवा |
|---|---|---|
| ०–१ वर्षे | १३,२१२ | १,०१४ |
| १–२ " | १७,७५३ | ८५६ |
| २–३ " | ४९,७८७ | १,८०७ |
| ३–४ " | ८७,५०८ | ४,७५३ |
| ४–५ " | १,३४,१०५ | ९,२७३ |
| ५–१० " | २२,१९,७७८ | १४,२७० |
| १०–१५ " | ६५,५५,४२४ | २२३,०४२ |

या निंद्यनीय व अनिष्ट विवाहाच्या चालीचा निश्चित परिणाम हिंदुस्थानामध्यें विधवांच्या संख्येचें अधिक प्रमाण होय. इंग्लंड व जर्मनी या दोनहि देशांत विवाहित स्त्रियांची जी संख्या आहे त्या पेक्षां आपल्या भारतामध्यें विधवांची संख्या अधिक आहे. १९११ चा सेन्सस रिपोर्ट पाहिला असतां असें दिसून येतें कीं, आपल्या देशांत विधवांची संख्या २ कोटी ६४ लक्ष २१ हजार ६४२ आहे.

स्त्रियांची विवाह मर्यादा कमी झाल्यामुळें पुरुषांच्या विवाह मर्यादेचें मान कमी होऊं लागलें व ज्यांची जशी इच्छा असेल त्याप्रमाणें विवाहाची चाल तो प्रचारांत आणूं लागला. अत्यंत आश्चर्याची गोष्ट ही कीं, आज विसाव्या शतकांतील कित्येक शिकलेले लोक सुद्धां प्राचीन वैज्ञानिक चाल सोडून ही निंद्यनीय व प्रकृतीविरुद्ध चालीचा स्वीकार करीत आहेत. या बालविवाहाच्या पद्धतीमुळें आमचा समाज अधोगतीला पोंचलेला आहे. करतां पुढच्या लेखांकांत या बद्दलचा विचार करूं.

Ano 9 N. 46

Quinta-feira 12 de Fevereiro de 1925

ASSINATURA
por cada ano tres rupias.

ANUNCIOS
por ... ainda que repetida uma tanga
... avulso uma tanga

...TOR E EDITOR
... Hegdo Dessay
...m-Goa

# भारत

BHARAT

वर्ष ९ वें. अंक ४६

गुरुवार ता. १२ फेब्रुवारी सन १९२५

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. ( आगाऊ )

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें–गोवा

S. R.
Biblioteca Nacional
Pangim

## EM ... PAZ

O sr. dr. S. Rau, primeiro bacharel hindú, formado na Universidade de Lisbôa, acaba de dedicar á *Politica Hindú* um artigo que o jornal europeu *A Provincia* inseriu no seu lugar de honra.

O sr. dr. Rau que, de resto, nos merece consideração não só pelo seu estudo mas tambem pela sua educação, perdeu, como se costuma dizer, uma bôa ocasião de estar calado.

Sua Excia, desde que regressou de Lisbôa, investido na magistratura judicial, tem contraido o habito de alhear-se da politica de toda a sorte, lidando, tão sómente, com os livros do seu *metiér*.

O ilustre magistrado não pode saber, portanto, bem o que seja a politica hindú que não é qualquer coisa que se pareça com algum artigo do Codigo Penal ou com alguma disposição da Novissima Reforma Judiciaria.

E quem emite pareceres conselheiros sobre assuntos desconhecidos, comete um grave erro de incompetencia e pratica uma falta de leviandade.

As considerações do sr. dr. Rau sôbre a *Politica Hindú* pecam, por conseguinte, por incompetencia e leviandade, por quanto incidem elas sobre uma tése que o distincto primeiro bacharel hindú não procurou, pelo visto, conhecer em todas as suas fases, particularidades e minudencias, antes de aprecia-la públicamente.

Claro é, portanto, que o aliás brilhante artigo do sr. Rau não pode ser considerado como um termómetro pelo qual se procure graduar a temperatura da *Politica Hindú*, na qual, para mais, Sua Excia. não tem *inspiração* nem filiação partidaria, como se viu.

Se o artigo do sr. Rau é destituido de valor algum como termómetro *pelo qual se procure graduar a temperatura da Politica Hindú*, êle se reveste, porêm, de grande importancia como instrumento de medição do *calor* da politica governamental. O que no artigo em questão se encontra traduzido, não é o sentir dos *jovens* ou *velhos hindús*, mas sim está ali expressa a *orientação* que a burocracia entende que a *Politica Hindú* deve seguir. Só isto e nada mais.

Pela *bôca* da caneta do sr. dr. Rau não fala, pois, a *Opinião Hindú*, com a qual Sua Excia. tanto se familiarisara, tendo-lhe até dado a sua melhor seiva, antes de ir cursar em Lisbôa. Quem fala pelo mesmo *bico*, é a burocracia, inimiga declarada do elemento popular, quere êste seja hindú, quere não.

¿Será o sr. dr. Rau capaz de jurar que as recentes afirmações contidas no seu artigo de *A Provincia* não vão de encontro com as velhas, bordadas *in ilo tempore* no seu jornal *A Opinião Hindú* e na sua revista *Chitacarchana*?

Crêmos que não.

E' que Sua Excia. não era então, como hoje, magistrado judicial ocupando um alto cargo de confiança governamental. Era um jornalista, como o somos agora, de confiança popular, de permanente lida com *a gente do Povo*.

E porisso mesmo repetimos que, quebrando o scilencio que sempre é de oiro, o sr. Rau perdeu uma bôa ocasião de estar calado.

De resto, com o seu artigo, o festejado primeiro bacharel hindù não invalida nenhum dos argumentos, aduzidos nas suas colunas pelo *Bharat* em volta da *Politica Hindú* que, não admitindo na concretisação do seu supremo desiderato violencia de especie alguma, está muitissimo longe de merecer o apôdo de *subversiva*, como o sr. dr. Rau, hoje governamental, pretende classifica-la, menospresando a circunstancia de estar *sub judice* uma das inofensivas e constitucionais manifestações da mesma *Politica*.

Diga-se isto em bôa paz.

## Insistindo....

O nosso presado colega de *A Epoca* promete, a proposito de concepção errada, dar-nos a sua resposta completa, logo que tenhamos conhecimento dos *ponderosos motivos que determinaram a exoneração* a que nos referimos.

Insistimos com o distincto colega—se isto não o incomoda—em que se digne de frisar e em tom claro, visto que já se extinguiu a tal fogueira, em que consiste a *concepção errada de alguns hindús*, sendo certo que a nossa insistencia se baséa na certeza matemática de que nunca lograremos explicação solicitada no nosso suelto *Porque!*

Crêa o colega que o nosso pedido não mascara nem envolve nenhum jogo politico: representa apenas o vivo desejo de apreciarmos a tal *concepção errada* que vergastaremos sem dó nem piedade, no caso em que se comprove a sua existencia.

Que diabo! Não queremos que a *Politica Hindú* se vicie, se macule e se comprometa com *concepções erradas*. A nossa ancia é que ela cresça e se desenvolva, completamente livre de quaisquere defeitos que, porventura, possam contribuir para lhe apoucar o valor moral e social.

Pois é verdade, ilustre colega!

Despresamos, sempre, a dissimulação que a diplomacia julga ser condição *sine qua non* da Politica. E despresamo-la, ainda com o risco de nossas pele e despauperada fortuna.

Na *Politica*, os *fins* tem de ser claros como claros tem de ser os *meios* destinadas á consecução dos mesmos *fins*. E, como crêmos que o nosso colega bardezano tambem comunga nêste nosso modo de ver politico, é que pretendemos que a *Epoca* seja clara e desassombrada na explicação da *concepção errada* que viu em alguns hindús e que, levada pelo único desejo de os enveredar pelo bom caminho, denunciou, em tom vacilante, *para não lançar achas na fogueira que se ia atear, devido á estouvada atitude de certos.*

## LIVRARIA MODERNA

O sr. Francisco Luiz S. Mergulhão, proprietario desta importante Livraria vende livros a preços módicos, aos preços da propria factura, o que já representa grande vantagem aos compradores.

Segundo o conhecimento que temos do sr. Mergulhão, podemos afiançar que, se a compra de toda a sore de livros, tais como escolares, literarios, judiciais, didaticos, scientificos, romanticos, religiosos, é proveitosa aos particulares, muito mais se o torna ainda aos gabinetes de leitura, destinados ao público. E' vêr e crêr.

Experimentem que a experiencia só lhes será lucrativa.

मालाला मागणी येत आहे. पण ती पडली फारच थोडी. पण आतां नवीन स्वराजिष्ट महाराष्ट्रीय कदाचित पुनः हळुहळू याच मालाची मागणी करतील असें वाटतें. पाहूं आतां काय होतें तें. " याच दालनांतील दुसऱ्या एका कपाटांत कांहीं औषधी कुप्या होत्या. त्या मीं सहज पाहूं लागलों तों एकावर " शिवराळभाषामृत " " ग्रामकेसरीछापचूर्ण " " मर्कटचेष्टावलेह " " विषलेखनींसंजीवनी " " कुचेष्टापाक " " बुद्धिवादकुठार " इत्यादि भपकेदार नांवें होतीं. या औषधांकडे मी सकौतुक नजरेनें पहात असतां मालक त्याचे मला एकएक गुण समजावून सांगत होता. तो म्हणाला, ' पुढारी ', विशेषतः जहाल पुढारी बनविण्याच्या कामीं या औषधांचा फार उपयोग आहे. हें ' शिवराळभाषामृत ' थोडेंसे पाण्यांतून घेतलें कीं वाटेल तसलें वेडेंवांकडें वक्तृत्व करण्याची शक्ति आंगीं येते व मग कांहीं दिवसांनी पुढारी बनतां येतें. या अमृताच्याच जोडीला हें चूर्ण आहे. वास्तविक खऱ्या देशभक्ताला व पुढाऱ्याला केसरी गर्जनाच पाहिजे पण अशानां नेहमीं सांपळयांत ठेवण्यांत येत असल्यामुळें पुष्कळ लोकांनीं आमच्याकडे इच्छा प्रदर्शित केल्यामुळें आम्हीं हें नवीन चूर्ण बनविलें आहे. याचीहि गर्जना कमी नसते व विशेषतः बायाबापड्यांना भिवविण्यास हेंच साधन बरें असतें पण तें कोठपर्यंत तर कोणी तसाच भेटून पाठीवर दांडा मारिला नाहीं तों पर्यंत. बाकीच्या या औषधाच्या कुप्या देखील वक्तृत्वाच्या व लेखनाच्या कामीं फार उपयोगी आहेत. या दालनांत आगली कांहीं पाहण्यासारखें राहिलें नाहीं म्हणून आम्हीं तिसऱ्या दालनांत गेलों.

या दालनांत याच कारखान्यांत तयार झालेल्या बराचशा नव्या जुन्या दे० भ० ची व पुढाऱ्यांची गर्दी जमली होती. त्यांच्याकडे स्वाभिमानपुरस्सर पहात मालक मला म्हणाला ' पहा ही सर्व मंडळी या कारखान्यांतून बाहेर पडलेली आहे. या कारखान्यात येण्यापूर्वी या प्रत्येकाची स्थिति अतिशय हलाखीची असे. कोणी भिकारटाकार पगारावर मास्तरकी करीत, कोणी कोर्टांतून उगीच इकडे तिकडे येरझारा घालीत व संध्याकाळीं हात हालवित परत येत, कोणी आपआपल्या नुकत्याच उघडलेल्या दवाखान्यतून रोग्यांची वाट पहात शुद्ध माशा मारीत असत. अशा कोणत्या ना कोणत्या निरुद्योगी धंद्यांत ही मंडळी गढून गेलेली असे. परंतु पूर्वपुण्याईमुळें या कारखान्यांत चालून आल्याबरोबर त्यांची सर्व नवलाई आतां पालटली आहे. या वकीलसाहेबांची आज हजारों रुपयांची प्रक्टीस आहे, व अशीलांची गांठ घेण्यास देखील त्यानां आतांशी फुरसत मिळत नाहीं. या डाक्टरसाहेबांचेंहि तसेंच. हा मास्तर आतां मोठा वर्तमानपत्रकार झाला आहे. असे एक ना दोन अनेक फायदे आमच्या या कारखान्यांपासून आहेत "

मालक एवढे शद्ब बोलतात तोंच ती सर्व देशभक्त मंडळी उठली. कांहीं सहज भेटण्यासाठीं म्हणून आलेले जुने इरसाल देशभक्त निघून गेले. पण नवीनच बनलेल्या देशभक्तांची एक फेरतपासणी मालकाच्या मनांतून करावयाची होती. त्यांपैकीं किित्येकांत अद्याप प्रामाणिकपणा, नैतिक सदाचरण, ऋजुता, गरीबीची आवड, मुग्धपणा इत्यादि दुर्गुण होते ते एका फुंकणीसरसे घालवून त्यांत भोंदूपणा, लबाडी, आढ्यता, श्रीमंतीची हांव, पोकळ डौल, वाचाळता इत्यादि सद्गुण एका भात्यावाटे घालून झाल्यावर ते देशभक्त व पुढारी विजयोत्फुल्ल मुद्रेनें आपआपल्या गाड्यांतून चालते झाले व कांहीं फी न घेतां तो कारखाना मला फुकट दाखविल्याबद्दल मालकाचे मनःपूर्वक आभार मानून मीहि घरीं परतलों.

# गोमंतकी भाषा

गोमंतकी भाषेला गोवी, गोवेंगिरी, हिंगाडीं अशीं नांवें असून कोंकणी असेंहि म्हणण्याचा परिपाठ आहे. गोमंतक हा देश प्राचीन कालापासून प्रख्यात आहे. परशुराम क्षेत्राची ही सीमा आहे असा आधार सांपडतो. " गौ म्हणजे बाण, मा म्हणजे मान आणि अंत म्हणजे शेवट, ह्या तीन संस्कृत शब्दांचा मिळून हा शब्द साधित झाला असल्यामुळें परशुरामानें मारलेल्या बाणाची ज्या ठिकाणीं सीमा होते तें स्थल, असा त्याचा अर्थ होतो." कोणी कोणी ह्याला गोमांतक असें म्हणतात, परंतु मांचे ठिकाणीं मं योजणें प्रशस्त असें पणजी येथें कांहीं वर्षांमागें "गोमंतक" नांवाचें साप्ताहिक पत्र निघत असे त्याच्या पहिल्या अंकांतील निराकरणावरून सिद्ध होतें. भारत वर्षीय कोषांत देखील " गोमंतक " असें आढळतें.

सह्याद्रीच्या पश्चिमेकडील अरुंद पट्टीस कोंकण असें म्हणतात. ह्याला कुङ्कोण किंवा कुङ्कण, अरिअक, अपरांत [पश्चिम टोंकावरील देश], शूर्पारक ( सुपारगारिखा देश ) अशादि संज्ञा आहेत. कोंकणाचे उत्तर आणि दक्षिण असे दोन विभाग झाले आहेत, त्यांतील दक्षिण प्रदेशांत गोमंतकाचा समावेश होतो. " गोमंतदेश मध्य कोंकण ॥षोडस योजनें विस्तीर्ण ॥" असा कोंकणाख्यानांत उल्लेख आहे. प्राचीनकाळीं सप्तकोंकण ह्या नावानें जे सात भाग ओळखण्यांत येत असत त्यांमध्यें " गोवराष्ट्र " (गोवा किंवा गोवें) आणि कोंकण ( रत्नागिरी आणि ठाणें हे जिल्हे ) असा भेद दिसून येतो. एका त्रैमासिकात " कर्नाट किंवा कानडी प्रदेशाचा वरचा भाग खास कोंकण ह्या नावानें ओळखला जातो. ह्या कोंकणाची दक्षिण सीमा गंगावळी नदी व उत्तरसीमा सोपाऱ्याजवळचीं वैतरणी नदी होय" अशीहि माहिती उपलब्ध होते.

कितीएकांच्या मतें गोव्यांत कानडी राजांची सत्ता स्थापन झाली त्यावेळीं गोवेंकरास कोंकणे व त्यांच्या भाषेला कोंकणी असें म्हणण्याचा प्रघात पडला व हाच प्रघात पुढें खिस्ती लोकांत रूढ होऊन सरकार दरबारांत गोमंतकी भाषेला कोंकणी(Concani- Concanim ही चूक असें ठरलें आहे ) भाषा ही कायमची सनद मिळाली.

सन १९१० सालांत सांवतवाडी संस्थानांत Elementary Concani Grammar ह्या नांवानें कोंकणी भाषेच्या व्याकरणाचीं मूलतत्वें प्रसिद्ध झालीं आहेत, त्यांतील प्रस्तावनेंत The most notable varieties of Concani are असें लिहून कोंकणीचे फार प्रसिद्ध असे चार भेद दाखवून दिले आहेत ते:— कुडाळी किंवा मालवणी ( सांवतवाडी संस्थान आणि वेंगुर्लें व मालवण ह्या दोन तालुक्यांमध्यें बोलण्यांत येणारी भाषा ), गोमंतकी ( गोवेंकरांची बोली ), कारवारी ( कारवारच्या शेणवी आणि शेणवीपैकीं = शणयपैकीं = ब्राह्मणांची बोली ) आणि मंगळुरी (दक्षिण कानड्यांतील खिस्ती लोकांची बोली) तात्पर्य, गोमंतकी भाषा ही कोंकणीचा एक भेद असें वरील पुस्तकांत दर्शविलें आहे.

भाषाकोविदांच्या मतें गोमंतकी आणि कोंकणी ह्या निरनिराळ्या आहेत. पुरातन कालीं ह्या भूतलावर ज्या छपन्न मानवी भाषा प्रचलित होत्या त्यांत गोमंतकी आणि कोंकणी ह्यांचा भिन्नत्वानेंच समावेश होतो. गुंजीकरांचें सरस्वती मंडळ, जोशांचें प्रोढबोध व्याकरण, पावग्यांचें भारतीय साम्राज्य, राजवाड्यांची ज्ञानेश्वरी वगैरे उपयुक्त पुस्तकें चाळून पाहिल्यास गोमंतकी भाषा ही कोंकणी असें म्हणण्यास मुळींच आधार नाहीं. अस्सल कोंकणी भाषेचा मासला ' करमणूक " साप्ताहिकाच्या जुन्या फायलींत मां एकदां पाहिला होता व त्याचा उताराहि घेतला होता, तो १९२३ सालांतील १९ जुलैच्या सांखळींतील महापुरांत विसावा घेत पडला. कदाचित खिस्ती लोक अधिक्यानें गोमंतकी भाषा ही कोंकणी भाषेचा एक भेद आहे अशी फुशारकी मारीत असतील, परंतु "गोमंतकी अपभ्रंशांत कांहीं किरिस्तांवी धर्म पुस्तकें व चार पांच व्याकरणें झालीं आहेत" हा राजवाड्यांच्या ज्ञानेश्वरींतील शेरा पाहिल्याबरोबर खिस्त्यांनीं शिक्का मोर्तब दिलेली कोंकणी ही खास कोकणांतील अस्सल कोंकणी नसून गोमंतकी भाषेचें अपभ्रष्ट स्वरूप होय अशी त्याच्या शब्दोच्चारावरून खातरी होते. मासल्यादाखल खिस्त्यांच्या कोंकणींतील एक उतारा देतों:—

" तूं सांगतीय तेंच खोरें. आंव नोकों या मुकार तूं कितें कितें दाकोयशी तें, गोडिये फातराक रोगोत आसा मुण दाकौन खोरो."

वरील मजकुराचा गोमंतकींत अर्थ:— तूं सांगता तेंच खरें. हांव नकळे ह्या मुखार तूं कितें कितें दाखयशी तें, घडिये फातराक रगत आसा म्हणून दाखौन खरो.

## मराठींत भाषांतर

तूं सांगतोस तें खरें. मी नकळें ह्यापुढें तूं काय काय दाखविशील तें, कदाचित दगडाला ( फत्थराला ) रक्त आहे म्हणून दाखवून खरा-

काहीं संस्कृत शद्ब परिणति होऊन येतात. उदाहरणार्थः ओस्तोरियो [ स्त्रिया ], पोमोंणें ( प्रमाणें ), वोर्तोता ( वर्ततो म्हणजे होतो किंवा ठरतो ह्या अर्थी ), चोतुरकायेन ( चतुराईनें ), सुरोपाचो ( स्वरूपाचा ), मोत ( मति ], सोन्तोस [ संतोष ], मोदें ( मध्यें) शेकीं ( शेखीं म्ह० शेवटीं ).

कितीएक खिस्ती ख चे जागीं ह किंवा फ ची योजना शद्बार्थापरत्वें करीत असतात, उदाहरणार्थः हा ( खा ), फोरें ( खरें ) इ० माझ्या मतें ह्यांत नवल नाहीं. भिन्नभिन्न जातीच्या अशिक्षित लोकांत हे फरक दृष्टोत्पत्तीस येतात. गुजराथी लोकांत चटईला सादडी म्हणण्याऐवजीं अशिक्षित हादडी म्हणतात. तसेंच ळ चे जागीं र चा उपयोग करतात असा अनुभव आहे.

गोमंतकी भाषेची रचना केव्हां आणि कशी झाली ह्याचा अद्यापि पक्का निर्णय झालेला नाहीं असें माझें ठाम मत आहे. हें मत लोकमताला बाधक नाहीं. कोणी म्हणतात ही स्वतंत्र भाषा [ Lingua autonoma ] कितीएकाच्या मतें ही पोटभाषा ( Dialecto ) हा वादग्रस्त प्रश्न आहे. आजचा विषय गोमंतकी आणि कोंकणी ह्यांच्यामध्ये छतिसाचा आंकडा असावा असें सप्रमाण दाखविण्याचा प्रयत्न आहे. सांप्रत गोमांतकी भाषा ही अठरा धान्याचें कडबोळें बनली आहे म्हणण्यास हरकत नाहीं. ह्या भाषेंत शुद्ध गोमांतकी शद्बांशिवाय संस्कृत, मराठी, कानडी, गुजराथी, पोर्तुगीज, इंग्रजी इत्याद्यनेक भाषांमधील शब्दभाडार कमज्यास्त प्रमाणानें परिणत स्वरूपानें संग्रहित झालें आहे. ह्याचें शतमान काढलें नसलें तथापि गोमंतकीय मराठी परिणत आणि विपरिणत शब्दाची निदान तीन चतुर्थांश संख्या आढळून येईल.

मासल्याकरितां कांहीं शद्ब पुढे देण्यांत येत आहेत:

### शुद्ध गोमंतकी

पांचवे ( पाचवें–पाच ह्यावरून–हिरवें ) हळदुवे किंवा हळदुवें ( हळद यावरून– पिवळें )

| | |
|---|---|
| तुतया – हातोडी. | हांदुरली–रांजणवाडी |
| अपुरवाय–लाड | भुती–शिदोरी |
| होंकल–नवरी | हुलुक–पिसू |
| रोईण–वारूळ | सूर–ताडी |
| जळार–मुरकूट | आळणो–विझणा |

### मराठी परिणत म्हणजे विकृत शद्ब

| | |
|---|---|
| झंगाट–जगांट | वल्हें–होलें |
| सनई–सेनाय | वोगण–भगुणं |
| कलथा–कायलातो | अस्वल–वांस्वेल |
| बोका–बुक्लो | ढेंकूण–भिकूण |
| शपथ–सपूत | वाळा–वाळेरू |
| बांदें–बेंदह्ल, बेंदुर्ली | ऐरण–हरण |
| दायाद–दायजी | |

### जुन्या मराठींतून

वर्कुल (वोरकली)– सोनें कसायाचा पाषाण

| | |
|---|---|
| आपे–बोलाव | वच–जा |
| मुदी ( मुद्रा )– | आंगठी |
| हडप– ( हडपू ) | पेटी. |

गोमांतकींत न्हाव्याच्या धोकटीस लागू झाला.

| | |
|---|---|
| सान्न–केरसुणी | अनवाळें–सोवळें |

दुसऱ्या लेखांकांत अन्य कांहीं भाषांमधील शद्बांचा मासला दिला जाईल.

O sr. dr. Constancio Roque da Costa, monarquico ferrenho que, por signal, nao consentiu que se desse sequere um viva a' Republica, na manifestaçao que alguns amigos seus lhe promoveram neste concelho de Quepem, ha' anos, facto que se acha constatado no arquivo do *Bharat*, como iamos dizendo, o sr. dr. Roque da Costa passou ao sr. dr. Jaime de Morais um atestado donde consta que este senhor e' o milhor governador que a India viu.

E' caso para dizer: "similes simili bus congregantur."

Se o sr. Roque da Costa representa uma garrafa de vinho velho com rotulo velho, o sr. Morais e' *avatar* do mesmo liquido mas com rotulo novo, isto e', ambos sao *vinho velho*.

Se nao que diga a perseguiçao a cintosa que o sr. Morais promoveu a' imprensa indiana, o ataque ao jornalista Liberio Pereira, o "Caso Canvorem," a politiquice recente de Sanguem etc. etc., o que se conforma muito bem com a modalidade de ser da *ominosa* que a *luminosa* diluiu ..

E' como se explica a origem do panegirico tecido pelo sr. Costa ao sr. Morais. Estimamos.

## BRAVO!

Nao nos surpreendeu mas indignou deveres a atitude do sr. dr. Jaime de Morais de, a' força do seu absolutismo policial, ter querido intervir num assunto afecto ao poder judicial.

A politiquice sempre foi ma' conselheira. Ela longe de acreditar o seu autor, avilta-o no conceito publico.

Referimo-nos a' eutrega forgada do cofre municipal de Sanguem. Ele estava "seneteado" abusivamente, a buso sobre que corre um processo crime na Comarca de Quepem. Era claro, portanto, que a entrega nao podia ser efectuada sem que a justiça tivesse cumprido diligencias necessarias.

Mas a politiquice! Quantas vitimas ela nao faz ?!

O que em toda essa miseria e pouca vergonha de Sanguem nos encheu de entusiasmo, e' a firme, patriotica e desassombrada atitude do sr. *S. V. Dessai* que soube honrar o seu ilustre nome e dos eleitores que guindaram a' presidencia da Camara Municipal que tanto deu que fazer ao sr. dr. Jaime de Morais.

A redacçao do *Bharat*, mesmo con tra vontade do seu director, parente do sr. Dessai, sauda daqui na pessoa deste um preclaro cidadao que com o seu acrisolado patriotismo e coragem a toda a prova, dignificou a sua Patria.

## NOVIDADE!

Nos jornais da ultima mala, vem inserta a seguinte novidade:

"Vai ser presente ao Conselho Legislativo do Estado da India o projecto de uma nova Carta Organica da provincia. O fim principal deste projecto e' reduzir as direcçoes gerais, de forma a concentrar em tres repartiçoes os diversos serviços, distribuidos por varias secretarias. As repartiçoes que vierem a criar-se, serao assim denominadas: Administraçao Civil e Politica, Finanças e Fomento.

Daqui ha nada temos, portanto mais uma "novidade organica."

¿Mas resultarao algumas vantagens praticas ao orçamento da Provincia?

¿Sera' a tal remodelaçao capaz de matar de vez o DEFICIT que nos atormenta deixando a' fome o esfarrapado funcionario?

Ignoramo-lo. E' bom, por isso, que nos conservemos de braços crusados, e com *bucho* apertado, antes que a novidade nao nos prove a sua eficacia E' prudente....

## UMA FATALIDADE

"O proprietario da tona de passagem do rio da Talpona ralhou com dez mulheres do povo que pretendiam passar para outra banda do mesmo rio. A indisposiçao do marinheiro levou .. as a que elas se afoutassem a ganhar o ponto desejado a vau: mas a fatalidade fez que das dez referidas mulheres, seis morressem submergidas no aludido rio, ficando salvas as restantes quatro por uma verdadeira maravilha!

E' pena que o marinheiro estivesse indisposto e fosse causa indirecta do lamentavel desastre. E" o que nos informam.

———

No numero seguinte publicaremos a brilhante crónica do sr. *Crispin*.

# Livraria Moderna

## DE

**Francisco Luis S. Mergulhao**

**Recebeu:**

*Luis Osório*, Notas do Código Penal 2.°, Legislação sobre o Proc. Penal; *L. Teixeira Magalhães*, Manual do Proc. Penal; *Sampaio*, Manual dos tribunais; *C. Pacheco*, Cod. cit., anot., *Loureiro*, Cód Civ., dito proc. civ. anotados; *Mata*, Manual das juntas de freguesia; Cod. Administrativo de 1896 (em vigor); Cod. Proc. Comercial.

*Campos Monteiro*, Os Lusiadas anot e prefaciad ; *A. M. Teixeira*, Táboas de logaritimos, *Figueirinhas*, A. B. C. estilo e da composição; *João Franco*, Cartas de D Carlos; O livro do sr. João Franco; *Rocha Martins*, Monarquia do Norte, Marquez de Pombal; *T. Vasconcelos*, Memórias de um caçador de elefante; *P. Bourget*, coração enamorado; *Marden*, O sucesso pela vontade, Sê perfeito, Alegria de viver, Milagres do amor; *Bordado Pinheiro*, M. de torneiro e frisador mecânico; *Ag. Campos*, Ler e tres ler; *Dr. A. de Aguiar*, Sciencia Sexual, Virgindade; *A. Bell*, Alguns aspectos da literatura; *Candido Figueiredo*, Dicionario, 2 v.

A' venda no sr. Basilio da Silva, Novo Mercado, e na sucursal de Jorje e Figueiredo (Velho Mercado), Margão.

Não se responde ás cartas quando não venham acompanhadas de sêlos para resposta.

---

## ADMINISTRACAO DO CONCELHO DE QUEPEM

## EDITAL

O advogado Mariano da Piedade Rebelo, administrador do Concelho de Quepem

Faço sáber e mando, a bem da ordem publica, que durante os dias do proximo carnaval se cumpra o seguinte:

1.° São expressamente proibidas as máscaras ou scenas alusivas que ofendam a moral publica, quaisquer entidades oficiais ou particulares ou quaisquer religião;

2° Os que queiram organisar danças, toque, brincos ou cortejos solicitarão desta administração, nos termos da Portaria Provincial n° 473 de 20 de dezembro de 1899, a competente licença que será registada na respectiva regedoria, devendo ser indicado no requerimento tanto o numero, nomes e residencia dos requerentes, como os trajes ou custumes que pretendem usar, e comprovando-se são vacinados ou passodas de variola;

3° Não haverá brincos nas povoações, onde houver variola numa área de raio de um kilometro do local infectado;

4° Não é permitido atirar nas ruas ou ás janelas quaisquer objectos que possam incomodar, ferir ou molestar o publico ou deteriorar a propriedade dos cidadãos;

5.° Os que transgredirem as disposições do presente edital serão presos como desobedientes aos mandados da autoridade.

E para constar se mandou publicar este edital no Boletim Oficial e nos jornais deste concelho e outros de igual teor serão afixados nos lugares de estilo.

Quepem 12 de Fevereiro de 1925.

O administrador do Concelho

*Mariano da Pidqade Rebelo*


**Rubber Stamp Manufacturing C.°**

Nas nossas oficiuas se fabricam diversos artigos, tais como toboletas com dizeres, panos he variadas pinturas para teatro, calendarios duradouros de zinco, carimbos de borracha de todas as qualidades, sinetes para lacre, tinta para carimbos, almofadas para os mesmos, datadores, numeradores automaticos e molduras para retratos etc.



PROPRIETARIO:

*DHARANKAR* MARGAO-GOA

# गोमंतकी भाषा

लेखांक २ रा.

श्रीयुत जोशी आपल्या ' मराठी शब्द सिद्धि ' ह्या पुस्तकांत अपभ्रंश दोन प्रकारचे आहेत असें सांगतातः ' रूपापभ्रंश व व रूपार्थापभ्रंश. जेथें शद्बांचें रूप बदलतें पण अर्थ बदलत नाहीं तेथें तो रूपापभ्रंश जाणावाः जसें, सिंदूर,-शेंदूर, अमंगळ-ओंगळ इ०. जेथेंशद्बांच्या रूपांबरोबर त्यांच्या अर्थांतहि बदल होतो तेथें तो रूपार्थापभ्रंश जाणावा. जसें, आचमन-आंचवणें, अन्य-आणि इ० "

गोमंतकी भाषेंत कोणी कोणी ड चे ऐवजीं ण ची, ग चे जागीं क ची व द चे बदली न ची योजना करीत असतात; उदाहरणार्थ, मांड [ दुकान ] ह्याचा माण, कांदो ( कांदा ) ह्याचा कानो, उगड ( उघड क्रि० ) ह्याचा उकड असा उच्चार करण्यांत येतो. मांड हा शब्द मांडणें ह्यावरून तयार झाला ह्मणून उ चाच उच्चार कायम राहणें इष्ट आहे. बाराखडींतील आ ह्या स्वराचें चिन्ह ज्याला मराठींत ( ा ) असें ह्मणतात त्याचें गोमंतकींत कानो असें रूप झालें, हें अर्थ भिन्नत्व लक्ष्यांत येण्या साठीं कांदो ह्याचें कानो असें रूपांतर होणं शक्य नाहीं. उकडणें ह्मणजे शिजविणें, हा शद्ब उघडण्याच्या क्रियेला लागू करणें ह्मणजे जरा चमत्कारिक आहे.

[illegible] ज्ञान नोंठिका [illegible]

हातीं है मराठी भाषेस अनुलक्षून श्रीयुत जोशी शब्द सिद्धींत ह्मणतात कीं, ' मुसलमानी अंमल झाल्यावर मराठींत पारशी व आरबी शब्द आले. त्यानंतर युरोपियन लोक इकडे आल्यावर पोर्तुगीज, फ्रेंच व इंग्लिश शब्दहि आले. त्याच प्रमाणें हिंदी, गुजराथी वगैरे देशभाषांतले शद्बहि मराठींत आढळतात. हीच स्थिति गोमंतकी भाषेची आहे. मराठी शिवाय इतर कांहीं भाषांमधून जे शद्ब गोमंतकींत घुसले त्यांतील थोडे खालीं देतों.

वंगालींतून

सांकव – बं. सांको ह्याचें रूपांतर ( पूल )
हालवेकार – बं. हालुइकर ( हलवाई )
भितर – बं. भितर ( आंत, मध्यें )
बुन्याद – बं. बनियाद [ पाया ]
पोटली – बं. पोंटला [ गांठोडें ]
चलो – बं. छेले ( मुलगा )
तेरीज – बं. तेरिज [ बेरीज )
बेकार – बं. बेकार ( रिकामा ]
आराव – ब- आराब ( शब्द, ध्वनि, ह्यावरून गोमंतकींत ताशाला नांव दिलें. ]

गुजराथींतून

कुटको – गु. कडकरे, कुटको ( तुकडा )
नळे – गु. नळिया ( कौलें )
भेरो – गु. बेहेरो ( बहिरा )
दिवली – गु. दिवी ( समई )
पोरूं – गु. पोर ( गुदस्तां )
तिसीं – गु. तिरछुं ( तिरवा )

कानडींतील

कॅप – का. कॅपु [ माणिक लाल नांवाचें रत्न )
तुवक -- का. तुबाकी ( बंदूक )
कुत्रों -- का. कुत्रॅमर ( डोलकाठी )
बरय -- का. बरि, बरे, बरेयु ( लिही )
हाऊ -- का. हावु ( साप. गोमंतकींत बागुलचा वाचक झाला. )
दुडू -- का. दुडु ( पैसा )
भांगर - का. भंगार ( सोने )
सांसव -- का. सांसिव [ राईह्म० मोहरी )
मोंचे -- का. मॉच्चॅ ( पायांतले जोडे )
मांव -- का. माव ( सासरा )
सांबार - का संभार ( मसाला )

संस्कृतांतून

भोव – सं. बहु ( फार )
आपय – सं. आव्हय ( बोलाव )
निसण – सं. निःश्रेणि ( शिडी )
सपण – सं. सोपान ( जिन्याची पायरी )
हांव – सं. अहम् ( मी )
पूत – सं. पुत्रक ( मुलगा )
मानांय - सं. मानव ( मनुष्य व ह्यावरून मजुरास लागू झाला )
राजू – सं. रज्जु ( विहिरीचा दोर )
वच – व्रज ( जा )

फिरंगीमधून

चावी – फि. शावि ( किल्ली )
आरमार – फि. अर्मारियु ( कपाट )
रेगादोर – फि. रेगादोर ( हजारा, फुलझाडांस पाणी घालण्याचें बारीक छिद्रांचें पात्र )
बल्ड – फि. बार्रील ( मध्यम प्रकारचं पीप ]
बुयांव – फि. बुयांव [ वरणी [
जनेल – फि. ज्यानेल [ खिडकी ]
[illegible]
कलियाद – फि. काद्रियादु [ ताळें ]
बिरव – फि. ब्रेव [ डामर, डांबर ]
खांप्री – फि. काफ्रि [ हबशी ]
बंदेर – फि. बांदैर [ बावटा [

इंग्रजींतून

बोत्ल – इं बाट्ल ( बाटली )
पाकीट – इं. पॉकेट ( पिशवी. ह्याची हँडबॅग किंवा पैशांची पिशवी ह्याकडे योजना झाली ]
टाइप – इं. टाइप् ( छापण्याचे खिळे ]
नोट – इं. नोट [ कागदी नाणें ]
तिफीन – इं टिफ्फिन [ फराळ उपहार फिरंगी लोकांत न्याहारी व दुपारचें जेवण ह्याच्या मधल्यावेळचा उपहार )
रूळ – इं. रूल [ नियम, गोल आंखणी ]
मार्क – इं- मार्क [ गुण ह्म. परीक्षेंतील वगैरे मार्क. ]
मार्किट – इं मार्केट ( बाजार ]
मास्तर – इ, मास्टर [ शिक्षक ]
पोष्ट – इं. पोष्ट [ टपाल ऑफिस. क्वचित रूढींत आहे. ]

ह्यांशिवाय रजिष्टर, प्रेस, पेन्सील, स्लेट, फी, बूक, पास इ० शब्दहि प्रचारांत अहेत. रजिस्टर, ऑगस्ट, पोस्ट ह्यांचे जागीं रजिष्टर, ऑगष्ट, पोष्ट असें लिहिण्याविषयीं श्री. रामचंद्र भिकाजी जोशी ह्यांचें मत आहे.

गोमंतकी भाषा स्वतंत्र कीं परतंत्र हा विचार येथें कर्तव्य नाहीं. ह्या भाषेचा मराठीशीं निकट संबंध आहे एवढें खरें. प्रत्येक भाषेंत अन्य भाषांमधील शब्द समुच्चय असतोच. खरी व्युत्पत्ति पाहूं गेल्यास दीर्घ काल परिशीलन करावें लागेल. बंगाली भाषेंत वगैरे कांहीं पोर्तुगीज शब्द मला आढळले तेः

वंगाली

आलपिन – पो. आलफिनेति [ धातूची टांचणी ]
केदारा – कादैर [ खुर्ची ]
आस्ताबल – पो. इस्ताबुलु [ गोठा ]
बरंड – पो. वारांद [ ओसरी, पडवी ].
रसिद – पो. रेसिबु [ पावती ]
कामीज – पो. कामीज [ खमीस, शर्ट ]
जानाला – पो. ज्यानेल [ खिडकी ]
आलमारी – पो. आर्मारियु ( कपाट )
काकातुया – पो. काकातूअ ( पोपटाच्या वर्गांतील एक पक्षी. मलाया भाषेंतील मूळ शब्द काकाऊ ]

मराठी

कडाबीन – पो. काराबीन, क्लावीन [ एक प्रकारची आंखूड बंदूक ]
बिजागरी – पो. बिजाग्र [ साधेपट्टी ]
पगार – पो. पागार क्रि. फारीग करणे ह्यावरून [ मुशाहिरा ]
चावी – पो. शावि ( किल्ली )
जुगार – पो ज्युगार क्रि. खेळणे [ द्यूत )
पिस्तूल – पो. पिश्तोल ( एका हातांत धरून उडविण्याची फार लहान बंदूक )
तिजोरी – पो- तिजौरु ( खजिना )
लिलांव – पो. लैलांव ( हरराजी )
सावण – पो. साबांव ( साबू ]
परात – पो. प्रातु ( मोठें ताट )
आरमार – पो. आर्माद [ लढाऊ जहाजांचा [illegible]मुदा[illegible]
पत्राज – पो. पातारोत (डौल, दिमाख )
बाल्दी – पो. बालदि ( पोहरा )

बटाटा हा मूळ स्पॅनिश शब्द पातात यावरून, इंग्रजींत पोटेटो व पोर्तुगीज मध्यें बातात असा झाला. संत्रा, तुरुंग, टोपी, गटार, लिंबू, ह्या शब्दांचा उगम पोर्तुगीजवरून अशी किती एकांची समजूत आहे ती निराधार होय. स्पॅनिशमध्यें नाज्या [Naja] हें एका जातीच्या सर्पाला नांव असून स्पॅनिशद्वारें पोर्तुगीजमध्यें नाज्य [Naja] असें रूढ झालें. ह्याची संस्कृतांतील नाग ह्या शब्दांशीं तुलना केली तर सुयुक्तिक होणार नाहीं. संस्कृतांत अग्रेसर ह्म. पुढारी आणि पोर्तुगीजमध्यें आग्रेसोर ह्म. हल्ला करणारा अंगावर जाणारा असा अर्थ होतो. ह्या सादृश्यावरून परस्परसंबंध जुळविण्यांत अर्थ नाहीं. पुरावा हा लातीन प्रोब्रा ह्यावरून उत्पन्न झाला. पोर्तुगीज प्रोव.

गटार हा फ्रेंच मधील गुतिये ह्यावरून इंग्रजींत गटर ह्या रूपानें शिरला. लिंबू हा आरबी आणि फारशी लिमन ह्यावरून तयार झाला. टोपी हा टोप ह्याचा लघुत्वदर्शक शब्द असावा. संत्रा आणि तुरुंग हे शब्द कोठून आले ह्याचा मला उलगडा होत नाहीं.

संस्कृतांतील पोर्तुगीजमध्यें तसेंच इंग्रजींतील पोर्तुगीजमध्यें व पोर्तुगीज मधील इंग्रजींत देखील फार कमी प्रमाणानें शब्द सांपडतात.

श्रीयुत गुंजीकर सरस्वतीमंडळ ह्या पुस्तकांत लिहितातः

'गोमंतकी भाषा ही बहुतकरून प्राचीन सरस्वती भाषेचें रूपांतर होऊन आलेली असावी असें दिसतें. प्राचीन बालभाषेशीं हिचें साम्य पुष्कळ आहे. आणि सांप्रतची मराठी भाषाहि बालभाषेपासूनच आलेली असल्यामुळें या दोहोंचा बराच निकट संबंध आहे. तशांत पुनः ही भाषा मराठीच्या संनिध असल्यामुळें सांप्रत प्रायः मराठीच्या अनुषंगानेंच वागते असें ह्मणण्यास कांहीं बाध नाहीं.'

श्रीयुत जोशांच्या प्रौढबोध व्याकरणांत व मराठी शब्दसिद्धींत पुढील माहिती मिळतेः

'सांप्रत पुणें, मुंबई, वगैरे प्रांतांत प्रमुख लोक ज्या मराठी भाषेंत बोलतात आणि लेखन व्यवहार चालवितात ती मुख्य मराठी आणि चितपावनी, परभी, कोंकणी, मालवणी, गोमंतकी, वऱ्हाडी, नागपुरी, खानदेशी, वगैरे हे तिचे प्रकार.' प्रौ. व्या.

'पश्चिमेकडे सिंध-पंजाब पासून पूर्वेकडे आसाम – कटकपर्यंत, आणि उत्तरेकडे काश्मीर-नेपाळपासून दक्षिणेकडे गोदावरीपर्यंत, एवढा जो विस्तृत देश, त्या ठिकाणीं आर्यांनीं वसती केली. या सर्वांची मुख्यतः भाषा एक होती, तरी तिच्या स्थानिक शाखा निरनिराळ्या होत्या. प्रथमतः त्यांमध्यें परस्पर असणारा भेद, कोंकणी मराठी, देशी मराठी, गोमंतकी, मालवणी, कोल्हापुर[illegible] वऱ्हाडी यांमध्यें आहे, [illegible]च थोडा [illegible]रीची कायद[illegible] वाढत जाऊन, सांप्रत जशी मराठी, [illegible]जराथी, बंगाली, हिंदी, अशा भाषा स्थलांतरानें व कालांतरानें झाल्या आहेत, तशाच त्यावेळीं आर्यांच्या अनेक भाषा असाव्या.'

'कोंकणांत गोमंतकी, कोंकणी, मालवणी चित्तपावनी, कऱ्हाडी, परभी अशा मुख्य मुख्य जुन्या उपभाषा असून त्यांमध्यें सांप्रतच्या प्रौढ मराठीच्या अगोदरचें स्वरूप आढळून येतें, आणि त्यांचा मराठी भाषेच्या जुन्या इतिहासाचा छडा लावण्यास फार उपयोग होतो.' म. श.

श्री. रामचंद्र भिकाजी गुंजीकर व रामचंद्र भिकाजी जोशी ह्यांचे ग्रंथ डोक्यास श्रम देऊन व खोल विचार करून लिहिलेले आहेत असें सकृतदर्शनीं दिसून येतें. केवळ पैसे मिळविण्याच्या हेतूनें उतावीळ करून झरझर लिपीनें भारदस्त नावें देऊन कांहींतरी आपटाआपट केलेली नाहीं असें मला वाटतें.

गोमंतकी आणि कोंकणी ह्या भाषा भिन्न नव्हत असें कोणास वाटत असल्यास वादविवाद करण्याची माझी हौस नाहीं, किंबहुना तेवढें ज्ञान माझ्यांत सांठलेलें नाहीं. तथापि, इंग्रजी हिंदुस्थानांतील तत्संबंधिक तज्ज्ञ विद्वानांचें मत मला ग्राह्य आहे. सवडीप्रमाणें " नोटेशन " हा लेख लिहीन.

डि० फं० ४ आणे. सारस्वत.

# गोमंतकी भाषा

लेखांक २ रा.

श्रीयुत जोशी आपल्या ' मराठी शब्द सिद्धि ' ह्या पुस्तकांत अपभ्रंश दोन प्रकारचे आहेत असें सांगतातः ' रूपापभ्रंश व व रूपार्थापभ्रंश. जेथें शब्दांचें रूप बदलतें पण अर्थ बदलत नाहीं तेथें तो रूपापभ्रंश जाणावाः जसें, सिंदूर,–शेंदूर, अमंगळ–ओंगळ इ०. जेथेंशब्दांच्या रूपांबरोबर त्यांच्या अर्थांतहि बदल होतो तेथें तो रूपार्थापभ्रंश जाणावा. जसें, आचमन–आंचवणें, अन्य–आणि इ० "

गोमंतकी भाषेंत कोणी कोणी ड चे ऐवजीं ण ची, ग चे जागीं क ची व द चे बदली न ची योजना करीत असतात; उदाहरणार्थ, मांड [ दुकान ] ह्याचा माण, कांदो ( कांदा ) ह्याचा कानो, उगड ( उघड क्रि० ) ह्याचा उकड असा उच्चार करण्यांत येतो. मांड ह्या शब्द मांडणें ह्यावरून तयार झाला ह्मणून उ चाच उच्चार कायम राहणें इष्ट आहे. बाराखडीतील आ ह्या स्वराचें चिन्ह ज्याला मराठींत (ा) असें ह्मणतात त्याचें गोमंतकींत कानो असें रूप झालें, हें अर्थ भिन्नत्व लक्ष्यांत येण्यासाठीं कांदो ह्याचें कानो असें रूपांतर होणं शक्य नाहीं. उकडणें ह्मणजे शिजविणें, हा शब्द उघडण्याच्या क्रियेला लागू करणें ह्मणजे जरा चमत्कारिक आहे.

[illegible] ज्ञान नोंठिका [illegible] हातीं [illegible] मराठी भाषेस अनुलक्षून श्रीयुत जोशी शब्द सिद्धींत ह्मणतात कीं, ' मुसलमानी अंमल झाल्यावर मराठींत पारशी व आरबी शब्द आले. त्यानंतर युरोपियन लोक इकडे आल्यावर पोर्तुगीज, फ्रेंच व इंग्लिश शब्दहि आले. त्याच प्रमाणें हिंदी, गुजराथी वगैरे देशभाषांतले शब्दहि मराठींत आढळतात. हीच स्थिति गोमंतकी भाषेची आहे. मराठी शिवाय इतर कांहीं भाषांमधून जे शब्द गोमंतकींत घुसले त्यांतील थोडे खालीं देतों.

बंगालींतून

सांकव – बं. सांको ह्याचें रूपांतर ( पूल )
हालवेकार – बं. हालुइकर ( हलवाई )
भितर – बं. भितर ( आंत, मध्यें )
बुन्याद – बं. बनियाद [ पाया ]
पोटली – बं. पोंटला [ गांठोडें ]
चलो – बं. छेले [ मुलगा )
तेरीज – बं. तेरिज [ बेरीज ]
बेकार – बं. बेकार [ रिकामा ]
आराव – ब. आराव ( शब्द, ध्वनि, ह्यावरून गोमंतकींत ताशाला नांव दिलें. ]

गुजराथींतून

कुटको – गु. कडकरें, कुटको ( तुकडा )
नळे – गु. नळिया ( कौलें )
भेरो – गु. बेहेरो ( बहिरा )
दिवली – गु. दिवी ( समई )
पोरु – गु. पोर ( गुदस्तां )
तिसों – गु. तिरछुं ( तिरवा )

कानडींतील

कॅंप – का. कंपु [ माणिक लाल नांवाचें रत्न )
तुवक -- का. तुबाकी ( बंदूक )
कुर्वो -- का. कुर्वमर ( डोलकाठी )
वरय -- का. वरि, बरे, बरेयु ( लिही )
हाऊ -- का. हावु ( साप. गोमंतकींत वागुलचा वाचक झाला. )
दुडू -- का. दुडु ( पैसा )
भांगर - का. भंगार ( सोने )
सांसव -- का. सांसिव [ राईह्म० मोहरी )
मोचे -- का. मॅाच्चें ( पायांतले जोडे )
मांव -- का. माव ( सासरा )
सांबार - का संभार ( मसाला )

संस्कृतांतून

भोव - सं. बहु ( फार )
आवय - सं. आव्हय ( बोलाव )
निसण - सं. निःश्रेणि ( शिडी )
सप्ण - सं. सोपान ( जिन्याची पायरी )
हांव - सं. अहम् ( मी )
पूत - सं. पुत्रक ( मुलगा )
मानांय - सं. मानव ( मनुष्य व ह्यावरून मजुरास लागू झाला )
राजू - सं. रज्जु ( विहिरीचा दोर )
वच - व्रज ( जा )

फिरंगीमधून

चावी – फि. शावि ( किल्ली )
आरमार – फि. अर्मारियु ( कपाट )
रेगादोर – फि. रेगादोर ( हजारा, फुलझाडांस पाणी घालण्याचें बारीक छिद्रांचें पात्र )
बल्ल – फि. बार्रील ( मध्यम प्रकारचं पीप ]
बुयांव – फि. बुयांव [ वरणी [
जनेल – फि. ज्यानेल [ खिडकी ]
[illegible] – फि. का[illegible]
कलियाद – फि. कादियादु [ ताळे ]
बिरव – फि. ब्रेव [ डामर, डांबर ]
खांप्री – फि. काफ्रि [ [illegible]शिद्दी ]
बंदेर – फि. बांदैर [ बावटा [

इंग्रजींतून

बोतल – इं बाट्ल ( बाटली )
पाकीट – इं. पॅकेट ( पिशवी. ह्याची हॅंडबॅग किंवा पैशांची पिशवी ह्याकडे योजना झाली ]
टाइप – इं. टाइप् ( छापण्याचे खिळे ]
नोट – इं. नोट [ कागदी नाणें ]
तिफीण – इं टिफिन [ फराळ उपहार फिरंगी लोकांत न्याहारी व दुपारचें जेवण ह्याच्या मधल्यावेळचा उपहार )
रूल – इं. रूल [ नियम, गोल आंखणी ]
मार्क – इं. मार्क [ गुण ह्या. परीक्षेंतील वगैरे मार्क. ]
मार्किट – इं मार्केट ( बाजार ]
मास्तर – इ, मास्टर [ शिक्षक ]
पोष्ट – इं. पोष्ट [ टपाल ऑफिस. क्वचित रूढींत आहे. ]

ह्यांशिवाय रजिष्टर, प्रेस, पेन्सील, स्लेट, फी, बूक, पास इ० शब्दहि प्रचारांत अहेत. रजिस्टर, ऑगस्ट, पोस्ट ह्यांचे जागीं रजिष्टर, ऑगष्ट, पोष्ट असें लिहिण्याविषयीं श्री. रामचंद्र भिकाजी जोशी ह्यांचें मत आहे.

गोमंतकी भाषा स्वतंत्र कीं परतंत्र हा विचार येथें कर्तव्य नाहीं. ह्या भाषेचा मराठीशीं निकट संबंध आहे एवढें खरें. प्रत्येक भाषेंत अन्य भाषांमधील शब्द समुच्चय असतोच. खरी व्युत्पत्ति पाहूं गेल्यास दीर्घ काल परिशीलन करावें लागेल. बंगाली भाषेंत वगैरे कांहीं पोर्तुगीज शब्द मला आढळले तेः

बंगाली

आलपिन – पो. आलफिनेति [ धातूची टांचणी ]
केदारा – कादैर [ खुर्ची ]
आस्तावल – पो. इस्ताबुलु [ गोठा ]
बरंड – पो. वारांद [ ओसरी, पडवी ].
रसिद – पो. रेसिबु [ पावती ]
कामीज – पो. कामीज [ खमीस, शर्ट ]
जानाला – पो. ज्यानेल [ खिडकी ]
आलमारी – पो. आर्मारियु ( कपाट )
काकातुया – पो. काकातूअ ( पोपटाच्या वर्गांतील एक पक्षी. मलाया भाषेंतील मूळ शब्द काकाऊ ]

मराठी

कडाबीन – पो. काराबीन, क्लावीन [ एक प्रकारची आंखूड बंदूक ]
बिजागरी – पो. बिजाग्र [ साधेपट्टी ]
पगार – पो. पागार क्रि. फारीग करणे ह्यावरून [ मुशाहिरा ]
चावी – पो. शावि ( किल्ली )
जुगार – पो ज्युगार क्रि. खेळणे [ द्यूत ]
पिस्तूल – पो. पिश्तोल ( एका हातांत धरून उडविण्याची फार लहान बंदूक )
तिजोरी – पो. तिजौरु ( खजिना )
लिलांव – पो. लैलांव ( हरराजी )
साबण – पो. साबांव ( साबू ]
परात – पो. प्रातु ( मोठें ताट )
आरमार – – पो. आर्माद [ लढाऊ जहाजांचा [illegible]
पत्राज – पो. पातारोत (डौल, दिमाख )
बाल्दी – पो. बालदि ( पोहरा )

बटाटा हा मूळ स्पॅनिश शब्द पातात यावरून, इंग्रजींत पोटेटो व पोर्तुगीज मध्यें बातात असा झाला. संत्रा, तुरुंग, टोपी, गटार, लिंबू, ह्या शब्दांचा उगम पोर्तुगीजवरून अशी किती एकांची समजूत आहे ती निराधार होय. स्पॅनिशमध्यें नाज्या [Naja] हें एका जातीच्या सर्पाला नांव असून स्पॅनिशद्वारें पोर्तुगीजमध्यें नाज्य [Naja] असें रूढ झालें. ह्याची संस्कृतांतील नाग ह्या शब्दांशीं तुलना केली तर सुयुक्तिक होणार नाहीं. संस्कृतांत अग्रेसर ह्या. पुढारी आणि पोर्तुगीजमध्यें आग्रेसोर ह्या. हल्ला करणारा अंगावर जाणारा असा अर्थ होतो. ह्या सादृश्यावरून परस्परसंबंध जुळविण्यांत अर्थ नाहीं. पुरावा ह्या लातीन प्रोबा ह्यावरून उत्पन्न झाला. पोर्तुगीज प्रोव.

गटार हा फ्रेंच मधील गुतिये ह्यावरून इंग्रजींत गटर ह्या रूपानें शिरला. लिंबू हा आरबी आणि फारशी लिमन ह्यावरून तयार झाला. टोपी हा टोप ह्याचा लघुत्वदर्शक शब्द असावा. संत्रा आणि तुरुंग हे शब्द कोठून आले ह्याचा मला उलगडा होत नाहीं.

संस्कृतांतील पोर्तुगीजमध्यें तसेंच इंग्रजींतील पोर्तुगीजमध्यें व पोर्तुगीज मधील इंग्रजींत देखील फार कमी प्रमाणानें शब्द सांपडतात.

श्रीयुत गुंजीकर सरस्वतीमंडळ ह्या पुस्तकांत लिहितातः

'गोमंतकी भाषा ही बहुतकरून प्राचीन सरस्वती भाषेचें रूपांतर होऊन आलेली असावी असें दिसतें. प्राचीन बालभाषेशीं हिचें साम्य पुष्कळ आहे. आणि सांप्रतची मराठी भाषाहि बालभाषेपासूनच आलेली असल्यामुळें या दोहोंचा बराच निकट संबंध आहे. तशांत पुनः ही भाषा मराठीच्या संनिध असल्यामुळें सांप्रत प्रायः मराठीच्या अनुषंगानेंच वागते असें ह्मणण्यास कांहीं बाध नाहीं.'

श्रीयुत जोशांच्या प्रौढबोध व्याकरणांत व मराठी शब्दसिद्धींत पुढील माहिती मिळतेः

'सांप्रत पुणें, मुंबई, वगैरे प्रांतांत प्रमुख लोक ज्या मराठी भाषेंत बोलतात आणि लेखन व्यवहार चालवितात ती मुख्य मराठी आणि चितपावनी, परभी, कोंकणी, मालवणी, गोमंतकी, वऱ्हाडी, नागपुरी, खानदेशी, वगैरे हे तिचे प्रकार.' प्रौ. व्या.

'पश्चिमेकडे सिंध–पंजाब पासून पूर्वेकडे आसाम – कटकपर्यंत, आणि उत्तरेकडे काश्मीर–नेपाळपासून दक्षिणेकडे गोदावरीपर्यंत, एवढा जो विस्तृत देश, त्या ठिकाणीं आर्यांनीं वसती केली. या सर्वांची मुख्यतः भाषा एक होती, तरी तिच्या स्थानिक शाखा निरनिराळ्या होत्या. प्रथमतः त्यांमध्यें परस्पर असणारा भेद, कोंकणी मराठी, देशी मराठी, गोमंतकी, मालवणी, कोल्हापु[illegible] वऱ्हाडी यांमध्यें आहे, [illegible]च थोडा रीची कायद[illegible] वाढत जाऊन, सांप्रत जशी मराठी, गुजराथी, बंगाली, हिंदी, अशा भाषा स्थलांतरानें व कालांतरानें झाल्या आहेत, तशाच त्यावेळीं आर्यांच्या अनेक भाषा असाव्या.'

'कोंकणांत गोमंतकी, कोंकणी, मालवणी चित्पावनी, कऱ्हाडी, परभी अशा मुख्य मुख्य जुन्या उपभाषा असून त्यांमध्यें सांप्रतच्या प्रौढ मराठीच्या अगोदरचें स्वरूप आढळून येतें, आणि त्यांचा मराठी भाषेच्या जुन्या इतिहासाचा छडा लावण्यास फार उपयोग होतो.' म. श.

श्री. रामचंद्र भिकाजी गुंजीकर व रामचंद्र भिकाजी जोशी ह्यांचे ग्रंथ डोक्यास श्रम देऊन व खोल विचार करून लिहिलेले आहेत असें सकृतदर्शनीं दिसून येतें. केवळ पैसे मिळविण्याच्या हेतूनें उतावीळ करून झरझर लिपीनें भारदस्त नांवें देऊन कांहींतरी आपटाआपट केलेली नाहीं असें मला वाटतें.

गोमंतकी आणि कोंकणी ह्या भाषा भिन्न नव्हत असें कोणास वाटत असल्यास वादविवाद करण्याची माझी हौस नाहीं, किंबहुना तेवढें ज्ञान माझ्यांत सांठलेलें नाहीं. तथापि, इंग्रजी हिंदुस्थानांतील तत्संबंधिक तज्ज्ञ विद्वानांचें मत मला ग्राह्य आहे. सवडीप्रमाणें " नोटेशन " हा लेख लिहीन.

डि० फं० ४ आणे. सारस्वत.

भा र त

मिति माघ व० ११ श्री शके १८४६

## राजनीतीचें एक तत्व

कौर्म संकोचमास्थाय प्रहारमपि मर्षयेत् ।
प्राप्तकालेपु नीतिज्ञ उत्तिष्ठेत्क्रूर सर्पवत ॥
॥ पंचतत्रम् ॥

पोलीस आणि मिलिटरी खातें किती आडदांड, अडाणी अशिक्षित आणि अज्ञानीं असतें हें विशेष स्पष्ट करून सांगण्याचें कारण नाहीं. अशाचे हातीं विशेष अधिकार सोंपविले ह्मणजे मग विचाराव यासच नको ! आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला अशी स्थिति व्हावयाला उशीर नको. कोणी कोणी त्याच्याकडे फिर्यादीस आले तर कोणाची शेंडीच काप, तर कोणाच्या भिवयांचेंच वाटोळें कर, तर कोणाच्या एका बाजूच्या मिशाच उतर तर कोणाला मरेपर्यंत मार तर कोणाला दिवसाचे दिवस उपवाशीं कैदेंत ठेव, असे चाळे हे आपल्या स्वभावानुसार करीत असतात. ज्याना सारासार विचार नाहीं, कायदा कशाशीं खातात याचें तारतम्य ज्ञान नाहीं अशांच्या हातीं हें एक अधिकाराचें नवें कोलीत आमच्या सरकारनें दिलें आहे. आणि त्याचा परिणाम जसा व्हावयाचा त्याचीं पूर्वचिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं आहेत.

अगोदरच सरकारच्या अजाण व्यवस्थेमुळें लोक हवाल्दील बनले आहेत. त्यांतच ही एक भर पडलेली. याचें पर्यावसान कोठपर्यंत होईल हें जरी आज निश्चित सागतां येत नाहीं तरी अशा प्रकारच्या आघातांना प्रत्याघात केव्हां तरी मिळतील हें निश्चित आहे. गोमांतकीय लोकांची अजून अनुकूल वेळ आलेली नाहीं. राष्ट्रीय वारें त्यांच्या अंगांत अजून शिरलेलें नाहीं, हे काय घोंटाळे उडत आहेत, याच्या मुळाशीं त्यांनी पाहिलेलें नाहीं. किंबहुना अशा बाबतींत ते उदासीनतेच्या गुर्मीत असल्यामुळें त्याचा तिकडे कानाडोळा झालेला आहे. यावरून सरकार जर मनांत मांडे खात असेल तर खुशाल खावो बापडें ! पण या उदासीनतेचें रूपांतर क्रमाक्रमानें असंतोषांत, द्वेषांत व शेवटीं बंडांत होणार नाहीं अशी खात्री मात्र त्यानें बाळगूं नये. एका परीनें सरकार करीत आहे तें ठीकच आहे. कारण मनुष्यस्वभाव जात्या जिज्ञासावान आणि अनुकरणप्रीय असल्यामुळें सरकारचेंच कां होईना पण अनुकरण होईल आणि 'टोल्यास टोला' याच्या ऐवजीं 'टोल्यास टोला' अशी बरी प्रतिकृति घडेल.

बंडकरा, बंड खोर बना असें कांहीं आम्ही लोकानां सांगत नाहीं. सरकार व अधिकारी वर्ग नोकरशाहीच्या रूपानें कसें वागत आहे, राष्ट्राच्या हिताहिताकडे कसें लक्ष्य देत नाहीं, आपण व आपले जातभाई याविषयीं कसें तत्पर असवें, त्यांच्या या तुंबडी भरणीच्या कामीं कायद्याचें उल्लंघन झालें तरी त्यानां शिक्षा न होतां त्याचें कौतुक कसें केलें जातें, उलटपक्षीं राष्ट्राच्या हिताच्या गोष्टी प्रजेच्या मनांत वावरत असल्यास त्यास अडथळे कसे येतात, हें आम्हीं वरचेवर सांगत आलों आहोंत. स्वार्थ साधणें हें त्यांतलें तत्त्व आहे आणि तें साधतानां राष्टाचें अधःपतन झालें, प्रजेचें नुकसान झालें, हाल झाले, काय ह्याच्या ठिकाणीं जुलूमाचें वस्तान बसलें, न्यायाचें अधिष्टान दडपशाहीनें पत्करलें आणि नीतीच्या भागांत अवदशा थैमान घालूं लागली तरी त्याची परवा करूं नये हा त्याचा मतितार्थ आहे. अशा प्रकारें वागलें असतां ती, नीच, दुष्ट, दरोडेखोर, बंडखोर बनत नसून, कायदा, न्याय आणि सद्सद्विवेकबुद्धि यांच्या कचाट्यांत सांपडत नाहीं हें सरकारनें स्वतःच्या वागणुकीनें प्रयोगसिद्ध उदाहरण घालून दिलेलें आहे.

शरीरसौख्य, चैन, व निरनिराळे उपभोग भोगण्याच्या इच्छेनें वासनारूपी प्रकृतीच्या पूर्ण आधीन होऊन निवळ नेभळट बनलेल्या गोवा प्रतीय लोकांनां सरकारचें उक्त प्रकारचें धोरण नेभळटपणा टाकून परावृत्त करूं शकत नाहीं काय ? त्यांचा स्वाभिमान, देशाभिमान, राष्ट्रप्रेम; मातृभूभक्ति, वीरत्व, पौरुषत्व यानां खळबळून सोडण्यासाठीं उपरोक्त कृत्यांच्या अंकुशाच्या टोंचण्या, बोंचण्या मारे पुरेसे होत नाहींत काय ? बंडखोर बनावें असें आमचें ह्मणणें नाहीं पण सरकार तिकडे लक्ष देऊन प्रसंगानुसार उच्च मनोभावनांना चलन दिलें पाहिजे. असें करितांना राजनीतीचें मात्र एक तत्व लक्षात ठेविलें पाहिजे आणि तें या लेखाच्या शिरोभागींच दिलें आहे. प्राप्तकालेषु नीतिज्ञ उत्तिष्टेत्क्रूर सर्पवत्

## स्फुट विचार

नोकरशाहीची भेदनीति :— फोडा व झोडा ( divide and rule ) ह्या एकाच चाणाक्य नीतींतील अजिंक्य शस्त्ररूप रील रामबाण या उपायावर ब्रिटिश सरकारानें हिंदुस्थानचें साम्राज्य सिंहासन पटकाविलें; आज जवळ जवळ दीडशें वर्षे आपल्या हातांत टिकविलें व पुढेंहि अनंत कालपर्यंत तें तसेंच कायम राखावयाचा त्यांचा फुशारकीवजा इरादा आहे. शिंद्यांनां उचलून होळकरांवर मार, भोंसल्याना धरून पेशव्यांवर आपट, पेशव्यांना धरून शिंद्यांना झोडप, मराठ्यांना उचलून टिपूवर मार, असा गनिमी कावा लढवूनच इंग्रजानीं हिंदवी पातशाही व मुसलमानी बादशाही पादाक्रांत केली असल्याची साक्ष देण्यास इतिहास तयार आहे. सध्याहि वेळेचें महत्व जाणून त्यांनीं पुन्हां एकदां त्या धोरणाचा अंगिकार केला आहे. एकीकडे हिंदुविरुद्ध मुसलमानांना फुसलावणी दे, तर दुसरीकडे ब्राह्मणांवर चढ करण्याला नोकरीचें आमीष दाखवून ब्राह्मणेतरांना फितूर कर, असा दुहेरी डाव खेळून कॉंग्रेसवर कशी तरी कुरघोडी करण्याची नोकरशाही सध्या खटपट करीत आहे.

तिचा आह्मांवर होणारा परिणाम :— ब्रिटिश सरकारचें आमच्याशीं असलेलें वर्तन कसें दुटपी धोरणाचें आहे, व त्यांत त्यांचा अंतिम उद्देश काय आहे, ह्याचा पुरता उमज न पडल्यामुळें आमच्यांतील कांहीं सुशिक्षितांची होत असलेली दिशाभूल पाहून कोणासहि त्यांची कींवच करावीशी वाटेल. कोंबडीं झुंजविण्याच्या उद्देशानें ब्रिटिश सरकारानें आह्मांपुढें टांकलेल्या चार दाण्यांस लालचावून वसून ह्या बहाद्दरांनीं माजविलेला जातवार प्रतिनिधित्वाचा लढा दिवसें दिवस विकोपास जात असून त्याचीं कडु फळें चाखण्याचा प्रसंग आह्मांवर आज गुजरला आहे. संघटित राष्ट्रकार्यावरील दृष्टि 'केवळ ज्ञातिहित पहाण्याइतकी' आकुंचित केल्यामुळें पंजाब व बंगाल ह्या दोन प्रांतांत तर नुसतीं रणें माजून राहिलीं आहेत. मद्रास इलाख्यांत व आमच्या महाराष्ट्रांत जोरानें चालू असलेल्या ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादाकडे पाहिलें ह्मणजे 'नकोत त्या दिवाणगिऱ्या' 'नकोत तीं कौन्सिलें' व 'नकोत त्या सरकारी नोकऱ्या' असेच उद्वेगपूर्ण उद्गार प्रत्येक समंजस विवेचकाच्या तोंडांतून कळत नकळत बाहेर पडतील हें निर्विवाद आहे.

महात्माजी व जातवार प्रतिनिधित्वः— हा किळसवाणा प्रकार बंद पडावा व राष्ट्रकार्याचा गाडा अनत्याचार पथावरून सुरळीत चालूं लागावा एवढ्यासाठींच महात्माजीनीं नोकरशाहीशीं झगडण्याचें तूर्त तहकूब ठेवून 'राष्ट्रीय ऐक्याची' 'पाठपुरवणी, करण्याचें कार्य सध्या आरंभिलें आहे. दिल्लीस भरलेल्या सर्वपक्षीय ऐक्य कमिटीनें निवडलेल्या पोट कमिटीकडे हा जातवार प्रतिनिधित्वाचा प्रश्न निकालासाठीं सोंपविला आहे व ठरल्याप्रमाणें तीनें आपला रिपोर्ट परवांचे दिवशीं साजरा केलाच असेल, पण ह्या महत्वपूर्ण विषयावर महात्माजीनीं आपलें खालील स्वतंत्र मत प्रसिद्ध केलें आहे. ते ह्मणतातः "तत्वतः जातवार प्रतिनिधित्वास जरी माझा अंतःकरणपूर्वक विरोध असला तरी दोन्ही परस्पर विरुद्ध पक्षांस भूषणावह व शांततेस बाध न आणणारें असें जें कांहीं ठरविलें जाईल त्याला माझी पूर्ण संमति आहे" पहा ! महात्माजींच्या अनत्याचारी चळवळीस 'बंडखोरी' समजणाऱ्या गोमांतकीय खिस्ती महात्म्यांनो ! असहकारिता किती शांतताप्रधान आहे ती जरा डोळे उघडून पहा ! व मग सांगा कीं महात्मा गांधींस गोमांतकांत येऊं दिल्यास, हिंदूंत अराजकता प्रसार पावेल अशी आपण केलेली हाकाटी निष्फळ होती कीं नव्हती !

## वर्तमानसार

—पेडणें महालांतील मोरजी गांवांत स्थापन झालेल्या 'विद्याप्रसारक समाजा"च्या श्री सरस्वती मंदिराच्या इमारतीचा पाया वे. मू. रा. रा. श्रीपाद बाळंभट मणेरीकर यांच्या हस्तें शुक्रवार तारीख ५–१२–१९२४ रोजीं बसविण्यांत आला. त्याचवेळीं वे. मू. गणेश केशव कऱ्हाडकर यांच्या अध्यक्षतेखालीं समाजाच्या कामगिरीबद्दल सदर शाळेचे हेडमास्तर एस्. व्ही. राव यांचें व प्राथमिक शिक्षणापासून फायदे थोवर फर्स्ट अ. कामत मास्तर यांचें भाषण झालें. नंतर सदर शाळेचे शिक्षक गो. रा. पत्कीकृत गाणीं व संवाद मुलांनीं ह्मणून दाखविल्यावर अध्यक्षांनीं ह्या संस्थेनें अवघ्या ३ महिन्यांत इमारत बांधण्याचें धाडस केल्याबद्दल मोरजींतील सर्व मंडळीचें अभिनंदन केलें. शेवटीं रा. रा. नारायण बुरये यांनीं अध्यक्ष व शिक्षक यांचे आभार मानिले. सध्या या शाळेंत २०० मुलें मराठी ५ व्या इयत्तेचें शिक्षण घेत आहेत. लवकरच इमारत फंडाकरितां व कायम फंडाकरितां गोंव्यांतील उदार धनिक लोकांकडे व शिक्षणप्रेमी गृहस्थांकडे संस्थेचें कार्यकारी मंडळ आश्रयार्थ निघणार आहेत, इत्यादि जगन्नाथ लक्ष्मण सामंत हे कळवितात.

—येत्या अंकीं 'विवाह' लेख मालेचा पांचवा लेखांक प्रसिद्ध होईल.

—लॉर्ड रेडिंग नंतर हिंदुस्थानच्या व्हाइसरॉयच्या जागीं बंगाल गव्हर्नर लॉर्ड लिटन ह्यांची नेमणूक होणार असल्याचें 'व्हाईस ऑफ इंडिया' ह्मणतो.

—क्रोनिकल पत्राचे माजी संपादक बी. जी. हॉर्निमन ह्यांना झालेली हद्दपारीची कायदे बाह्य शिक्षा रद्द करावी असा ठराव बॉंबे लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें डॉ० वेलकर आणणार आहेत.

—आपण विनंति केल्याप्रमाणें एक वर्ष सोडून चार वर्षे आह्मां आपली चळवळ बंद ठेवून असहकारितेच्या यशस्वितेकडे आपली आशादृष्टि रोंखली; पण आपण सुरू केलेल्या चळवळीनें नोकरशाहींत कांहींच फरबदल न झाल्याचें दिसून आल्यामुळें पुन्हां क्रांतिकारक चळवळ हातांत घेणें आह्मांस अपरिहार्य झालें आहे, अशा अर्थाचें एका क्रांतिकारकाचें महात्माजींस गेलेलें पत्र त्यांनीं आपल्या 'यंग इंडियांत, प्रसिद्ध केलें आहे.

—गेल्या ता. ९ रोजीं दिल्लीस स्वराज्य पक्षाची सभा भरून दिवाणांचा पगार ४००० रुपयांपर्यंत असावा असें तिनें ठरविलें आहे.

—कुडाळ [ रत्नागिरी ] जवळील डीगस गांवीं भुताटकीचे विलक्षण प्रकार चालू झाले आहेत.

—बरद्वानच्या महाराजांनीं लाहोरच्या सनातन धर्म कॉलेजला १२ हजार रु. देणगी दिली.

—सैबेरियांत एक नवीन सोन्याची खाण सांपडली आहे.

—'इंस्तितुत वास्कु दा गाम' या नावांची एक संस्था गामस्मारकानिमित्त स्थापन करण्यांत आली असून, तींत केवळ पाश्चात्य संस्कृतीच्याच पुरस्कर्त्यांचा समावेश होणार आहे.

—बेतींहून ह्मापशें येथें जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला एका हिंदूचें प्रेत बरेच दिवस पडून राहिलें होतें, अशी एक बातमी पणजीच्या उ येराल्दांत प्रसिद्ध झाली आहे.

भारत

मिति माघ व० ११ श्री शके १८४६

## राजनीतीचें एक तत्व

कौर्म संकोचमास्थाय प्रहारमपि मर्षयेत् ।
प्राप्तकालेपु नीतिज्ञ उत्तिष्ठेत्कूर सर्पवत ॥
॥ पंचतंत्रम् ॥

पोलीस आणि मिलिटरी खातें किती आडदांड, अडाणी अशिक्षित आणि अज्ञानी असतें हें विशेष स्पष्ट करून सांगण्याचें कारण नाहीं. अशाचे हातीं विशेष अधिकार सोंपविले ह्मणजे मग विचाराव यासच नको ! आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला अशी स्थिति व्हावयाला उशीर नको. कोणी कोणी त्याच्याकडे फिर्यादीस आले तर कोणाची शेंडीच काप, तर कोणाच्या मिशाचेंच वाटोळें कर, तर कोणाच्या एका बाजूच्या मिशाच उतर तर कोणाला मरेपर्यंत मार तर कोणाला दिवसाचे दिवस उपवाशीं कैदेंत ठेव, असे चाळे हे आपल्या स्वभावानुसार करीत असतात. ज्याना सारासार विचार नाहीं, कायदा कशाशीं खातात याचें तारतम्य ज्ञान नाहीं अशांच्या हातीं हें एक अधिकाराचें नवें कोलीत आमच्या सरकारनें दिलें आहे. आणि त्याचा परिणाम जसा व्हावयाचा त्याचीं पूर्वचिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं आहेत.

अगोदरच प्रकारच्या अजाण व्यवस्थेमुळें लोक हवालदील बनले आहेत. त्यांतच ही एक भर पडली. याचें पर्यवसान कोठपर्यंत होईल हें जरी आज निश्चित सांगतां येत नाहीं तरी अशा प्रकारच्या आघातांना प्रत्याघात केव्हां तरी मिळतील हें निश्चित आहे. गोमांतकीय लोकांची अजून अनुकूल वेळ आलेली नाहीं. राष्ट्रीय वारें त्यांच्या अंगांत अजून शिरलेलें नाहीं, हे काय घोंटाळे उडत आहेत, याच्या मुळाशीं त्यांनीं पाहिलेलें नाहीं. किंबहुना अशा बाबतींत ते उदासीनतेच्या गुर्मींत असल्यामुळें त्याचा तिकडे कानाडोळा झालेला आहे. यावरून सरकार जर मनांत मांडे खात असेल तर खुशाल खावो बापडें ! पण या उदासीनतेचें रूपांतर क्रमाक्रमानें असंतोषांत, द्वेषांत व शेवटीं बंडांत होणार नाहीं अशी खात्री मात्र त्यानें बाळगूं नये. एका परीनें सरकार करीत आहे तें ठीकच आहे. कारण मनुष्य स्वभाव जात्या जिज्ञासावान आणि अनुकरणप्रीय असल्यामुळें सरकारचेंच कां होईना पण अनुकरण होईल आणि 'टोल्यास ठोला' याच्या ऐवजीं 'टोल्यास टोला' अशी बरी प्रतिकृति घडेल.

बंडकरा, बंड खोर बना असें कांहीं आह्मी लोकानां सांगत नाहीं. सरकार व अधिकारी वर्ग नोकरशाहीच्या रूपानें कसें वागत आहे, राष्ट्राच्या हिताहिताकडे कसें लक्ष्य देत नाहीं, आपण व आपले जातभाई याविषयीं कसें तत्पर असवें, त्यांच्या या तुंबडी भरणीच्या कामीं कायद्याचें उल्लंघन झालें तरी त्यानां शिक्षा न होतां त्याचें कौतुक कसें केलें जातें, उलटपक्षीं राष्ट्राच्या हिताच्या गोष्टी प्रजेच्या मनांत वावरत असल्यास त्यास अडथळे कसे येतात, हें आह्मीं वरचेवर सांगत आलों आहोंत. स्वार्थ साधणें हें त्यांतलें तत्व आहे आणि तें साधतानां राष्ट्राचें अधःपतन झालें, प्रजेचें नुकसान झालें, हाल झाले, काय वाटेल त्या ठिकाणीं जुलुमाचें बस्तान बसलें, न्यायाचें अधिष्टान दडपशाहीनें पत्करलें आणि नीतीच्या भागांत अवदशा थैमान घालूं लागली तरी त्याची परवा करूं नये हा त्याचा मतितार्थ आहे. अशा प्रकारें वागलें असतां तो, नीच, दुष्ट, दरोडेखोर, बंडखोर बनत नसून, कायदा, न्याय आणि सद्सद्विवेकबुद्धि यांच्या कचाट्यांत सांपडत नाहीं हें सरकारनें स्वतःच्या वागणुकीनें प्रयोगसिद्ध उदाहरण घालून दिलेलें आहे.

शरीरसौख्य, चैन, व निरनिराळे उपभोग भोगण्याच्या इच्छेनें वासनारूपी प्रकृतीच्या पूर्ण आधीन होऊन निवळ नेभळट बनलेल्या गोवा प्रांतीय लोकांनां सरकारचें उक्त प्रकारचें धोरण नेभळटपणा टाकून परावृत्त करूं शकत नाहीं काय ? यांचा स्वाभिमान, देशाभिमान, राष्ट्रप्रेम; मातृभूमिभक्ति, वीरत्व, पौरुषत्व यानां खळबळून सोडण्यासाठीं उपरोक्त कृत्यांच्या अंकुशाच्या टोंचण्या, बोंचण्या मारे पुरेसे होत नाहींत काय ? बंडखोर बनावें असें आमचें ह्मणणें नाहीं पण सरकार तिकडे लक्ष देऊन प्रसंगानुसार उच्च मनोभावनांना चलन दिलें पाहिजे. असें करितांना राजनीतीचें मात्र एक तत्व लक्षांत ठेविलें पाहिजे आणि तें या लेखाच्या शिरोभागींच दिलें आहे. प्राप्तकालेषु नीतिज्ञ उत्तिष्ठेत्कूर सर्पवत्

## स्फुट विचार

**नोकरशाहीची भेदनीति :—** फोडा व झोडा ( divide aud rule ) ह्या एकाच चाणाक्य नीतींतील अजिंक्य शस्त्ररूप रामबाण या उपायावर ब्रिटिश सरकारानें हिंदुस्थानचें साम्राज्य सिंहासन पटकाविलें; आज जवळ जवळ दीडशें वर्षें आपल्या हातांत टिकविलें व पुढेंहि अनंत कालपर्यंत तें तसेंच कायम राखावयाचा त्यांचा फुशारकीवजा इरादा आहे. शिंदांनां उचलून होळकरांवर मार, भोंसल्यांना धरून पेशव्यांवर आपट, पेशव्यांना धरून शिंदांना झोडप, मराठ्यांना उचलून टिपूवर मार, अशा गनिमी कावा लढवूनच इंग्रजानीं हिंदवी पातशाही व मुसलमानी बादशाही पादाक्रांत केली असल्याची साक्ष देण्यास इतिहास तयार आहे. सध्याहि वेळेचें महत्व जाणून त्यांनीं पुन्हां एकदां त्या धोरणाचा अंगिकार केला आहे. एकीकडे हिंदुविरुद्ध मुसलमानांना फुसलावणी दे, तर दुसरीकडे ब्राह्मणांवर चढ करण्याला नोकरीचें आमीष दाखवून ब्राह्मणेतरांना फितूर कर, अशा दुहेरी डाव खेळून कॉंग्रेसवर कशी तरी कुरघोडी करण्याची नोकरशाही सध्या खटपट करीत आहे.

**तिचा आह्मांवर होणारा परिणाम :—** ब्रिटिश सरकारचें आमच्याशीं असलेलें वर्तन कसें दुटपी धोरणाचें आहे, व त्यांत त्यांचा अंतिम उद्देश काय आहे, ह्याचा पुरता उमज न पडल्यामुळें आमच्यांतील कांहीं सुशिक्षितांची होत असलेली दिशाभूल पाहून कोणासहि त्यांची कींवच करावीशी वाटेल. कोंबडीं झुंजविण्याच्या उद्देशानें ब्रिटिश सरकारानें आह्मांपुढें टांकलेल्या चार दाण्यांस लालचावून बधून ह्या बहाद्दरांनीं माजविलेला जातवार प्रतिनिधित्वाचा लढा दिवसें दिवस विकोपास जात असून त्याचीं कडु फळें चाखण्याचा प्रसंग आह्मांवर आज गुजरला आहे. संघटित राष्ट्रकार्यावरील दृष्टि 'केवळ ज्ञातिहित पहाण्याइतकी' आकुंचित केल्यामुळें पंजाब व बंगाल ह्या दोन प्रांतांत तर नुसतीं रणें माजून राहिलीं आहेत. मद्रास इलाख्यांत व आमच्या महाराष्ट्रांत जोरानें चालू असलेल्या ब्राह्मण—ब्राह्मणेतर वादाकडे पाहिलें ह्मणजे 'नकोत त्या दिवाणगिऱ्या' 'नकोत तो कौन्सिलें' व 'नकोत त्या सरकारी नोकऱ्या' असेच उद्वेगपूर्ण उद्गार प्रत्येक समंजस विवेकवान्याच्या तोंडांतून कळत नकळत बाहेर पडतील हें निर्विवाद आहे.

**महात्माजी व जातवार प्रतिनिधित्व:—** हा किळसवाणा प्रकार बंद पडावा व राष्ट्रकार्याचा गाडा अनत्याचार पथावरून सुरळीत चालू लागावा एवढ्यासाठींच महात्माजींनीं नोकरशाहीशीं झगडण्याचें तूर्त तहकूब ठेवून 'राष्ट्रीय ऐक्याची' 'पाठपुरवणी, करण्याचें कार्य सध्या आरंभिलें आहे. दिल्लीस भरलेल्या सर्वपक्षीय ऐक्य कमिटीनें निवडलेल्या पोट कमिटीकडे ह्या जातवार प्रतिनिधित्वाचा प्रश्न निकालासाठीं सोंपविला आहे व ठरल्याप्रमाणें तीनें आपला रिपोर्ट परवांचे दिवशीं सादर केलाच असेल, पण ह्या महत्वपूर्ण विषयावर महात्माजीनीं आपलें खालील स्वतंत्र मत प्रसिद्ध केलें आहे. ते ह्मणतात: " तत्वत: जातवार प्रतिनिधित्वास जरी माझा अंतःकरणपूर्वक विरोध असला तरी दोन्ही परस्पर विरुद्ध पक्षांस भूषणावह व शांततेस बाध न आणणारें असें जें कांहीं ठरविलें जाईल त्याला माझी पूर्ण संमति आहे " पहा ! महात्माजींच्या अनत्याचारी चळवळीस 'बंडखोरी' समजणाऱ्या गोमांतकीय खिस्ती महात्म्यांनो ! असहकारिता किती शांततापधान आहे ती जरा डोळे उघडून पहा ! व मग सांगा कीं महात्मा गांधींस गोमांतकांत येऊं दिल्यास, हिंदूंत अराजकता प्रसार पावेल अशी आपण केलेली हाकाटी निष्फळ होती कीं नव्हती !

## वर्तमानसार

—पेडणें महालांतील मोरजी गांवांत स्थापन झालेल्या 'विद्याप्रसारक समाजा''च्या श्री सरस्वती मंदिराच्या इमारतीचा पाया वे. मू. रा. रा. श्रीपाद बाळंभट मणेरीकर यांच्या हस्तें शुक्रवार तारीख ५-१२-१९२४ रोजीं बसविण्यांत आला. त्याचवेळीं वे. मू. गणेश केशव कन्हाडकर यांच्या अध्यक्षतेखालीं समाजाच्या कामगिरीबद्दल सदर शाळेचे हेडमास्तर एस्. व्ही. राव यांचें व प्राथमिक शिक्षणापासून फायदे यावर फुर्टे अ. कामत मास्तर यांचें भाषण झालें. नंतर सदर शाळेचे शिक्षक गो. रा. पत्कीकृत गाणीं व संवाद मुलांनीं ह्मणून दाखविल्यावर अध्यक्षांनीं ह्या संस्थेनें अवघ्या ३ महिन्यांत इमारत बांधण्याचें धाडस केल्याबद्दल मोरजींतील सर्व मंडळीचें अभिनंदन केलें. शेवटीं रा. रा. नारायण बुरये यांनीं अध्यक्ष व शिक्षक यांचे आभार मानिले. सध्या या शाळेंत २०० मुलें मराठी ५ व्या इयत्तेचें शिक्षण घेत आहेत. लवकरच इमारत फंडाकरितां व कायम फंडाकरितां गोव्यांतील उदार धनिक लोकांकडे व शिक्षणप्रेमी गृहस्थांकडे संस्थेचें कार्यकारी मंडळ आश्रयार्थ निघणार आहेत, इत्यादि जगन्नाथ लक्ष्मण सामंत हे कळवितात.

—येत्या अंकीं 'विवाह' लेख मालेचा पांचवा लेखांक प्रसिद्ध होईल.

—लॉर्ड रेडिंग नंतर हिंदुस्थानच्या व्हाइसरॉयच्या जागीं बंगाल गव्हर्नर लॉर्ड लिटन ह्यांची नेमणूक होणार असल्याचें 'व्हाईस ऑफ इंडिया' ह्मणतो.

—क्रोनिकल पत्राचे माजी संपादक बी. जी. हॉर्निमन ह्यांना झालेली हद्दपारीची कायदे बाह्य शिक्षा रद्द करावी असा ठराव बॉंबे लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें डॉ० वेलकर आणणार आहेत.

—आपण विनंति केल्याप्रमाणें एक वर्ष सोडून चार वर्षें आह्मां आपली चळवळ बंद ठेवून असहकारितेच्या यशस्वितेकडे आपली आशादृष्टि रोंखली; पण आपण सुरू केलेल्या चळवळीनें नोकरशाहींत कांहींच फरबदल न झाल्याचें दिसून आल्यामुळें पुन्हां क्रांतिकारक चळवळ हातांत घेणें आह्मांस अपरिहार्य झालें आहे, अशा अर्थाचें एका क्रांतिकारकाचें महात्माजींस गेलेलें पत्र त्यांनीं आपल्या 'यंग इंडियांत, प्रसिद्ध केलें आहे.

—गेल्या ता. ९ रोजीं दिल्लीस स्वराज्य पक्षाची सभा भरून दिवाणांचा पगार ४००० रुपयांपर्यंत असावा असें तिनें ठरविलें आहे.

—कुडाळ [ रत्नागिरी ] जवळील हीगस गांवीं भुताटकीचे विलक्षण प्रकार चालू झाले आहेत.

—बरद्वानच्या महाराजांनीं लाहोरच्या सनातन धर्म कॉलेजला १२ हजार रु. देणगी दिली.

—सैबेरियांत एक नवीन सोन्याची खाण सांपडली आहे.

—'इंस्तितुत वास्कु दा गाम' या नावांची एक संस्था गामस्मारकानिमित्त स्थापन करण्यांत आली असून, तींत केवळ पाश्चात्य संस्कृतीच्याच पुरस्कर्त्यांचा समावेश होणार आहे.

—बेतींहून म्हापशें येथें जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला एका हिंदूचें प्रेत बरेच दिवस पडून राहिलें होतें, अशी एक बातमी पणजीच्या उ येराल्दांत प्रसिद्ध झाली आहे.

Quinta-
...aulim por apenso aos de acção do processo especial do Decreto de 28 de Março de 1905 que o dito Tucobá moveu a referida Rucmiuim para pagamento da quantia de 346:08:02 proviniente do capital, juros penas e custas liquidados nos referidos autos de acção e de custas e selos acrescidos da execução. O arrematante pagará a contribuição de registo por inteiro e as despezas da praça alem do preço da mesma dentro de tres dias Por este são citados quaisquer credores e co-proprietarios O que para ser publico se espediu este.

Xeldem 8 de Abril de 1924

O escrivão do 2° oficio encarregado de 1°

*Aires Manuel Barreto*

Verifiquei

O Juiz de Direito,

*A. A. de Brito e Nascimento*

---

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2° oficio. Barreto, vão ser vendidos em hasta publica, á porta do tribunal judicial desta comarca, situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige a estação de Sanvordem no dia 29 do corrente mez ás 10 horas, pela terceira vez e pelo preço que a praça der os seguintes bens 1/24 do predio rustico denominado "Galicodilsordo" sito em Colomba e 1/24 do predio rustico denominado "Choudalem ou Choudavisvé" sito na dita ambos da cultura de arroz, descritos na conservatória predial desta comarca respectivamente sob os nos. 12.459 12 460 a f 56 e 57 do livro B. 35 e avaliados em 40 e 30 rupias respectivamente. penhoranos nos autos civeis de execução por custas que o Digno Agente do Ministerio Publico nesta comarca promove contra Xeuntú e seu marido Arjuna Gãocar de Molcopona de Molcornem, por apenso aos autos de inventario orfanologico a que se procedeu por obito de Seguna Vellpo que foi de Colomba. São por este citados todos os credores incertos dos ditos executados e os co-proprietarios e quinhoeiros nos termos e para os fins da lei ficando a contribuição do registo por inteiro a cargo do arrematante. E para ser publico se expediu este. Xeldem 11 de April de 1924.

O Escrivao de Direito do 2° oficio.

*Aires Manuel Barreto*

Verifiquei

O Juiz de Direito,

*A. A. de Brito e Nascimento*


दोन लाखांचें दहा लाख

## भांडवल वाढविलें !

सन १९२२–२३ सालीं कंपनीनें आपल्या भागिदारांस शेंकडा ९ टक्के डिव्हिडंड देण्याचें ठरविलें

शेअर विक्रीसाठीं गांवोगांवीं मेहनती, विश्वासू व हुषार

एजंटस पाहिजेत

एजन्सीचे नियम, प्रॉस्पेक्टस, अर्जाचे नमुने व इतर माहिती साठीं खालील पत्यावर पत्रव्यवहार करावा.

ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड.
पो. ओगलेवाडी (औंध स्टेट)
जि. सातारा

एस. पी. ओगलो अँड कंपनी
मॅनेजिंग एजंटस

## गोमांतकांतील गुऱ्हाळाचा हंगाम

यशस्वी व फायदेशीर करण्यास

# किर्लोस्कर किसान चरक

उपयोगांत आणा रचना साधी व मजबूत. रसाचें भरपूर प्रमाण मिळतें चालविण्यास बैलांची फक्त एक जोडी पुरते. काम मनाजोगतें होण्याजोगा



सुटे भाग हवे तेव्हां मिळण्या सारखे. किंमत अवघी रुपये २०० शिवाय व्यापाऱ्यांस भरपूर क मिशन.

माहिती मागवा

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड

किर्लोस्करवाडी

M. S. M. R.

जि. सातारा.

## सरकारांतून रजिष्टर झालेले

२७००० एजंटांकडून विक्री होणें हें सर्वात उत्तम औषधाचें प्रमाण होय.

## सुधासिन्धु

हें पाण्यांत टाकून घेतल्यानें कफ, खोकला, पटकी, दम, शूल, संग्रहणी, अतिसार, मुलांचे हिरवे पिंवळे जुलाब, उलटी करणें, दूध टाकणें इत्यादि रोगांस एकाच मात्रेंत गुण दाखवितें. बाटलीस ८ आणे व पो. ख. १ ते २ पर्यंत ७ आणे

## दद्रुगजकेसरी

गजकर्णास मुळांपासून घालविणारें औषध १ बाटलीस ४ आणे. एक डझन घेणाऱ्यांस २। रुपयांत घर बसल्या देऊं.

## बालसुधा

अशक्त व रोगी मुलांना धष्टपुष्ट व निकोप करणें असेल तर आमचें हें स्वादिष्ट औषध द्यावें. बाटलीस १२ आणे पोष्ट खर्च ८ आणे.

क्याटलाग फुकट पाठऊं. 4

आमचीं औषधी सर्व औषधें विकणाराजवळ मिळतील.

पत्ता—सुखसंचारक कंपनी, मथुरा.

भाषा ास्त्र ! भाषाशास्त्र !

## केवळ मुलांसाठीं !

ज्या कोणास आपल्या मुलाबाळानीं व्याकरणाचे नियम सहज रीतीनें, नाचत बागडत व हांसत खिदळत शिकावे अशी इच्छा असेल त्यानीं त्यांच्या हातीं रा० व्यंकटेश अनंत नार्वेकर यानीं अत्यंत कुशलतेनें केवळ मुलांसाठी रचलेलें

# कविताबद्ध मराठी व्याकरण

द्यावें. एकदां पाठ झालेले नियम स्मृतिपटलावरून कधींच न ढळण्यासारखी मोहकता त्यांत ओतप्रत भरलेली असून, सदर्हू पुस्तकाविषयीं तज्ञांचे उत्तमोत्तम अभिप्राय मिळाले आहेत.

किंमत—ग्लेज प्रत साडेपांच आणे रफ प्रत साडेचार आणे. ट. ख. निराळा

पत्ताः— भारत ऑफिस—केपें-गोवा.

—आयुर्वेधनाच्या प्रयोगाकरितां मथुरा अयोध्या वगैरे भागांतून माकडें जर्मनींत नेलीं जात आहेत.

—येत्या मार्च महिन्याच्या पहिल्या तारखेपासून पोर्तुगीज हद्दींतील ब्रिटिश तार ऑफिसें पोर्तुगीज सरकारच्या ताब्यांत येतील.

—पोर्तुगालच्या "गाजेत दास कोलोनीअस" पत्राचा वास्को डी गामाच्या स्मारकार्थ एक खास अंक निघावयाचा होता.

—तळपणच्या नदींत होडीकराच्या बेमुर्वतखोर वर्तनानें ६ बायका बुडून मेल्या! सरकारच्या कामदारांनीं या गोष्टीची विशेष चौकशी करणें योग्य आहे.

—कुंभारवाडा येथें एक ब्रह्मचारी आले असून, त्यांच्या दर्शनार्थ हजारों लोकांच्या उड्या पडत आहेत, असें एक वाचक कळवितात.

—मुंबईच्या विविध-वृत्ताची लोकप्रीयता दिवसेंदिवस वृद्धिंगत होत आहे.

—येत्या मार्च महिन्यापासून भारताची नवी योजना अमलांत यावयाची आहे.

—पोर्तुगाल येथें गामाचें श्राद्ध वाढण्यांत आलें खरें, पण त्याला येथील उत्सवाप्रमाणें 'भव्य' स्वरूप प्राप्त झालें नव्हतें, असें ह्मणण्यास सबळ पुरावा आहे.

## मदिरालयें कशीं असावीं?

आमच्या मडगावांत जीं मदिरालयें स्थापन झालेलीं आहेत, त्यांत अर्धी अधिक मदिरालयें शास्त्रोक्त पद्धतीनें बांधलीं नसल्यामुळें, प्रतिष्ठित दारुबाजांस मोठी गैरसोय होत आहे.

हलक्या प्रतीच्या दारुबाजांस पुढील दारानें राजरोसपणें व्यवहार करतां येतो, पण खानदानीच्या घराण्यांतील प्रतिष्ठित दारुबाजांनां, जनलज्जेची चाड असल्यामुळें हलक्या प्रतीच्या दारुड्याप्रमाणें दारुचा संसार उघडपणें माडतां यत नसतो. त्यांनां गावांतल्या गुत्यांस जर मागिलदार असलें, तर तिथें जाऊन आपली सोय करतां येते. पण तशी सोय नसल्यास, गावांपासून दूर अंतरावरच्या लोकरहदारी नसलेल्या गुत्यांवर जावें लागतें. प्रतिष्ठित दारूबाज दूरच्या गुत्यांवर गेल्यामुळें गावांतील गुत्तेवाल्यांस अतोनात नुकसान होत असतें. हलक दारूबाज आपल्या रोजच्या मिळकतीप्रमाणें उन्माद चढण्यासाठीं ह्मणूनच – साहेब पितात ह्मणून नव्हे! हलक्या प्रतीची दारू माडी ताडी पिऊन आपली मानिषा भागवितात. शिवाय त्यांनां लोकापवादाची भीति नसल्यामुळें मोठमोठ्यानें ओरड करून मारवाडी वाटाघाटीनें आणखी थोडी फुकट मागून घेण्यास ते कधींच चुकत नसतात. असलें वर्तन प्रतिष्ठित दारूबाजांचें नसतें, त्यांना एक सर्वसाक्षी सर्वेश्वर सोडून–लोक आपणास पाहतील ही भीति सारखी सर्पदंश करीत असल्यामुळें, ते चोराप्रमाणें आड वाटेनें खांच–खळग्यांतून, पायखान्यांतून, पायखान्याच्या नरकांतून भली थोरली पृथ्वी प्रदक्षिणा घेत मागील दारांतून गुत्यांत प्रवेश करतात.

गुत्यांतहि कोणी आपणांस पाहील ही भीति असल्यामुळें, साहेबबहाद्दरांनीं जी दारू घेण्यास आज्ञा केली, किंवा ज्या दारूची त्यांनीं प्रशंसा केली, ती दारू घेऊन ते आल्या वाटेनें घाईघाईनें परत जातात. असल्या गिऱ्हाइकांस पिलेल्या दारूची फाजील जरी किंमत सांगितली तरी त्याबद्दल मुळींच चकार न काढतां सांगितलेली किंमत देऊन ते चालते होतात.

शिवाय प्रतिष्ठित दारूबाजांची ओळख गुत्तेवाल्यांस अडचणींच्या प्रसंगीं होत असते!

ह्या चोरून दारू पिण्याविषयीं एक प्रतिष्ठित दारूबाज आपल्या छातीला हात लावून असें सांगत आहे कीं,– मी दारू पिऊन बेहोष स्थितींत घरीं जातां जातां पाणीच्या डबक्यांत पडलेलों लोकांनीं आपणांस पाहिलें असेल! – बडबडतांना पाहिलें असेल! – फार तर काय – बेहोष स्थितींत आपल्याचसारखा प्राणी मानून डुकरांनीं माझ्यावर बैठक मारलेली लोकांनीं पाहिली असेल! – पण दारू पितांना मात्र आजपर्यंत एका गुत्तेवाल्याशिवाय, मनुष्यांनीं काय, पण ब्रह्मदेवानें सुद्धां मला पाहिलें नाहीं! ही प्रतिष्ठित दारूबाजाची अभिमानोक्ति फोल आहे असें कसें ह्मणतां येईल?!

कोणत्याहि कलालानें मदिरालय थाटण्यांस जागा घेतांना विचार करून घ्यावी. भर रहदारींत जागा घेण्याचा विचार केल्यास गुत्याच्या मागीलदारी येण्यास प्रतिष्ठितांस वाट आहे कीं नाहीं ह्याचा पूर्वी अवश्य विचार करावा.

गुत्याच्या मागीलदारीं येण्याची वाट, केरटाकण्याची जागा, पायखानें, पाणी सांचून झालेली घाण, जेवून टाकलेल्या पत्रावळी, अशा सजावटीनें मंडित झालेल्या जागेमधून गेली असल्यास, फार चांगलें होईल! कारण त्या ठिकाणीं जीवंत मनुष्य फिरकण्याची भीति नसल्यामुळें प्रतिष्ठितांस या वाटेंत वावरण्यास चांगलें फावतें! मागीलदाराशिवाय गुत्यास बाजूस एक खिडकीहि असल्यास तो गुत्ता उत्तम, अगदीं —राजलक्षणी असें ह्मणण्यास कोणतीच हरकत नाहीं!...

प्रतिष्ठित पांतस्थ परदेशी पाहुण्यांस जाण्याच्या निकडीमुळें त्या स्वर्गीय रस्त्यावरून मागील दारांतून गुत्यांत प्रवेश करण्यास वेळ नसल्यामुळें त्यांना खिडकीचा आश्रय धरावा लागतो. एखादेवेळीं ह्या खिडकीचा उपयोग गांवच्या प्रतिष्ठितांसहि होत असतो.

—गडकरीचेला.

## आजचें पोर्तुगीज सदर

अग्रलेखः—

'आ प्रोव्हींस' पत्राची कारवाई; पक्षांधतेचा कडेलोट; स्वरूपाविष्करण.

स्फुट विषयः—

माझोर्डेच्या 'इंदिये'चे तारे व व्हास्कोडीगामा; व्हास्कोडीगामा व हिंदु राजकारण; हिंदु राजकारण व प्राचीप्रभा; प्रभेला भारताचें उत्तर; सांगें मुनिसिपालटी व सु. वि. देसाई; 'स्वराज्या'चा नवीन मसुदा; इ. इ.

## साभार स्वीकार

**श्री शिवाजीः—** वर्तमानपत्रकाराच्या धंदाला दिवसेंदिवस 'पोट भरण्याचा' व 'पोटभर झगडण्याचा धंदा, असें स्वरूप येत चाललें आहे. पण श्री. दामोदर सांवळाराम यंदे ह्यांच्या संपादकत्वाखालीं सुरू झालेलें आणि ऐक्य व संघशक्ति ह्या घटकद्वयांस अधिकाधिक ताकदवान बनविण्याकरितां वाहिलेलें हें नवीन साप्ताहिक —आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या अंकावरून पहातां— त्या मोहास बळी पडणार नाहीं अशी आशा प्रदर्शित करण्यास बरीच जागा आहे. संपादकीय सदर तडफदार तर असतेंच पण त्यांत एक प्रकारचा जिवंतपणा असतो हाच श्रीशिवाजीचा' विशेष होय. चिरायु होवो. वा. व. ३ रु. पत्ता— श्रीशिवाजी, ३८८ गिरगांव रोड मुंबई नं. २

**भंडारी विजयः—** हें मासिक भंडारी ज्ञातीच्या उन्नतीप्रीत्यर्थ श्री. आ. न. सुर्वे ह्यांच्या संपादकत्वाखालीं आज जवळ जवळ ५ वर्षें निघत असतें. लेख बरे असतात. वा. व. २ रु. पत्ता भंडारी विजय कचेरी ५३ उमरवाडी, मुंबई.

**तेलगू समाचारः—** कांहीं अपरिहार्य अडचणीमुळें बंद पडलेलें हें मासिक पुनः सुरू झालें असून श्री. शं. सा. परब हे त्याचे संपादक आहेत. विशेषतः ऐतिहासिक माहिती देणारे लेख ह्यांत प्रसिद्ध होत असतात. संसार व सुधारणा ह्या सदराखालीं त्यांत श्री. कृ. वि. उपलप ह्यांची एक लेखमाला सुरू झाली असून ती वाचनीय आहे. वा. व. ३ रुपये. पत्ता— व्य. तेलगू समाचार, ६७ कामाठी पुरा बाजार रोड, भायखळा, मुंबई.

**बायको हरवली:—** ह्या छोट्या पुस्तकांत आमच्या समाजाची विभक्त कुटुंब पद्धतीची वाढती इच्छा व मुंबईसारख्या अफाट शहरांत राहणाऱ्या नवतरुण आणि तरुणी ह्यांच्या प्रत्यहीं चाललेले चोंचले ह्या दोनहि विघातक प्रकारांचें चित्र श्री. श्रीमंताचे दोस्त, ह्यांनीं हुबेहुब चित्रित केलें आहे. लेखकाच्या लेखणीचा ओघ अविरत वहात राहिल्यामुळें पुस्तक सर्व दृष्टींनीं वाचनीय झालें आहे. किं. २ आणे. पत्ता— किरात प्रेस, वेंगुर्लें.

## सूचना

'नवें वर्ष, नवें संकट' हा गेल्या अंकांतील लेख 'शैमित्र' या लेखकाचा असून त्यांतील सर्वच विधानें भारताला कशीं मान्य नाहींत, हें आमचें धोरण ज्यांना अवगत आहे, त्यांना विशेष विशद करून सांगण्याचें कारण नाहीं. सं. भारत.

## इकडे लक्ष द्या!

हरतऱ्हेचे पोर्तुगीज ग्रंथ पाहिजे असल्यास नावेली-साष्टी येथें खालील पत्त्यावर मूळ किंमतीला मिळतील.

लिव्रारीय मुदेर्न
फ्रा. लु. एस. मेरगुल्यां

ANUNCIO

## गैरसोय दूर झाली!

येत्या शिमग्याच्या दिवसांत मडगांवाहून येथें जांवावलीपर्यंत मोटार सर्व्हीस सुरू होणार असून, प्रत्येक सीटची किंमत १॥ रुपया पडेल. सकाळीं ९ व संध्याकाळीं ५ वाजतां मडगांवाहून मोटार निघेल व जांवावलीहून लगेच परत येईल. शिमग्यानंतर मडगांव व कुसमण या उभय शहरांतहि मोटार सर्व्हीस सुरू होईल. विशेष माहिती खालील पत्त्यावरः—

शांबा मेस्त,
नवीन–बाजार मडगांव.

### "सेव्हेंज बॅक, मार्क शाव"

वरील बीर (सेव्हेंज) हें एक अत्यंत स्वच्छ व रुचकर पेय असून इकडे बाजारांत मिळणाऱ्या कोणत्याही दुसऱ्या मेकरच्या बीर पेक्षां त्यामध्यें कडवटपणाचें व आल्कोहोलचें प्रमाण फारच कमी आहे हें प्रत्येकानें लक्षांत ठेवावें. बाटलीची किंमत– फक्त १२ आणे.

### "व्हिस्की व्हॅायट होर्स"

प्रत्येक वेळीं व्हिस्की खरेदी करतानां वरील मेकरचीच असल्याबद्दल खात्री करून घ्यावी. कारण कीं, ही व्हिस्की सुप्रसिद्ध व अत्यंत खात्रीलायक असल्याचें आपल्याला अनुभवांतीं पटल्याशिवाय रहाणार नाहीं. एकवेळ वापरून पहा.–बाटलीची किंमत ५॥ रुपये. ह्या बाटल्या सर्व ठिकाणीं मिळतील.

सारस्वत ज्ञातीची

## वधु पाहिजे!

कौशीक गोत्रा जुळणारी, वयानें १३ चे पुढें, कुलीन व अव्यंग. वराचें वय ३०, विजर, स्वतंत्र धंदा व शेतीचें उत्पन्न. विशेष माहितीकरितां पत्रव्यवहार करा.

एस् ब्रदर्स, बेळगांव.

## काळजी कां करतां?

मुलांस शालोपयोगी पुस्तकें पाहिजेत ना? तर मग वेळ न करतां चला व अनंत व्यं. नावेलकर यांच्या दुकानांत आपणांस पाहिजे तीं शालोपयोगी पुस्तकें विकत घेऊन मुलांस श्री रवळनाथ विद्याभुवन शाळेंत पाठवा.

विद्याप्रसारक फंड कमिटी–पोंबुर्पें

Ano 9 N. 5

Quinta-feira 24 de Abril de 1924

ASSINATURA
Por ... s rupias

... OS
Por cada linha ... repetida uma tanga
Num... uma tanga

DI... EDITOR
G. S... Dessay
(...) Goa

S. R.
Biblioteca Nacional
Panjim

# भारत.

BHARAT

वर्ष ९ वें. अंक ५

गुरुवार ता. २४ एप्रील सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केपें—गोवा.

## "NARRATIVAS ELOQUENTES"

II

Continuando, passemos a' 2.a as serçao que feriu os nervos do sr. *V. S*, e' a que vai:

"A politica de cruzamentos dos portugueses com os indianos, em preendida por Albuquerque, foi um mal para os indianos e um erro politico do conquistador";

O sr. *V. S.* defendendo Albuquerque, diz que esta politica *obedeceu a' ideia do dominante confundir se com o dominado*, Admitida como verdadeira a explicaçao da *Tribuna*, qual e' pois a consequencia que dela flui? Porventura, os europeus casando com os indios dao filhos europe s? Nao, de certo . Onde a *confusao*, pois?

Nao ha duvida. A politica do cruzamento trouxe mais um mal para a India. Alem de tantas castas que nos separam, dividem e alheiam uns dos outros, c. ou mais uma, a dos *mesti ços*. Eis o resultado da tal "confusao"

Entremos, agora, a ver o que diz o sr. V. S. acerca da 3a. afirmaçao que e':

"Na India Portuguesa nao se deve glorificar Afonso de Albuquerque por se tratar de "Conquistador de Goa;" a festa realisada no Liceu Central de Nova Goa foi um absurdo, significativo do abastardamento da raça indiana, preparada pela politica do dominante;

A isto observa o ilustre articulista que:

"A conquista de Goa nao foi feita por Albuquerque aos naturais desta mas sim, aos mouros que a traziam subjugada;e fe-la o inclito portuguez a pedido de Timoja que atestou o jugo de ferro e fogo do dominante mussulmano"

Com isto quere dizer o sr. V. S. que Goa nao foi conquistada? Para o ponto de vista indiana, fosse Albuquerque conquistar Goa aos mouros ou ao diabo, uma vez que ele nao restituiu Goa aos seus naturais para que eles mandassem nela como em sua casa, antes pelo contrario, estabeleceu ai o dominio dos portugueses —para o criterio indiano—repitimos— "Albuquerque Conquistou Goa. Aos outros, como ao sr. V. S. e' livre dizer que libertou Goa ou coisa milhor. Isto, porem, e' sentimentalismo, nao e' historia.

A 4.a e ultima opiniao dos jovens articulistas que mereceu, reparo ao sr. *V.* S. e' esta:

"A civilizaçao europeia abriu falencia na Europa, segundo sociologos de autoridade: e porisso, nem em nome da utilidade dessa civilizaçao na India se pode glorificar Afonso de Albuquerque."

O sr. V. S. comentando acrescenta:

"E' uma opiniao pessoal de quem a emitiu; nao pode ela ser aceita na forma lata como esta' expressa no artigo a que aludimos,"

Simplesmente queira o ilustre V. S. dizer quantas opinioes quere no mesmo sentido. E, entretanto, pode ler o nterressante artigo do *O. N.* "A Proxima renascença" publicado em "A Patria", revista dos noves, que se publica em Nova-Goa, 3. º numero.

Continua o sr. V. S. na sua defesa da civilizaçao ocidental

"A civilizaçao europeia pode ter defeitos: mas e' certo que ela e' superior a todas outras, como se ve do facto dos proprios portugueses adquirirem dela os ensinamentos politicos, legislativos e scientificos; como se ve do exodo dos indianos de Goa e da India britanica para Portugal, Inglaterra, França, Alemanha, etc etc.; como se ve das naçois como o Japao, a China, o Egipto, os principados indianos, copiarem a essa civilizaçao as normas administrativas e sociais que caraterizam".

Nao ha' civilizaçoes superiores e inferiores. Ha civilizaçoes distintas e caracteristicas, porque as civilizaçoes sao producto de homens e do momento. Todas elas tem muito de apreciavel, tem tambem muito de condenavel.

Contesta a "Tribuna" isto? Nao de certo—A maxima aspiraçao da civilizaçao europeia e' o "comunismo", que ja' era facto na India antiga sob o nome do "comunalismo" !

Continua o mesmo neste diapasao:

"A civilizaçao europeia e' a que nos da' as siencias, que nos envia maquinas e engenhos de todo o genero; que nos da' comunicaçoes telegraficas para toda a parte; que nos serve com os produtos de suas riquissimas industrias."

Todas as civilizaçoes contribuiram para o avanço das sciencias, construiram maquinas e engenhos...conforme o saber e uaic tura do tempo em que elas floresceram, O sr. V. S. gosta de erudiçao, nao deve ignorar que foi a China que inventou a palavra com que ao presente os europeus "civilizam" os paises "barbaros" de hoje. Digo de hoje, porque os europeus tambem foram "barbaros" de entao.

E' finalmente, no seu "hosana" ao ocidentalismo, desfecha o sr. V. Sr. o seguinte trecho:

"E nao n.s veiu de Europa o gostinho de liberbades civicas?

O congresso nacional do impe'rio visinho e o caracter audaz nos caudilhos populares dessa India sao frutos da civilizaçao europeia. Ha dezenas de anos, reinava a pusilanimidade nesta e noutra India. Hoje em todo o Industao se exibe a audacia, obra da civilizaçao ocidental ingerida por esses proprios que tal qualidade revelam como tribunos do povo. Com o aumento progressivo de indianos que se educam na Europa decresceu a par e passo a primitiva impostura dos dominantes da India, passou para a historia o tratamento de "saheb"...

Logo se calcula. O sr. V. S. finge ignorar a historia, pois do contrario nao teria o arrojo de taxar de pusilanimes uma raça que produziu o Shivaji, o heroi dos herois, o fundador do reino de Maharastra. Uma raça que pela sua resistencia aos ambiciosos do ocidente, fez da conquista da India uma vardadeira epopeia de lutas, de heroismos, de triunfos e derrotas, Sim a "Tribuna" deve ter bem presente na memoria que a conquista da India pelos europeus nao foi um idilio; — foi uma epopeia Na India existe uma fortaleza para a defesa da qual um heroi europeu, viu-se na necessidade de gritar que por cada pedra dela sacrificaria um filho! Porque seria? De certo nao foi porque os indios eram pusilanimes.

Deixe de historias, sr. V. S. Quem nos fez pusilanimes, mesquinhos, incaracteristicos foi a civilizaçao europeia.

A renascença da India, o grande despertar que se nota hoje no Industao e uma surpreza desagradavel para os que nos pretendem civilizar. E' que como disse o Ramananda Chaterjee; os europeus edificaram mais do que eles sabiam!

X.

---

## Ecos & Critica

### COISAS QUE ACONTECEM

O sr. dr. Jaime de Morais publicou na folha oficial uma portaria "dictatorial" que visa a negar competencia aos professores dos Liceus Municipais a examinar os alunos de admissao a 4.a classe. Mas s. excia, sem querer fez mais e bonito. Reconheceu pela mesma portaria. essa compntencia em alguem que embora professor do Liceu Central, saiu duas vezes reprovado no concurso para professor do Liceu Municipal. Enfim sao coisas que acontecem.

### E' POR ESCRIPTOS

Sejamos francos. A Direcçao dos Serviços de Instruçao falhou redondamente, provou-se completamente imcapaz de preencher os intuitos que haviam presidido a' sua creaçao. E' hoje condenada, sem discrepancia de uma voz sequer, pela opiniao publica. O proprio governo em duas portarias a seguir a da nomeaçao de juris especiais para os exames de admissao a' 4.a classe nos Liceus Municipais e a do emprestimo de 65.000 rupias para aquisiçao de mobiliario etc. para o Liceu Central, mostra ignorar a sua existencia. Agora, sr. dr. Lucio dos Santos, o que e' preciso e' encher-se de coragem e por escritos na antiga Tesouraria de Faeznda. Nao lhe encontramos outra soluçao.

### AO SR. DIRECTOR DOS SERVICOS DE INSTRUCAO

Ja' em outro lugar alguem com competencia e criterio aventou a magnifica ideia do ensino da historia da India nos liceus. Parece ridiculo, extremamente burlesco que se ensine a historia pormenorizada de todos os paises menos a da India. Sabem os alunos a' ponta da lingua quais foram os imperadores e reis de Cochichina, da Groelandia; sabem a vida inteira do farao' lenda'rio Tutankhamen, e, agora que o velario do misterio foi descerrado ao mundo inteiro nao resta sequer o mais tenue resquicio para a humanidade descobri. Mas, emquanto tornamos uns portentos em todas as histories ficamos no esquecimento da nossa propria historia!!!, ... A India tem a sua historia, tem os seus feitos heroicos que nao devem ser desprezados. Temos os nossos herois, temos os santos, temos reis, temos matematicos, poetas, filosofos que constelam o

## लेखणीचे कटाक्ष

" तिजोरीची तूट भरून निघण्यासाठीं नोकरशाहीच्या पगाराची खची करणें जरूर असून, या खच्चीला सुरुवात गव्हर्नर साहेबांच्या पगारापासून झाली पाहिजे " असें एका नामदारानें सुचविलें. यां सूचनेनें नामदार गव्हर्नर साहेबांचें मस्तक-तापून त्यांच्या तोंडावाटे क्रोधाग्नीच्या ज्वाळा निघाल्या सर्वांगाची लाही झाली. आपाद मस्तक थरारलें. धरणीकंप होतो कीं काय असा क्षणभर भास झाला.

×

ही क्रांतिकारक स्थिति थोडक्यांतच स्थिरावली. गव्हर्नर साहेब शुद्धीवर आले. व त्यांनीं नोकरशाहीच्या पोटावर पाय देण्या त्या वेड्या कोन्सिलरास आपल्या खासगी खर्चीचें टिपण अवलोकन करणार्थ पाचारण केलें. व या पाचारण विधींत त्या सूचनेचा अंत्यविधी उरकण्यांत आला

*

आमचे गव्हर्नर साहेब धूर्त मुत्सद्दी आहेत कीं नाहींत ? स्वतःच्या पोटाला चिमटा न येतां, तिजोरीची हलाखी घालवून बुद्धीची चलाखी व्यक्त करण्याची त्यांची कला और आहे कीं नाहीं ? या त्यांच्या ' और ' कलेमुळेंच तिजोरीची १५ लाखांची तूट 'कराच्या' एका मात्रेनें चटदिशीं भरून येणार आहे !

×

हें तूटभरपाईचें शतकृत्य आटोपतांच लाट साहेबांची स्वारी निजधामास जाणार आहे. पोर्तुगालची आर्थिक स्थितिहि समाधानकारक नाहीं. तेथील सरकारनें या विलक्षण प्राण्याची सदहू स्थिति सुधारण्याचे कामीं योजना केल्यास, काम फत्ते होणार आहे. तूटीचें नांव काढण्याची कोणाहि प्राज्ञा होणार नाहीं. सर्व राजकारण आनंदाच्या लहरींत विरून जाईल.

×

' खिसा राखून राजकारणाचा शिसा ' हलविण्याचें हें नूतन शास्त्र उजेडांत आणल्याबद्दल सर्व जग गव्हर्नरसाहेबांच्या भजनीं लागेल यांत शंका नाहीं. जगभर त्यांचे सोनेरी पुतळे उभारण्यांत येणें सर्वथैव योग्य आहे. जगांतील ' पहिला मुत्सद्दी ' ही पदवी त्यानांच शोभत असल्यानें, वरील मानांवर त्याचाच हक्क आहे, हें कोण नाकबूल करील ?

❀

मडगांवच्या ' आ तेन्ह ' पत्रानें हिंदु समाजावर मनसोक्त तोंडसुख घेतलें. त्याची नाना विशेषणांनीं निर्भत्सना केली.वापरूं नये ती शब्दयोजना वापरली. विष्णुबाब धेंपे व दादा वैद्य हे खेरीज करून इतर सर्व हिंदु एकजात अराजक आहेत, असा आपला अभिप्राय त्या पत्रानें ठोकून दिला.

×

पण हिंदुसमाजानें काय केलें?' आ तेन्ह ' पत्रानें वाहिलेल्या लोखोलींची कशा रीतीनें संभावना केली ? अपमानाचा सूड कसा उगवून घेतला ? त्या वात्रट पत्राची वात्रट विधानें धिक्कारून कोणत्या मार्गानें हिंदुसमाजानें स्वाभिमान व्यक्त केला ?

+

हिंदु पत्रानीं निषेधपर लेख लिहिले. पोर्तुगीज व मराठी भाषेंत आपली तीव्र नापसंती दर्शविली व निषेधपर चळवळीच्या नाटकाचें भरतवाक्य गाण्यांत आलें ! सर्वत्र शुकशुकाट ! सर्वत्र सामसुम !

×

अशा या 'नेभळट' व एकांगी उपायानें बेभान ' आ तेन्ह ' शुद्धीवर येईल, असें हिंदुसमाजाला वाटत आहे काय ? तसें वाटत असल्यास तो चुकत आहे, असेंच कष्टानें म्हणावें लागत आहे.

*

' आ तेन्ह ' पत्राला वठणीवर आणण्यासाठीं जालीम मात्रेच्या वळशांची जरूरी आहे. आपल्या वात्रटपणाचा पश्चाताप जेणेंकरून होईल, त्या अखेरच्या पण खात्रीच्या उपायांचा अवलंब झाल्यासच 'आ तेन्ह' पत्राचे डोळे उघडणार आहेत, या गोष्टीकडे डोळेझांक उपयोगाची नाहीं.

×

प्रस्तुतचा मनु जाग्रतीचा आहे. घेरण्याचा नाहीं, हें प्रत्येकानें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. दुसऱ्यांच्या लाथा सहन करण्याचा काळ मागें राहिला. गाल पुढें करण्याची खिस्ती रीति मातीमोल ठरलीं असून, तिचा फोलपणा सर्वत्र प्रस्थापित झाला आहे. अशा प्रसंगीं स्वत्व संरक्षणार्थ समरांगणात उभें रहाणें, हे हिंदुसमाजाचें पवित्र कर्तव्य आहे, हें विसरतां कामा नये. भारती.

---

—अमेरिकेंत विमानांच्या चर्मपिशवींसाटीं पांच लाख गुरांचा संहार करण्यांत आला !

—पर्वतावरील चैत्रपोर्णिमेचा उत्सव येत्या शनिवारीं पार पडेल.

—रिवण येथें घडलेल्या एका चोरीला सगुण रूप प्राप्त व्यावयास लागल्याचें एक बातमीदार कळवितात. विष्णवे नमः !

—श्रीपाद शे. नाडकर्णी हे लिसेवाच्या ७ व्या वर्षाच्या परीक्षेंत पहिले आल्याबद्दल त्यांना पहिलें बक्षीस मिळणार आहे. या सन्मानाबद्दल आह्मीं नाडकर्णी यांचें अभिनंदन करितों.

—ह्मापशें येथें 'स्वातंत्र्य' या नावांचें एक साप्ताहिक प्रसिद्ध होणार आहे, असें लोक बोलतात.

--ज० गोमेस दा कोस्त हेहि आपली येथील कामगिरी संपवून पोर्तुगालला चालते झाले.

—येत्या अंकापासून मुंबईचीं बातमीपत्रें प्रसिद्ध होतील. त्यांत ब्रिटिश राजकारणाची निर्भिड चर्चा झालेली वाचकांस आढळून येईल.

—जिकडे तिकडे ग्रीपीसारख्या सांथीचा उद्भव झालेला असून, बरींच कुटूंबें आजारीं पडलीं आहेत.

*O Bharat*, ano 9°, n° 4, 17 de Abril de 1924.

Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida.

# Anuncios

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivao do 1° oficio Redcar, vao a praça para venda em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem na estrada nacioual que de Quepem se dirige a estação de Sanvordem no dia 29 do corrente mez de Abril ás 10 horas pelo maior lanço que se oferecer acima do seu valor os seguintes bens:- 18 maos e 25 arrateis de jagra compacta ou dura, mas nao seca e 157 mãos e 25 arrateis de jagra menos compacta sendo que o preço da referida jagra se acha regluado a razão de 4 rupias a mão e a qual tendo sido depositada nos autos crimes de querela que o Ministerio Publico nesta comarca e o queixoso particular Crisna Porobo Bembró de Quepem moveu a Sorvotema Mortu Sinai Monercar de Curpem e outros em poder de Esvonta Vitol Porobo Dessay de Rivona, foi por este requerida a venda em hasta publica da mesma jagra por não ser de facil conservação, tendo sido deferido esse pedido O arrematante pagará as despezas da praça alem do preço da mesma dentro de tres dias. O que para ser publico se expediu este.

Xeldem 12 de Abril de 1924
O escrivão de direito do 2° oficio encarregado do de 1°
*Aires Manuel Barreto*
Verifiquei
O Juiz de Direito
*A. A. de Brito e Nascimento*

---

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivao do 2° oficio Barreto, vao ser vendidos em hasta judicial a porta do tribunal judicial, situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirije a estagao de Sanvordem, no dia 29 do corredte mez a's 10 horas e pelo prego superior ao da avaliagao os seguintes bans:- Direito a 4.a parte do predio rustico denominado "Bórichemmola" sito em Barcem da cultura de arroz: Direito a' quarta parte do predio rustico denominado "Mad...tulemxeta" sito na dita da cultura de arroz, Direito a quarta parte do predio rustico denominado "Gorbata" sito na dita, da cultura de coqueiros e outras arvores fructiferas e Direito a quarta parte do predio rustico da varzea denominado "Nondonavoli" sito na dita da cultura de arroz, todos descritos na conservatoria predial desta comarca respectivamente sob os n°.s 16593, 16594, 16595 e 16596 a fl. 137 v. te 139 v. do Livro B 45 e avaliados tambem respectivamente por 250, 150 22o, e 325 rupias. Penhorados nos autos civis de execugac por custas que o Digno Agente do Ministerio Publico nesta comarca promove contra Malcuma Gancarina viuva de Panglo, Gaocar de Barcem e outros por apenso aos autos de inventario orfanolo'gico a que se procedeu pelo falecimento do dito Panglo' Gaocar.

Sao por este citados todos os credores incertos dos ditos executados Malcuma e outros e os co-proprietarios e quinhoeiros nos termos e para os fins da lei. A contribiugao por inteiro ficara' a cargo do arrematante Para ser publico se expediu este.

Xeldem 1 de Abril de 1924.
O escrivao de Direito
*Aires Manuel Barreto*
Verifiquei
O Juiz de Direito
*A. A. de Brito Nascimento*

---

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1°. oficio Redcar, vai à praça para venda em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem na estrada Nacional que de Quepem se dirije á estação de Sanvordem no dia 29 do corrente mez ás dez horas pelo maior lanço que se oferecer o direito a quatro quintos do predio 'Urbano" situado no bairro Zambaulim da aldeia Rivona avaliado por 100 rupias: e o direito á metade do predio denominado "Bondoy" namoc anny aforamento da cultura de arroz tem terreno inculto situado em Rivona avaliado por 120 rupias, descritos respectivamente por inteiro na conservatoria destacomarca sob os nos. 13351 e 6471 e penhorados nos autos civeis de execução que Tucobá Ananta Porobo Dessai de Rivona move a Rucmiuim Quenina vulgo Bicú, viuva de

काळ अर्थात् एकाच प्रकारचा होईल. वर्तमानकाळीं दिसून येणारें वैचित्र नष्टप्राय होऊन, भूतकाळचें स्वातंत्र्य वैभव भविष्यकाळीं सर्वांसच उपभोगावयास मिळेल. अशा स्थितींत गोमांतक व हिंदुस्थान या परस्परांत वसत असलेल्या निकटसंबंधाकडे या पुढें विशेष काळजीपूर्वक लक्ष पुरवून, शेजारच्या चळवळींचा शक्य तितका जास्ती फायदा घेणें, हें गोमांतकाचें एक महत्वाचें कर्तव्य होय. व हें कर्तव्य योग्य रीतीनें बजावलें जाण्यास भक्कम मदत व्हावी याच हेतूनें ‘ हिंदुस्थानचें राजकारण ’ या सदराखालीं आजच्या अंकापासून आमच्या वाचकांस ब्रिटिश हिंदुस्थानांतील हरेक चळवळींचा निकट परिचय करून देण्याचा ‘भारत’नें उपक्रम केला आहे.

**आवतोनोमी:**— आवतोनोमीच्या सध्य स्वरूपांत पालट होऊन, तिला नवीन वस्त्रालंकारानीं विभूषित करण्यांत येईल, अशी एक बातमी मागें पसरली होती. कित्येक तर गोमांतकाच्या कपाळावरील हा आवतोनोमीचा टिळा ‘कायमचा’ पुसला जाईल, असेंहि वरळत होते. परंतु तसा प्रकार कांहीं न होतां, सध्या ज्या आवतोनोमीचा आह्मीं ‘फायदा’ घेत आहोंत, तीच आवतोनोमी कांहींशा फेरफारानिशीं कायम केली आहे, अशी सरकाररीत्या खात्रीलायक बातमी आहे. गोव्याच्या सांपत्तिक अधोगतीचें खापर कित्येक मुत्सध्दी आवतोनोमीच्या कपाळावर फोडतात तर कित्येक शहाणे त्याचा संबंध गोमांतकाच्या ‘अपात्रतेशीं’ जुळवितात. एतावता आवतोनोमीविषयीं सगळ्यांचीच मनें सारखीं शुद्ध नसल्यानें, तसेंच तिचें अधिकार क्षेत्र अगदीं आकुंचित असून त्यांतहि वरिष्ट सरकारला मनसोक्त हैदोस घालण्यास कसलाच पायबंद नसल्यानें, आवतोनोमीवरील लोकांचा विश्वास दिवसेंदिवस उडतच चालला आहे.

**‘ गोमांतक अक ’:** — ‘गोमांतक अंकाची ’ कल्पना बहुतेकांस आवडत चालली असून, भारताच्या या नवीन उपक्रमाबद्दल सहानुभूतिपर अशीं पुष्कळ पत्रें येत आहेत. नवशिक्यास गोमांतकाचा पूर्ण परिचय व्हावा, अशाच तऱ्हेच्या विषयांची या अंकांत आंखणीं करण्यांत येणार असून, शिवाय ठिकठिकाणच्या मान्य गृहस्थांचे फोटोहि देण्यांत येणार असल्यानें, ‘ गोमांतक अंक ’ उपयुक्त होईल, असें वाटतें. असो. ‘ भारत’ाच्या या नूतन उपक्रमाला गोमांतक प्रेमी जनतेकडून भरपूर प्रोत्साहन मिळेल, अशी आह्मांस पूर्ण खात्री आहे.

---

—‘ आवदीतोरी ’ खात्यांत अनेक नवीन सुधारणा करण्यांत आल्या असून त्या लवकरच अमलांत येणार आहेत.

—येत्या महिन्याच्या पहिल्या तारखेपासून मिलिटरी, कस्टम व जंगल या खात्यांची नवीन घटनेनुरूप नवी व्यवस्था प्रचारांत येणार आहे.

---

# पुनः तेंच !

## थि गोवा हिंदु असोसियेशन

भारतवाचक वर्ग हो, मागें आपला निरोप घेतांना पुनर्भेटीचा सुयोग इतक्या लवकर येईल अशी आमची कल्पना नव्हती, परंतु ‘भारत’ाच्या ता. २७ मार्चच्या अंकांत रा. वासुदेवराव देसाई यांचें ‘पुनरागमन’ झाल्यामुळें, त्यास उलट दिशा दाखविण्याकरितां ‘पुनः तेंच ’ लिहून ‘भारतास व आपणा सर्वांस तसदी द्यावी लागत आहे याबद्दल क्षमा असावी.

‘गोवा हिंदु असोसिएशन व त्यांचें व्यवस्थापक मंडळ यांची नालस्ती करण्याचा रा. देसाई यांनीं धंदा सुरू केला आहे, व या आपल्या कृत्याचें समर्थन ते ‘ सन्मार्ग सांडुनी भले न जाती या शब्दांनीं करूं पाहतात. पण इथेंच तर त्यांची चूक होत आहे. कारण असें ह्मणतानां एक तर ते स्वतःस भल्याच्या कोटींत घालतात व दुसरें आपण पत्करलेला मार्ग सन्मार्ग समजतात. या दोनही विधानाबद्दल त्यांची गैरसमजूत घालविण्याचा आह्मीं मागच्या खेपेस प्रयत्न केलाच आहे. आज फक्त त्यांना न समजणाऱ्या कांहीं गोष्टींचा उलगडा करण्याचा विचार आहे.

आमचा मागचा लेख लिहिण्याचा हेतु आह्मी त्याच लेखांत सुरवातीस धडधडीत सांगितला असतांना आपल्यावर वाक्बाणाचा वर्षाव केल्याचा व ‘भारत’ावर शिंतोडे उडवल्याचा आरोप रा. देसाई हे आमच्यावर करीत आहेत, आणि आपल्या लांबलचक लेखास आश्रय देऊन पाठ राखल्याबद्दल कृतज्ञता ते भारतास ‘बिचारा भारत’ या नांवानें संबोधून प्रगट करीत आहेत ! त्यांच्यावर वाग्बाण सोडण्याच्या हेतूनें प्रेरित होण्याइतकी त्यांना आह्मी मान देत आहों असें जर ते समजत असतील तर तो निवळ त्यांचा भ्रम आहे. आणि शेंकडो मैल अंतरावर असलेल्या एखाद्या व्यक्तीनें तितक्याच दूर असलेल्या एखाद्या संस्थेविषयीं अद्वातद्वा लिहिल्यास त्यास थारा देण्यापूर्वीं बराच विचार केला पाहिजे एवढेंच भारतकारांच्या नजरेस आणून द्यावयाचें होतें. याच्या पलिकडे भारतावर आमच्याकडून कसलेही शिंतोडे उडवले गेले नाहींत हें खुद्द भारतकारसुद्धां नाकबूल करणार नाहींत. भारताबद्दल आमच्यांत चांगलाच ग्रह असून भारताबद्दल आह्मांला अभिमानही आहे. भारत चुकला कुठें हें दाखवून देण्यांत भारताला कमीपणा नसून रा. देसाई यांच्या लेखासारखे लेख प्रसिद्ध केल्यानें पत्राची इभ्रत कमी होते हें संपादकाना समजलें पाहिजे. आपल्या पत्रांतून प्रसिद्ध होण्याकरितां आलेल्या मजकुराबद्दल उदासीन राहून पत्रकारांना चालत नाहीं. याचें प्रत्यक्ष उदाहरण पहायचें असल्यास खुद्द रा. देसाई यांना मुंबईच्या “ लोकमान्य ” पत्राच्या २४ मार्चच्या अंकातून मिळालेला अर्धचंद्र होय.

व्य० मंडळांत एक कंपू निर्माण झाला आहे व तो आपणास वाटेल॰ तो गोंधळ घालतो असें रा. देसाई यांचें ह्मणणें आहे. पण आम्हीं ह्मणतो कीं निवडून आल्यावर कंपू निर्माण करणें हें एकवेळ व्य. मंडळाच्या हातीं असेल परंतु सभासदांच्या इच्छेविरूद्ध निवडून येणें हें कांहीं त्यांच्या हातीं असणें शक्य नाहीं ना ? मग देसाई ह्मणतात त्याचप्रमाणें दोन तीन इसम बदलून इतर सर्व सभासद प्रत्येक वर्षीं तेच तेच निवडून कसे येतात ? यावरून निवडून येणाऱ्या सभासदांचें संस्थेमध्यें तसेंच वजन असलें पाहिजे. त्यांना संस्थेविषयीं कळकळ पाहिजे. काम करण्याची हांव पाहिजे. अनेक विधायक इलाज अमलांत आणण्यास ताकद पाहिजे. इतकें असल्याशिवाय कोणी त्यांना निवडून देणार नाहीं निदान सभासदांच्या मर्जाविरुद्ध त्यांना निवडून येतां येणार नाहीं. आपणासहि व्य. मंडळावर येतां येऊन गोंधळ घालण्यास मिळावा अशी एखाद्याची इच्छा असेल परंतु त्याची कर्तबगारी दुसऱ्यांच्या नजरेस आली पाहिजे. टीकायुक्त लेख लिहून कुठें कर्तबगारी अंगीं येतें ?

व्य– मं. कडून चुका झाल्या व हें त्यांस कबूलही आहे. असें ते स्वतःच गृहित धरतात. कां तर “ आपण जाब विचारला होता आणि त्यास उत्तर देण्याचें टाळून व्य० मं. मूग गिळून स्वस्थ बसलें पण रा. देसाई यांच्या अपारदर्शक ( opaque ) डोक्यांत हें कसें आलें नाहीं कीं, ......‘ गांठ पडें तो चूप रहना ’ याच तत्वाचा व्य० मंडळाकडून अनुवाद झालाअसेल ? रा. रा. देसायांच्या लांबलचक लेखास उत्तर करण्याचें व्य. मंडळास कांहींच कारण नव्हतें व नाहीं. त्यांच्या लेखास व्य. मंडळ इतकें महत्व देईल असें आम्हांस कधींच वाटलें नाहीं. आणि आम्हीतरी प्रत्युत्तर देण्याचा मान कां दिला हें गेल्यावेळीं कळवलेंच आहे.

हिशोबाच्या बाबतींत ज्यावेळीं डोळ्यात चुरचुरीत अंजन पडलें त्यावेळीं ती रक्कम बदलून दुसरी आली व अधिक ज्ञान मिळविण्याच्या इच्छेनें रा. तेलंग यांची मुलाखत घेण्याची त्यांस बुध्दि झाली. परंतु त्यांच्या दुर्दैवानें त्यांस घोंटाळेच दिसून आले. आम्हीं ह्मणतों, नुसता घोंटाळाच काय, त्यांचा ब्रह्मघोंटाळा उडेल, कारण तें त्यांचें क्षेत्रच नव्हे ! आम्ही पृथ्वीच्या पाठीवर आहों हें समजावून देण्याचा प्रयत्न सर्वांच्याच बाबतींत सफल होईल असें नाहीं. इथें रा. देसाई यांस श्री. वरेरकर यांच्या गुलेलुच्या एका वाक्याची आठवण करून दिल्यास तें अप्रासंगिक होणार नाहीं. तो ह्मणतो: ‘ तुमचा धर्म फार गहन असावा, कां कीं, त्यांत मला कांहीं समजत नाहीं.’

रा. देसाई यांच्या लेखास या खेपेस इतकेंच उत्तर बस्स आहे. कारण चर्चा सविस्तर लांबवून भारताची जागा व वाचकांचा वेळ घेणें प्रशस्त नाहीं. बाकी रा. देसाई यांच्या विधानांत कितपत पोकळपणा आहे हें आम्ही सर्वांच्या नजरेस आणून दिलेंच आहे तरी जातां जातां रा. देसाई यांस आमचा असा सल्ला आहे कीं, १८ रु. २ आण्याचें कलम रिपोर्टांत पुनः पहाण्याकरितां त्यांनीं एखाद्या नेत्रवैद्या ( opthai nia surgen ) कडे अवश्य जाऊन यावें.

रा. देसाई यांस पुनः आमचें सांगणें आहे कीं, शंका कुशंका फेडून घेण्याकरितां जो त्यांनीं मार्ग पत्करला आहे तो चुकीचा आहे व योग्य व सरळ मार्ग हाच आहे कीं त्यांनीं ताबडतोब सभासद होण्याची खटपट करावी– व्य. मंडळाकडून वाटाण्याच्या अक्षता मिळतील अशी भीति आजच त्यांनीं धरूं नये–आणि नंतर शंका वगैरे फेडून घेण्याचा त्यांना अधिकार प्राप्त होईल. तोंपर्यंत त्यांच्या हेतूविषयीं लोकांना संशय असला तर त्यांत नवल नाहीं. आपणास मुक्ताफळें अर्पण केल्याबलल ते कुरकुर करतात, परंतु भारतवाचक वर्ग हो, आमच्यांतील चुकलेल्या कोंकरास ताळ्यावर आणणें हें आमचें कर्तव्य आहे व असें करतांना वेळींच नाइलाजानें दोन तडाखे द्यावे लागत आहेत, व रा. देसायांच्या वृत्तींत अशीच चलबिचल दिसून आली तर आम्ही हें आमचें कर्तव्यं शेवटपर्यंत बजावित राहूं असें आश्वासन त्यांना आम्ही आजच देऊन ठेवतों.

[ १ ] श्रीधर नरसिंह प्रभू
४० तारा बिल्डींग, बदामवाडी
गिरगांव, मुंबई

[ २ ] पुंडलीक वामन घोटींग
कॉंट्राक्टर बिल्डींग, गिरगांव मुंबई.

---

## वर्तमानसार

—हस्तांदोलनाविरुद्ध स्थापन झालेल्या पणजी येथील संस्थेचा परिचय आ[illegible] वाचकांना करून दिलाच आहे. आतां चुंबनविधीविरुद्धहि एक संस्था तेथें [illegible] होणार असल्याची बातमी एका मडगांवच्या पोर्तुगीज साप्ताहिकांत प्रसिद्ध झाली आहे. ‘ तुका ह्मणे उगी रहावें । काय होतें तें तें पहावें.’

—ह्मापसें व मडगांव येथील पाठशाळेच्या तिसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा पणजीच्या लिसेव सेंत्रालांतच घेण्यांत येतील, असें ह्मणतात.

—पणजीचे वयोवृद्ध पेन्शनर फ्रांसिस्कु जुवांव शाव्हीयर–गव्हर्नमेंट सेक्रीटरीयेटचे मुख्य ऑफिसर— हे खिस्तवासी झाल्याचें कळविण्यास वाईट वाटतें.

—अनेक अनावश्यक खर्चांची कलमें कमी करण्याच्या प्रयत्नांत पोर्तुगीज वसाहतीचे प्रधान गढून गेल्याचें कळतें.

—पणजी येथें अजूनहि प्लेगचे उंदीर आढळून येत असतात.

ce'u da India, o ce'u deste bergo verdadeiro das civilizagoes.

Nao se devem olvidar destes herois milenarios que num sonho todo tecido de amor da Patria; do heroismo, da abnegagao viveram aqueles tempos em que Prestes Joao dominava a India e as mentes alucinadas e prenhes de cobiga dos mandoes da Europa.

Aqui se escreveram o *Mahabharata*, o *Ramaiana*, de quem o Emilio Burnouf faz a seguinte apreciagao:

"Este livro e' provavelmente o mais belo que tem saido da mao dos homens ...Ver-se-ha' que houve homens que pensaram melhor do que no's e que tragaram o caminho da salvagao" O prlmoroso poema de Nala e Damaianty causou enlevo aos orientalistas de renome como Carriere, Schlegiel, Lobedanz etc. E no's so' de nome e de lombada conhecemos estes livros sagrados.

Como ainda nao esta' publicada a lista dos livros dos liceas pedimos ao sr. Director dos S. da I. se deseja que o seu nome seja lembrado e deseja ter alguma gratidao dos indios s. excia. que por ocasiao dos exames foi tam guerreado nao diremos que o foi sem razao, para instar com os poderes constituidos se e' que s. excia. nao tem poder para isso, para de futuro, se ensinar a historia desta grande terra da India.

Tera' entao quem o aplauda!

### SERA' VERDADE?

O que nos consta, se tiver foros de verdadeiro, e' um atropelo a' lei medonho.

Informam-nos que o Director da Escola Normal nao aceitara' este ano os requerimentos dos candidatos ao exame de 3 ° ano na 2.a epoca; com que basse na lei?

Nao o sabemos; ao que se supoe e' a falta de gratificagoes. A lei taxativamente preceitua que e' concedida uma 2.a epoca aos alunos do liceu, escola normal, Instituto Comercial etc E nao ser a mesma concedida e' uma grande atrapalhagao tida em consideragao a grande razzia que houve. De 4 alunos so' passaram 4.

Ou omem todos ou haja moralidade.

Chamamos a atengao do Directo que superintende estes servigos.

### RESTABELECENDO ...

Foi assinado no dia 30 de Margo um decreto que restabelece em todas as colonias as respectivas cartas organicas, com as modificagoes julgadas necessarias.

¿Que alteragoes serao estas? Reducgao da maicria dos vogais eleitos? Expulsao da demasiada superintendencia do Governo Centrai, da acgao legislativa e executiva das mesmas colonias?

Nada se sabe nem ha' elementos donde se possa obter qualquer informe fidedigno.

Mas o que for, soara'!

भा र त

मि. चैत्र व० ५ मी गुरुवार १८४६

## विद्यार्थ्यांचें राजकारण

[ लेखांक ३ रा ]

गोमांतकांतील विद्यार्थ्यांच्या राजकारणांत कोणकोणत्या गोष्टींचा समावेश करणें इष्ट आहे, हें या लेखांकांत पाहूं. विद्यार्थ्यांनीं राजकारणांत लक्ष घालणें ह्मणजे राजकीय प्रश्नांच्या झगड्यांत चढाईचें धोरणच केवळ नव्हे तर त्या प्रश्नांत प्रत्यक्षरीत्या भाग घेणें नव्हे, हें पुन्हां एकदां सांगणें इष्ट आहे. जें कांहीं करावयाचें तें योग्य वेळीं राजकारणाचेद्वारा देशहित साधावयाचें आहे यावर दृष्टि ठेवून पूर्व तयारी ह्मणून केलें पाहिजे.

कोणत्याहि रोगाचें योग्य निदान व्हावयाला वैद्य लोकांना ज्या शरीराचे मागावर त्या रोगाचें ठाणें वसलें असेल, त्या भागाचें पूर्ण ज्ञान असणें अत्यावश्यक होय. हीच गोष्ट राष्ट्रालाहि लागू करून चालण्यास हरकत नाहीं. देशाची राजकीय व्यवस्था ही एका शरीर रचनेप्रमाणें आहे, असें धरून चालल्यास, त्या राजकीय व्यवस्थेंत उद्भवणाऱ्या कोणत्याहि रोगांवर औषधाचा प्रयोग करण्यापूर्वीं त्या व्यवस्थेची पूर्ण माहिती करून घेणें फार जरूरीचें आहे. इतकें कीं, ती माहिती मिळविण्यापूर्वीं औषधोपचार करणें वेडेपणाचें ठरेल. याकरितां, गोमांतकाच्या राजकीय क्लेशाचा उपशम करणें असल्यास विद्यार्थ्यांनीं त्याच्या राजकीय घटनेचें काळजीपूर्वक अध्ययन केलें पाहिजे. या अध्ययनाचा जोर तुलनात्मक पद्धतिवर विशेष ठेविल्यास जास्त चांगलें, हें सांगणें नकोच. यापुढील पायरी, ह्मणजे, राजकीय व्यवस्थेची किंचित् देखील माहिती नसलेल्या आपल्या बांधवानां आपल्या राजकीय घटना पत्रांतील ( carta orga'nica ) मुख्य मुख्य कलमांचें ज्ञान करून देणें, ही होय. अमुक एक कलम स्वराज्यांत समावत असलेल्या आपल्या हक्कांचे विरुद्ध आहे याची जाणीव झाल्याशिवाय सर्व साधारण जनतेला त्या कामाचा इनकार करण्याची बुध्दि होणें शक्य नाहीं. कोणत्याहि आवश्यक गोष्टीच्या अभावाची जाणीव झाल्याशिवाय त्या गोष्टीच्या सिध्यर्थ मनुष्याचे प्रयत्न खर्चीं पडत नसतात. हें लक्षांत आणून अशिक्षित लोकांच्या राजकीय ज्ञानानभिज्ञ लोकांच्या डोळयांसमोर स्वराज्याचा मळकट आरसा वेळोवेळीं ठेविला पाहिजे. व त्यावरील डागांची त्यानां माहिती करून दिली पाहिजे. या कार्याबरोबरच दुसरें, पण अत्यंत महत्वाचें कार्य विद्यार्थी वर्गानें आपल्या शिरावर घेतलें पाहिजे. हिंदुमतदार संघास त्याच्या कर्तव्याची जाणीव करून देणें हें तें कार्य होय. स्वराज्याचें खरें स्वरूप जास्त उत्तम तऱ्हेनें जर कुठें दृष्टींस पडणें शक्य असेल तर ते मताधिकारांत होय. **मताधिकारांत बीजरूपानें देशाचें स्वराज्य सर्वस्व सांठविलेलें असतें.** या मताधिकाराची राजभाषेच्या ज्ञानाचे अभावीं येथून तेथून सर्वत्र हिंदूंना, अमंल बजावणी करतां येत नाहीं. हें जन्मसिद्ध हक्कांविरुद्ध व दुःखदायक तर खरेंच; पण मताधिकाराला लायक असून तो हस्तगत न करणारे व हस्तगत केला असल्यास त्याचा योग्य प्रसंगीं उपयोग न घेणारे लोक बऱ्याच प्रमाणावर आपल्यांत असावे, हें त्याहिपेक्षां दुःखदायक होय. हा अज्ञानजन्य प्रकार दूर करण्यास तरुण हिंदु विद्यार्थ्याला फारसे श्रम पडणार नाहींत. ओळखीच्या मंडळीशीं प्रसंगानुसार बोलणें काढून तिच्या मनावर मताधिकाराच्या व मतदानाच्या फायद्याचा प्रकाश पाडल्यास बरेंच कार्य होण्यासारखें आहे. पण यापूर्वीं वयाची आडकाठी नसल्यास, प्रत्येक विद्यार्थ्यानें आपलें नांव नोंदवून मताधिकार मिळविणें इष्ट आहे. समजा, उद्यां पोर्तुगालच्या पार्लेमेंटांत गोमांतकाला असलेल्या हक्काच्या दोन जागांपैकीं एकेकरितां हिंदूनीं आपला एक उमेदवार उभा केला. आजपर्यंत गेलेले प्रतिनिधी ख्रिश्चनच असल्यामुळें, एक जागा हिंदूंना देणें, ख्रिश्चन समाजाला आपल्या रूढ हक्कांवर गदा आणल्यासारखें होणार आहे. हें आजपर्यंतच्या इतिहासावर नजर फिरविल्यास सांगण्याची जरूरी नाहीं. तेव्हां हिंदु प्रतिनिधी निवडून देण्याच्या आपल्या युक्त आकांक्षेला त्या समाजाकडून विरोध होणार हें उघडच आहे. पोर्तुगीज भाषेच्या अज्ञानामुळें मताधिकारास मुकलेल्या हिंदुसमाजास, ही बिकट परिस्थिति अशीच चालू राहिल्यास, वरील विरोधांतून वाट काढणें शक्य नाहीं. पण पुढें मागें समाज पुढाऱ्याच्या प्रयत्नानें ही स्थिति नाहींशी होणार असें धरून चालल्यास देखील मताधिकार व मतदान यांचे संबंधीं अशीच अनावस्था चालू राहिल्यास हिंदु जनतेच्या गरजा व गाऱ्हाणीं मुख्य कायदे मंडळांत पोंहचणें शक्य नाहीं. व अशा रीतीनें, त्याचें राजकीय अस्तित्व असून नसून सारखेंच होणार आहे. याकरीतां, येथील तरुण विद्यार्थी वर्गानें, नवीन मतदार संघ तयार करणें व असलेल्यास त्याच्यापुढील कार्याची ओळख करून देणें, फार अगत्याचें आहे. या मार्गाचा हिंदु विद्यार्थ्यांनीं एव्हांच अवलंब केल्यास, राजकारणांत थोडक्याच काळाचे आंत, हिंदु समाजाला अनुकूल क्रांति घडवून आणतां येणार आहे.

सर्वच गोष्टी कांहीं विद्यार्थ्यांना करतां येण्यासारख्या नाहींत, ही गोष्ट आह्मांस ठाऊक आहे. आणि ह्मणूनच शक्यतेच्या आटोक्यांत असलेल्या कांहीं थोड्या गोष्टी आम्हीं वर सांगितल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या हितसंबंधाशीं जास्त निकट रीतीनें वास करणारे असे दुसरे कांहीं प्रश्न विद्यार्थी वर्गानें सोडविण्यापेक्षां समाज पुढाऱ्यानींच सोडविणें सध्याचे परिस्थितींत इष्ट आहे. मराठी शिक्षणाचा प्राथमिक शिक्षण संस्थांत व दुय्यम शिक्षण संस्थांत प्रवेश, हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाचें वरील संस्थांतून सक्तीचें शिक्षण वगैरे प्रश्न पुढारी वर्गानें सोडविण्यासारखे आहेत. लिसेव व० संस्थांतून एकंदर जगाचा इतिहास शिकवितात, हें खरें. पण लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ह्मटली ह्मणजे, शिक्षण खात्यानें मंजूर केलेल्या जगाच्या इतिहास ग्रथांत हिंदुस्थान, चीन वगैरे प्राचीनतम देशाचा इतिहास वगळलेला आहे. हा प्रकार शोचनीय होय. ज्या राष्ट्राचा इतिहास त्याच्या संस्कृति प्राचीनत्वामुळें उभ्या जगांतील एकंदर सुधारलेलीं राष्ट्रें मोठ्या आस्थेनें शिकत आहेत. त्या राष्ट्राला—हिंदुस्थानाला त्याचा स्वतःचा इतिहास असावा कीं नसावा या बद्दल विद्यार्थ्याला, शिकत असलेल्या पुस्तकावरून शंका यावी; ही गोष्ट फार दुःखदायक होय. हा प्रकार होतां होईतों लवकर बंद करण्याविषयीं झटणें, हें गोमांतकाच्या पुढारी वर्गाचें एक पवित्र कर्तव्य होय. इतकें सांगून व विद्यार्थ्यांचे राजकाणासंबंधीं फिरून केव्हां तरी विचार करण्याचें अभिवचन देऊन, ही लहानशी लेखमाला पुरी करूं.

## स्फुट विचार

**भविष्यकाळः—** अमलवैचित्र्याची बाब खेरीज करून, गोमांतक प्रांत व हिंदुस्थान या उभय देशांत विशेष महत्वाचा फरक असा कोणताच नाहीं, हें कोणीहि कबूल करील. जी संस्कृति हिंदुस्थान देशाचें जीवन होऊन बसली आहे, त्याच संस्कृतीचा पगडा, परदेशी सुधारणेनें हुच बनलेले कांहीं ख्रिस्ती खेरीज करून, गोमांतकावरहि बसलेला दिसून येतो. गोमांतकाला हिंदुस्थानाविषयीं आपलेपणा वाटत असतो तर हिंदुस्थानला गोमांतक हा आपल्या देहाचाच एक भाग आहे, असें वाटत असतें. ज्या इतिहासानें हिंदुस्थान देशांतील लोकांची मनें विविध भावनानीं उचंबळतात, त्याच इतिहासानें गोमांतकीय जनतेचींहि मनें चलविचल होतात. तात्पर्य, अमलभिन्नतेचा मुख्य प्रश्न व भाषावैचित्र्य व स्थानिक भेदाभेद या गौण पण अनिवार्य बाबींकडे दुर्लक्ष केलें, तर हिंदुस्थान व गोमांतक या उभय देशांच्या अंतःरचनेंत दुसऱ्या कोणत्याच प्रकारचा भेद आढळून येणार नाहीं. एकाच संस्कृतीच्या या दोन्ही देशांत अथवा एकाच मोठ्या देशाच्या या दोन्ही भागांत पुढें मागें एकाच जातीची राज्यसत्ता ठाणें देऊन बसेल यांत संशय नाहीं.

**आह्मीं व आमचे शेजारीः—** आमचा व आमच्या शेजाऱ्यांचा राजकीय भविष्य

# श्री मदिन्दिराकांततीर्थ

व त्यांचे परम प्रिय शिष्य श्रीमत्कमलानाथतीर्थ हे स्वामीद्वय संचारास फिरत असतां कालापुरास आले त्यावेळीं त्यांच्या स्वागतार्थ रचिलेल्या कविता.

## आर्या गीति

श्रीमद्वैष्णवगुरुगुरु गुरुहि तसे सर्वसिद्धिसदन मुनी ।
ध्यातों सादर चित्तें त्यांचें स्ववांछितुल्य पद नमुनी ॥ १ ॥
करितां नम्र पदाब्जीं माथा सांभाळिती अवनतातें ।
विसरुनि अपराधांतें याहुनि करिजेल का अवन तातें ? ॥ २ ॥
अस्मद्दुरीतें अपुल्या योगबलाग्नित करावया हूत ॥
झटती याहुनि माता बाळांचें करिल काय फार हित? ॥ ३ ॥
ज्यांनीं असंगशस्त्रें केलें जिंकोनि षडरीचें दमन ।
वमन तसें धन गणिलें त्यांतें न करील बुध कसें नमन? ॥ ४ ॥
सुतपस्यासिद्धि तसें योगबलहि बहु असे असामान्य ॥
जगतीं न पाहिला कधिं तापसवर कुणि तुह्मां असा मान्य ॥ ५ ॥
अति शांत दांत तुमची मूर्ति सतत जे मनांत पुजितील ।
दैन्य न बाधेल तयां कीर्ति, श्री, यश बळेंच वरितील ॥ ६ ॥
नरनारायण तैसे गुरुशिष्य तुंह्मीं तपःपर महर्षी ॥
भूषण सत्पुरुषांचें पाहुनि झालों तुह्मां परम हर्षी ॥ ७ ॥
आहे वाटे अमुच्या सुकृताची जोड पदरिं फार बरी ।
ह्मणुनि कृपेची तुमच्या वळलि सदय हो अह्मांवरी लहरी ॥ ८ ॥
किंवा हें भेषजचा अति रुग्णा वांचवावया आलें ॥
घालें पाहुनिया मन वाटे प्रेमार्णवांत तें न्हालें ॥ ९ ॥
किंवा आपोआपची लोटलि हीं अळशावरी गंगा ।
जीच्या नामस्मरणें पावति अजि अखिल पातकें भंगा ॥ १० ॥
वाहति तुमच्या ह्रदयीं दया, क्षमा, शांतिचे सदैव झरे ।
ह्मणुनिच संनिध जातां अतितप्ताचाहि सर्व ताप सरे ॥ ११ ॥
वेदार्थतुल्य अपुले शांतिसुखपूण्यकीर्तिजनक वच ।
संरक्षाया क्लेशांपासुनियां होय मूर्त कीं कवच ॥ १२ ॥
त्याचा करी अनादर जो नर तो मूढ वा असे मंद ।
त्याला सुख, जय कैंचें ? स्वप्नींहि न शिवेल अल्प आनंद ॥ १३ ॥
गुरुवाक्यग्रहणीं ज्यांचे आहे तत्पर सदैव कान, मन ।
ते पावति सौख्य जगीं घाली त्यां माळ कीर्ति, सुयश, धन ॥ १४ ॥
होउनि रत स्वधर्मी गुरुंची जो मनुज सत्कृपा जोडी ॥
भवशीत निवाराया त्यांतें नलगेची अन्य पासोडी ॥ १५ ॥
आक्रमिती सुनीतीपथ विमल जयां आवडे सदाचरण ।
भीती अपकीर्तीतें ते गुरुंचे पूजिती सदा चरण ॥ १६ ॥
संसारह्रदीं बुडतां गुरुंची अति सुदृढ वाक्तरी तारी ।
हारी त्रेतापातें आधिव्याधी समस्तही वारी ॥ १७ ॥
दुर्मति दुराग्रही बहु जे नर ते मात्र गुरुपदीं चुकती ।
रचिती निजकरें अपुलें अहित स्वसुखासि सर्वदा मुकती ॥ १८ ॥
गुरुच्या चरणावरुनी ओंवाळिति सर्वदा असु ज्ञाते ।
ते धन्य होत जगतीं अति दुर्लभ भाग्य हें असुज्ञातें ॥ १९ ॥
गुरुवचनावरि ज्यांचा श्रद्धापूर्वक अखंड विश्वास ।
होतां वश न विकारां, तेच मनुज पूज्य होत विश्वास ॥ २० ॥
पांडित्याचा वाहुनि गर्व शिरीं जे तुह्मांकडे आले ।
टिकले ते न क्षणहि होउनियां विमद सर्वही गेले ॥ २१ ॥
परिसुनि तुमचे भव्यद मधहुनि अति गोड बोल कानांही ।
मुढहि निवे खरोखर तुमच्यासम कुणिहि बोलका नाहीं ॥ २२ ॥
दीन न पावो कधींही वसतां तुमच्या पदासमीप दरा ।
मागतसें नम्रपणें हेंच परसुनी पदास मी पदरा ॥ २३ ॥
ठेवा प्रेम निरंतर ठेवियलें विमल जेवि अजवरती ।
मागावें काय अधिक ? आस वसेना मनांत या परती ॥ २४ ॥
आदरपूर्वक गुरुंच्या पुनित पदाब्जीं समर्पिल्या आर्या !
या त्यां रुचो झटति जे संतत वैष्णव समाजहितकार्या ॥ २५ ॥

कालापूर, फाल्गुन कृष्ण ८ मी शके १८४५.

श्रींचा शिष्यानुशिष्य.

सगुण आत्माराम प्रभू मोये

*O Bharat*, ano 9º, nº 5, 24 de Abril de 1924.

Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida.

# Anuncios

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivao do 1º oficio Redcar, vao a praça para venda em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem na estrada nacional que de Quepem se dirige a estação de Sanvordem no dia 29 do corrente mez de Abril ás 10 horas pelo maior lanço que se oferecer acima do seu valor os seguintes bens:– 18 maos e 25 arrateis de jagra compacta ou dura, mas nao seca e 157 mãos e 25 arrateis de jagra menos compacta sendo que o preço da referida jagra se acha regluado a razão de 4 rupias a mão e a qual tendo sido depositada nos autos crimes de querela que o Ministerio Publico nesta comarca e o queixoso particular Crisna Porobo Bembró de Quepem movem a Sorvotema Mortu Sinai Monercar de Curpem e outros em poder de Esvonta Vitol Porobo Dessay de Rivona, foi por este requerida a venda em hasta publica da mesma jagra por não ser de facil conservação, tendo sido deferido esse pedido. O arrematante pagará as despezas da praça alem do preço da mesma dentro de tres dias. O que para ser publico se expediu este.

Xeldem 12 de Abril de 1924

O escrivão de direito do 2º oficio encarregado do de 1º

*Aires Manuel Barreto*

Verifiquei

O Juiz de Direito

*A. A. de Brito e Nascimento*

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivao do 2º oficio Barreto, vao ser vendidos em hasta judicial a porta do tribunal judicial, situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirije a estagao de Sanvordem, no dia 29 do corredte mez a's 10 horas e pelo prego superior ao da avaliagao os seguintes bans:- Direito a 4.a parta do predio rustico denominado "Borichemmola" sito em Barcem da cultura de arroz: Direito a' quarta parte do predio rustico denominado "Maddamtulemxeta" sito na dita da cultura de arroz, Direito a quarta parte do predio rustico denominado "Gorbata" sito na dita, da cultura de coqueiros e outras arvores fructiferas e Direito a quarta parte do predio rustico da varzeá denominado "Nondonavoli" sito na dita da cultura de arroz, todos descritos na conservatoria predial desta comarca respectivamente sob os nº.s 16593, 16594, 16595 e 16596 a fl. 137 v. te 139 v. do Livro B 45 e avaliados tambem respectivamente por 250, 150 22o, e 325 rupias. Penhorados nos autos civis de execugac por custas que o Digno Agente do Ministerio Publico nesta comarca promove contra Malcuma Gancarina viuva de Panglo, Gaocar de Barcem e outros por apenso aos autos de inventario orfanolo'gico a que se procedeu pelo falecimento do dito Panglo' Gaocar.

Sao por este citados todos os credores incertos dos ditos executados Malcuma e outros e os co-proprietarios e quinhoeiros nos termos e para os fins da lei. A contribiugao por inteiro ficara' a cargo do arrematante Para ser publico se expediu este.

Xeldem 1 de Abril de 1924.

O escrivao de Direito

*Aires Manuel Barreto*

Verifiquei

O Juiz de Direito

*A. A. de Brito Nascimento*

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1º oficio Redcar, vai à praça para venda em hasta publîca á porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem na estrada Nacional que de Quepem se dirije á estação de Sanvordem no dia 29 do corrente mez ás dez horas pelo maior lanço que se oferecer o direito a quatro quintos do predio "Urbano" situado no bairro Zambaulim da aldeia Rivona avaliado por 100 rupias: e o direito á metade do predio denominado "Bondoy" namoc anny aforamento da cultura de arroz tem terreno inculto situado em Rivona avaliado por 120 rupias, descritos respectivamente por inteiro na conservatoria destacomarca sob os nos. 13351 e 6471 e penhorados nos autos civeis de execução que Tucobá Ananta Porobo Dessai de Rivona move a Rucmiuim Quenina vulgo Bicú, viuva de

# हिंदुस्थानचें राजकारण

मि. हॉर्निमन यांस परत हिंदुस्थानांत येण्यास बंदी करणारा निर्बंध काढून टाकण्यांत यावा किंवा सरकारास त्यानीं कांहीं गुन्हा केला आहे असें वाटत असल्यास त्या गुन्ह्याची शाबिती योग्य रीतीनें कोर्टांत होऊन त्यांना बचाव करण्याची संधी देण्यांत यावी, अशा अर्थाचा ठराव लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्लींत राष्ट्राच्या प्रतिनिधींच्या मंडळांत कांहीं दिवसांपूर्वी पसार झाल्यानंतर, थोड्याच दिवसांनीं त्याच स्वरूपाचा एक ठराव स्वराज्यपक्षाच्या सभासदानीं मुंबईच्या कायदेमंडळांत आणला होता या ठरावावर वादविवाद होऊन अखेरीस तो सरकारी मताधिक्यानें नापास झाला. हा वादविवाद व त्याचा निकाल वाचल्यावर स्वराज्य व स्वतंत्र पक्षांच्या ह्या अपेशाचें खापर 'ब्राह्मणेतर' जागांच्या प्रतिनिधींच्या कपाळावर कां फोडण्यांत येतें, हें सहज ध्यान्यांत येईल. हा ठराव पुढें आणण्यापूर्वी तो पास होईल ही खात्री करण्याची काळजी मि. नरिमान ह्यानीं घेतली होती; वर उल्लेख केलेले सद्गृहस्थ ऐनवेळीं दगा देतील अशी शंकासुद्धां कोणास आली नाहीं. दुर्दैवानें किंवा ( सरकारीदृष्टीनें ) सुदैवानें सर्वांचीच अपेक्षा चूक ठरली व हॉर्निमनच्या बाबतींतला माणसुकीला लाज आणणारा हा अन्याय दूर करण्याची संधी मिळाली असतांहि तिचा फायदा घेण्याचें कांहीं व्यक्तींनीं नाकारलें. बिचाऱ्या हॉर्निमननीं ह्यांचा असा कोणता अन्याय केला होता कीं ह्या सद्गृहस्थानीं आपल्या मतांचा एवढा अक्षम्य दुरुपयोग निलाजरेपणानें करावा? शुद्ध जातिद्वेषानें आपल्या प्रतिस्पर्ध्यांस हाणून पाडण्यासाठीं ह्यांनीं सरकारची तळी उचलून धरल्यास, कदाचित, कोणास आश्चर्य वाटावयास नको; पण ज्यानीं जन्मभर सामाजिक व राजकीय पतितांचें संरक्षण करण्याचा प्रयत्न केला व ह्या अक्षम्य अपराधाबद्दल ज्यांना आज स्वताच्या समाजांत बहिष्कृत व पतित व्हावें लागलें अशा माणसाला अन्यायानें वागविण्यास ह्या सभासदांनीं मदत केल्याबद्दल प्रत्येक विचारी माणसास नुसतें आश्चर्यच नव्हे पण लाज वाटली पाहिजे.

खुद्द सरकारला आपल्या कृत्याचें समर्थन करणें किती जड गेलें ह्याची दोन्ही मंडळांतील सरकारी पक्षाच्या पुढाऱ्यांचीं भाषणें वाचून चांगलीच कल्पना करितां येईल त्यांचीं भाषणें ह्मणजे सरकारी बेजबाबदारीची व त्याच्या मागें असलेल्या बेकायदेशीरपणाची कबूली आहे. ज्या कामचलाऊ कायद्यासाठीं हॉर्निमनना हद्दपार करण्यांत आलें तो कायदा आज अस्तित्वांत नाहीं हें कबूल करतानां गृहमंत्री सर मॉरीस हेवर्ड हे पासपोर्ट—ॲक्टकडे बोट दाखवितात; पासपोर्टचे नियम सर्व साम्राज्यांस लागू आहेत व हे अनादिकालापासून चालत आलेले नियम हॉर्निमनला हिंदुस्थानासाठीं पासपोर्ट देण्याच्या आड येतात, असें गृहमंत्र्याचें ह्मणणें आहे. आज अस्तित्वांत असलेले पासपोर्टचे नियम पूर्वीपेक्षां बऱ्याच सौम्य स्वरूपाचे आहेत व ह्या नियमांत भयंकर असें कांहींच नाहीं, हें पहिल्यांदांच सांगून टाकलेलें बरें. मुख्य प्रश्न आहे तो ह्या नियमांच्या भाष्याचा; त्यांच्या लवचिकपणाचा फायदा घेऊन सरकारला आपल्या फायद्याकडे लक्ष्य देऊन तो साधण्यासाठीं भाष्य करणें अशींतच कठीण नाहीं. ह्या नियमाखालीं कोणत्याहि व प्रत्येक माणसास राजकीय चळवळी 'भयंकर' व ह्मणून undesirable ठरवून त्याच्या एका देशांतून दुसऱ्या देशांत जा ये करण्याच्या स्वातंत्र्यास आळा घालतां येईल. हें 'अनडिझायरेबल' लोक कोण असतात, हें सुद्धां पोलिसांनीं ठरवावयाचें असतें. हें ठरविण्यांत ह्या देशाच्या नफ्यातोट्याचा, हिताहिताचा प्रश्नच निघत नाहीं. तसें नसतें तर हिंदुस्थानचें मीठ खाऊन वर दुसऱ्या देशांत त्याच्या संस्कृतीचीं धर्माची व राजकारणाची बदनामी करण्याचा ज्यानीं आपला धंदा केला आहे अशा माणसांना ह्यापूर्वीच 'अनडिझायरेबल ठरविण्यांत आलें असतें. हॉर्निमनच्या गैरहजिरींचा क्षुद्र फायदा घेऊन ह्या सरकारी सभासदांनीं व हिंदुस्थानांतील इंग्रजांच्या प्रतिनिधीनीं त्यांच्या नैतिक आयुष्यावर वाटेल ती टीका केलेली आहे. विशेषतः मुंबईच्या गृहमंत्र्यानीं ह्या बाबतींत पोलीस रिपोर्ट वाचून दाखवून आपला अनुदारपणा प्रकट केला आहे. हॉर्निमन साहेब हे हिंदुस्थानांतील इंग्रज समाजांत एवढे अप्रिय कां झाले होते, हें समजणें फारसें अवघड नाहीं, ही एकच गोष्ट त्या समाजाच्या घटकांबद्दल योग्य कल्पना आणून देतें पण ज्याला ह्मणून इंग्लंडांतील इंग्रज समाजाविषयीं खरी माहिती आहे त्याला निदान वरील विधान खरें समजल्यास हिंदुस्थानांतील इंग्रज समाज व इंग्लंडांतील इंग्रज समाज ह्या दोन वस्तूंत कांहींच साम्य दिसणार नाहीं, हें कबूल करणें भाग आहे. इकडील समाज नैतिक दृष्टीनें निर्दोष व देवदूतांनीं बनविलेला असला तरी इंग्लंडांतील इंग्रज समाज (आयरिश सुद्धां धरून) मानवी आहे. त्यांत सर्व जगास अभिमान वाटण्यासारखीं रत्नें आहेत; कुत्र्याचें आयुष्य कंठण्याचें कर्मठपण कुचकामीं व खऱ्या सुधारणेच्या आड येणाऱ्या ध्येयांना मान नमविण्याचें त्यांनीं हजारदां नाकारलें आहे; व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्वासाठीं वाटेल ते हाल सहन करण्याचें प्रसंगीं मरण्याचें सुद्धां त्यानीं पत्करलें आहे. हॉर्निमनना सरकारी आश्रयानें व खर्चानें इंग्लडांत पोंचविल्यावर कांहीं दिवसांनीं त्यानीं लिहिलेले 'अमृतसर व आमचें हिंदुस्थानसंबंधी कर्तव्य' हें पुस्तक त्या वेळीं 'किशर अनाविन' ह्या प्रख्यात इंग्लिश कंपनीनें प्रसिद्ध केलें. हॉर्निमन विरुद्ध लोकमत जर एवढें तीव्र होतें तर हें पुस्तक छापून प्रसिद्ध करण्याचें धाडस कोणीहि दाखविलें नसतें. तेव्हां हिंदुस्थानांतील इंग्रज समाजानें हॉर्निमनसंबंधीं दिलेला निकाल सर मॉरास हेवर्ड यांच्या नीतिशास्त्रावरील व्याख्यानाएवढाच अढळ व शेवटचा समजला पाहिजे.

कालाच्या लाटेवरोबर पोर्तुगालांत रिपब्लिक झालें व त्याच कालाच्या करणीनें गोव्यांत आवतोनोमी प्रगटली. याचा अर्थ मानवी हक्कांचीं जाणीव झाल्यामुळें व्यक्तिस्वातंत्र्य देण्यांत आलें असें मात्र मुळींच नव्हे, व ह्मणूनच रिपब्लिकच्या लोकशाहींत देखील मागील जुलुमाचे व अन्यायाचे वण पुसून गेले नाहींत. हिंदुजनतेवर आजच्या रिपब्लिकन पोर्तुगीजांच्या बापजाद्यानीं चारशें वर्षें पर्यंत जी सैतानी धर्मांधतेची तरवार अखंड चालविली होती, त्यामुळें हिंदुधर्म व हिंदुलोक घायाळ होऊन गेले होते. त्या जखमा आज मितीला सुद्धां गोव्यांत दिसत आहेत ह्मणूनच रिपब्लिकच्या मलमपट्टीचा त्यावर फारसा उपयोग झाला नाहीं. पण रिपब्लिक हें खरें खुरें आस्ते आस्ते जखम बरें करणारें मलम आहे हें जाणून त्याचा योग्य उपयोग शिल्लक राहिलेल्या ३ तीन लाख हिंदूनीं केल्यास त्यांनां सुखाचे दिवस खास येतील अशा आशेनें हा लेख लिहिण्यांत येत आहे.

आह्मां हिंदूंची संस्कृति धर्म व भाषा यांचा नायनाट करण्याचा प्रयत्न पोर्तुगीजांकडून कसा कसा केला गेला याचा इतिहास फारच बोधप्रद असल्यानें, त्याचें चर्वित चर्वण होईल तितकें थोडें आहे-

सोळाव्या शतकांत पोर्तुगीज लोकांनीं गोवें प्रांत तरवारीच्या जोरावर जिंकून घेतला खरा परंतु त्यावेळीं त्यांस मराठ्यांच्या मदतीनें गोमांतकस्थ हिंदु लोकांकडून हांकून लाविलें जाण्याची फार भीति होती. पोर्तुगीजांची इच्छा तर आपलीं पाळें मुळें या देशांत दृढ करण्याची होतें; तेव्हां त्यानीं असा विचार केला कीं आपणास जर या देशांत कायमचें राहावयाचें असेल तर या लोकांचा धर्म, भाषा व संस्कृति बदलून त्यांच्यावर आपला धर्म, आपली भाषा व आपली संस्कृति लादली पाहिजे; परंतु हें कृत्य फार कठीण होतें. हिंदु लोकांच्या समवेत जेव्हां त्यांनीं सारा कोंकण प्रांत प्रत्यक्ष फिरून पाहिला, तेव्हां त्यांनां असें आढळून आलें कीं, हिंदूंचा जमाव प्रचंड व धर्मश्रद्धा निःसीम आहे. शेकड्यानीं मोजतां येण्याजोगीं भव्य देवालयें व लाख लाख वस्तीनीं भरलेल्या जमावाच्या जत्रा पाहून त्या परकी देशाहून आलेल्या युरोपियनांचीं मनें थक्क झालीं. या साऱ्या हिंदूंचें धार्मिक स्वातंत्र्य तरवारीच्या जोरावर नष्ट करून व त्यांनां बाटवून ख्रिश्चन केल्याशिवाय आपली येथें धडगत नाहीं असें त्यांना स्पष्ट दिसून आलें आणि इतिहास आपल्याला स्पष्टपणें असें सांगतो कीं सोळाव्या शतकांत क्रूरपणाची कमाल झाली. हिंदूंना हिंदोळून टाकण्यांत आलें व धर्म श्रद्धेचीं धडगत नाहींसी झाली; हिंदु देवळानीं धुळीचें दिवे खाल्ले व त्याच जागीं क्रोसाच्या मुगुटानें मढविलेलीं ख्रिस्ती देवळें दृश्यमान होऊं लागला आजच्या दडपलेल्या दृष्टीला देखील हिंदु देवांच्या उरावर नाचत असलेली ख्रिस्ती देवळें चारी दिशेला असंख्य दिसत आहेत. जगताच्या पाठीवर धर्मांच्या बाबतींत जुलुमी ह्मणून मुसलमानाची कीर्ति आहे. परंतु सोळाव्या शतकांतील पोर्तुगीजानीं आपल्या जुलुमी वर्तनानें मुसलमानावरहि कडी केली. सोळाव्या शतकांतील कोंकणपट्टींत घडत असलेलें हें दृश्य अपूर्व होतें. हिंदु लोकांचा भोळेपणा देखील या काळीं परागतीला पोंचला होता. ख्रिस्त्यानीं घरावर गाईच्या अथवा डुकराच्या मांसाचा गोळा टांकला कीं घर बाटलें. विहिरींत भात किंवा पाव टाकला कीं सारे हिंदु बाटले. क्रॉसच्या पाण्याचा स्पर्श झाला कीं हिंदुत्व नष्ट झालें. अशा प्रकारच्या भोळ्या समजुतीनें पोर्तुगिजांच्या राज्य दृढिकरणाच्या प्रयत्नाला अप्रत्यक्ष मदतच केली गेली. ज्यांचा भोळेपणा या पेक्षां कमी होता असल्या क्षुल्लक व वरच्या कारणांनी ज्यांचें अढळ हिंदुत्व नष्ट होत नव्हतें त्यांनां तरवारीच्या धारेचें व मालमत्ता जप्तीचें भय घालण्यांत आलें. व मालमत्ता पाहिजे तर ख्रिस्ती व्हावें नाहींतर धर्म बचावून पळून जावें याशिवाय हिंदूना तरणोपाय उरला नव्हता. सारे हिंदु धर्मी हवालदील झाले. त्राता कोणीच उरला नाहीं. अशा वेळीं कित्येक आपला आवडता प्राणप्रिय धर्म टाकून देऊन ख्रिस्ताच्या नावावर विकं लागले व ज्या तेजस्वी लोकानां 'स्वधर्मे निधनं श्रेय' वाटलें, ते परागंदा होऊन रत्नागिरी कारवार, कोचीन कडे जाऊन राहिले. अशा रीतीनें सोळाव्या शतकांत पोर्तुगीजाच्या ताब्यांतील मुलखांत हिंदु शिरस्त्राण व हिंदुकळस दिसेनासे झाले आणि पोर्तुगिजांच्या सद्दीचा जोर साऱ्या ख्रिस्ती राष्ट्रांत बलवत्तर आहे असें ठरलें, पण सद्दीच्या जोराला तरी मर्यादा असते. पाद्रयाच्या जुलमाला त्यांच्या देशबंधूकडून आळा बसला व कांहीं वर्षांनीं येथील वातावरण बेंच निवळलें जुलमाचा जोर जिरून गेला. परागंदा झालेले लोक आस्ते आस्ते परत येऊं लागले व नवीन काबिजादींत जुन्या काबिजादींतील देवस्थानाची स्थापना झाली तरीपण स्वत्वाची जाज्वल्य ज्योत जी कमी झाली ती अजूनहि चांगल्या रीतानें प्रज्वलित झाली नाहीं.

नुसतें धर्मस्वातंत्र्यच हिरावून घेऊन पोर्तुगीज स्वस्थ बसले नाहींत. कारण ते फार धूर्त होते धर्म नष्ट झाला तर स्वदेशाभिमान व स्वभाषाभिमान नष्ट होत नाहीं हें त्यानां पक्कें ठाऊक होतें. आजसुद्धां अर्धे जपान धर्मानें ख्रिस्ती असले तरी 'निपोन' ह्मट त्याबरोबर अभिमानानें ज्यांच्या वृत्ति उचंबळत नाहींत असा एकहि जपानी आढळणार नाहीं. पोर्तुगीज लोक-त्या वेळचे पोर्तुगीज लोक हीं तत्वें पूर्णपणें जाणत होते ह्मणून त्यांचा **दुसरा हल्ला येथील भाषेवर झाला.** त्याच्या अनिष्ट परिणामांची चर्चा येत्या अंकीं करूं.

## स्फुट विचार

**अत्याचार:**—ह्मापसेंच्या पोलीस ऑफिसरानीं दोघां परदेशस्थ निरपराधी गृहस्थांवर आपल्या हडेलहप्पी जुलुमांचें शस्त्र चालविल्याचें प्रसिद्ध झालें आहे. पराक्रमीं पोलीसांचें हें पहिलेंच शतकृत्य आहे, अशांतला प्रकार नाहीं. किंबहुना सदरील कृत्यासारख्या कृत्यांना जन्म देण्यासाठीच आपला जन्म आहे, अशी त्या खात्याची समजूत झाल्यासारखी वाटते! कांहीं ठिकाणचे पोलीस लोक वगळले, तर इतर सर्व ठिकाणच्या त्या लोकांत जुलमाच्या बाबतींत एकसूत्रीपणाच आढळून येत असतो. जुलुम निस्तरण्यासाठीं अवतरलेल्या खात्यानेंच आपल्या जुलुमी कारभारानें निरपराधी व असहाय्य लोकांवर जुलुमाची नंगी तरवार चालवावी, याचें परकीयांना आश्चर्य वाटेल; परंतु ज्यांना येथील अंतस्थ कारभाराची 'अंदरकी बात' अवगत आहे, त्यांना त्यांत विशेष नवलाई आढळून येणार नाहीं!

**तिजोरीची तूट:** — भरदिवसा चालविलेल्या लुटीच्या कारभारामुळें, तिजोरीला तुटीचें भगदाड पडलें. हें भरून निघण्यासाठीं सरकारनें करभारानें लोकांची रेवडी उडविली. परंतु पथ्य सांभाळण्याचे बाबतींत पूर्ण डोळेझांक केली गेल्यावरून, करभाराचा जालीम उपाय अखेर निरुपयोगीच ठरूं पहात आहे. ! लूट बंद झाल्याखेरीज तूट बंद कशी होईल? लुटीला खाट दाखविल्याशिवाय, तुटीला आपली वाट सुधरण्याची केव्हाच इच्छा होणार नाहीं, हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट आहे. लुटीची विल्हेवाट लावल्यानंतर, मग पुढच्या सर्व गोष्टी. जंगलची सुधारणा, नवीन काबिजादींतील लोकाची आरोग्य सुधारणा, शेतकी सुधारणा इत्यादि सुधारणानीं गोव्याची सांपत्तिक स्थिति भरभराटेल. पण केव्हां? ज्यावेळीं लुटीच्या कारभाराला कायमचा आळा पडेल तेव्हांच. जोंपर्यंत लुटीचें कारण आपला नंगा नाच नाचत राहील, तोंपर्यंत तुटीचें कार्य नष्टप्राय होइल, अशी आशा करणें ह्मणजे थंड पाण्याच्या अखंड धारेनें पेटलेला अग्नि प्रदिप्त करण्याची वेडी महत्वाकांक्षा बाळगण्यासारखेंच होय. तात्पर्य तुटीचा संबंध लुटीशीं संलग्न असल्यानें लूट मेल्याशिवाय तूट मरणार नाहीं, हें उघड आहे.

—नेरुल येथील एक कुटुंब ख्रिस्ती देवळांत प्रार्थनेसाठीं गेल्याची सवड साधून चोरांनीं सुमारें एक हजार रुपयांचा माल लांबविला. पोलीसांचा ऐदीपणा. दुसरें काय?

Ano 9° N. 6

Quinta-feira 1 de Maio de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegde Dessay
Quepem-Goa

# भारत.
BHARAT.

वर्ष ९ वें. अंक ६

गुरुवार ता. १ मे सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. ( आगाऊ )

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हगेडे देसाई.
केंपे—गोवा.

Biblioteca Nacional Pangim

## "Colonial distinto"

Enquanto a nossa autonomia continuar a ser um ludibrio que ela hoje e', da boa ou ma' admistragao do pais sera' sempre e totalmente responsavel a primeira autoridade da provincia, do seu talento e boa vontade dependendo a marcha regular ou anormal dos negocios publicos.

Na India, e' certo, existe firmada, como em colonia alguma lusitana, a tradigao da influencia das "moscas palatinas" que ordinariamente sao os chefes dos servigos que pelo seu contacto directo e constante exercem uma acgao decisiva na orientagao e actos do governo, quando quem governa seja, por temperamento, um impressionavel ou seja um homem sem cultura e tino necessarios para guiar se so', distinguindo, sem pressao ou influxo de fora, o que convem e do que e' prejudicial para o bemestar dos povos cujo distino lhe esta' confiado.

Felizmente para no's, o sr. dr. Jaime de Morais, a quem, vai para cinco anos, esta' entregue esta colonia vinha com fama justa de homem talentoso, culto e dotado de senso administrativo bastante para olhar pelo governo de uma *nesga da terra* como e' ao presente, o dominio portugues no Industao, nessa tam pobre e insignificante terra que pelo criterio administrativo britanico seguido na India, daria quando muito, para um simples *collectorate*. Felizmente para no's tambem as moscas palatinas por estes tempos sao tam pacatas e inofensivas que estam bem longe de perturbar o socego de s. exia., turvando lhe a nitida visao de homens e coisas.

Assim, o momento governativo do sr. dr. Jaime de Morais foi um momento feliz e propicio e para tanto, nao lhe faltou sequer o apoio incondicional do Conselho Legislativo, apoio que, embora de facto dispensavel tem, para os olhos do publico que ve de fora—pois os de dentro estam scientes e edificados—o merito de incuicar que s. exia. nao so' governa mas *governa com o povo*.

Efectivamente o momento era propicio para sua excia. e isto fez a felicidade de sua excia. No entanto e no que diz respeito a' felicidade de no's outros,—tudo continua como dante, quanto a *governar*. E quanto a *desgovernar* tem se ido tam longe e tam vertiginosamente que ja' estamos no ......abismo. Pois o abismo para os povos nao e' a morte, porque os povos nao morrem, mas e' uma vida de privagoes, dores e agonias e esta ja' comegou para esta terra.

Dir se-ha pela centessima vez—la' das bandas dos turibularios — que s. exia nao tem a responsabilidade do que se passa, e que esta pertence aos *Amanuenses do Terreiro do Pago*. Ninguem, como no's, detesta, tendo a condenado varias vezes neste jornal, a acgao do Terreiro do Pago, venha ela dos *amanuenses* ou de quem quere. Mas se esta acgao e' tam poderosa que contra ela nada podia e avangava o sr. dr. Jaime de Morais, que e' como deixamos dito atraz, o unico que de facto governa a India, devia ter em tempos abandonado o lugar, como o fez, na identidade de circunstancias, o sr. Major Leite de Magalhaes no Cuanza do Sul, Angola.

Nao fez isto. Pelo menos, verificado que o Terreiro so' lhe permitia langar os impostos e criar logares, adoptasse uma atitude que seria mais comoda a s. excia e menos ruinosa aos governantes, qual e' a de nada fazer S. Excia nem assim procedeu.

Resultado. O sr. dr. Jaime de Moraes, agora, quase ao terminar a sua comissao na India, apresenta aos olhos do observador imparcial—o pais sem nenhuma obra de utilidade material ou moral a mais; os empregados descontentes; e os contribuintes exhaustos. Em suma ... tudo mal. Tudo, nao. So' os grandes funcionarios e os grandes proprietarios e' que folgam.

Teria o sr. dr. Jaime de Morais empregado todo o seu talento, toda a sua cultura, todo o seu senso administrativo, em resumo todas as suas invulgares faculdades de *Colonial distinto* em beneficiar os grandes?

### EMENDA E SALTO

No "Narrativas Eloquentes" publicado neste jornal na ultima edigao, onde se le "foi a China que inventou a palavra" leia se "foi a China que inventou a palavra". Ha ai mais esca pos de revisao; mas de facil emenda.

Por descuido de compaginagao, saiu nos "Ecos & Critica" a correspondencia do Mandovi de A. V. dirigida ao sr. Director dos Servigos de Instrugao. Desta falta pedimos desculpas ao s. A.V.

## Ecos & Critica

### CRITICA...NACIONALISTA

Um tal DOITOR C. Mascarenhas pretende, a seu modo, fazer CHACOTA das ideas nacionalistas dalguns indios, residentes em Lisboa.

O mesmo DOITOR nao encontra na da de bom no procedimento dos referidos, procedimdnto que acha feio.

Mas, o' DOITOR, quem e' que mandou falar em um assunto que mostra nao conhecer nem superficialmente?

Outro oficio, doitor!

### BEM HAJA

No seu artigo "Congressos," a "Provincia" do sr. Pereira Batalha diz que os indios sao "assim e assado; que lhes falta isto e mais aquilo.

A "Provincia" tem razao. E, se a pesar de tantos "defeitos" e "vicios" a India respira, e' devido aos titanicos —e nao satanicos — esforgos da empreendedora e desinteressada classe dos europeus que nos abriram os olhos a' civilisagao, tirando-nos do "charco" de selvageria.

O proprio sr. Pereira Batalha ¿quantos sacrificios nao fez para por em ordem o nosso servigo telegrafo. postal?

Todos os europeus que ca se encontram trabalham, unicamente, para felicitar esta terra da qual nada absolutamente nada recebem.

A "Provincia" tem, pois, razao. Efectivamente, os filhos da India sao imprestaveis; e, se nao fossem os europeus, a sua desgraga seria certa ... infalivel.

Bem haja, pois, uma tao "santa" classe!

### BOM PROVEITO

A "India Portuguesa" de Majorda ficou desgostosa com a nossa local "Graxa" e no auge do seu profundo desgosto sinifica que, se no's atacamos o sr. dr. Jaime de Morais, e' porque esse senhor desapontou-nos ... e que a nossa critica nao se firma na logica.

Ve-se, portanto, que nao so' e' livre a graxa, mas tambem livre e' o disparate, a asneira que outra coisa nao e' a "lo'gica...gregoriana" da folha majordense.

¿Com que, entao, julga que o desapontamento e' a causa da nossa oposigao ao seu idolo?

¿Como, quando e em que o "Bharat" foi desapontado pelo sr. Governador Geral nao nos dira'?

Quanto a' lo'gica, leia o reverendo o nosso artigo de fundo da presente edigao.

## GENERALIDADES IRRITANTES

Sentado em Lisboa, o sr. dr. C. Mascarenhas, todo empertigado na sua casaca e luva branca, atira-se com a sua furia de 500 anos de ocidentalisado contra os "ecos" dum artigo que dois amigos seus deram causa a um *chinfrim* da parte da imprensa indo-portuguesa. Fes mal o sr. dr. Constancio de nao ler o artigo dos amigos e de se adeantar fazendo consideragoes de toda especie numas generalidades, num criterio onde ha' absoluta falta de conhecimento de tudo que se relaciona com o grande movimento que esta' a convulsionar a India e prender atengoes de todas cabegas pensantes do mundo!

Apo's um preambulo ligeiro sobre o "eco" do artigo em questao diz o ilustre articulista: "sao pessoas que vivem uma vida que vale por si so' o desmentido formal do nacionalismo indiano: nao vestem *swadeshis*, nao usam o *gandhi cap*, nao se perfumam com *zaios*, e interpretam os mestres da musica europeia."

Em levar uma vida pacata, porque todos nao dispoem de meios, nao importa desmentir o sentimento duma alma que anceia por ver livre o solo sagrado da sua patria; e nem e' necessario usar fatos *swadeshis*, e o *gandhi cap* para se manifestarem pelo nacionalismo indio, pois antes destes factos, havia indios francamente defendendo as ideas liberais duma India livre!

Numa ingenuidade unica cita o sr. dr. Mascarenhas Romain Rolland e varios outros autores europeus que tem tratado do assunto, dando causa a "desencontradas opinioes."

Nao sabemos porque ocultou os nomes doutros autores e nao cita as suas opinioes, distringando-as, dando a cada um da sua justiga e tirando a conclusao lo'gica dos livros de Rolland e doutros que afirma ter lido.

Neste caso haviamos de ver como e' que influiram estes livros no grande numero de rapazes da India, que se encontram em Portugal" andando pelas ruas, gesticulando e falando o concanim!

Com a responsabilidade dos diplomas que o sr. dr. acarreta tinhamos di-

असें पुटपुटून स्वतःचें समाधान करावें लागलें. बैठकीस स्त्रिया हजर असतानां निदान ह्या शब्दाचा उपयोग करण्यांत येऊं नये असें प्रतिपादण्यांत तरुण ( मेहतांचें नक्की वय मला माहीत नाहीं, पण तरुण ह्या शब्दाचा व्यापक अर्थ आहे. त्या अर्थानें व श्री. मेहता हे दिसण्यांत आनंदी व ओंठांवर नेहमी निर्दोष, जवळ जवळ बालीश हास्य असलेले असे दिसतात, ह्मणून ह्या शब्दाचा उपयोग क्षम्यच ठरेल ) मेहतांनीं दाखविलेल्या स्त्रीदाक्षिण्याबद्दल व कित्येकदां रुक्ष वाटणार वादविवाद कमी कंठाळवाणा वाटण्यास मदत केल्याबद्दल कोणीहि त्यांचें कौतुक व अभिनंदनच करील. पण त्यांची तक्रार मात्र खरोखरच अकारण होती. हें कोणासहि कबूल करावें लागेल.

दुर्दैवानें ह्या दुसऱ्या प्रसंगांविषयीं मात्र तसें ह्मणतां येणार नाहीं. ब्रिटिश पार्लमेन्ट मध्यें असले अनुचित व अभिरुचीला वाईट दिसणारे प्रसंग वारवार घडंत नाहींत. व क्वचित प्रसंगीं घडल्यास त्याबद्दल सर्वांसच वाईट वाटतें. पार्लमेन्टरी वादविवादाचे व सभ्यपणाचे नियम एवढे कडक असतात व ते कोणत्याहि परिस्थितींत मोडले जाऊं नयेत ह्याबद्दल एवढी काळजी घेण्यांत येते कीं भांडणाच्या गर्तींत स्वतःस किंवा त्यांस विसरल्यास गुन्हेगार सभासदास जब्बर दंड द्यावा लागतो. कांहीं दिवसांपूर्वी कित्येक स्कॉटिश सभासदांना कडक व अनुचित भाषा वापरल्याबद्दल त्या मंडळांत बसण्याची बंदी करण्यांत आली होती. त्यानंतर एका मजूर पक्षाच्या सभासदानें दुसऱ्या एका सभासदावर हात टाकला होता, त्यालाही अर्थात योग्य ती शिक्षा करण्यांत आली होती. शारीरिक आडदांडपणाचें (Rufflanism) अशा ठिकाणीं केलेलें प्रदर्शन सुसंस्कृत माणसांस नेहमीच अनुचित वाटणार. शारीरिक किंवा मानसिक स्वरूपाचा आडदांडपणा आजच्या सार्वजनिक आयुष्यांत व राजकारणांत (इटलीकडे पहा) नाहींसा झालेला नसला किंवा त्याच्या मुळाशीं कोणताहि सदहेतु असला तरी त्याला उत्तेजन देणें योग्य होणार नाहीं. ज्या माणसांना वेळीं प्रसंगीं स्वतःच्या मनोवृत्तींवर ताबा ठेवतां येत नाहीं व स्वतःच्या जबाबदारीची जाणीव रहात नाहीं, अशानां असल्या प्रातिनिधिक स्वरूपाच्या संस्थांत बसण्याचा हक्कच नाहीं, मग ते लोक कायद्यानें प्रस्थापित झालेल्या एखाद्या राज्य पद्धतीचे प्रतिनिधि असोत किंवा बेकायदेशीरपणाकडे व असनदशीरपणाकडे कल असलेल्या लोकांचे प्रतिनिधि असोत.

ब्रिटिश पार्लमेन्टांतील वरील सभासदांचें उदाहरण आमच्या 'पार्लमेन्टांत'–दिल्लीच्या ॲसेंब्लींत व प्रांतिक कौन्सिलांत–गिरविल्यास काय देखावे दिसतील ह्याची कल्पना करा. मुंबई कौन्सिलांतील पुण्याचे श्री. गुंजाळ हे उद्यां एकाद्या गुरगुरणाऱ्या 'मौलाना'स चीड येण्यासारखें भाषण करतील व मग गुंजाळा सारख्या काफिरानां एकजात कापून काढण्यास आधार दाखविणारे 'फतवे' निघतील. (खुद्द म. गांधी 'काफिर' ठरतात असें सिद्ध करण्याचा एक प्रयत्न क्रॉनिकल पत्राच्या विद्वान संपादकांनीं कुराणांतले आधार दाखवून त्या पत्राच्या ता. १२ च्या मुख्य लेखांत खोडून काढला आहे ) ॲसेंब्लीमध्यें ले. क. गिडने [ॲंग्लो–इंडियन वगैरे ज्ञातीचे प्रतिनिधि] श्री विठ्ठल भाई पटेलाची पिंगळी दाढी हलवून, बॅ. साहेब इंग्लंडांत असतांना ते स्वसंरक्षणाची (बॉक्सिंग सारखी ) उपयोगी कला शिकले नाहींत ह्याबद्दल त्यांना पश्चाताप करावयास लावतील. अशा गोष्टी घडणें अशक्य आहे असें समजूं नका. मोठ्या शहरांतील कॉर्पोरेशन पासून थेट दिल्लीच्या कौन्सिल ऑफ स्टेट पर्यंतच्या सर्व संस्थांत पार्लमेन्टचें अनुकरण करण्यांत येत आहे. हें अनुकरण निर्दोष व पूर्ण कसें होईल ह्याकडे सर्वांचें लक्ष लागलेलें असतें व त्या दिशेनें त्यांचें प्रयत्नाहि चाललेले असतात. बोलण्यांत चालण्यांत, हालण्यांत, एकंदर सर्व गोष्टी पार्लमेन्टरी कसास लागल्या पाहिजेत. एका सभासदानें दुसऱ्या सभासदाविषयीं बोलतानां सन्माननीय सभासद अमुक किंवा माझे मित्र सन्माननीय सभासद तमुक हे ठराविक शब्द वापरले पाहिजेत; त्याच्या प्रत्येक वाक्याची सुरवात 'सर' ह्या शब्दानें झाली पाहिजे; दररोजच्या व्यवहारांत ज्या गोष्टी पांच दहा शब्दांत सांगतां येतील त्या सांगण्यास त्यांच्या तिप्पट शब्दांचा उपयोग केला पाहिजे. पार्लमेन्टरी भाषा वापरण्यास किंवा 'पार्लमेन्टरी रीति रिवाज पाळण्यास कोणीहि माणूस हरकत घेणार नाहीं. पण पार्लमेन्टरी कपडे वापरण्यास हिंदी देहांना विशोभित दिसणारे, व्यक्तीची अभिरुचि ध्यानांत न घेणारे असे कपडे आपल्या खांद्यावर टांगण्यास हरकत घेणें योग्य होईल. उद्यां जर जपानीं झगे 'पार्लमेन्टरी ' ठरविले व ते घालून कौन्सिलांत व ॲसेंब्लींत बसण्याची सूचनावजा विनंति त्या त्या मंडळांच्या सभासदांस केली गेली तर सध्या खादीचे साधे व सोईस्कर कपडे वापरणाऱ्या 'स्वराजिष्टां' चें त्याला काय उत्तर मिळेल ? श्री. दास, नेहरू व स्वराज्य पक्षाचे दुसरे पुढारी आपली खादी, महाराष्ट्र–सांप्रदायाचे श्री. केळकर आपल्या निळ्या खादीचा व लठ्ठ सुती बटणें असलेला कोट, श्री. भोपटकर आपली भगवी टोपी टाकून देऊन, हे 'पार्लमेन्टरी' झगे घालतील, ही कल्पना जेवढी विचित्र आहे तेवढीच अशक्य आहे. ह्या गृहस्थांची कायदे मंडळांतील वर्तणूक पहाण्याची ज्यांना संधी मिळाली आहे अशांनाच फक्त त्यांनीं त्या ठिकाणीं दाखविलेली तीव्र बुद्धिमत्ता, वादविवादांत कौशल्य, औदार्य, सभ्यपणा वगैरे गुणांनीं त्यांच्या शत्रूंच्या अपेक्षा व तर्क कसे खोटे ठरविले, ह्याची कल्पना येईल. ह्या माणसांच्या मतांचा व त्यांनीं केलेल्या कामाचा प्रश्न अप्रस्तुत आहे.पण हे लोक केव्हांहीं चांगले 'पार्लमेंन्टरीयन ' ठरतील हें निर्विवाद आहे. विलायती ' मॉर्निंग ' किंवा ' इव्हीनिंग ' ड्रेसांत आपले निर्जिव व निस्तेज अवयव लपेटून, दास्यवृत्तीचें लाजिरवाणें प्रदर्शन करणाऱ्या हिंदी प्रतिनिधींपेक्षां हे मूर्तिभंजक स्वराजिष्ट कोणत्या बाबतींत कनिष्ट ' पार्लमेंन्टरीयन ' ठरतील हें त्यांचे निंदक दाखवून देतील काय ?

तरीपण, कौन्सिलांत ह्या ' पार्लमेंन्टरी आडदांडपणाचा प्रसंग आल्यास काय करावयाचें ? माझ्या मतें ह्या प्रश्नास एकच उत्तर आहे. व मी तें नम्रपणानें सूचवितों. शारीरिक आडदांडपणा आपण निर्बल केला पाहिजे सभ्य माणसाच्या अंगावर हात टाकणाऱ्या आडदांडाचे हात एकदां आपल्या अंगावर पडल्यावर पुन्हा ते उचलले जाणार नाहींत असा यशस्वी प्रतिकार आह्मीं केला पाहिजे स्वसंरक्षणाची कला आपण शिकली पाहिजे. आपण आपलें पुरुषत्व अशा रीतीनें प्रगट केलें पाहिजे कीं, आडदांडभ्याडानां आपले हात व जिभ अयोग्य रीतीनें वापरण्यास छातीच होऊं नये. द्रोणाचार्यांप्रमाणें आह्मांसहि उत्कृष्ट ब्राह्मणाचें व क्षात्र्याचें केंद्र स्वताच बनविलें पाहिजे.

---

## प्रा. संघ व रजिस्त सिव्हील

प्रागतिक संघाच्या जनन, मरण, विवाहादि नोंदणी सुधारणा कमिटीस आपल्या लोकमान्य वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाल्याप्रमाणें, मला कांहीं सुचलेल्या अडचणी आपल्या पत्रांत प्रसिद्ध करून व सदरील कमिटीस विचार विनिमयास जागा द्याल अशी आशा आहे. पैकीं पहिली अडचण विवाहाच्या नोंदणींत दिसून येते ती हीच कीं, विवाह होण्यास १५ दिवसपूर्वी येदिताल प्रसिद्ध करण्यास लागतात व हे पंधरा दिवस झाल्यानंतर मग विवाहाची नोंद होणार. ही अडचण अनेक तऱ्हांनीं आह्मां हिंदूंस बाधक होते. विशेषतः मुहूर्त त्या १५ दिवसानंतर मिळालाच पाहिजे, नसल्यास आमच्या धर्माप्रमाणें विहोणें शक्य नाहीं. ह्मणून हीं येदितालांची घातक होणारी कायद्याची अडचण दूर करण्यास वरील प्रागतिक संघाच्या कमिटीनें सुधारणा घडवून आणावी. विवाहास त्या येदितालांची गरज कशाला ? ते येदिताल नसतांना नोंद करण्यानें काय होतें ? यापूर्वी प्रत्येक गांवच्या रेजिदोर याजकडे ही नोंद करण्याचें काम होतें त्यावेळीं कोठें ह्या येदितालांची कायद्यानें अंमलबजावणी होती व त्यावेळच्या नोंदणी काय बेकायदेशीर होत्या? ह्या येदितालांच्याच सुळसुळाटानें रेजिस्त सिव्हीलाच्या नोंदणीस फारच पैसे भरावे लागतात. व ह्याच अडचणीमुळें लोक ब्रिटिश हिंदुस्थानांत जाऊन विवाहाचें कार्य उरकून घेतात. आह्मीं हिंदुलोक नव्हे पोर्तुगीज हिंदुस्थानांतील सारीच प्रजा नोकरशाहीनें केलेले नवे निरनिराळे कर मुकाट्यानें सहन करतों यावरून नोकरशाही आह्मीं सांपत्तिक दृष्टीनें फार सुखी आहोंत असें समजतें. तरी सदरील येदितालांची गरजच नसावी अशा विषयींचें बिल कायदे कौन्सिलांत आणण्याची खटपट करून तें पास करून घेण्याची चळवळ करावी व प्रत्य तो प्रागतिक संघ असें ह्मणून घेण्यास चुकूं नये. अशा प्रकारचें काम केल्यानें संघास सभासदांचें बळहि मिळेल. वरील येदितालांमुळेंच विवाह नोंदणीस खर्च अधिक येतो तरी ते काढूनच टाकण्याची खटपट करावी किंवा ते येदिताल नुसत्या साध्या फोलीवर तरी करावे ह्मणजे जनतेच्या पैशांचा चुराडा न होतां प्रजा थोड्या सुखानें तरी आपला उदर निर्वाह करील.

रघुनाथ शंकर कुळकर्णी.
मुकाम धारगळ–गोवा.

---

## वर्तमानसार

—येथील जज्जांची बदली मडगांव येथें होणार असून, मडगांवच्या न्यायाधिशांची रवानगी आफ्रिकेंत होईल, असं कळतें.

—शेतकी खात्याची नवी संघटना अमलांत येणार असून, या संघटनेनुरूप तीन नवे 'केळकर' आणण्यांत येतील. उपरिनिर्दीष्ट संघटनेनुरूप एकंदर गोमांतकाचे तीन भाग करण्यांत आले असून, तिसवाडी, बार्देस व पेडणें यांचा पहिल्या भागांत, फोंडें, सांखळी सत्तर प्रांत व उत्तर सांगें यांचा दुसऱ्या व सासष्टी, मुर्गांव, केंपें काणकोण व दक्षिण–सांगें यांचा तिसऱ्या भागांत समावेश करण्यांत आला आहे.

—डॉ० रुद्रीग रुद्रीगीस, माकाव येथील गव्हर्नर यांस पोर्तुगीज हिंदुस्थानचे प्रांताधिपति नेमण्यांत येईल असें ह्मणतात.

—( बाळकृष्ण मार्तंड चौंडे यांजकडून ) ह० भ० प० दामोदरबुवा रिसबूड हे आज १२–१५ वर्षें गोवर्धन संस्थेसाठीं अथवा तिच्या गोरक्षण ज्ञानप्रसारक संघशाखेसाठीं मदत मिळविण्याचें काम प्रचारक या नात्यानें करीत असत. परंतु गेल्या १ । १॥ वर्षांपासून संस्थेशीं त्याचा प्रचारक या नात्याचा असलेला संबंध सुटला आहे. सबब गोवर्धन संस्थेसाठीं त्याचेकडे कोणी परभारें मदत दिल्यास संस्था त्याजबद्दल जबाबदार नाहीं. सांप्रदायिक कार्यासाठींहि माझा त्यांचा संबंध जाणून कोणी मदत देऊं नये.

—गल्या महिन्याच्या ३ तारखेपासून म० गांधींनीं 'यंग इंडीया' व 'नवजीवन' या पत्रांचें संपादकत्व आपणाकडे घेतलें.

—येत्या वर्षाच्या मार्च महिन्यापासून मद्रास इलाख्यांत सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा अमलांत येणार आहे.

—गेल्या रविवारीं गोवा हिंदु मंडळाची एक समेट सभा ह्मापसें येथें भरावयाची होती.

—से. मासकारेंजस नावाच्या एका डॉक्टरानें हिंदी संस्कृतिविरुद्ध आपल्या अकलेचे तारे तोडले असून पाश्चिमात्य सुधारणेची महति गाइली आहे. भारताच्या पोर्तुगीज भागांत त्याच्या भ्रमाचा भोपळा फोडण्यांत आला आहे.

—बनावट नोटी तयार केल्याबद्दल अबदूल अल्ली नावाच्या एका मुसलमानास मुंबई येथ तीन वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावण्यांत आली.